# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १४/०६/२००७

आज दि. १४/०६/२००७ रोजी दि. ०१/०६/२००७ व दि. ०८/०६/२००७ रोजीची मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकूब झालेली महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. २२/०५/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ७) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ८) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ११) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १२) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १३) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १४) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १५) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १६) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १७) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १८) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २०) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २१) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २२) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २३) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २६) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २७) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| २८) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| २९) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३०) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३१) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ३२) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३३) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ३४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ३५) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ३६) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ३७) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ३८) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ४०) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४१) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४२) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४३) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ४४) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ४५) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ४६) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ४७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ४८) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ४९) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५०) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ५१) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५२) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५३) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५४) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

## <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य़ |
| ५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| ८) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ९) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| १०) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ११) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १३) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| १४) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| १५) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| १६) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| १७) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| १८) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| १९) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| २०) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| २१) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| २२) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| २४) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| २५) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| २६) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| २७) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| २८) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| २) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |

(राष्ट्रीयगीत वंदे मातरम् नंतर महासभेला सुरुवात झाली.)

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

(नगरसचिवानी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, एक अभिनंदनाचा ठराव मांडू इच्छिते. मुंबईमध्ये सी.ई.टी. परिक्षा घेण्यात आली. त्या परिक्षेमध्ये मुंबई विभागामध्ये प्रथम आलेल्या उदित सराफ, तिसरा मजला, बालाजीधाम, शंकर मंदिराजवळ, भाईंदर यांच्याबद्दल मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सय्यद नुरजहाँ नझरहुसेन :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १६ :-**

मुंबईमध्ये घेण्यात आलेल्या सी.ई.टी. परिक्षेत मुंबई विभागामध्ये श्री. उदित सराफ, तिसरा मजला, बालाजीधाम, शंकर मंदिराजवळ भाईंदर हे प्रथम आल्याबद्दल ही सभा अभिनंदन करत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शहा.** **अनुमोदक :- श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, मला थोडे बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही विषयाला धरुन बोलत असाल तर तुम्हाला विषय संपल्या नंतर वेळ दिली जाईल.

**एस. ए. खान :-**

तुम्ही मी उठल्यावर मला विषयाबाबत विचारले आणि ह्याच्यापूर्वी चार मिटींगमध्ये दिवसभर चर्चा चालली होती. त्यावेळेला तुम्ही काहीही बोलले नाही आणि मी उठल्याबरोबर तुम्ही मला विषयाला धरुन बोला असे बोलता.

**मा. महापौर :-**

तुम्ही आता विषयाला धरुन बोला.

**एस. ए. खान :-**

परंतु, मला विषयाला धरुन ना बोलता दुसरे बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला नंतर वेळ दिला जाईल.

**एस. ए. खान :-**

जर मी विषयाला धरुन बोललो नाही तर तुम्ही मला मनाई करणार आहात का? तुम्ही मला तसे सांगा.

**मा. महापौर :-**

प्रथम विषयाला सुरुवात होउ दया. नंतर वेळ दिला जाईल.

**एस. ए. खान :-**

विषयाला सुरुवात झालेली आहे आणि हा विषय तीन सभांमध्ये झालेला होता.

**मा. महापौर :-**

तुम्ही प्रथम खाली बसा.

**एस. ए. खान :-**

तुम्ही मला एक सांगा की, जर कोणाला विषयावर बोलायचे असेल तर तुम्ही बोलायला देणार आहात की नाही. ते तुम्ही सांगा. मगच ती खाली बसतो. अन्यथा मी खाली बसणार नाही.

**मा. महापौर :-**

प्रथम विषयाला सुरुवात होउ दया.

**एस. ए. खान :-**

विषयाला सुरुवात झालेली आहे. आपल्या तीन सभा विषयांशिवाय आलेल्या होत्या. तुम्ही संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत कुठलेही विषय घेतलेले नव्हते. मी आता बोलायला उठलो. तर तुम्ही मला विषयावर बोला असे सांगता हे योग्य नाही. साहेब हा महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे मला दोन मिनिटे बोलण्याची वेळ दया.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, जर हा विषय महत्त्वाचा असेल तर तुम्ही यांना दोन मिनिटे बोलण्याची वेळ दया.

**एस. ए. खान :-**

मला या ठिकाणी असे विचारायचे आहे की, आपण या सदनामध्ये जे ठराव पारित करतो. त्या ठरावांपैकी प्रशासनाने किती ठरावाची अंमलबजावणी झालेली आहे? मला त्याची माहिती द्या. तुम्ही या सदनामध्ये रुलिंग देता किंवा कमिशनर साहेब डायसवर वरुन रुलिंग देतात. त्याची अंमलबजावणी करायची असते. मग तुम्ही सांगून सुद्धा ठरावाची पुर्तता करीत नाहीत. आपण फक्त सांगितले म्हणजे काम झाले असे काहीही नसते. मागच्यावेळेला कमिशनरसाहेबांनी कनकियाच्या एका साईडला रस्त्याचे काम चालु आहे आणि दुस-या साईडला मोठे मोठे खडडे पडलेले होते ते खडडे ताबडतोब भरण्यात यावेत. असे सांगितलेले होते. परंतु ते खडडे अजुन पर्यंत भरलेले नाहीत महानगर गॅस लिमिटेडवाल्यांनी खडडे करुन तेही होते परंतु अजुन पर्यंत पॅच वर्कचे काम चालु झालेले नाहीत आता पावसाळा जवळ आलेला आहे आणि आता पाउस सुरु झालेला आहे. आपण सदना मध्ये ठराव पारीत करायचे आणि त्याची अमंलबजावणी करायची नाही. मग त्याला काहीही अर्थ नाही. या बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एस.ए.खान यांनी विचारलेल्या संबंधित प्रश्नाचा प्रशासनाने खुलासा करावृ

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सदर प्रश्नाचा खुलासा करतो की,जो कनकियाचा रस्ता आहे आपण सिनेमॅक्स कडुन एका साईडचा रस्ता उंच केलेला आहे आणि आपले काम त्याच्यापुढे लक्ष्मी पार्क पर्यंत चालु आहे. दुसऱ्या बाजुला असलेल्या रस्त्याचे दुरुस्तीकरण करण्यात येत आहे.

**एस. ए. खान :-**

कमिशनर साहेबांनी ते रस्ते ताबडतोब भरुन घ्या असे सदनामध्ये सांगितलेले होते. कमिशनर साहेबांना सांगुन एक महिना झालेला आहे. काल तिकडे एक ॲक्सीडंट झालेले होते. तेथील एकही खड्डा भरण्यात आलेला नव्हता. मी काल तिकडे होतो.

**दिपक खांबित :-**

तेथील कामे सुरु केलेली नाहीत. फक्त खडी टाकुन खड्डे बुंजवलेले आहेत. तुम्ही कुठल्या रस्त्या बाबत बोलत आहात?

**एस. ए. खान :-**

कनकियाचा जो खाली साईडचा रस्ता होता. दुसऱ्या दिवशी तेथील खड्डे भरण्यांत यावेत असे कमिशनर साहेबांनी सांगितलेले होते.

**दिपक खांबित :-**

ते काम करुन घेण्यात येईल.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडमध्ये महानगर गॅस लिमिटेडवाल्यांनी जे खड्डे खोदलेले आहेत. त्यांनी कॉम्प्लेक्समध्ये आणि रस्त्यावर मोठमोठे खोदलेले आहेत. आता पावसाळा सुरु झाल्यावर कोणीही खड्डयात पडून मेला तर त्याला कोण जबाबदार राहिल?

**दिपक खांबित :-**

मिरारोडचे कन्टिन्यू कामे सुरु आहेत आणि जी कामे अर्धवट राहिलेली आहेत ती येत्या शनिवारपर्यंत पूर्ण करुन घेण्यात येतील.

**चंद्रकांत मोदी :-**

शांतीनगरमे रस्ते के बाजूमे जो खड्डा है उसका इसमे समावेश किया जाए ऐसी मेरी सुचना है।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी या ठिकाणी अशी एक सुचना मांडतो की काशी नाक्यावर ट्रॅफिक जाम होते. हे सगळ्यांना माहिती आहे. मा. आयुक्त साहेब, मा. महापौर, अन्य अधिकारी वर्ग, सगळे नगरसेवक, आम जनता आणि आम पत्रकार यांना हे माहिती आहे की काशिमिरा नाक्याच्या हायवेवर ट्रॅफिक जाम होते. आपण या सभागृहात चर्चा केलेली होती की घोडबंदरकडून बी.एस.ई.एस. कडे जाणारा जो रस्ता आहे. तो रस्ता येण्या-जाण्यासाठी चांगला करावा. आजच्या घडीला त्या रस्त्यावर काहीच नाही. त्या रस्त्याने तुमची आणि सगळ्यांची गाडी येते. परंतु, एक तातडीची बाब म्हणून तो रस्ता चांगला करणे आवश्यक होते. आपण बी.एस.ई.एस. कडून पुढे आल्यानंतर तिकडे जे दोन टर्न आहेत. त्या ठिकाणी गाडी टर्न घेउ शकत नाही. जे काम २४ तासाचे आहे. त्यासाठी दोन अडीच महिने झालेले आहे. या सभागृहात चर्चा झालेली होती. स्थायी समितीमध्येसुद्धा चर्चा झालेली होती. परंतु, त्याच्यावर कुठलीही कार्यवाही होत नाही.

**दिपक खांबित :-**

तो रस्ता चालू आहे.

**रोहिदास पाटील :-**

जिथे पाईपलाईनचे काम करायचे होते. तो रस्ता चालू आहे का? त्या ठिकाणी खांबे मारलेले आहेत. तिथे काय पोझिशन आहे? तिथे गाडी येउ शकते का?

**दिपक खांबित :-**

तिथे हेव्ही ट्रॅफिक डाउन आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्या कोपऱ्यात डब्ल्यू. एम. करायला पाहिजे. जेणेकरुन तिथून गाडी जाउ शकेल.

**दिपक खांबित :-**

आपण डब्ल्यू. एम. करु.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्हाला हे करण्याची कुठलीही अडचण नाही. परंतु, तुम्ही डब्ल्यू. एम. करित नाहीत. तुम्हाला तांत्रिक अडचण नाही. शिवाय तुम्ही रु. १० लाखाची कामे अवलोकनासाठी काढत असता. परंतु, गाडी येण्या-जाण्यासाठी अडचण होउ नये असे आमचे मत आहे.

**दिपक खांबित :-**

संबंधित काम मंजूर आहे. त्यामुळे हे काम करुन घेण्यात येईल.

**केशव घरत :-**

मी या संदर्भात बोलतो. तुम्ही त्या ठिकाणी पोल काढलेले आहेत. त्या खड्डया संदर्भात बोलत आहात. तिथून पाण्याचे मोठे टॅकर्स जातात म्हणून ते पोल काढलेले आहेत. आपली पाईपलाईन त्या ठिकाणी नेहमी लिकेज व्हायची म्हणून तो खड्डा तसाच ठेवलेला आहे. आम्ही नेहमी त्या रस्त्याने जातो. त्यामुळे आम्हाला जास्त त्रास आहे.

**दिपक खांबित :-**

तिकडे एक मोठा खड्डा आहे का?

**केशव घरत :-**

त्या ठिकाणी एक मोठा खड्डा आहे.

**दिपक खांबित :-**

तो खड्डा भरून घेण्यात येईल.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, आम्ही त्या रस्त्याने सकाळ-संध्याकाळ जातो. त्यामुळे आम्हाला त्याचा त्रास होतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम,फक्त माझीच गाडी त्या रस्त्याने येते असे नाही.तुमची गाडीसुध्दा रोज त्या रस्त्याने येते. जर काशिमिराला ट्रॅफिक जाम झाले तर आपण त्या बाजुला वळतो मग, तुम्ही तो येण्यासारखा रस्ता कराव एवढेच माझे म्हणणे आहे मग तुम्ही डांबर टाका किंवा काहीही करा. परंतु सर्व लवकर करा.

**दिपक खांबित :-**

फक्त कॉर्नरला जो खड्डा आहे तो दोन दिवसात त्याचे काम करुन घेतो.

**रोहिदास पाटील :-**

जे खड्डे असतील तर लवकर भरुन घ्या.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, शहरामध्ये जे ठिकठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत त्यासाठी आपले सर्व नगरसेवक त्या खड्डयांची दुरुस्तीची मागणी करीत आहेत. सन्मा. सदस्य एस.ए. खान हे अधिकाऱ्यांच्या विरोधात बोलले. मला अधिकाऱ्यांचा चांगला अनुभव आलेला आहे. उत्तन रोडपासुन राईपर्यंत चार ठिकाणी मोठे खड्डे पडलेले होते. आणि डोंगरीपासुन भुबंगला पर्यंत ३२ ठिकाणी स्ट्रेचेस पडलेले होते. परवा सिटी इंजिनिअर यांना सांगण्यात आले होते. मला याठिकाणी सांगायला आंनद होतो की, संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांनी २४ तासात खड्डे बुजवले तर मी त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मागील सभेमध्ये असा ठराव केलेला होता की, एस्सलवर्ल्डने जी कमान लावलेली आहे. त्याला भाडे आकारणी करण्यात यावी तुम्ही त्याला भाडे आकारणी करुन भाडे वसुल केली का? हा विषय महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या संबंधित आहे. आपण त्याला बिल पाठवणार होते. आपण त्याची चौकशी केली नाही. तर तुम्ही त्याची चौकशी कधी करणार आहेत?

**मा. उप. आयुक्त ( संभाजी पानपट्टे सो.) :-**

मा. महापौर मॅडम, यांच्या परवानगीने बोलतो की, आपण संबधितांना कर आकारणी केलेली आहे. त्यांना बिल पाठवलेले आहे त्याची वसुली पंधरा दिवसात होईल.

(सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी सभागृहासमोर प्रकरण क्र. ४५ च्या ठरावाचे वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मागच्या वेळेला ह्या सभागृहामध्ये डॉ. राठोड यांना लाचलुजपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी अटक केली त्यावेळेला औषधांचा भ्रष्टाचार झालेला होता हे सिध्द झालेले होते. हे सिध्द झाले असतांना सभागृहात सांगितले की, जी आपल्याकडे औषधे आली आहेत. ती बरोबर आहेत की नाही याचे प्रमाण कोण देणार? जर ती औषधे बरोबर असतील तर संबधीत अधिकाऱ्यांने उभे राहुन त्याबाबत खुलासा करावा असे सांगितले होते हे सर्व टेंपीग झाले पाहिजे. ही औषधे बरोबर आहेत आणि आम्ही येणारी औषधे सुध्दा बरोबर घेउ असे संबधीत अधिकाऱ्यांनी सांगितले पाहिजे आपण मागच्या वेळेला जे डास मारले होते आपण ते औषध बायर इंडियाचे घेतो असे बोललो होतो. ही औषधे बायर इंडियाचीच खरेदी केली जाणार आहेत. किंवा ही उच्च दर्जा ची कंपनी असेल तर त्या कंपनी कडुन ही औषधे खरीदी केली पाहीजेत. अशी त्या अधिकाऱ्याकडुन आम्हाला हमी पाहीजे.मग आम्ही त्या कंपनीची औषधे खरेदी करणार. आपण मागच्या वेळेला औषध फवारणी केल्यावर सर्व नगरसेवकांची तक्रार होती की, औषध मारल्यावरही मच्छर मरत नाही. तुम्ही आम्हाला प्रथम हमी द्या. आम्ही बायर इंडियाची औषधे खरेदी करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो.) :-**

मी याठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांना खुलासा करु इच्छितो की, हा विषय आरोग्य केंद्रासाठी लागणारे औषध आणि रेबीजसाठी लागणारे औषधासाठी आहे आणि मच्छराबाबतचा विषय नंतर येणार आहे.

**मिलन पाटील :-**

आपण ही औषधे वापरणार आहोत ती सुध्दा चांगली पाहीजेत. त्या औषधांचा पंधरा दिवसां नंतर ईफेक्ट होईल तशी औषधे आम्हाला नको आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी केलेली सुचना अतिशय योग्य आहे. हॉस्पीटल आणि आरोग्य केंद्रात येणाऱ्या औषधांचे परिक्षण झाले पाहिजे. ती औषधे योग्य आहेत की भेसळयुक्त आहेत याची पाहणी करुन आपल्या विभागाचे जे ऑफीसर आहेत, डॉक्टर आहेत ते प्रत्यक्ष त्याची पाहणी करुन, तपासणी करुन त्याची खात्री देतील. आणि तशाच प्रकारची औषधे आरोग्य केंद्रात उपलब्ध राहावीत. कारण नागरीकांच्या जिवाशी आपल्याला कुठल्याही प्रकारे खेळायचे नाही. यासाठी जागरुक राहुन ती औषधे चांगल्या दर्जाची मागवावीत. असे आदेश प्रशासनाला देत आहे.

**मिलन पाटील :-**

आम्ही मागवु म्हणुन त्यांच्याकडुन तसे रुलिंग येउ दे. त्याच्यांकडुन रेकॉर्डला येउ द्या.

**मा. महापौर :-**

तसा ते खुलासा ही करतील.

**मिलन पाटील :-**

त्यांनी सांगावे आम्ही बरोबर मागवू नंतर आम्ही त्याचा पाठपुरावा करतो.

**डॉ. पडवळ :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. आरोग्य केंद्रासाठी जी औषधे घेतली जातात. त्या सर्व औषधांचे नमुने अन्न आणि औषध प्रशासन महामंडळातर्फे रेग्युलरली सॅम्पल घेतले जातात. आणि त्याची त्याच्या लॅबोरटी मध्ये तपासणी करुन घेतली जाते. आपण चांगल्याच दर्जाची औशधे खरेदी करतो. परंतु कसे जरी असेल तरी त्यांच्या तर्फे नमुने तपासले जातात. रेग्युलरी आपण त्याचे अहवाल आपल्याकडे पाठवतात. आणि त्याच्यामध्ये जे अप्रमाणीत आढळुन येतात ते आपण त्याच्याकडुन बदलुन घेतो. आणि ह्याच्यावर जरी आपले कंट्रोल नसले तरी अन्न आणि औषध महामंडळाचे कंट्रोल ह्याच्यावर आहे. चांगल्या दर्जाची आपण औषधे खरेदी करतो. आणि या गोष्टीची खात्री आम्ही देतो.

**रोहिदास पाटील :-**

आता डॉ. पडवळ यांनी जे निवेदन केले. सभागृहाची की सभागृहाच्या सदस्यांची ही मागणी होती की, घटना घटल्या नंतर एवढ्या परसेंटेमध्ये त्याची दलाली जात होती. तर येणाऱ्या औषधाची शाश्वती खरी आहे की नाही. त्याचे निवेदन असे व्यक्त होते की, जसे मा. महापौरांनी सांगितले की, त्याची तपासणी करण्यात येईल असे नाही. त्या घटनेच्या दिवसापासुन आजच्या घटकेला तसे ते बोलले. तें बोलतेवेळी बोलले की, तसे नसेल तर मी बदलुन घेतो. तुमची किती औषधे दुय्यम दर्जाची होती, किंवा ती कनिष्ठ होती, किंवा ती अयोग्य होती, किंवा एक्सापारीडेटची होती. असे काही तुमच्या लक्षात आले तर ती तुम्ही किती प्रमाणात बदलली एखादे औषध, किंवा अमुक एक कंपनीचे औषध हे दुय्यम दर्जाचे आहे असे तुमच्या लक्षात आले आहे तसे सांगा.

**डॉ. पडवळ :-**

आपल्याकडे औषध विभागामध्ये सर्व माहिती उपलब्ध आहे. सन्मा. सदस्यांना ती माहिती देण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, एक तर मोबाईल लावुन द्या. म्हणजे जे तुम्ही बोललात ते त्यांच्याकडुन वाजले जाईल. हे त्याहुन उत्तर बरे पडेल असे प्रॉन्ट्रींग करु नका. त्यांना उत्तर देउ द्या. त्यांना आम्ही ,त्यांना कोणत्याही अडचणीत टाकत नाही. पण खतगांवकर साहेब, सांगितले तेवढेच उत्तर द्याल तर पुर्ण फसाल. तुम्ही ते खरे आहे ते सांगा कारण तुम्हाला तेवढे परवडणार नाही.

**मिलन पाटील :-**

ह्याचे उत्तर टेंपीग होते हे लक्षात ठेवा.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

श्री. रोहिदास पाटील साहेब तुमचे गैरसमज व्हायला नको. मी त्यांना वस्तुस्थितीची माहिती सांगा असे सांगत होतो काही उलट सांगत नव्हतो.

**डॉ. पडवळ :-**

आतापर्यंत किती वेळा औषधांचे नमुने खराब किंवा अप्रमाणीत आलेले आहेत. किती तरी ह्यांच्यामध्ये औषधांचे प्रमाण कमी हाते. ह्याची सर्व माहिती आरोग्य विभागात उपलब्ध आहे.

**रोहिदास पाटील :-**

डॉक्टर पडवळ साहेब, आम्ही सभागृह तुम्हाला अशी विनंती करतो, केवळ दोन चार कंपनीचे नावे सांगा की, हे आलेले लिक्वीड, हे आलेले सिरब, हे आलेले टॅबलेट , किंवा इंजेक्शन ही दुय्यम दर्जाची होती ती आपण बदलेली आहेत असे निवेदन करा तुमच्या आरोग्य विभागात आहे त्याला आम्ही काय करणार? आम्हांला त्याच्यांतले समजते का? नावही वाचता येत नाही. तुमच्या निर्देशनात किती आणि की ही औषधे तुमच्या निर्देशनात आली?

**डॉ. पडवळ :-**

काही ॲन्टीबायटीक कॅप्सुल होत्या, डोळ्याचे ड्रॉप होते. आणि आणखीन असे दोन तीन औषधे आहेत मला आठवतात की, ती अप्रमाणात आढळुन आली होती म्हणुन आपण बदलुन घेतलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे ती अयोग्य होती का? हानीकारक होती का? एक्सपायर डेट ची होती का?

**डॉ. पडवळ :-**

कसे आहे की, कुठल्याही औषधामध्ये त्याच्यामध्ये जे ॲक्टीव्ह ईलायमेंट आहेत. त्याचे एक विशिष्ट प्रमाण असते. ते प्रमाण असेल तरच ते त्या रोगावर उपायकारक ठरेल किंवा तो रोग बरा करु शकेल समजा एखादे ६० इलायमेंन्ट चे औषध आहे ते जर ६० नसेल तर त्याचा रोगावर उपचार होणार नाही तर अशाप्रकारे ते अप्रमाणीत म्हणुन घोषीत केले जाते आणि अशी औषधे आपण परत पाठवतो.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही त्याच्या पलिकडचे ही सभागृहात विचारतो की जे औषधे आली होती ते तुम्ही परत पाठविली हे खरे आहे. पण ते लोकांना दिले असते तर हानीकारक झाले असते आमच्या साडे सात - आठ लाख लोकांचे भवितव्य तुमच्या हातात आहे. आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवतो ना. तुमच्या कार्यपध्दतीमधला एक भाग विचारतो जी सेटींगमध्ये औषध आली तुम्ही आता ती बाहेर काढली असली खरे आहे पण ती काढल्यानंतर तुमच्या आता असे लक्षात आले की हे औषध दिले असते तर लोकांना त्रास झाला असता. अशी किती औषधे होती किंवा कोणती होती?

**डॉ. पडवळ :-**

अशाप्रकारे हानीकारक अशी कोणतीही औषधे नव्हती की जी दिली असती तर त्रास झाला असता. त्यातला जो त्रास आहे तो दुर झाला नसता. अशाप्रकारे त्याच्यामध्ये त्रुटी आढळुन आल्या आहेत. म्हणजे त्या पेंशटला कोणताही आराम मिळाला नसता किंवा पाहिजे तेवढा आराम मिळाला नसता.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे ती औषधे प्रभावी औषधे नव्हती म्हणजे ती कमी प्रतीची औषधे होती. मॅडम, आता असा प्रश्न उभा राहतोय की प्रभावी नसलेली औषधे आपण किती प्रमाणात घेतली किती प्रमाणात त्याचा वापर केला? टक्केवारी वाला गेला, टक्केवारी वाले डॉक्टर गेले. हा विषय वेगळा झाला. पण अशी औषधे जी प्रभावी नाहीत त्याचा उपयोग नाहीत. नुसते आपले असे म्हणतात की, डॉक्टर पाण्याची औषधे देतात. तर अशी औषधे आपण किती प्रमाणात वापरली. परसेंन्टेजचा विषय वेगळा आपले सप्लायर्सचे रजिस्टर आहेत ना. मग ते रजिस्टर सप्लायर्सने केले त्याला आपण काही करु शकतो का? विचारणा तरी करु शकतो का? कारवाईतरी करु शकतो का? की, दुसऱ्या पध्दतीने औषधे दिले म्हणुन नुकसान भरपाई घेउ शकतो का? औषधे बदली केली ती बाब वेगळी आणि किती क्वॉंटेटी आपण वापरली? अशापध्दतीची जी औषधे तुमच्या लक्षात आली. अशी किती औषधे तुम्ही वापरली? १० लाख रुपयांची औषधे वापरली, ५ लाख रुपयांची औषधे वापरली. साईडईफेक्ट विषय वेगळा औषधे घेतल्यानंतर नसतील आणि अपायकारक नसतील आणि उपायकारक नसतील अशी दुय्यम दर्जाची औषधे आपण किती वापरली? मला ह्याची व्यवस्थित माहीती

काढायला लागेल. आम्ही जरी याची माहिति विचारली नाही तरी कोणीतरी ह्याची चौकशी करण्यासाठी तुम्हांला विचारतीलच की नाही विचारणार.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सन्मा. सदस्यांची सुचना फारच उपयुक्त आहे. आरोग्य खात्यांतुन निवीदा मागवुन जरी सर्टीफाय कंपनीची औषधे खरेदी केली तरी सन्मा. वैद्यकिय अधिकारी याठिकाणी नमुद केल्या प्रमाणे आपण त्याची सॅम्पलिंग टेस्ट करण्यासाठी पाठविले व त्यामध्ये जर सॅम्पल जर निगेटीव्ह आला किंवा प्रमाणात जर सॅम्पल आला नसेल तर औषध बदलुन न घेता यापुढे त्याच्यावर रितसर कार्यवाही करावी. आणि सदरची जी कंपनी असेल त्या कंपनी वर ब्लॅकलिस्ट टाकण्यासाठी अन्न भेसळकडे अहवाल पाठवावा मी अशा सुचना करीतो आणि त्याची अंमलबजावणी केली जाईल.

**मुक्ता रांजणकर :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे तसा आणखीन एक खुलासा आपल्याकडून हवा आहे आपण जी ही औषधे मागवितो त्या औषधांचा स्टॉक आपण किती वर्षासाठी जमा करणार आहोत?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

किती दिवसासाठी हा स्टॉक जमा करणार आहोत.

**रिटा शहा :-**

हा स्टॉक साधारण किती वर्षासाठी आपण जमा करणार आहोत?

**डॉ. पडवळ :-**

हा जो ठराव मांडलेला आहे. ते आपले २००७ – २००८ या आर्थिक वर्षासाठी आपण ही औषधे खरेदी करतो.

**मुक्ता रांजणकर :-**

२००७ - २००८म्हणजे एका वर्षासाठी तुम्ही हा स्ट्रॉक जमा केलेला आहे.

**डॉ. पडवळ :-**

आपण एकदाच खरेदी करत नाही. आपण फक्त मंजुरी आता घेतो. आणि गरजेनुसार आपण स्टॉक मागवितो.

**मुक्ता रांजणकर :-**

आता त्याच्यामध्ये मला तुम्हांला असे विचारायचे आहे की, तुम्ही आता जी औषधे खरेदी करणार त्याची एक्सपायरी डेट चा जो टाईम लिमीट आहे तो किती लिमीट पर्यंत असेल तर तुम्ही खरेदी करणार? कारण काही – काही वेळेस असेही आढळलेले आहे की, सहा महिने अजुन बाकी आहेत एक्सपायरी डेटला अजुन सहा महिने बाकी आहेत तरी अशी औषधे खरेदी केलेली आहेत. आणि माझ्या माहिती प्रमाणे तशी औषधे खुप स्वत म्हणजे१/४ रेटला मिळतात. तसे होता कामा नये प्रत्येक औषधाची अमुक एक – दोन वर्ष एक्सपायरीसाठी टाईम लिमीट असायला पाहिजे. तशी औषधे खरेदी करा.

**डॉ. पडवळ :-**

मा. सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की आपण एक्सपायरी डेट हे आपल्या ज्या पिरीयड मध्ये औषधे संपणार आहेत ते गृहीत धरुनच आपण त्या औषधांची एक्सपायरी डेट पुढची असेल अशीच औषधे मागवितो.

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब, तुम्हांला त्यांचा प्रश्न समजलेला नाही ते काय म्हणतात की सहा महिने बाकी असलेली औषधे तुम्ही खरेदी करायची नाहीत हे नीट लक्षात घ्या.

**मुक्ता रांजणकर :-**

ती जर सहा महिने पर्यंत जर एक्सपायरी होणार आहे असे औषध जर तुम्ही खरेदी केले तर मी तुम्हांला सांगतो की ते औषध १/४ रेटवर भेटते. १० रुपयांचे औषध तुम्हांला अडीच रुपयांला भेटेल.

**डॉ. पडवळ :-**

कुठलेही औषध हे एक्सपायरी डेट सफिशिएन्ट लॉंग असेल असे बघुनच घेतले जाईल.

**मुक्ता रांजणकर :-**

सफीशिएन्ट लॉंग म्हणजे किती? कुठल्याही औषधाची एक्सपायरी डेट सहा महिन्या पुरती नसते कमीत कमी दोन - तीन वर्षापुरते असते.

**डॉ. पडवळ :-**

आहे, कमीत कमी एक - दोन वर्ष असते.

**मुक्ता रांजणकर :-**

तुम्ही नाविन लॉट घेतला तरी त्या औषधांची एक्सपायरी दोन ते तीन वर्षा असते. कुठे असे लिहीलेले आहे की तुमची ही सगळी औषधे एका वर्षातच संपणार आहेत. तशी तीन वर्षाची लॉंगटाईमची औषधे खरेदी करण्यांत यावीत.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

तशाप्रकारे औषधे खरेदी करण्यांत येतील.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, पिछली मा. महासभा जब डॉक्टर साहेब का प्रकरण हुआ तभी हम लोगोने माँग की थी की जो दवा का स्टॉक है वो देखकर आपको अलग करना चाहिऐ। लेकीन आज भी उत्तर मिल रहा है। वह गोलमोल उत्तर है। अभी बोल रहे है, हम बादमे सोचकर करेंगे, बादमे यहाँपर डॉक्टर साहाब को उत्तर देना जरुरी था। की जो भी दवा उन्होंने खरेदी है। उसमे दवा इतनी खराब थी की कितनी दवाईया उन्होंने वापस दी उसके बदलेमे दुसरी ली और दवाईया खराब देने वाला कौन सप्लायर था। उसके उपर आपने क्या ॲक्शन लिया। वो भी आपने बताया नही। अभी और ले के बेच रहे है। बादमे इधर कोई महासभा नही होने वाली है। तीन महिने के बाद महासभा होगी उसके पहिले आज आपको उत्तर देना चाहिए था।

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्यावर मी खुलासा करु इच्छितो यापुर्वीच डॉक्टरांनी याठिकाणी खुलासा केलेला आहे की, त्यांनी ते औषध बदलुन घेतलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही तेच विचारतो की, ती औषधे किती बदलुन घेतलेली आहे? कुठल्या कंपनीचे औषध खराब आणले होते? त्या सप्लायर वर तुम्ही काही ॲक्शन घेतली का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

ॲक्शन काही घेतली नाही. त्यांनी फक्त औषधे बदलुन घेतली असे सांगितलेले त्यावर याठिकाणी मी आपल्याला आश्वासीत केलेले आहे की, यापुढे अशी औषधे बदलुन न घेता. संबंधीतावर कार्यवाही करावी. आणि ती कार्यवाही केली जाईल.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, औषधामध्ये होलसेलमध्ये १०० टक्के मार्जीन असते. जे खराब कंपनीची वस्तु असते ते १०० टक्के ची मार्जीन असते तर त्याच्यात तुम्ही काय बदलुन घेतले? ॲक्शन घेतले नाही आणि तो कमवुनच गेला.

**डॉ. पडवळ :-**

इथुन पुढे खराब औषध निघाले तर आपण त्या कंपनी कडुन आपण परत औषधे खरेदी करणार नाही. आणि असेल तो स्टॉक परत करुन आपण त्याच्याकडुन पैसे परत घेउ.

**धनराज अग्रवाल :-**

ज्याने सप्लाय केला त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली? डॉक्टरांची चुक होती. पण, ज्याने औषधे सप्लाय केली त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाका.

**एस.ए.खान :-**

महापौर मॅडम, अजुनपर्यंत कोणावर कार्यवाही केली का?

**डॉ. पडवळ :-**

आपल्याकडे सर्व यादी आहे परंतु कलेक्ट करुन ती सगळी माहिती .......

**एस. ए. खान :-**

वर्ष संपले पाच वर्ष ही संपले. अजुनपर्यंत कोणावरही काहीही कार्यवाही झाली नाही.

**डॉ. पडवळ :-**

आपण कार्यवाही केली नाही आपण फक्त औषधे बदलत होतो. ह्याच्यापुढे साहेबांनी आश्वासन दिल्याप्रमाणे अशा लोकांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकु.

**एस. ए. खान :-**

लास्ट डे आहे बॅटींग जोरदार चालु आहे. त्याच्यामध्ये अडचणीचे होईल.

**मुक्ता रांजणकर :-**

तुम्ही अजुनपर्यंत काही कार्यवाही केली नाही. तुम्ही मिरा भाईंदर शहराच्या लोकांशी काय खेळ चालवलेला आहे का? हातात खुळखुळा दिला आहे का? तुम्ही त्याची काही कार्यवाही केली नाही. म्हणजे तुम्ही आमच्या कडे या आम्ही विष खरेदी करतो. तुम्ही घ्या, खरेदी करा,घ्या,खा,प्या आणि मरा. मिरा भाईंरचे पब्लिक कुठे तरी कमी होईल.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. आयुक्त साहेब,तुम्ही यांची जास्त काळजी करु नका. नाहीतर शहराचे आरोग्य एकदमच खराब झालेल आहे. बदली करुन घेत नाही. फक्त कमिशन घेतात.

**मुक्ता रांजणकर :-**

तुमच्या आरोग्य केंद्राच्या जर औषधेच जर इफेकटिव्ह नसतील तर मी तुम्हांला सांगतो की तुम्ही डेंग्यु चे जरी दिले तरी त्याचे काय इफेक्ट होणार आहेत? साधारण जर गरीब माणुस असेल तो तुमच्याकडे येईल आणि तुम्हाला सांगेल मला डेंग्यु झालेला आहे मला औषध द्या त्याला काय माहित तुम्ही त्याला डेंग्युचे औषध देता की विष देत आहेत?

**धनराज अग्रवाल :-**

मॅडम, त्याच्यावर काय ॲक्शन घेणार याचे फक्त उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण ज्या सर्व सुचना मांडलेल्या आहेत. सन्मा. सर्व सदस्यांनी शहरातील ठिक ठिकाणी आरोग्य केद्रांमध्ये लागणारे औषध पुरवठा, खरेदी करत असतानाच अतिशय जागृतपणे, बारकाईने लक्ष देउन तो साठा खरेदी करावा. की त्याची एक्सपायरी डेट कमीत कमी दोन वर्षानंतरचा कालावधी त्याच्यावर लिहीलेला असावा. अशा प्रकारची औषधे आपण खरेदी करावीत. तसेच जेव्हा आपल्याकडे अशी औषधे येतील तेव्हा खरेदी करत असतांना संबधीत नगरसेवक, किंवा आरोग्य समितीची जी कमिटी आहे त्या समितीला विश्वासात घेउन काही हया कमिटीचे सदस्य, त्या त्या विभागातील जे आरोग्यकेंद्र आहेत तेथील नगरसेवक हयांना विश्वासात घेउन ती औषधे दाखविण्यात यावीत आणि त्याच्या अध्यक्षतेखाली सुध्दा औषधे खरेदी केली तरी हरकत नाही. पावसाळ्यास सुरुवात होत आहे. शहरामध्ये ज्या ज्याठिकाणी ज्याप्रकारे आजार उद्‌भवतात. मच्छरांन पासुन उद्‌भवणारे आजार अशाप्रकारची रोगराई किंवा इतर छोट मोठे प्राथमिक आजार आहेत. या आजारावर प्राथमिक ईलाज म्हणुन अशाप्रकारची औषधे त्यामध्ये खरेदी करुन घेण्यात यावी. व संबंधित नगरसेवकांनी ज्या सुचना मांडलेल्या आहेत त्या सुचनांचे अधिकाऱ्यांनी पालन करावे तसेच त्यांच्याकडुन व्यवस्थित औषधे मिळवावीत. म्हणुन याची कारवाई तर आपण सुरुवातीलाच करणार आहोत. परंतु याही पुढे जाउन आपल्याला असे आढळले नाही तर आपण ज्याच्याकडून औषधे खरेदी करणार आहोत त्याला ब्लॅकलिस्टमध्ये तर टाकु. परंतु, त्यावेळेला त्याचे पेमेंन्टही आपण थांबवुन ठेवु. अशा प्रशासनाला सुचना देत आहोत.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आम्हाला कमीत कमी सॅम्पल तरी दाखवा.

**मा. महापौर :-**

आपल्याला सॅम्पल दाखवीले जातील.

**एस. ए. खान :-**

केंद्रामध्ये जी औषधे असतात ती आम्हांला बोलावुन दाखवा. की, ही आणलेली औषधे आहेत. आम्ही ते बघु की त्याच्या मध्ये काय आहे ते कमीत कमी आम्हांला इनस्पेक्शन करा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माल लेनेवाला और माल देनेवाला दोनो गुन्हेगार है। इंडियन कानुन में माल लेने वाला और देनेवाला, खराब माल लेनेवाला और खराब माल देनेवाला दोनो गुन्हेगार है। तो एक के उपर ॲक्शन लिया और दुसरे के उपर आपने ॲक्शन लिया क्या? मैं वही पुछ रहा हुँ।

**मा. महापौर :-**

दोनो के उपर ॲक्शन लिया जाऐगा। दोनो उतने गुन्हेगार है।

**धनराज अग्रवाल :-**

लिया नही अभी उसको तो देड महिना हो गया। एक के उपर ॲक्शन लिया दुसरे के उपर कहाँ लिया?

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, महापालिकेमध्ये जे आरोग्य केंद्र चालु केलेले आहेत. या आरोग्य केंद्रामध्ये मुर्धा गावाचा उल्लेख या ठिकाणी केलेला नाही. तर केंद्र आरोग्य केंद्राची आपण गेल्या दोन वर्षापासुन मुर्धा खाडी वर केंद्र स्थापन केलेले होते. पण त्या केंद्रास्थानी अद्याप पर्यंत डॉक्टर बसत नाही. हे असे का? ह्याचा खुलासा करावा. महानगरपालिकेतर्फे दोन वेळा कलर काम केलेले आहे. महानगरपालिके तर्फे दोन वेळा स्वच्छता केलेली आहे. तिथे आरोग्य केंद्र होण्यासाठी गेल्या दोन वर्षापासुन मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. परंतु ते चालु का होत नाही? याचा खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी जी वर्षिक औषधे लागतात. या अनुशंगाने सन्मा. सदस्यांनी ज्या उपयुक्त सुचना केलेल्या आहेत आणि सन्मा. महापौर यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यांची कटाक्षाने प्रशासनाकडुन कारवाई केली जाईल. आपल्याकडे आता जे सॅम्पल आहेत त्याची तपासणी करुन जे रिसेन्ट सॅम्पल आहेत. त्या संबधीत सप्लायर्सवर कारवाई करण्यासाठी प्रस्थापीत केले जाईल आणि जो आरोग्य केंद्राचा याठिकाणी मुद्दा आहे तो तपासुन यापुढील सभेत तो विषय आणण्यासाठी प्रशासनाकडुन कारवाई केली जाईल. तुम्हाला माहिती सांगु इच्छितो हे आरोग्य केंद्र केंद्रशासनाच्या योजनेतुन आपण चालवितो सुरुवातीला

जो फंड मिळतो आणि नंतर ते आरोग्य केंद्र आपण आपल्या फंडातुन चालवितो आता यापुढे जर आपल्याला एखादे आरोग्य केंद्र किंवा सब आरोग्य केंद्र चालवायचे असेल तर त्याला पुर्ण खर्च महापालिकेतुन कराव लागेल आताच्या परिस्थितीमध्ये केंद्र शासनाच्या कोणताही आरोग्य केंद्र मंजुर होउन प्रलंबित राहिलेला नाही. म्हणुन मी म्हणतो येणाऱ्या सभेमध्ये याबाबतचा प्रस्ताव दिला जाईल.

**अनंत पाटील :-**

परंतु महापालिकेने दोन वेळा जे समाजमंदीर आहे ते कलर केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मी माहिती घेतली. सन्मा. बावीस्कर असतांना ही बाब झालेली होती. वास्तवीक प्राधान्याने ही कार्यवाही व्हायला पाहिजे होती. पण ती झालेली नाही. आपण यापुढे निश्चीतच करु.

**अनंत पाटील :-**

परंतु, मुर्ध्याला ते आरोग्य केंद्र असल्यामुळे त्याचा नागरीकांना उपयोग होणार आहे.

**मिलन पाटील :-**

महापौर आपण लाखोरुपयांची औषधे खरेदी करतो. आपली लॅब आता चालु आहे. किंवा नाही आपण लाखो रुपयांची औषधे चालु करतो दवाखाने फिरवतात परंतु आपल्याला आपण मागच्या वेळेला लॅबसाठी मंजुरी दिलेली आहे. तर आपली लॅब चालु आहे कि नाही?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

पॅथलॉजीकल जी लॅब चालु करण्यासाठी महासभेने मान्यता दिलेली आहे त्याच्यावर कार्यवाही केलेली आहे. त्या अनुंषगांने आपल्या आवश्यकत्या आरोग्य केंद्रामध्येच ते लॅब चालवणार आहोत इनफॅस्ट्रकचर ची कार्यवाही चालु आहे त्यासाठी लागणारे उपकरणे औषधे याबाबतच्या निवीदा मागविलेल्या आहेत.

**मिलन पाटील :-**

निवेदाआलेल्या आहेत का? आलेल्या निवीदा धुळखात पडलेल्या असतील.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

निवीदा आलेल्या आहेत निवीदा ओपन केलेल्या आहेत.

**मिलन पाटील :-**

पाच सहा महिने झाले धुळ खात पडलेल्या आहेत.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्यासाठी आवश्यक असलेली फ्युज आणि ॲक्झामिनेशन टेबल आपण मागाविलेले आहेत. मी माझ्या ह्याच्यामध्ये सुधारणा करतो पुर्ण साहित्य अजुन आपण खरिदी केलेले नाही. त्यासाठी मुंबईचे तज्ञ पॅथेलॉजीकल इन्स्टीस्टूट आहेत किंवा ठाणे महापालीकेचे आहेत. त्यांच्याकडुन आपण माहिती घेतोय आणि ती माहिती प्राप्त होताच त्या अनुषगाने आवश्यक असलेले उपकरण आणि साहित्य आपण खरेदी करुन पॅथोलॉजीकल लॅब कार्यन्वीत केले जातील.

**मिलन पाटील :-**

साहेब, जवळ – जवळ पाच महिने झाले मागाविलेली उपकरणे खराब होणार नाही का? आणि लॅब लागणारी जी औषध असतात. महाग असतात. त्या औषधांचा उल्लेख या औषधांनमध्ये का केला नाही? की त्याच्यासाठी आपण वेगळे टेन्डर काढणार का? डॉक्टर साहेब तुम्ही सांगा तुम्ही ह्याच्यामध्ये औषधे मागाविलेली नाहीत.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मी खुलासा केलेला आहे, याच्यामध्ये पॅथोलॉजीकल लॅबची औषधे नाहीत. मा. महासभेने जी मंजुरी दिलेली आहेत त्याबाबत योग्य दर्जाची पॅथोलॉजीकल लॅब सुरुकरण्यासाठी आवश्यक असलेली सर्व तज्ञ माहिती आपण इतर महापालिकेकडुन घेतोय आणि त्यासाठी आवश्यक असलेला इन्फास्ट्रक्चर आणि येणाऱ्या काळामध्ये ते पॅथेलॉजीकल लॅब सुरु केले जातील याच्यमध्ये ते येत नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, आम्ही म्हणतो की, ही मिटींग शेवटची आहे. त्यामुळे ह्यात समाविष्ट करुन घ्या. आम्ही द्यायला तयार आहोत आता ही मिंटीग झाल्यानंतर पुढच्या वेळेला जेव्हा निवडुन येतील ऑगस्ट नंतर मिंटीग होणार आहे तोपर्यंत परिस्थिती काय होणार आहे? आता आम्ही तुम्हांला सांगतो ना उद्या लॅब चालु करायची आहे ना जर औषधे आता समाविष्ट करुन घ्या.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्यासाठी निवीदा काढाण्या लागतील.

**मिलन पाटील :-**

त्यासाठी वेगळया निवीदा काढण्याची गरज काय आहे? ते ह्याच्यामध्येच समाविष्ट करुन घ्या.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

तुम्ही ऐकुन तर घ्या एवढ्या तातडीने नाही होणार निश्चित एखाद्या महिन्यामध्ये त्याची पुर्ण कार्यवाही होईल.

**जोजफ घोन्सालविस :-**

साहेब, महापौरांच्या परवानगीने बोलतो उद्या पुन्हा प्रश्न आहे. आपण जी औषध बाजारातुन घेतोय त्याच्यावर आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचा स्टॅम्प असतो का? कारण औषध चोरीला सुध्दा जातात युज ओनली फॉर मिरा भाईंदर महानगरपिालका असा स्टॅम्प असतो का?

**डॉ. पडवळ :-**

सर्व औषधांवर आपण युज ओनली फॉर मिरा भाईंदर कार्पोरेशन असा स्टॅप लावुन घेतलेला होता आणि त्यांना आपण तशा सुचना दिलेल्या आहेत.

**जोजफ घोन्सालविस :-**

तसा स्टॅम्प असतो का? आणि आता आपल्याकडे कुठल्या कुठल्या रोगाची औषधे आहेत? हे बघा खेड्यामध्ये कुत्रा चावला, तरी त्याला वणवण फिरायला लागते. आपल्याकडे औषध नाही. पेशंटला टिबी झाला. तरी आपल्याकडे एक्स रे मशिनची सोय नाही. हत्तीरोग झाला त्यालाही आपल्याकडे औषध नाही. मग कुठल्या रोगाची औषधे आपल्याकडे आहेत.

**मिलन पाटील :-**

मॅडम, टिबीचे पेंशट आता खुप वाढायला लागले आहेत तर मॅडम त्याचा निर्देश द्यावा. श्री. जोजफ साहेब जे बोलतात ते सत्य आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

मॅडम, आम्हांला सांगा की, तुमच्याकडे किती रोगांची औषधे आहेत?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सन्मा. सदस्यांना मी माहिती देउ इच्छितो की शासनाकडुन डॉटची स्किम आहे. टिबीग्रस्त सर्व रुग्णांना मोफत औषध भेटतात.

**जोजफ घोन्सालविस :-**

हे मलाही माहिती आहे की, रुग्णांना मोफत औषधे भेटतात पण एक्स - रे मशिन नसल्यामुळे....

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्यासाठी एक्स - रे मशिनची फॅसेलिटी आपल्याकडे नाही.

**जोजफ घोन्सालविस :-**

आपल्याकडे एक्स - रे मशिनची फॅसिलीटी आपल्याकडे का नाही? त्यासाठी किती खर्च येतो?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आता आपले नविन हॉस्पीटल जे होईल त्याच्यामध्ये ह्याच्यामध्ये ह्या सर्व बाबी इत्तंभूत समाविष्ठ करु.

**जोजफ घोन्सालविस :-**

नाही. पण सध्या जरी ही व्यवस्थित केली तरी त्याला किती खर्च येतो? त्याच्यामुळे किती नुकसान होते डॉक्टरांना तुम्ही विचारा

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

निश्चीतच त्याची यापुढे नोंद घेवुन कार्यवाही केली जाईल.

**जोजफ घोन्सालविस :-**

तूमच्याकडे हत्तीरोगाच्या लस उपलब्ध आहेत का?

**डॉ. पडवळ :-**

काशी गाव — घोडबंदर ह्या एरियामध्ये मिरागाव हत्तीरोगाचे रुग्ण आहेत म्हणुन दरवर्षी त्याठिकाणी एक दिवसीय सर्वांना आपण जवळपास ४५ हजार लोकांना आपण एकदिवस त्या गोळ्या वाटप करतो. ही मोहीम आपल्याकडे मागच्या दोन वर्षापासुन चालु आहे ती कन्टिन्यु तशीच चालु राहणार आहे ही योजना शासनातर्फे राबविण्यात येते.

**जोजफ घोन्सालविस :-**

सापाच्या विषावर काही औषधे आहेत का?

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवांनगीने बोलतो सन्मा, सदस्य श्री. मिलन पाटील यांनी जो पॅथोलोजीस लॅब बद्दल जो प्रश्न उपस्थित केला मा. उपायुक्त साहेबांनी थोडासा चुकीचा खुलासा केला असे मला वाटते. आपण आता काय म्हणलात आपण इतर महापालिकेकडुन आपण त्याची माहिती मागावीतो आपण इतर महापालिकेकडुन माहिती मागविण्यापेक्षा आपल्या मिरा - भाईंदर शहरामध्ये लॅब चालु करायची आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

खेड्यापाड्यातील गावे आहेत. आणि इथे खर्च वगैरे फार होउ शकतो.,

**रतन पाटील :-**

आपण डॉक्टरर्स मागावीतो किंवा आपण पॅथोलॉजी लॅबसाठी मागवु शकातो ना आपण ती भरती करु शकातो ना. साहेब, आपण जर चुकीचा खुलासा केला तर आपण सगळ्यांच गोष्टी इतर महापालिकेकडुन घ्यायच्या का? आपण आपले सक्षम नाही का? आपल्याला अधिकार आहे आपण मागवु शकातो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला असे वाटते की, आरोग्याचा विषय चालला आहे तर, श्री. खतगांवकर साहेब त्या पदावर आहेत. मी एक विचारु इच्छिते की, आपल्याकडे रक्त,लघवी तपासण्याचा असा एक ठराव स्टँडिंगला पारित झालेला त्यानुसार काही इंटरव्ह्युपण झाल्या होत्या जी योजना आपल्याला परवडत नाही. एखाद्या युरिन टेस्टसाठी किंवा ब्लड टेस्ट साठी तर त्यासाठी सगळी निश्चितीही झालेली त्याचे इंटरव्ह्यु पण झालेले तर त्या योजनेचे पुढे काय झाले?

**डॉ. पडवळ :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी एक शंका उपस्थित केली होती की आपण इतर महानगरपालिकेकडुन माहिती का मागवितो? तर आपण आपल्याकडे मुख्यतः जी ब्लडबँक चालु करायची आहे. त्याच्यासाठी माहीती मागविली होती. आणि जी माहिती राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून मागविलेली आहे. कारण ब्लड बँक चालू करण्यासाठी त्यांचे निकष आहेत. आणि त्या निकषानुसारच आपल्याला लॅब उभी करावी लागते म्हणून आपण .......

**रतन पाटील :-**

साहेब, प्रश्न लॅबचा होता. ब्लड बँकचा नव्हता. पॅथोलॉजीकल लॅब जी चालू करायची आहे. असा प्रश्न उपस्थित केला होता.

**डॉ. पडवळ :-**

आपण माहिती लॅबसाठी नाही तर ब्लड बँकसाठी मागविलेली आहे.

**रतन पाटील :-**

तो नंतरचा प्रश्न आहे. श्री. मिलन पाटील यांनी असा होता की, आपल्याकडे मागच्या सहा महिन्यापासून हा प्रश्न सतत चालू आहे की आपल्या मिरा भाईंदरमध्ये आरोग्य केंद्रामध्ये पॅथोलॉजी लॅब चालू करावी. लघवी आणि ब्लड टेस्ट साठी लागणारी लॅब आपल्या आरोग्य केंद्रामध्ये चालू करावी. अशी सहा महिन्यापूर्वी स्टॅण्डींग आणि महासभेमध्ये सुद्धा पास झालेले आहे. तरीसुद्धा आपल्याकडे अजून एवढा उशीर का होतो?

**डॉ. पडवळ :-**

मागच्यावर्षी आपण पॅथोलॉजीकल लॅब चालू करण्यासाठी महासभेने स्टाफ भरण्यासाठी पॅथोलॉजीकल लॅबसाठी लागणारे इन्स्ट्युमेंट त्याच्यासाठी लागणारे री एजन्स, जे काही मा. मिलन पाटील यांनी उपस्थित केला होता की ते ह्यामध्ये का घेत नाही? त्याच्यासाठी आपण ऑलरेडी त्यावेळेसच परवानगी घेतलेली आहे. आणि निवीदा काढताना ते सर्व इन्स्ट्युमेंट त्याचे सर्व रीएजन्स आहेत. त्या सर्वांना अंतर्भूत करुनच निवीदा काढलेल्या आहेत. आणि त्या आता काढलेल्या पण होत्या. परंतु त्याचे आता रेट जास्त असल्याने त्याच्यासाठी परत हे केलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मिरा भाईंदर मध्ये येणारा आणि राहणारा सगळेच काही श्रीमंत नाहीत. मध्यमवर्गीय आणि गरीब सुद्धा आहेत. ह्यांना हे लॅबचे भाव आहेत ते परवडत नाहीत. त्यांचे भाव असे आहेत की विचारुच नका. रु. ३००/- पासून ते रु. ३०००/- पर्यंत त्याच्यापेक्षाही जास्त रक्ताचे जे गट आहेत. ते तपासायला किंवा अन्य, लघवी, रक्त दुसरे जे काही प्रती आहेत. ते तपासण्याचे ते मध्यम वर्गीय साधारण, माणूस एवढे देईल कुठून आम्ही महापालिकेकडे का ओरडतो? की आपल्या महापालिकेकडे अशी व्यवस्था चालू करावी. एकत्रित जर आपण सगळीकडे चालू करु शकत तर भाईंदर (पू.) आणि भाईंदर(प.) विभागाकडे तात्पुरती सेवा म्हणजे सेवा चालू करावी. दोन्ही विभागामध्ये त्याचा लाभ सामान्य जनतेला मिळेल. अशी आमची भूमिका आहे. तर लवकरात लवकर करा. वेळ घालवू नका. आपण आता म्हणालात की पुढच्या महासभेमध्ये पण पुढची महासभा तीन महिन्यांनी येईल. त्याच्या अगोदरच त्याच्यामध्ये हे द्या. समाविष्ट करा. त्यासाठी लॅब भाईंदर (प.), भाईंदर (पू.) विभागामध्ये मिरारोड येथे ही लॅब लवकरात लवकर चालू करावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. सर्प दंशावर औषध आहे का?

**डॉ. पडवळ :-**

सर्पदंशावरील औषध हे भाईंदर प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उत्तन प्राथमिक आरोग्य केंद्र दोन आणि याठिकाणी उपलब्ध आहेत. महापालिकेतर्फे आपण घेउ शकत नाही. कारण त्यासाठी एक हॉस्पिटल सेटअप लागते. जे ते आपल्या आरोग्य केंद्रामध्ये नाहीत. म्हणून आपण सर्प दंशावरील लस विकत घेतलेली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मला वाटते की आपण ती लस घ्यावी. कारण आपले आरोग्य केंद्र चालू झाल्यावर जर आपल्याला त्या लसची गरज लागली तर आपण ती लस घेउ शकतो.

**डॉ. पडवळ :-**

आपले हॉस्पिटल सुरु झाल्यानंतर आपण घेउ शकतो. आरोग्य केंद्रामध्ये आपण ते घेउ शकत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जे सगळेच करु. पण सध्या जे मरत आहेत. त्याचे काय? तुमचे हॉस्पिटल होताना आणखी पाच वर्षी जातील? ही पाच वर्षी गेली आता.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, सभागृहाचे एक लक्ष वेधतो. आपण कुत्र्यांना लस दिली. त्याच्या आल्यानंतर साईड ईफेक्ट कधी सभागृहात चर्चा झाली का? आम्ही स्टॅण्डींगमध्ये सांगतो की, त्याचा परिणाम असा आहे की, ज्या ज्या कुत्र्यांना ती लस दिली. ते कुत्रे फक्त सुजत माजत चालले. चावतात. चावणाऱ्यांची संख्या वाढली. त्याच्यावरही आपण औषध व्यवस्था केली पण ते चावतेवेळी पिसाळतात. पिसाळल्यानंतर कुत्र्यांना कुत्रा चावतोय. चावलेली शहरामध्ये अनेक कुत्री दिसतात. त्यांचा तो बंदोबस्त व्हायला पाहिजे तो होत नाही. अनेक ठिकाणी चावलेली कुत्री आपल्याला दिसतात. अनेक ठिकाणी कुत्री माणंसाना चावतात. माणसांना चावतात. तेव्हा आपण माणंसाना इंजेक्शन देतो. मध्ये तो स्टॉकही नव्हता. स्टॅण्डींगमध्ये त्याच्यावर वाद झाला. आता स्टॉक आहे असे समजते. पण अशा पिसाळलेल्या कुंत्र्यांचे आपण साईड इफेक्ट आहे तो. हे कुंत्र्यांचे आपण नियोजन म्हणून केले ते ठिक आहे. पण त्यांचे साईड इफेक्ट असे झाले की, सगळीच कुत्री माजलेली आहोत. त्या माजलेल्या कुत्र्यांवर होणारा परिणाम आहे. त्याच्यावर आपण काय गांर्भीयाने विचार केला. अधिकाऱ्यांना तुम्ही विचारा आपण १ वर्षभर जी मोहिम राबविली. आता निश्चितच त्याचे परिणाम दिसायला लागले. कुत्र्यांची संख्या कमी झाली नाही हे खरे आहे. पण ज्यांना लस टोचले त्या कुत्र्यांची जी स्थिती आहे. त्याने जी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याच्यावर आपण काय उपाय केला? ह्याच्यावर दखल घेतली की नाही?

**मा. उप. आयुक्त ( संभाजी पानपट्टे सो. ) :-**

मा. महापौरांच्या परवानंगीने बोलतो साहेब त्यांना पॅन्टी रेबीज ऑपरेशन झाल्यानंतर त्यांना ॲन्टी रॅबीजची लस देतो. त्याच्यानंतर त्याचे साईडिइफेक्ट होउन त्यांचे अंग फुगणे असा काही साईडीफेक्ट नसतो. तो त्याच्या खाण्यावर अवलंबुन असतो.

**रोहिदास पाटील :-**

बघा नसेल लक्षात तर लक्षात आणा असे आम्ही सांगतो तूम्ही करा की, तुम्ही ज्या – ज्या कुत्र्यांना लस टोचली आहे ती कुत्री आधी होती त्यापेक्षा दुप्पट तिप्पट डुक्करांसारखी जाडी झालेली आहेत.हे खोटे नाही ही वस्तुस्थिती आहे त्यांच्यापेक्षा चावण्याचे प्रमाणे वाढत चालले आहे आज शहरामध्ये तूम्ही एका बाजुने दावा करीता की, कुत्र्याची संख्या कमी होत चालली आहे आम्ही म्हणतो की लहान कुत्र्यांची वाढतच चाललेली आहे हा आकडे मोडीचा विषय सांगत नाही पण त्यातुनच परिणाम असा होत चालला आहे की, त्यांची तब्बेत सुधारुन ते पिसाळलेले आहेत. माणसांनाही चावता, कुत्र्यांनाही चावतात. आणि पिसाळलेली कुत्र्यांना चावलेली कुत्री आपण त्याची व्यवस्था करत नाही कुठेही ते दैन्य अवस्थेमध्ये एक धावतांना तरी दिसतात किंवा पडलेली दिसतात. त्याची व्यवस्था करा असा माझा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

ठराव वाचुन कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. ४५ :-**

महापालिका आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारे सन २००७-०८ या वर्षात औषधे, उपकरणे, साहित्य व रेबीज प्रतिबंधक लस यांचा पुरवठा करणे करिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ७ आरोग्य केंद्र १ फिरता दवाखाना व १ आरोग्य उपकेंद्र सुरू आहेत. या आरोग्य केंद्रात दररोज ६०० ते ७०० बाह्य रूग्ण आरोग्य केंद्रातील मोठ्या प्रमाणात घेत असतात. या बाह्यरूग्णांना आरोग्य केंद्रामधुन औषधाचे वाटप करण्यात येते.

सन २००७-०८ या वर्षात महानगरपालिका आरोग्य केंद्राकरिता लागणाऱ्या तसेच राज्य शासनाच्या आर.सी.एच. प्रकल्पांर्तगत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ५ नव्याने सुरू होणाऱ्या आरोग्य केंद्राकरिता मोठ्या प्रमाणावर औषधांची रेबीज प्रतिबंधक लसींची, साहित्य उपकरणांची आवश्यकता आहे.

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिका आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारी साहित्य उपकरणे व रेबीज प्रतिबंधक लस, खरेदी करणेस या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले.)

(सन्मा सदस्य हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ४६ च्या ठरावाचे वाचन केले.)

**रिटा शहा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४६ :-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्धाकृती पुतळा अनावरण समारंभ व मा. कविवर्य श्री. जगदिश खेबुडकर यांच्या अमृत महोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमांना कार्योत्तर मान्यता देणे.

**ठराव क्र. १८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण मा. कविवर्य श्री. जगदीश खेबुडकर यांच्या अमृत महोत्सवा निमित्त भाईंदर (पू.) नवघर शाळेच्या पटांगणात दि. २४/०३/२००७ रोजी त्यांच्या जाहिर नागरी सत्कार करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात त्यांना स्मृती चिन्ह देण्यात आलेले आहे. सदर दोन्ही कार्यक्रमांना व कार्यक्रमांच्या खर्चास मा. महासभेची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.          अनुमोदक :- सौ. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४७ चे वाचन केले.)

**मा. उपमहापौर :-**

हाउसिंग फॉर डिस हाउसिंगसाठी मिरा - भाइर महानगरपालीका हद्दीतील आरक्षण क्र. २२२ आणि २२२अ यामध्ये बेघरांनसाठी घरे आरक्षणाबाबत आपण धोरण निश्चित करण्यासाठी मागच्या सभेत मा. आयुक्त साहेबांना पॉवर्स दिल्या होत्या परंतु मा. आयुक्त साहेबांकडून परत हा विषय आला आणि बऱ्याच लोकांकडे ही टिपणी उपलब्ध नसावी. मा. सचिव साहेब आपण ही जी नविन टिपणी आहे ह्या टिपणीमध्ये पुन्हा एक सुधारीत सूचना दिलेली आहे मी ती सुचना सभागृहाच्या निर्देशनास आणु इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. २२२ व २२२अ ह्या जागेबाबत मा. महासभा ठराव क्र. ७३ दिनांक. ६/१२/२००६ बाबत फेरविचार करुन निर्णय घेण्याबाबत सुधारीत गोषवारा सादर करण्यात येत आहे मा. आयुक्त साहेबांकडुन आलेल्या गोषवाऱ्यामध्ये कलम १) असे लिहीत आहे की, विकास नियंत्रणानियमावलीत कलम ९ टेबल ३/१ ब नुसार १८०चौ. फुट. अर्थात १६.७५ चौ. मिटर ची घरे विकास योजनेतील नवीन रस्ता, रस्ता रुंदीकरणांत किंवा आरक्षणाने बाधीत होणाऱ्या अधिकृत मालमत्ता धारकांना पर्यायी जागा म्हणुन देण्यात यावी २) लाभार्थीयांची गुणवंत्ता यादी व जेष्ठता यादी सार्वजनीक बांधकाम विभाग यांनी तयार करावी. ३) शासनाने वेळोवेळीच्या धोरणानुसार बांधकामाच्या किंमतीत २५ टक्के रक्कम लाभार्थी यांच्याकडुन दहा वर्षात टप्याटप्याने प्रशासनाने पुन्हा एकता तपासणी करावी अशांचा एक सुधारित गोषवारा आलेला आहे हा गोषवारा आपण काल परवा दोन दिवसांत डिस्टयुब्युट केल्यामुळे बऱ्याच सदस्यांकडे हा गोषवारा उपलब्ध झाला नाही पण मा. सर्व सदस्यांना हा गोषवारा दिला तर त्यांच्याकडुन अजुन काही सुचना येतात का? ज्या सुचना आहेत त्या नक्कीच स्वागतार्ह आहेत. मान्य आहेत परंतु आणखीन काही सुचना येणार असतील तर त्या सदस्यांकडुन घेउन मग ह्या विषयांला पुन्हा आपण चर्चेला घेउ.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम हे बरोबर आहे.

**रिटा शहा :-**

मा. वैती साहेबांनी जी टिपणी वाचली त्या टिपणीची आम्हाला एक प्रत द्यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब १) मॅरीट लिस्ट आणि सिनीयॅरीटी लिस्टमध्ये सिनीअॅरीटी ह्याबाबत प्रशासनाची व्याख्या काय आहे? २) जे अधिकृत आहे त्या मालमत्तेला आपण घरे द्यायची आता मला बाकी मागचे काही माहित नाही बऱ्याच वेळा आपले सन्मा. सदस्य श्री. रोहीत सुवर्णा यांनी सांगितले की, हाउसिंग फॉर डिसहाउसिंग आपल्याकडे जागा आहेत त्या झोपडपट्टीवासीयांना देण्यात यावीत. आपल्या कडे आतापर्यंत किती अशी यादी उपलब्ध आहे ? ज्या अधिकृत लोकांना आपण पर्यायी जागा देणार आहोत दुसरे जे आता नवीन आहे ते माझ्याकडे आलेले आहे. जे आपण जुना गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये आपण असे म्हटले आहे की हे तात्पुरते देण्याकरीता आपण हाउसिंग डिसहाउसिंग वापरणार आहोत म्हणजे टेम्पररी बेसिस धोकादायक इमारती असली किंवा रस्त्यात गेली त्यासाठी तर आता नक्की

ह्याच्यावर आहे की त्याच्यावर ते आधी नक्की करा आपला अजेंडा बरोबरचा जो गोषवारा आहे त्याच्यामधला तात्पुरते घ्यायचे.

**रिटा शहा :-**

साहेब, हा आपण ट्रांझिस्ट कॅम्प धरणार का?

**नरेंद्र मेहता :-**

ही घरे तात्पुरत्या स्वरुपाची आहेत की परमन्ट आहेत ते सांगा.

**रिटा शहा :-**

ह्याला आपण ट्रांझिस्ट कॅम्प म्हणुन धरणार का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो. ) :-**

सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे हाउसिंग फॉर डिसहाउसिंग म्हणजे जे आरक्षण डेव्हलप करण्यासाठी बाधीत होतात. त्यात पुरक टिपणी मा. आयुक्त साहेबांनी दिलेली आहे. मुद्दा क्र. १ मध्ये त्यात स्पष्ट लिहीलेले आहे त्या लाभार्थीनसाठीच हे वाटप करण्यासाठीचा हा निर्णय आहे असा मागे ठराव झाला होता.

**नरेंद्र मेहता :-**

हा मा. आयुक्त साहेबांचा गोषवारा आहे . ह्याच्यात म्हटले आहे की ठराव असा झाला होता जे धोकादायक इमारती मध्ये रहिवाशी तात्पुत्या कामी वाटप होणे कामी. आयुक्त स्तरांवर कार्यवाही करण्यात ही मा. महासभामध्ये ते तात्पुरती आहे. आता ते माझ्या माहितीप्रमाणे परमंट झाले.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

बरोबर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण याच्यापैकी काय योग्य म्हणायचे आहे?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

विकास नियंत्रणानियमांनी परवाना आता जी पुरक नविन टिपणी दिलेली आहे. त्याच्यावरील निर्णय घ्यायचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तो मागचा आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

तो मागचा नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब ठिक आहे.

**रोहिदास पाटील :-**

एक विषय ह्याच्यात मिक्स होउ द्या. आज या शहरात आवश्यकता नक्कीच आहे की अनेक धोकादायक इमारती आहेत. पाउस पडायला सुरुवात होते वेळी किंवा आता आपण आधीच्या मिंटीग मध्ये हा विषय आणला होता. की, आपण नोटीस दउन ह्याच्यातुन मोकळे होतो त्या चार माळ्याच्या बिल्डींग मधली लोक उतरणार ती जाणार कुठे? म्हणुन संक्रमण शिबीर हा एक विषय होता आणि रस्ता रुंदीकरणामध्ये जी घरे बाधीत होतील त्यांचे सेटमेंन्ट करणे हा विषय होता ह्या दोन्ही विषयांमध्ये क्लप कुठे झाला नाही. आणि हा विषय क्लिअर ही होत नाही. तुम्ही रस्ता रुंदीकरणही ह्याच्यामध्ये लिहीलेले आहे. आणि धोकादायक इमारतीचे पण आहे मग आपण कसे समजायचे?

**रिटा शहा :-**

साहेब सदर विषय आपण ट्रांझिस्ट कॅम्प म्हणुन घेतलेला आहे का?

**रोहिदास पाटील :-**

ट्रांझिस कॅम्प म्हणुन हा विषय वेगळा आहे. आणि त्यांना कायम स्वरुपी घरे देणे हा विषय वेगळा आहे.

**रिटा शहा :-**

आपण कायमस्वरुपी घरे कोणाला देवु शकत नाही. कायमस्वरुपी घरे आपण किती लोकांना देणार?

**धनराज अग्रवाल :-**

आपले काही लाभार्थी आता आहेत का? ज्यांची घरे रस्त रुंदीकरणात गेलेली आहेत.अशा लाभार्थीची लिस्ट आहे का? आपण मा. महापौर मॅडमच्या केबीन मध्ये मिंटीग घेतलेली होती. त्यामुळे असे काही नाही. भागाचे सगळे क्लिअर झालेले आहे. मग आता पुढच्या नविनसाठी आहे की जुन्यांसाठी आहे?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

हा विषय ट्रांझिस्टसाठी नाही आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मागच्या वेळेला जे दिलेले होते सहज दिलेले होते का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

ट्रांझिस्टसाठी वेगळी व्यवस्था आहे. वास्तविक मागच्या ठरावामध्ये दोन्ही विषय एकत्र करुन जो निर्णय झाला होता. त्याची अंमलबजावणी करणे नियमाप्रमाणे प्रशासनाला शक्य झाले नाही. म्हणुन याच्यामध्ये मा. आयुक्त साहेबांनी पुरक टिपणी सादर केलेली आहे. हाउसिंग फॉर डिसहाउसिंगसाठी जे रिझर्वेशन आहेत किंवा त्याच्यामध्ये आपली विकास कामे होउन जी घरे भेटतात. त्यामध्ये जी वाटप करायचे आहे त्याचे धोरण निश्चीत होण्यासाठी आणि ती घरे आपण परमन्ट देतो जे विस्थापीत होतात. नियमांनी जी मालकी हक्काची जागा दाखवुन जे विस्थापीत होतात. त्यांना परमन्ट घरे देण्यासाठीचे धोरण निश्चीत करण्यासाठी हे दिलेले आहे.

**रिटा शहा :-**

हे मान्य आहे झोपडपट्टीवादी, फ्लॅट धारक की, कुठल्या प्रायव्हेट प्रॉपर्टी रस्ता रुंदीकरणामध्ये आले. आणि त्याची प्रायव्हेट प्रॉपर्टी गेली म्हणुन आपण त्यांना घरे देणार आहेत. की रस्ता रूंदीकरणामुळे सरकारी जागेवर झोपड्या विस्थापीत झाल्या त्यांना देणार ते क्लिअर करा.

**सुधा गोयंका :-**

महापौर मॅडम, मै इसपे बोलना चाहती हुँ। इसमे जैसे बताया। दो विषय एक साथ मे लिया हुआ है। की, रस्ता रुंदीकरण मे जिनके घर गये उनको घर देंगे। और दुसरा जो विषय है की, जो इमारते धोकादायक है। उनमें रहनेवालो को कूछ समय के लिए वो घर दिया जाएगा। लेकीन दोनो विषयोंको एकसाथ क्यों लिया? दोनो विषय को अलग अलग लेना चाहिए था। दोनो विषय निर्णय के लिए भेजेंगे तो मॅडम दोनो विषय मे गूमराही होगी। ये दोनो विषय अलग अलग है। दोनो को अलग अलग भेजिए। एक साथमे हम इसको मंजुरी कैसे दे सकते है?

**दिलीप घेवारे :-**

हा जो आरक्षण क्र. २२२ आणि २२२ (अ) आहे याचे नाव बेघरांसाठी घरे असा आहे. ही जागा खाजगी आहे. आपल्या किंवा सरकारी मालकीची नाही.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर, महोदय ही बेघरांसाठी घरे आहे ना मग आपल्याकडे बेघर कोण आहे? आता तुम्ही जसा खुलासा देनेवाले वैया दो जे बेघर होनेवाले है क्या? जो मिरा भाईंदर के जो लोग है उनको देने वाले है?

**दिलीप घेवारे :-**

विकास नियंत्रण नियामावलीतील टेबल ३ (१) मध्ये याच्याबद्दल हाउसिंग आणि डिसहाउसिंग हे आरक्षण कोणी आणि कसे विकसित करायचे याबद्दल स्पष्ट केले आहे. यामध्ये त्यांनी सांगितले की, १६.७५ चौ. मिटरची घरे म्हणजे १८० चौफुट हि घरे जे विकास योजनेचे प्रस्ताव आहे. म्हणजेच विकास योजनेतील नविन रस्ता आहे. रस्ता रूंदीकरण आहे. म्हणजे १२ मिटर रस्ता १८ मिटर रस्ता होतोय. किंवा काही आरक्षणे आहेत. जेथे पूर्वी अधिकृत घरे होती समजा आरक्षण २ एकरचे आहे. त्याच्यामध्ये कूठेतरी दोन तीन घरे आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आता सन्मा. सदस्य मिलन पाटील यांची जशी बिल्डींग झाली.

**दिलीप घेवारे :-**

हो तशीच त्याच अर्थाने तर आपण तर त्या लोकांना तिथून काढले तर आपल्यांला त्यांना पर्यायी राहण्यासाठी जागा म्हणुन अशी घरे द्यायची आहेत आणि त्याची स्पष्ट तरतुद आहे याच्यामध्ये असा शब्द आहे की, अलॉटमेंन्ट ऑफ परसन्स ॲफेटेड बाय इंम्प्लीमन्ट ऑफ डेव्हलपमेंट प्लॅन यु आर अगोपाईन रेग्नाईज स्ट्रक्चरर्स म्हणजे जे अधिकृत मालमत्ता धारक आहेत त्यांची जी घरे होती. आता एस.व्ही.रोड आहे. एम.जी. रोड आहे ते रस्ता रुंदीकरण करतांना एखादे घर पाडावे लागते मग त्या व्यक्तिला ते घर पर्यायी घर म्हणुन आपल्याला द्यायचे आहे. हा ट्रॅझिंस्ट कॅम्प या म्हणुन हा विषय मा. स्थायी समितीमध्ये येवुन गेलेला आहे. ट्राझिंस्ट कॅम्प किंवा संक्रमण शिबीर हे चार पाच दिवसांकरीता किंवा आठ दिवसा करिता असते. तर ही पर्यायी घरे त्यांना कायमस्वरुपी देण्याचा विषय आहे. त्याच्यासाठी हा सुधारीत गोषवारा दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे स्पष्ट म्हणणे असे आहे की, हा जो रिझर्व्हेशन आरक्षण आहे . बेघर लोक आहेत. त्यांच्यासाठी ही घरे आहेत. हे बरोबर आहे ना ट्राझिंस्ट कॅम्प म्हणुन नाहीत. पण ह्याला आपल्याला ट्रांझिस्ट कॅम्प म्हणुन वापरता येतील का? म्हणजे एखाद्या धोकादायक इमारतीतील लोकांना राहण्याची वापरता येउ शकते का?

**दिलीप घेवारे :-**

हो , आपण त्यासाठी ती जागा तात्पुरत्या स्वरुपासाठी वापरु शकातो.

**नरेंद्र मेहता :-**

टेम्परारी म्हणजे १ वर्ष, १० वर्षे, ८ महिने.

**दिलीप घेवारे :-**

आता पर्यंत आपल्याकडे ज्या परवानग्या दिलेल्या आहेत. त्यात एकुण १४५ घरे मिळणार आहेत. त्यापैकी आज ६७ घरे आपल्या ताब्यात आलेली आहेत. आता समजा उद्या काही घटना घडली तोपर्यंत आपण त्यांना ती घरे १५ दिवस, महिनाभर जोपर्यंत आपला अलाउमेंट हात नाही. तोपर्यंत देवु शकतो. कारण ती आपली घरे आहेत. परंतु उद्या जर आपण ह्या लोकांना परमन्ट घरे दिली तर ते कसे होईल?

**नरेंद्र मेहता :-**

माझे म्हणणे असे की, तात्पुरत्या म्हणजे एका वर्षासाठी घरे देता येतील का?

**दिलीप घेवारे :-**

हे वाटप होईपर्यंत वाटप झाले की, ते बंद तुमचा दुसरा मुद्दा होता की मेरीट लिस्ट आणि सिनी ऑरिटी सिस्टमचा.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही कुठेतरी दोन गोष्टी मिक्सअप करत आहात तुम्ही ज्यांची घरे आपतकालीन काही घटना घडतील त्यांना तुम्ही तिथे राहण्यास जागा देणार आता आपण म्हणलात.

**दिलीप घेवारे :-**

तात्पुरती घरे वाटप होईपर्यंत.

**जयंत पाटील :-**

तात्पुरती घरे वाटप होईपर्यंत त्यांना राहायला देणार त्याचे काही निकष ठरलेले नाहीत. तुम्ही त्या लोकांना एक वर्षासाठी देणार, दोन वर्षासाठी देणार, त्या घरांना भाडे लावणार की नाही . आपण दोन गोष्टीमध्ये मिक्सअप करु नका. आपण हाउस फॉर डिसहाउस जेव्हा बोलतो तेव्हा आपण अधिकृत मालमत्ता धारकांना हा निकष इकडे लावलेला आहे. अधिकृत चा अर्थ १९९५ च्या अगोदर रोडला लागुन ज्या झोपड्या आहेत त्या अधिकृत आहेत का? सभागृहामध्ये तसे तुम्ही आहेत त्या अधिकृत आहेत का? म्हणजे त्याची तशी नोंद होउ द्या. एखाद्या रस्त्याच्या कडेला सहसा झोपडपट्टीच असते किंवा सन्मा. श्री. जयंत पाटील यांचा बंगला रस्त्यामध्ये बाधीत झालेला आहे. तर माझा बंगला बाधित झाला किंवा पाचशे, हजार फुटाचा फ्लॅट बाधीत झाला तर आपण मला १८० फुटामध्ये राहण्यासाठी जागा देणार आहात का? माझा प्रश्न असा आहे की, तूम्ही मला किती जागा देणार? कारण तुमच्या म्हणण्याप्रमाणे अधिकृत मालमत्ता धारक तो मोठा असणार त्याचे फ्लॅट असणार. ५०० फुटांचे १००० फुटांचे, ६०० फुटांचे तर तो १८० फुटांमध्ये राहण्यास कसा जाईल? म्हणजे.......

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सन्मा. सदस्यांना मी स्पष्ट करु इच्छितो की, आपल्या विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे असतात. नुसता रस्ता म्हणुन नाही, गार्डन असतात. हॉस्पीटल असतात, शाळा असतात, जे अनेक आरक्षणामध्ये विकसीत करतानां आपल्याला अनेक अडचणी येतात त्यामध्ये खाजगी मालमत्तेमध्ये जे ॲक्वीशन करणारी जागा आहे त्याच्यामध्ये जर काही घरे असतील आणि ती खाजगी असतील. खाजगी मध्ये स्वतःची...

**जयंत पाटील :-**

आरक्षण एकदा शहरामध्ये लागल्यानंतर त्या ठिकाणी झोपडपट्टयां झालेल्या आहेत हे फक्त मिरा भाईंदरचे उदाहरण नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

झोपडपट्ट्यांही त्याचा एक भाग होउ शकतो. पण एखादा प्रस्थावित डि.पी रस्ता आहे आता मागच्या सभेमध्ये चर्चा केलेली आहे. असा तो डि.पी रस्ता आहे. की, तो वस्ती मधुन टाकलेला आहे. तिथे वस्ती असतानाही तिथे रस्ता टाकलेला आहे. कनेकटिव्हीटी असते. दोन एरिया एकमेंकाना जोडण्याचा भाग असतो. म्हणुन त्यांनी प्रस्थापीत केलेला असतो. अशा परिस्थितीमध्ये जर एखादे कुंटुब पुर्णपणे बेघर होत असतील तर त्यांना विस्थापीत करण्यासाठी ह्या हाउसिंग फॉर डिसहाउसिंग नियंत्रण नियमावलीत असलेली तरतुद आहे. आता त्याचा कसा वापर करावा आपल्या महापालिकेचे याच्यासाठी काय धोरण असावे. याच्यासाठी मा. आयुक्तांनी ही पुरक टिपणी दिलेली आहे. आपल्याला अशाप्रकारचे किती लाभार्थी उपलब्ध होतील? किती लाभार्थी उपलब्ध आहेत. याचा निश्चीत विचार करुन आपल्याला ह्याचे वाटप करावे लागणार आहेत. आपण जे म्हणता की, टेंम्पररी ट्रॉझिस्ट याच्यामध्ये करायचे का? हा आपला निर्णय आहे. एखादी आपतकालीन परिस्थिती निर्माण झाली. आणि कोणीतरी अशी परिस्थिती आहे की, १०० कुंटुबे आज बेघर आहेत. आणि आपल्याला लोकांना ती घरे राहण्यासाठी द्यायची असतील तर मा. महासभेने याकरीता तात्पुरत्या वेळेसाठी जर निर्णय घेतला तर त्या लोकांना त्या ठिकाणी तात्पुरत्या वेळेसाठी राहण्यास जागा देता येतील आपण ट्रांझिस्टमध्ये मा. स्थायी समितीमध्ये निर्णय घेतलेला आहे. काही शाळा ॲडेन्टीफाय केलेल्या आहेत. एक दोन दिवसांसाठी किंवा काही कालावधीसाठी ट्रांझिस्ट करण्यासाठीचे स्थळ आपण ॲडेन्टी फाय केलेले आहे. पण विकास योजनेमध्ये ही जी तरतुद आहे. ती ॲथोराईज विस्थापीतांसाठी ही तरतुद आहे. आपण म्हणता की, रस्ता रुंदीकरणामध्ये घराचा थोडासा भाग गेला. तर तो भाग कंम्लीट विस्थापीत होत नाही. त्याचा मागोवा घेउन महापालिका रिइनव्हेस्टमेंट करु शकते. पण जर एखाद्याचे पुर्णच घर गेले असेल त्याला तर आपल्याला

रस्त्यावर ठेवता येत नाही. त्याच्यासाठी ही तरतुद आहे. आणि त्याच्यासाठी आपल्या मा. महासभेचे धोरण असावे म्हणुन ती टिपणी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, या तुम्ही दिलेल्या टिपणीमध्ये हा विषय तुम्ही सहा महिन्यापुर्वी हा विषय आणला. सहा महिन्या नंतर पुन्हा हा विषय आणता. तर खरच ह्यामध्ये पारदर्शकता आहे का? तुमच्या ह्या टिपणीमध्ये जर पारदर्शकता असती तर ऐवढी चर्चा झालीच नसती. हा शब्दांचा जो खेळ झाला तो कशासाठी झाला? किंवा अमुक ठिकाणी पाहिजे असे कुठे नाही? लाभार्थी कोण आहेत? ते धोरण नाही. तुम्ही आमच्याकडुन वदवूनन घेतात. म्हणजे आम्हाला प्रशासनाबद्दल संशय घ्यायचे कारण नाही. पण संशयाची घेण्यासारखी परिस्थिती तुम्ही निर्माण करता. पुन्हा एखादा विषय मा. महासभेपुढे आणावा. असे कूठे वाक्य नाही. म्हणजे तुम्ही आमचे अधिकार घेता का? ह्याच्यामध्ये काय आहे? तुम्हांला काय विचारायचे आहे ते आम्हांला सांगा ना आपल्या लाभार्थ्यांना मुळ कागदपत्रांची तपासणी प्रशासनाने पुन्हा एकदा करावी. म्हणजे जी आधी तपासणी केली ती चुकीची आहे का? यादी कोणती आहे की, तुम्हांला ती यादी चुकीची असल्याची शंका आली असे तुम्हीच आम्हांला सांगता. ती यादी पुन्हा करावी असे तुम्ही आम्हांला सांगता की आम्ही तुम्हांला सांगतो. ही टिपणी मा. आयुक्त साहेबांची आहे मा. आयुक्त साहेबांच्या ते लक्षात आले आहे का, की ती यादी सदोष आहे. मा. आयुक्त साहेबांच्या लक्षात आले नाही. जसे जसे तूम्ही आम्हांला कामासाठी वेळ द्याल तस तसे त्याचे पोस्टमार्टम होत जाईल. तुम्ही ती टिपणी पारदर्शक दिली असती तर असे झाले नसते.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, ही जी टिपणी आलेली आहे. आणि त्या टिपणीद्वारे जे व्यक्त झालेले आहे तर ते मी मुद्दामुन मा. आयुक्त श्री. बालाजी खतगांवकर साहेबांच्या निर्दशनास आपल्या माध्यमातुन आणुन देवु इच्छितो की, जेव्हा जेव्हा अशा प्रकारच्या लोकांची, नागरीकांच्या संबंधित गोष्टी येतात त्याचे सर्व अधिकार प्रशासन घेत आणि मग प्रशासन जनहिताच्या विचार न करता.आपला अधिकार प्राप्त झालेला आहे. सभागृहाने आपल्याला अधिकार दिलेले आहेत. त्याचा प्रशासन कसले पण निर्णय घेतात. आणि त्यातुन नंतर बखेडे निर्माण होतात. म्हणुन ह्या विषयांमध्ये या ठरावाला आमची अशी सुचना आहे की, ह्याच्यामध्ये फार तर प्रत्येक गटनेता त्याच्यामध्ये असावा. म्हणजे जे श्री. रोहिदास पाटील (काका) यांच्या ज्या सुचना आहेत. पारर्दशकता तर त्याचे निश्चितच समाधान होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांचा प्रश्न अर्धवट झाला पण आपण त्याचे उत्तर दिले नाही. एकाचा तुम्ही १००० फुटाचा बंगला तोडुन टाकला तरी त्याला १८० फुट जागा द्यायची का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

तुम्हाला सर्वांना माहिती आहे की, भु - संपादनाचा कायदा काय आहे?

**नरेंद्र मेहता :-**

मला भु - संपादन कायद्याविषयी माहिती नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सर्वांना भु - संपादन कायद्याविषयी माहिती आहे. एखाद्या १००० फुटांचा बंगल्याचे व्हॅल्युऐशन करावे लागते. डायरेक्ट जाउन आपल्याला कुणाचे अधिकार हिरावुन घेता येत नाही. जे असलेले स्ट्रक्चर तोडता येत नाही, अपेक्षा अशी आहे की, त्यांच्यामध्ये १००० फुटाच्या बंगल्याला मोबदला द्यावा लागतो. त्या कुंटूबांला हे जे व्हॅल्युऐशन मिळेल ते त्यातुन डिडक्ट केले जाईल. समजा माझा २०००,३००० फुटाचा बंगला आहे. त्याला फक्त एवढेच स्ट्रक्चर दिले जाईल का? असे नाही त्याचे जे व्हॅल्युएशन होउन या बंगल्याचे व्हॅल्युएशन त्याच्यातुन डिडक्ट करुन जे राहिलेले असेल त्याला रिइनव्हेस्टमेंट केले जाते.

**नरेंद्र मेहता :-**

बाकीचा मोबदला आपण देणार का? बाकीची रक्कम आपण त्याला कॅश मध्ये देणार का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

भु - संपादनाची कार्यवाही आपण ज्यावेळेला करतो. त्यावेळेला ती रक्कम आपण त्या व्यक्तीला त्या नावाने कॅश मध्ये देतो.

**नरेंद्र मेहता :-**

ते ब्रॅकेट लॅन्डचे झाले.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्याच्यात एखादे स्ट्रक्चर ही घेउ शकते ह्याच्यात अपेक्षा अशी आहे की, एखादे गावठण आहे. छोटे कस्टल घरे आहेत. जी मोठ्याप्रमाणात कुटुंब बेघर होतात. त्यासाठी हा प्रोव्हिजन आहे. एखादा बंगलेवाला विस्थापीत होतो अशी ह्याच्यात अपेक्षा नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तशी व्याख्या नाही. पाटील साहेबांचे म्हणणे असे होते की, माझा एखादा बंगला आहे म्हणुन मी बंगला हा शब्द बोललो ५०० फुटांचे दुकान गेले किंवा ४०० फुटांचे घर गेले तर त्याला १८५ फुट देणार जे टाउन

प्लॅनिंग मोबदला देतो टी.डी. आर किंवा कॉन्फसेन्ट तो व्हॅकेनलाईन्टला तर त्या जागेचा किंवा दुकानाचा जे स्टॅप ड्युटी रजिस्ट्रेशन असते १०,००० टक्के रु. किंवा ६०००/- रु. रेट असतो त्या हिशोबाने उरलेली रक्कम आपण त्यांना देणार का? १ असा माझा प्रश्न आहे. समजा, एखादे १२०० रु. फ्लॅटची रेडी रक्कम रेट आहे तुम्ही १८० फुट दिले आणि ५०० फुटचे तोडले तर बाकीच्या उरलेल्याचे काय करायचे? व्हॉट यु विल पे? साहेब जरा हे स्पष्ट करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

तुम्ही उदाहरणे टाईप चर्चा करता आहात.

**रोहित सूवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, विस्थापीत झोपडपट्टीचा विषय सोडुन यांनी डायरेक्ट बंगल्याचा विषय आणला. तुम्ही हाउसिंग फॉर डिसहाउसिंग विषयांवर चर्चा करा. तुम्ही डायरेक्ट बंगल्याचा विषय आणला.

**नरेंद्र मेहता :-**

घर असु द्या, फ्लॅट असु द्या, झोपडपट्टी असु द्या, हाउस फॉर डिसहाउस.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो.) :-**

मी तुम्हांला ह्या पुर्वीही सांगितलेले आहे की, आपल्याला ज्या विविध आरक्षणामध्ये जे विस्थापीत होतात. त्यांच्यासाठी ही हाउसिंग फॉर डिसहाउसिंग कनस्पेंट आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब,तुम्ही परत परत तेच बोलु नका. माझे फक्त ऐवढेच म्हणणे आहे की, नविन प्लॅनिंग प्रमाणे एखादे ५०० फुटाचे घर रस्ता रुंदीकरणांत बाधीत झाले. आणि तो अधिकृत आहे. त्याला आपण १८० फुटाचे घर देणार बाकी उरलेल्या एरियाचे काय?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

या घराची जी कॉस्ट आहे. ती मायनस होउन त्यावेळेस त्याचे जे व्हॅल्युएशन होईल ते व्हॅल्युएशन त्याला दिले जाईल.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. मी, मघाच पासुन हेच विचारतो की आपण व्हॅल्युएशन लॅडचे मोजणार की कन्स्ट्रक्शनचे मोजणार.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्याची एक पध्दत आहे. त्याबाबत आपल्याला डिटेलमध्ये इथे चर्चा करता येत नाही. व्हॅल्युएशन करतांना त्याचे एज ऑफ बिल्डींग असते, त्याचे प्रझेंट फिजीकल नेस्ट, मार्केटकॉस्ट असते. त्याप्रमाणे भु - संपादन अधिकारी त्याचे व्हॅल्युएशन करेल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ठिक आहे. खर म्हणजे आपण द्यायला पाहिजे होते आपण त्याचे गृहित धरुन त्याचा मोबदला देणार आता जर आपण म्हटलेले आहे की, अधिकृत मालमत्ता धारकांना आतापर्यंत ॲज ऑन टुडे आपल्याकडे अशी कुठलीही यादी वगैरे आहे का? की जे अधिकृत किंवा आपण तोडलेली आहेत. आजच्या तारखेला अशी कोणती यादी आहे का? १० लोकांची, २०, १०० लोकांची यादी आहे का?

**रोहित सुवर्णा :-**

अशी यादी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपण एवढ्या वेळेला आपण ठराव आणला तरी आपल्या एवढेही माहित नाही. की, कोणाला द्यायचे पेंडीग आहेत का? ठराव झाल्यानंतर आपण शोधायला जाणार की, कोणी पेंडीग आहेत का? माझे तेच म्हणणे आहे. पॉलिसी डिसीज झाल्यानंतर आपण शोधणार आहेत की कोणी कोणाची नावे आहेत याची आपल्याकडे यादी तरी असली पाहिजे की, सदस्या एवढ्या लोकांना द्यायचे अजुन बाकी आहेत. कारण तुम्ही इथे दिलेले आहे की, मॅरीट आणि सिनीयारीटी जर तुम्हांला पहिल्यांदा त्यांना द्यायचे आहे. त्यांची घरे आधी बाधित झालेली आहेत. तर अशांची आपल्याकडे यादी आहे का?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे फक्त आंबेडकर नगर, भोला नगर आहे तीकडच्या लोकांच्या नावांची यादी आहे पण ती व्हॅलिडीटी डेट ची नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तूमच्याकडे २०,२५,३०,५०,१०० लोकांची यादी आहे का? तेवढे फक्त सांगा.

**दिपक खांबित :-**

नावांची यादी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग द्यायला नव्हते का? ठिक आहे. तुमच्याकडे जी यादी आहे ती किती लोकांच्या नावाची यादी आहे?

**दिपक खांबित :-**

जवळ जवळ सव्वादोनशे लोकांच्या नावाची यादी आहे.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, मै आपको थोडीसी मदत कर रहा हुँ। पात्र लाभार्थी धारको की यादी ४२७ है।

**नरेंद्र मेहता :-**

यांच्या म्हणण्याप्रमाणे ७०० व्यक्तिंची यादी आपल्याकडे आहे. आता आपण खाली म्हटले आहे की, २५ टक्के कन्स्ट्रक्शन कॉस्ट मार्केट व्हॅल्यु हे पाहिले क्लिअर करा. २५ टक्के, १० वर्षात १० टप्प्याने घ्यायचे तर मार्केट कॉस्ट की, कन्स्ट्रक्शन कॉस्ट.

**रोहित सुवर्णा :-**

कन्स्ट्रक्शन कॉस्ट.

**दिपक खांबित :-**

तसे म्हटलेलेच आहे की, कन्स्ट्रक्शन कॉस्ट.

**नरेंद्र मेहता :-**

आपले कन्स्ट्रक्शन कॉस्ट किती आहे काय माहित आहे? कारण साहेब, आता काय होणार माहिती आहे, चार आण्याची मुर्गी बारा आण्याचा मसाला मी क्लिअर करतो. कन्स्ट्रक्शन कॉस्ट किती आहे?

**दिलीप घेवारे :-**

रुपये ७००/- कन्स्ट्रक्शन कॉस्ट आहे.

**नरेंद्र मेहता :-**

रुपये ७००/- कन्स्ट्रक्शन कॉस्ट आहे. म्हणजे १८० फुटाचे किती झाले?

**दिपक खांबित :-**

१८० फुटाचे एक लाख छप्पन हजार झाले.

**नरेंद्र मेहता :-**

एक लाख छप्पन्न हजार त्याला आपण दहा टप्प्यांत केले तर त्याचे किती झाले? दहा हजार रुपये, दहा टप्प्याचे झाले.

**दिपक खांबित :-**

त्याच्यांकडुन दहा हजार रुपये वर्षात घ्यायचे आहेत.

**दिलीप घेवारे :-**

तो एरिया संपुर्ण झोपडपट्टीचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्याच्याकडुन दहा हजार रुपये वर्षात घ्यायचे आणि त्याला १२००/- रुपये म्युनिसिपल टॅक्स लावायचा. एखाद्या झोपडपट्टी वाल्याला आपण एक दहा हजार उपयोगात दिले आणि त्याला १२००/- रुपये म्युनिसीपल टॅक्स भरायला सांगायचा.

**रोहित सुवर्णा :-**

त्यांना टॅक्स माफ आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता ह्यांना टॅक्स माफ आहे. समजा सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांचा बंगला रस्ता रुंदिकरणात गेला. त्यावेळी ते टॅक्स भरत नव्हते का? मग ह्याच्यात टॅक्स भरायचा नाही का?

**रोहित सुवर्णा :-**

तो झोपडपट्टीचा विषय वेगळा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कोणता व्यक्ति नसेल गेला, दुकान गेले, घर गेले, तो आता टॅक्स भरतोय नविन घर गेले म्हणजे त्याला टॅक्स माफ का? त्याला ही टॅक्स भरायला लागेल ना.

**दिपक खांबित :-**

नियमानुसार असेल ते होईल.

**नरेंद्र मेहता :-**

त्याला टॅक्स भरायला लागेल ना. आपण त्याला घर देणार एक लाखाचे २५ टक्के प्रमाणे किती झाले? २५,०००/- रु. त्याच्याकडुन इनस्टॉलमेंन्ट घेतांना. अडीच हजार रुपये घेणार आणि म्युनिसिपाल्टीची पावती १२००/- रु देणार आहे. ते पण वाढले. दहावर्षानंतर ते पण २५००/- रु. आणि हे पण २५००/- रु. म्हणजे हे कितपत योग्य आहे. म्हणजे गरिबाला घरे द्यायची परंतु एक दुसरे द्यायचे.

**दिलीप घेवारे :-**

तुम्ही जे म्हणता एक लाख रुपये, ते तसे नाही. त्याच्या घराची किंमत जर दिड लाख रुपये असेल तर त्याची २५ टक्केच घेणार २५ टक्के दहा हप्त्यात घेणार.

**नरेंद्र मेहता :-**

मी तेच बोलतोय. एक लाखाचे २५ टक्के झाले. २५ हजार/- रु. दहा हप्त्याचे अडिच हजार रु. झाले म्हणजे घराचे इनस्टॉलमेंन्ट अडिच हजार रुपये आणि म्युनिसिपाल्टी टॅक्स १२००/- रु.

**दिलीप घेवारे :-**

जो घर घेईल त्याला सर्व टॅक्स भरावे लागतील.

**नरेंद्र मेहता :-**

पण त्याच्याकडुन २५ टक्केच का घ्यायचे ? पुर्ण पैसे का घ्यायचे नाही?

**एस.ए. खान :-**

साहेब, तुम्ही सांगा.

**दिलीप घेवारे :-**

आपण नियम करा. आपल्या समोर ठेवलेले आहे. आपण पुर्णपणे निर्णय द्या.

**रोहित सुवर्णा :-**

श्री. मेहता साहेब, डी. सी. ला तुम्हीच मंजुरी दिली. तुम्ही डि.सी.आर. ला मंजुरी दिली तेव्हा या विषयावर चर्चा का केली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आपण त्यांच्याकडुन २५ टक्के पैसे घ्यायचे त्याला १० वर्षात द्यायचे आहे. त्यापेक्षा १० टक्के एकदम घ्या. त्या रिपोर्टसाठी इक्वल टु ३० टक्के फॉम द इंटरेस्ट तुम्ही ज्या व्याज विषयी बोलत आहात. ते व्याज खाजगी घ्यायचे असेल तरच घ्या. नाहीतर तूमची रक्कम कशी वसुल होणार. तुमचे रुपये १० हजार किती वर्षाने वसुल होणारी म्हणजे तुमचे नुकसान आहे.

**रतन पाटील :-**

ह्यांची चांगली सुचना आहे. तुम्ही या सुचनेची नोंद घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्तांच्या सूधारीत गोषवाऱ्याप्रमाणे ३ नंबरच्या यादीवर शासनाच्या धोरणाप्रमाणे जर शासनाच्या योजनेचे निकष सभागृहाला द्या म्हणजे १० टक्के ते २५ टक्के चा मुद्दा क्लिअर होईल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

श्री. खतगांवकर साहेब तुम्हाला जेव्हा आपल्याला याची गरज असते. तेव्हा आपण भिंवडी महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका ह्या लोकांनी काय केलेले आहे? ते बघा.

**हॅरल बोर्जीस :-**

तरी ३ नंबरच्या यादीवर शासनाच्या धोरणाप्रमाणे २५ टक्के बाजार भावाप्रमाणे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मला असे म्हणायचे आहे की, १० टक्के ने घ्या. पण एक रक्कमी घ्या असे माझे म्हणणे आहे.

**रतन पाटील :-**

बरोबर आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

३ नंबर उनको जो क्लोज हे, गर्व्हमेंट के रुल और रेग्युलेशन के हिसाब से है। उनका श्री. दिलीप घेवारे से क्लेरिफीकेशन माँगो।

**तुळशीदास म्हात्रे :-**

इतर कामे करतानां सल्ला घेवुनच काम करता ना. भिंवडी महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका ह्यांचेच बघुन करा ना.

**हॅरल बार्जीस :-**

महापौर मॅडमच्या परवांनगीने बोलतो श्री. घेवारे साहेब आहे शासनाने वेळोवेळी धोरणानुसार बांधकामाचे २५ टक्के त्याऐवजी १० टक्के घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, मला या ठिकाणी एक गोष्ट समजली नाही की, जे नियम आहेत. त्या नियमांच्या बाहेर जाता येत नाही असे आहे का?

**रतन पाटील :-**

साहेब, आपण ही जी टिपणी दिलेली आहे. त्याच्यामध्ये १ नंबर मध्ये बघा. १ मध्ये असे केलेले आहे की, जी घरे विकास योजनेतील. नवीन रस्ता, रस्ता रुंदीकरणांत किंवा आरक्षणाने बाधीत होणाऱ्या अधिकृत मालमत्ता धारकांना पर्यायी जागा म्हणुन देण्यात यावी साहेब, अधिकृत या शब्दाचा अर्थ मला समजलेला नाही. जर मला अधिकृत या शब्दाचा अर्थ व्यवस्थित समजावुन सांगितला तर बरे होईल.

**नरेंद्र मेहता :-**

२५ टक्के पेक्षा १० टक्के घ्या पण एक रक्कमी घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

क्रॉस चर्चा न होता. आपण भुई मांडा आम्ही त्या मुद्दांची नोंद करतो. आणि सर्व मुद्द्यांची एकत्रच उत्तरे देवु.

**रतन पाटील :-**

आपण मुद्द्यांचे एकत्रिकरण घ्या. साहेब, आपण जर ही चर्चा घेतली नाही तर पुढचे मुद्दे कसे येतील?

**हॅरल बोर्जीस :-**

महापालिका स्तरावरती इतर महापालिकेचे हा जो विषय आहे. ह्या विषयावरती धोरण आणि निकष यांची माहिती जर तुमच्याकडे उपलब्ध असेल तर सभागृहाला सांगा म्हणजे त्याच्यावर आपल्याला चर्चा करता येईल.

**रोहिदास पाटील :-**

सभामध्ये हेच तर आम्ही अपेक्षीत करत होतो की, ठराव मांडता अनुमोदन देता मग चर्चेला विषय सुरु करता.

**जयंत पाटील :-**

ठराव मांडलेला नाही.

**रोहिदास पाटील :-**

ठराव मांडलेला नाही. मग तुम्हांला ह्याच भाषेमध्ये पाहिजे असे त्यांना सांगा सविस्तर तरी माहिती द्या.

**रतन पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये आणखीन एक आहे. पात्र लाभार्थी यांच्या मुळे कागदपत्रांची  छाननी करु पुर्तता करावी.

**मिलन पाटील :-**

महापौर मॅडम, ह्याची पुर्तता करुन पाहिजे असल्यास नंतर हा विषय पुढे घ्या. कारण ह्याची अजुन पुर्तता झालेली नाही. प्रशासनाला अजुन बरोबर उत्तरे देत येत नाही. ह्या विषयाचा निट अभ्यास करुन ते उत्तरे देतील.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयाबद्दल बोलण्याची मला परवानगी द्यावी. हे प्रकरण चुकीचे आहेत . प्रकरणामध्ये मिक्सअप केलेले आहे. ते परमन्ट द्यायचे की तात्पुरते द्यायचे दोन टिपण्या त्याच्यामध्ये आहेत. म्हणुन हे प्रकरण व्यवस्थित आणलेले नाही. बेघरांचा जो शब्द आलेला आहे. त्या ठिकाणी जे बेघर होणार आहे. त्यांच्यासाठी घरे त्याठिकाणी असा उल्लेख करा. तुमचा विषय चुकीचा आहे. हे जे लिहीलेले आहे. ते चुकीचे आहे बेघर होणार आहे. इकडे बेघर कोण आहेत? हा तरी खुलासा करा. की, इकडे बेघर कोण आहेत? बेघर होणार आहे. ना आर शेड मध्ये बांधीत आहे. रस्ता रुंदीकरणात बाधीत आहे. ते नंतर बेघर होणार आहेत.

**मुक्ता रांजणकर :-**

महापौर मॅडम, आपल्या मार्फत साहेबांना खुलासा विचारु इच्छिते. हे जे दोन्ही विषय आहेत. ते फ्लिप करुन आलेले आहेत. हाउसिंग फॉर डिसहाउस, ट्रांझिस्ट कॅम्प आपण कशाला म्हणतो? ज्यांच्याकडे घरे नाहीत. त्यांना पर्यायी टेम्परी घरे उपलब्ध करुन देणे दॅट इज हाउसींग फॉर डिसहाउस? तर त्याच्यासाठी आता तुम्ही ज्या बिल्डींगी आहेत. आता ह्यांचे ठिक आहे. ह्यांची घरे रस्ता रुदिकरणामध्ये गेली म्हणुन ह्यांना तूम्ही कुठेतरी सामावुन घेणार आहात. आपण अशा अजुन किती नविन रस्ते बांधणी करणार? मग अशा किती लोकांना तुम्ही पर्यायी जागा देणार? दुसरी गोष्ट जर आपण हाउंसिग फॉर डिसहाउसिंग असे म्हटले आणि ट्रांझिस्ट कॅम्प असे म्हटले तुम्ही आता म्हणालात की ट्रांझिस्ट कॅम्प म्हणुन वापरायचे की, हाउसिंग फॉर डिसहाउसिंगसाठी वापरायचे हे तुम्ही ठरवायचे माहपालिकेच्या धोरणानुसार तुम्ही ट्रांझिस्ट कॅम्प केव्हाच बनावायला पाहिजे होता. आपल्याकडे तसे रिर्झव्हेरेशन देखील आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आज तुम्ही मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जेवढ्या डॉलिफीटेड कन्डीशनमधील इमारती आहेत. त्यांना तुम्ही नोटीसा वगैरे लावता. त्याच्यामध्ये काही बिल्डींगमध्ये लोवर मिडल क्लास लोक राहतात. लोअर मिडलक्लास लोकांची लोकवस्ती आहे. मग लोअर मिडेल क्लास लोक जी महिन्याला तिन चार हजार रुपये महिन्याला कमविणारे आहेत. त्यांच्या बिल्डींगला आज आपण धोकादायक म्हणुन घोषीत केले तर अशा लोकांनी कुठे जायचे? अशा लोकांसाठी आपल्याकडे पर्यायी योजना काय आहे? आपण अशा लोकांसाठी आपल्याकडे पर्यायी योजना काय आहे? आपण आज तिकडे नोटीस लावली आणि नोटीसा लावुन आपण त्याच्यावर कार्यवाही केली मग ती लोक जाणार कुठे?

**रिटा शहा :-**

मा. कमिशनर साहेब, आमचे दोन प्रश्न ऐकुन घ्या मग आपण एकत्रित करुन उत्तर द्या. एकतर पहिल्या ह्याच्यामध्ये आपण दिलेले आहे की, पहिलाच मुद्दा असा आहे की, २२२ अंतर्गत की अधिकृतपणे जी लोक मालकी हक्कदार आहेत. आणि जर त्यांची जागा कूठल्याही रिझर्वेशनमध्ये गेली. तर त्या लोकांना

विस्थापीत होण्यासाठी परमनंट घरे देणार परंतु, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये रस्ता रुंदीकरणामध्ये असलेल्या सरकारी जागेवर असलेल्या झोपडपट्टी तर ते आपण अधिकृत मानणार की अनधिकृत? आणि त्या झोपडपट्टी रस्ता रुंदीकरणामध्ये गेल्या. तर तुम्ही ह्या २२२ मध्ये इनक्ल्युड करणार आहात का? कारण २२२ मध्ये आपण जी काही डेव्हलमेंन्ट करायला जात आहोत. त्याच्यामध्ये जो खरोखरच जमीन मालक आहे. त्याची लाखो रुपयांची जमिन आपल्या रस्ता रुदीकरणामध्ये किंवा इतर कूठल्याही रिझर्वेशनमध्ये बाधित होत असेल आणि ती जागा आपण ॲक्वीझेशन एक्वॉयर करत असेल तर नक्की आहे की, आपण त्याला जागेच्या बदल्यात जागा द्यायची मोबदला द्यायचा की, कॅश द्यायची . परंतु जी आपली जागा कलेक्टर लॅन्ड असेल सरकारी जागा असेल किंवा आपल्या महापालिककेतल्या हद्दीतील कूठलीही रिझर्व्हेशनची ती जागा असेल आणि त्या ठिकाणी त्या जागेत अनधिकृत झोपड्या लागलेल्या असतील जर त्या झोपड्या असतील आणि आपण अशा लोकांना कूठल्याही रिझर्व्हेशनमध्ये विस्थापीत केले तर अशा लोकांना तुम्ही २२२ मध्ये इनक्ल्युड करणार आहात का? कारण या मिरा भाईंदर शहरामध्ये धोकादायक बिल्डींग भरपुर प्रमाणात आहेत. आणि आज नाहीतर उद्या त्या धोकादायक बिंल्डीगमध्ये राहणाऱ्या लोकांना त्याठिकाणाहुन काढावेच लागेल जोपर्यंत त्यांची बिल्डींग पुन्हा नविन बनत नाही तोपर्यंत त्या लोकांची टेम्पररी पर्यायी राहण्यासाठी व्यवस्था करावी लागेल. मग आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये अशी भरपुर लोक आहेत की, ती नियमाप्रमाणे टॅक्स भरतात. आणि महानगरपालिकेच्या प्रत्येक गोष्टीत त्या लोकांचा अधिकारच आहे. तर तुम्ही अधिकृत या शब्दांची व्याख्या कशी कराल? की जे जमिन ओनर आहेत फ्लॅट ओनर आहेत, धोकादायक बिल्डींगीमध्ये राहणारे फ्लॅट ओनर आहेत. की, तुमच्या रिझर्व्हशन जागेमध्ये झालेल्या झोपड्यामध्ये अनधिकृतपणे राहतात. त्यांना तुम्ही अधिकृत मानणार आहेत. जे सन १/१/९५ पुर्वीचे आहेत. अशा लोकांना ह्याच्यामध्ये समाविष्ठ करणार आहात? आणि जर साहेब तुम्ही असे करणार असाल तर तुम्हांला २२२ अपुर्ण पडतील. तुम्हांला पुर्ण मिरा भाईंदर शहराला २२२ बनवावे लागेल एवढी लोक आपल्याकडे आहेत. आणि माझा महत्वाचा मुद्दा असा आहे की, तुमच्या कुठल्याही रोड रिझर्वेशनमध्ये किंवा कूठल्याही रिझर्वेशनमध्ये कुठेल्याही रोड रिझर्वेशनमध्ये किंवा कूठल्याही रिझर्वेशनमध्ये कुठले ही स्ट्रक्चर आहे. ज्याला मिरा भाईंदर महानगरपालिका ए.डी.टी.पी डिपार्टमेंन्ट ने त्यांचा प्लॅन मंजुर केलेला आहे. आज तुमची ती जागा रोडमध्ये बाधित आहे. की कूठल्या डी.पी रोड मध्ये किंवा कूठल्याही रोडमध्ये मग, तश्या बिल्डींगी तुम्ही रिकाम्या करुन घेणार आहात का? आणि तशा लोकांना तुम्ही २२२ मध्ये इनक्लुड करणार आहात का? रिझर्वेशनमध्ये झालेल्या अशा भरपुर बिल्डींगी आहेत. त्या बिल्डींगीचे प्लॅन मंजुर आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सभागृहामध्ये प्रकरण ४७ बाबत सन्मा सदस्यांनी विविध सुचना याठिकाणी मांडलेल्या आहेत. यामध्ये हा विषय सभागृहापुढे यापुर्वी आलेला आहे. त्यावर धोरणात्मक निर्णय झालेला होता आणि मा. आयुक्तांना अधिकार दिलेले होते मुख्यत्वे त्यामध्ये अंमलबजावणी करत असतांना ज्या काही अडचणी आलेल्या होत्या किंवा ज्या ज्या काही शासकीय नियमाच्या तरतुदी आहेत. त्या अनुषंगानी मा. आयुक्त साहेबांनी या विषयाच्या अनुषंगाने पुरक टिपणी या ठिकाणी सादर केलेली आहे. वास्तवीक हा विषय सभागृहापुढे यापुर्वी आणि आता येण्याचे मुख्य कारण म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्र. २२२ व २२२ (अ) यामध्ये समाविषयक आरक्षणातुन जो काही विकास झालेला आहे. आणि डेव्हलपरकडुन आपल्याला साधारणतः १४५ घरे उपलब्ध होणार आहेत. तर आता त्या घरांचे वाटप होण्यासाठी किंवा भविष्यात वापर होण्यासाठी महापालिकेचे एक धोरण निश्चित होउन त्या धोरणाच्या अनुषंगाने त्याची अमंलबजाणी व्हावी. यासाठी हा विषय याठिकाणी ठेवलेला आहे. वस्तुस्थितीमध्ये हाउसिंग फॉर डिसहाउसिंग हे जे आरक्षण आहे त्यातुन उपलब्ध होणारी जी घरे आहेत. महापालिकेचे इतर विकास योजनेमध्ये आरक्षण असतात. आणि त्यामध्ये जे अधिकृत विस्थापीत होतात. आणि बेघर होतात. त्यांना राहण्यासाठी जी व्यवस्था करायला पाहिजे. ह्या आरक्षणातुन जो उपलब्ध होणारा इन्फ्रास्ट्रक्चर आहे. फ्लॅट असेल तर महापालिकेने बांधकाम करुन घरे द्यायला पाहिजे किंवा समायोजन आरक्षणातुन जी घरे येतात ती घरे त्यांना वाटप करायला पाहिजे ही या मागची भुमिका आहे. आता हे करत असतांना ह्यामध्ये खुप बारकावे आहेत. काही सन्मा. सदस्यांनी हा विषय सर्व सदस्यांनी हा विषय सर्व सदस्यांना मिळालेला नाही. असा ही मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. काही सन्मा. सदस्यांनी इतर महानगरपालिका किंवा शासनाकडुन याबाबत सविस्तर माहिती घ्यावी. हा मुद्दा ही उपस्थित केलेला आहे. यामध्ये काही सदस्यांनी अधिकृत झोपडपट्टी धारक यामध्ये येतात का? असे सर्व मुद्दे याठिकाणी उपस्थित केलेले आहेत. अधिकृत मध्ये शासनाकडुन आपल्याला नियमावली तपासुन घ्यावी लागेल. ह्याचे लाभार्थपात्र निश्चित करावे लागतील. यापूर्वीचे लाभार्थी पात्र आणि भविष्यात असे आरक्षण विकसित करण्यासाठी होणारे पात्र लाभार्थी हया सर्वासाठी हया घरांचा वापर करावा लागणार आहे. मग त्यामध्ये सन १/१/९५ पूर्वीचे झोपडपट्टी धारक हयामध्ये समाविष्ट होतात का? याचा ही विचार हयाठिकाणी करावा लागणार आहे. तर या अनुषंगाने सविस्तर चर्चा होउन आणि या अनुंषगाने आपले धोरण निश्चित होउन हि १४७ घरे आपल्याला मिळणार आहेत. त्या घरांचे वाटप करण्यासाठी हा विषय आहे. याबाबत प्रशासनाकडून विविध मुददयांचा खुलासा करुन आपल्या सर्वांचे अंतिम धोरण झाले तर त्याप्रमाणे प्रशासन कार्यवाही करु शकते यासाठी हा विषय आहे. ह्याच्यामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी अधिकृत मुद्दा उपस्थित

केलेला आहे. तर जे आरक्षण बाधीत झालेले आहे जे विस्थापीत झालेले आहे ते विकास प्राधिकरणाने अधिकृत समजलेले आहेत. तेच पात्र राहणार आहेत. मग सन १९९५ पुर्वीच्या झोपडपट्टी सुध्दाही अधिकृतमध्ये समाविष्ठ होतात. ही वस्तुस्थिती आहे.

**रिटा शहा :-**

साहेब, एक्झक्टली तसेच आहे. की सन १९९५ पुर्वीच्या अशा झोपड्या आपल्याकडे भरपुर आहेत. आणि ते रिझर्व्हेशन अंडरखाली आहे. ते रिझर्व्हेशन आपल्याला डेव्हलप करायचे आहे. मग त्या सर्व लोकांसाठी आपल्याला करायला लागेल. तसे असेल तर आपण किती लोकांसाठी काय करणार आहेत?

**रतन पाटील :-**

आपल्याला किती घरे मिळणार आहेत?

**रिटा शहा :-**

फक्त १४० घरे मिळणार आहेत.

**जयंत पाटील :-**

आपण विषयामध्ये कुठल्याही प्रकारचा अभ्यास केलेला नाही. किंबहुना आपल्याकडे माहिती नाही. आणि आपण विषय आणायची घाई केली. सुरुवातीला जेव्हा मी विचारले तेव्हा आपण म्हणालात की, अधिकृत रस्त्यामध्ये बाधीत आता आपण पुन्हा झोपडपट्टीच्या विषयाकडे वळलात की, सन १/१/१९९५ पुर्वीच्या ज्या झोपडपट्ट्या आहेत त्यांना सुध्दा ह्यामध्ये द्यावे लागेल असा विषय आपण आणलात. माझे त्याबाबत काही म्हणणे नाही. प्रश्न असा आहे की, आपण याबाबत कुठलाही अभ्यास केलेला नाही. आपण सर्व्हे नंबर २२२ आणि सर्व्हेनंबर २२२(अ) याच्यामध्ये आपल्या हाउस फॉर डिसहाउस साठी किती रुम तयार होतात? आपल्याला एकुण त्या जागेतुन किती रुम मिळणार आहेत?

**दिलीप घेवारे :-**

आरक्षणाचे क्षेत्र १०,००० स्केअर मिटर आहे. आतापर्यंत ४००० स्केअर मिटरला वेगवेगळ्या तुकड्यामध्ये परवानग्या मिळालेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

माझे म्हणणे असे आहे की, या आरक्षण क्षेत्राच्या १०,००० स्केअर मिटरमध्ये आपल्याला एकुण किती सदनिका मिळणार आहे?

**दिलीप घेवारे :-**

१०,००० स्केअर मिटर क्षेत्रातुन आपल्याला १० टक्के सदनिका मिळणार आहे.

**जयंत पाटील :-**

१० टक्के सदनिका मिळणार आहे. असे आरक्षणाचे क्षेत्र आपल्या शहरामध्ये किती आहेत?

**दिलीप घेवारे :-**

आपल्या शहरामध्ये अशी आरक्षणे एकुण २ आहेत.

**जयंत पाटील :-**

साधारणः १० टक्के हे आणि १० टक्के दुसरे आपल्या शहरामध्ये तूम्हाला एकुण १०,०००घरे बनवायला लागतील.

**दिलीप घेवारे :-**

१०,००० घरे मिळणार नाहीत.

**जयंत पाटील :-**

आपल्या शहरामध्ये एवढ्या सदनिका आहेत. की, १०,००० सदनिका लागतील आणि त्या झोपड्या तूमच्या आरक्षणाच्या जागेवरच आहेत.

**दिलीप घेवारे :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब झोपडपट्टी आपण एस.आर.ए. योजना बी.एस.यु.पी. या योजना घेतलेलीच नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही कूठेही लावता.

**रिटा शहा :-**

साहेब, म्हणुनच आम्ही सांगतो की, ह्याच्यामध्ये त्याचा समावेश करु नये कारण आपल्याकडे एवढ्या धोकादायक बिल्डींगी आहेत.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मॅडम, आपण सर्व्हे आरक्षण विकसित करत नाही. आपण जे प्राधान्याने आरक्षण विकसीत करायला घेतो.

**जयंत पाटील :-**

आपण जोपर्यंत कूठल्याही विषयाचा संपुर्ण अभ्यास करुन हा विषय आणत नाही कृपया तो पर्यंत ह्या विषयांवर चर्चा करु नका. हा विषय तसाच पेंडिग ठेवा आपण संपुर्ण माहिती आणावी आणि त्यानंतर हा विषय

आणावा. माझी अशी आपल्याला विनंती आहे कारण हाउस और डिसहाउस विषय आणि ट्रांझिस्ट कॅम्प हे दोन्ही वेगळे विषय आहेत. ट्रांझिस्ट कॅम्प कुठल्याही शहरामध्ये मुंबईमध्ये म्हाडाच्या ज्या इमारती आहेत. त्यांच्यासाठी ट्रॉझिस्ट कॅम्प आहे. खाजगी जागेवरच्या इमारतीसाठी ट्रांझिस्ट कॅम्प नाही. म्हाडाच्या इमारतींसाठी ट्रांझिस्ट कॅम्प दिला जातो. हा विषय संपुर्ण माहिती सह आणावा असा मी ठराव मांडतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, तुम्ही अजुनही खुलासा केलेला नाही. आपण ज्या धोकादायक इमारती म्हणुन घोषीत केलेल्या आहेत. त्यांच्या बद्दल काय करायचे?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

धोकादायक इमारती ट्राझिस्ट कॅम्प मध्ये त्या टेम्परारी विस्थापीत होतात. यामध्ये त्याचा समावेश होत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, गेल्यावर्षीच्या पावसाळ्यात इमारत कोसळून एक माणुस मेला होता त्याचवेळेला हा विषय सभागृहात आला होता की आपण ट्राझिस्ट कॅम्प बनवायचे.

**मुक्ता रांजणकर :-**

भर पावसाळ्यात तुम्ही इमारती तोडायची नोटीस लावतात तर ती लोक जाणार कुठे?

**रोहिदास पाटील :-**

आपण अधिकार म्हणुन एक नोटीस देवुन मोकळे झालेलो आहोत. माझ्या वॉर्डमध्ये सहा इमारती आहेत. की त्याचे तुम्ही काय कराल ते सांगा तूम्ही नोटीसी देवुन मोकळे झालात तर काम संपले का? डि. जे मार्केट वाले पाच वर्षे झाली एन. ओ. सी मागतात. तरी आपण त्यांना देत नाही. ती बिल्डींग खाली होत नाही खाली बिल्डींग आहे ती पुर्ण होत नाही. अर्धवट ज्या बिल्डींगी आहेत त्या खाली होत नाही ती लोक जाणार कूठे? एक धोरणाचा भाग आहे की, आपले धोरण काय आहे? आपण व्यवस्था करणार आहोत की नाही? मॅडम त्या लोकांची तात्पुर्ती तरी व्यवस्था करायला पाहिजे शाळा, समाज मंदीर आहेत. असे आपण ......

**रतन पाटील :-**

तो विषय घेतला. पण फक्त चर्चा आहे. कारण शहरामध्ये १०० पेक्षा जास्त धाकादायक इमारती आहेत. ग्रामपंचायतीपासुन नगरपालिकानंतर महानगरपालिका अशा १०० पेक्षा जास्त धोकादायक इमारती आहेत. आणि महापालिकेने त्यांना नोटीसा पाठवलेल्या आहेत अशा नोटीसा पाठवल्या. महानगरपालिका काय काम करते? ज्या धोकादायक इमारती आहेत त्यांना खाली करा. परंतु, त्याची राहण्याची व्यवस्था आपण कुठे करणार? मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एवढी आरक्षणे आहेत त्यात संक्रमण शिबीर अजूनपर्यंत का केले नाही. संक्रमण शिबीरासाठी जागा बांधायची व त्यात स्लम उभा करायचा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीमध्ये चर्चा करतो. त्याला आपण मान्यताही देतो. तर, त्याची कारवाई का होत नाही? गेल्या वर्षी पाउस पडायच्या आधी कापडी टेन्ट उभे करायचे असेही ठरले होते. त्याचे इंन्स्टमेन्ट झाले होते. त्यालाही मा. स्थायी समितीने मान्यता दिली होती. गेल्या वर्षीही टेन्ट उभे राहिले नाही. आणि यावर्षीही तुम्ही टेन्ट उभे करण्याचे कोणतेही प्रोव्हीजन केले नाही. अधिकाऱ्यांनी केले असेल तर तसे त्यांनी सांगावे की, उद्या पाउस पडल्यानंतर आता वेध शाळेने सांगितलेले आहे की, आज रात्री पाउस सुरु होणार आहे. आज पाउस सुरु झाल्यामुळे भयंकर परिस्थिती निर्माण झाली. काही लोकांना सुरक्षीत स्थळी हलवायला लागले. एखादी धोकादायक इमारत खाली करावी लागली. तुम्ही अशा लोकांची कुठे राहण्यासाठी, बसण्यासाठी व्यवस्था करणार? अशा लोकांसाठी तुम्ही काय व्यवस्था केली आहे? हे त्यांनी सांगावे. आपल्या महापालिकेच्या कामकाजातली कंपलसरी ड्युटी आहे. हे आम्ही मागायला पाहिजे अशातला भाग नाही. प्रशासनाची जी कंम्पलसरी ड्युटी आहे. त्याबद्दल त्यांनी काय केले? याबद्दल ते काहीच बोलणार नाहीत.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, दुसरी गोष्ट अशी आहे की, आतापर्यंत ह्यांनी किती धोकादायक इमारत पाडल्या आहेत?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, हा धोकादायक इमारतींचा विषय नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, तसे त्यांना सांगा. नाहीतर लोक बेघर होतील.

**रोहित सुवर्णा :-**

हा विषय हाउसिंग फॉर डिसहाउसिंगचा विषय आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना तसे सांगा नाहीतर लोक बेघर झाल्यानंतर त्यांनी रहायचे कुठे? त्यांनी आज चार दिवस झाले अजून घरात चुल पेटवली नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र.४७ वर मा. महासभेच्या दि. ६ डिसेंबर २००६ रोजीचा ठराव क्र. ७३ जो मांडला होता. त्याबद्दल आयुक्त साहेबांनी जवळ-जवळ सहा महिन्यानंतर हा फेरविचार करण्यासाठी जो धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हा जो विषय आणला. तो फार उशीरा आणलेला आहे. कारण आज जी ४२७ लोक बेघर आहेत. डॉ. आंबेडकर नगर आणि भोलानगर, बंदरवाडी आणि धावगी झोपडपट्टी उत्तन याठिकाणच्या पात्र झोपडी धारकांची यादी देखील महानगरपालिकेने तयार केलेली आहे. ती यादी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना देखील पाठवण्यात आलेली आहे. तसेच केंद्र सरकारकडून धावगी झोपडपट्टी येथे राहणाऱ्या लोकांचे पुनर्वसण करण्यासाठी आपल्याला मंजुरी देखील मिळालेली आहे. तरी देखील देर आये दुरुस्त आए. आज परत पुन्हा सन्मा. नगरसेवक म्हणायला लागले की, झोपडपट्टीचा विषय अपूरा आहे. या सर्व सन्मा. नगरसेवकांनी ६ डिसेंबर २००६ रोजी झालेल्या मा. महासभेत या विषयावर चर्चा केलेली आहे. इतिवृत्तांताप्रमाणे जवळ-जवळ झालेल्या चर्चेत सर्व सन्मा. नगरसेवकांनी सुमारे १० पाने चर्चा केलेली आहे आणि त्यावेळी कोण असे नाही म्हणाले की, आता हा विषय अर्धवट आणू नका. नंतर सविस्तर विषय आणा. मा. महापौर मॅडम, महाराष्ट्र शासनाचा जो शासन निर्णय आहे. त्या निर्णयावर मी आपले लक्ष वेधू इच्छितो. राज्य शासन व राज्य शासनाच्या उपक्रमाच्या जमीनीवरील खेळाच्या मैदान किंवा रि-क्रिएशन ग्राउंड, उद्यान इत्यादी सार्वजनिक प्रोव्हीजनासाठी असलेली आरक्षणे, तसेच बांधकाम प्रतिबंध असणाऱ्या म्हणजे नॉन बिल्डेबल जमीनीवरील सन ०१/०१/१९९५ पूर्वीच्या पासून असलेल्या पात्र झोपडपट्यांना देखील ह्या योजना लागू आहेत. तसे ह्या ठिकाणी शासनाचे धोरणच म्हणते. आणि आज सर्व शासनाच्या धोरणाच्या विरुध्द बोलत आहेत. आज गेल्या चार वर्षापासून ह्या लोकांना राहण्यासाठी घरे नाहीत. यासंबंधी मा. आयुक्त साहेबांनी ज्यावेळेला विषय पत्रिकेवर विषय आणला. आपल्या दालनामध्ये सर्व गटनेत्यांना बोलाविले होते. दि. १० मे २००७ रोजी फक्त भारतीय जनता पार्टीचे गटनेते श्री. धनराज अग्रवालजी व काँग्रेसचे गटनेते श्री. हंसुकुमार पांडेजी त्याठिकाणी उपस्थित होते आणि त्याठिकाणी कुठल्याही पक्षाचे गटनेते असे कोणीही बोलले नाही की, तुम्ही झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन करु नका. आज याठिकाणी श्री. धनराज अग्रवालजी सभागृहात उपस्थित आहेत आणि श्री. हंसुकुमार पांडेजी आज याठिकाणी उपस्थित नाहीत. फक्त ज्या ४२७ लाभार्थी लोकांची जी यादी आहे. त्या यादीमध्ये जी काही खोटी कागदपत्रे असतील तर त्यांना मात्र त्या लाभार्थींच्या यादीतून काढून जे योग्य आहेत. तसेच जे खरचं पात्र झोपडपट्टीधारक आहेत. ज्यांची खरोखरच रुस्ता रुंदीकरणामध्ये घरे गेलेली आहेत. ज्यांची खरोखरच घरे आरक्षणामध्ये तुटलेली आहेत. अशा लोकांना पूर्नवसन करण्याबाबत सगळ्या पक्षांच्या नगरसेवकांनी त्याठिकाणी आपला एक समर्थ विचार मांडला होता. मी याठिकाणी आपल्याला सांगू इच्छितो की, तात्पुरत्या स्वरुपाचा जो ठराव झाला होता. सगळ्या नगरसेवकांच्या कदाचित लक्षात नसेल. त्या प्रत्येक नगरसेवकांनी दि. २१ जानेवारीच्या मिटींगमध्ये त्या ठरावाला मंजूरी दिलेली आहे. इतिवृत्तांतालाही मंजुरी मधला मी शेवटचा पॅरेग्राफ याठिकाणी वाचून दाखवतो. याबाबत आतापर्यंत विकास योजनेतील नविन रस्ते, रस्ता रुंदीकरण किंवा आरक्षणाचा विकास इत्यादी बाबींशी विस्थापित झालेल्या अधिकृत भोगवटाधारक हा शब्द आहे. मालमत्ता धारक नाही. मालमत्ता सुप्रिम बॉडी आहे. आपल्याला डी.सी.आर. ला अजून मंजुरी झालेली नाही. ती ड्राफ्ट आहे. आपण मा. महासभेने ठरविले तर ही जी बाहेर जनता बसलेली आहे. ही जी धावगी झोपडपट्टीची लोक आहेत, बंदरवाडीमध्ये राहणारी लोक आहेत. त्यांना कुठेतरी घरे मिळतील. आज आपल्याकडे १४७ घरे असून देखील आपण त्या लोकांचे पूर्नवसन करीत नाही. ही अत्यंत खेदाची बाब आहे. मी याठिकाणी आपले लक्ष वेधू इच्छितो की, ज्या यादीतील जेष्ठता आणि गुणवत्ता अनुसार वाटप करण्याबाबत मा. आयुक्तांच्या स्तरावर कार्यवाही करण्यासाठी आपण मंजुरी दिली. आपण प्रत्येकांनी तो ठराव मंजुर केला होता. मा. आयुक्त साहेबांनी पुन्हा तो विषय आपल्यासमोर आणलेला आहे. त्याबाबत काही हरकत नाही. आम्हाला कालच मा. आयुक्त साहेबांनी पाठवलेली टिपणी मिळालेली आहे. मी त्या टिपणीवर माझे काही विचार मांडू इच्छितो. मी टिपणीमधल्या विषयाला सोडून बोलत नाही. मी विषयावरच बोलतो आहे. टिपणी क्र.१ ...

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण स्थायी समितीमध्ये वेगळा विषय घेवून त्याच्यावर चर्चा करुया. आपण ठराव करुन घेउया.

**रोहित सुवर्णा :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. या विषयावर सगळे नगरसेवक बोलले. मी कागदपत्रे आणि शासनाच्या नियमाच्या अनुषंगाने बोलातोय. मी बाहेर जाउन एकही विषय बोलत नाही. आपण जो विषय मा. आयुक्त दुरुस्ती सुचविलेली आहे. त्या टिपणीमध्ये त्याच उल्लेख केलेला आहे. विकास नियंत्रण नियमावलीतील कलम (९) त्याठिकाणी विलीन करण्यात यावे. विलीन क्र. ९ टेबल दि. ०३/०१२००४, १८० चौ. फुट ही घरे विकास योजनेतील नविन रस्ता. रस्ता रुंदीकरण किंवा आरक्षणात बाधीत होणाऱ्या अधिकृत मालमत्ता धारकास जो शब्द वापरलेला आहे तो शब्द फक्त चुकीचा आहे. अधिकृत भोगवटाधारक असा शब्द आहे. कृपया आपण

आपला डी.सी.आर. वाचावा. डी.सी.आर. मधील पान क्र. २८ मध्ये देखील हाच उल्लेख आहे. इन द बेगीन कन्सप्टेड बाय इन शाल बी हॅन्डेड ऑन टू द म्युनिसिपल कॉन्सील फ्री ऑफ कॉस्ट. फॉर अलॉटमेन्ट बाय परसन इफेक्टेड बाय इम्लीमेन्टेशन ऑर डेव्हलपमेन्ट प्लॅन आर ऑक्युपाय रेकग्नाईझ स्ट्रक्चर. मग असे असेल तर शासनाने एका बाजूला क्लिअर केलेले आहे की, जी लोक दि. ०१/०१/१९९५ च्या पूर्वीपासून पात्र झोपडपट्टी धारक आहेत. त्यांचे देखील ह्या स्किममध्ये पूर्नवसन करावे. असे शासनाचे क्लिअरकट डायरेक्शन आहे. त्यानंतर लाभार्थ्यांची जी गुणवत्ता यादी आहे आणि जी जेष्ठता यादी असते त्याबाबत महाराष्ट्र शासनाची जबाबदारी असेल.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मला तुमच्याकडून असा खुलासा पाहिजे आहे की, जे हे म्हणतात त्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने असे निर्देश दिलेले आहेत की, झोपडपट्टी धारकांना विकास योजनेत सामील करुन घ्यावे, असे कुठे आहे का? ह्यांनी तरी स्पष्ट करावे नाहीतर प्रशासनाने तरी स्पष्ट करावे.

**रतन पाटील :-**

मग प्रशासनाने स्पष्ट करावे.

**रोहित सुवर्णा :-**

शासन निर्णय क्र. गवसु/१२२०/प्र.क्र. २४० (१) झोपासु (१) मंत्रालय दि. ११ जुलै २००१ हा शासन निर्णय आहे. सभागृहामध्ये मी कुठेही आपली दिशाभूल करणार नाही.

**लिओ कोलासो :-**

मी तुम्हांला बोललोच नाही की, तुम्ही दिशभूल करता आहात.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, एक मी इंटरअप करते. त्यांच्याकडे महाराष्ट्र शासनाचे एवढे जी.आर. आहेत. मग, प्रशासन म्हणून आयुक्त म्हणून आपण बसलेले आहात. सर्व डिपार्टमेन्टचे अधिकारी आहेत. तुमच्याकडे शासनाचा जी.आर. वगैरे काहीच नाही का? प्रशासनाने तसे क्लिअर करावे ना. एखादा नगरसेवक उठून आम्हाला सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट महाराष्ट्र शासन शिकवेल. तर प्रशासनाने काय कार्यवाही करायची?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सुप्रीम कोर्टाबद्दल किंवा हायकोर्टाबद्दल काहीही बोललो नाही.

**रिटा शाह :-**

प्रशासनाने क्लिअर करावे. कुठल्याही नगरसेवकांकडून आम्हाला ऐकायचे नाही की तो जी.आर. काय आहे?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा व सन्मा. सदस्या रिटा शाह आपण बसून घ्या. शासनाचे जे जी.आर असतील त्याबाबत खुलासा करतील. वैयक्तिक विषय काढू नका.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेबांनी ही जी टिपणी दिलेली आहे. त्याच्यामध्ये एक वाक्य लिहले आहे की, नविन रस्ता रुंदीकरणात किंवा आरक्षणाने बाधीत होणाऱ्या अधिकृत मालमत्ता धारकांना पर्यायी जागा म्हणून देण्यात यावी. जी.आर. प्रमाणे वाक्य आहे अधिकृत त्याचा अर्थ असा आहे. ज्यांना समजून घ्यायचा असेल त्यांनी चांगला समजून घ्यावा. आपण कशासाठी भांडतोय आणि सभागृहात या विषयावरती सर्व सदस्यांकडून विविध सुचना येत असताना मा. आयुक्त साहेबांनाकडून ह्या टिपणी देताना दोन टिपण्या आल्यात. एकामध्ये टेम्परररी द्यायचा. दुसऱ्यामध्ये अधिकृत द्यायचा. तर, याच्यावरती खुलासा होत नाही. सन्मा. जयंत पाटील साहेब, म्हात्रे साहेब यांनी हा विषय रितसर पुन्हा चर्चेसाठी सभेपुढे आणावा, असे ठरलेले असताना सदस्यांनी आपआपसात भांडायचे कारण नाही आणि आपण बाहेरची लोक आणतो. ती लोक गेल्या मा. महासभेच्या वेळेल्या देखील त्या झोपडपट्ट्या विषयांची चर्चा झाल्यानंतर सर्व नगरसेवकांचा निषेध करणे. त्यांच्या नावाने हात चोळणे, हे असे प्रकार करणे योग्य नाही. जे पण लोक आणत असतील त्यांनी त्या विषयावरती त्या लोकांना समजून आणायचे तुम्हाला घरे मिळणार आहेत असे सांगून अशी त्यांची दिशाभूल आपण किती दिवस करणार आहोत? आजपण हा विषय झाला.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही त्यांची दिशाभूल करीत नाही. मा. पंतप्रधान आणि विलासरावजी देशमुख स्वतः या कमिटीचे अध्यक्ष आहेत. झोपडपट्टी पूर्नवसन प्राधिकरणाचे अध्यक्ष मा. श्री. विलासरावजी देशमुख आहेत. म्हणजे आपण काँग्रेस पक्षाच्या विरोधात बोललात.

**मा. उपमहापौर :-**

आजपण त्या विषयात अधिकृत लिहलेले आहे. अधिकृत म्हणजे आपल्याला त्या जागेची मालकी सिध्द करावी लागणार आहे.

**रोहित सुवर्णा :-**

दि. ०१/०१/१९९५ पूर्वीच्या सगळ्या झोपडपट्टया ह्या संरक्षित आणि अधिकृत आहेत आणि शासनाचा जी.आर. आहे.

**मा. उपमहापौर :-**

या विषयावरती मा. आयुक्त महोदयांकडून त्यांच्या सहीनिशी दोन टिपण्या आलेल्या आहेत. याविषयांवरती सभागृहामध्ये तसा ठराव आलेला आहे. ठरावाप्रमाणे पुढे चर्चा होउ दे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या ज्या टिपणी दिलेल्या आहेत. त्या टिपणीवरच मी बोलतो आहे. ज्या लाभार्थ्यांची जी गुणवत्ता यादी आहे. जी सिनीऑरीटी आणि मेरिटलिस्ट आहे. याबद्दलही आपण बोलावलेल्या मिटींगमध्ये चर्चा झालेली होती. त्याप्रमाणे प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा. शासनाचे जे ध्येयवादी घोरण आहेत, बांधकामाबाबतीत जो काही किंमतीचा २५ टक्के ठरवलेली रक्कम लाभार्थीकडून १० वर्षात १० टप्प्याने घेण्यात यावी. यासंबंधी मी आपणाला सांगू इच्छितो. ज्या शहराची व नगराची लोकसंख्या १९९१ सालीच्या जणगणनेनुसार ५० हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशा व ज्या महानगरपालिका व नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र झोपडपट्टया अधिनियम १९७१ ज्याठिकाणी लागू करण्यांत आलेला आहे. त्या ठिकाणच्या पात्र झोपडपट्टयांना मुलभूत सुविधा पुरविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेबांनी घेतलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एकूण ४२७ पात्र लाभार्थी आहेत. ही त्यांची यादीदेखील मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना पाठविण्यात आलेली आहे. बेघरांसाठी घरे या आरक्षण विकसित होउन मिळणारी १० टक्के घरे मंजुर विकास नियंत्रणाच्या नियमावलीतील ९ टेबल १-३ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्थापित होणाऱ्या अधिकृत भागेवटाधारक ऑक्युपायर म्हणून मॅडम ठराव पास झालेला आहे. मॅडम, ६ डिसेंबरचा ठराव काय आहे ते बघा. ऑक्युपायर हा असा शब्द आहे. अधिकृत भोगवटा धारक ठरावाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. विस्थापित झालेल्या अधिकृत भोगवटा धारक असा शब्द आहे. आपण ६ डिसेंबरचा ठराव बघावा. या ठरावामध्ये प्रत्येकाने चर्चा केलेली आहे आणि आज तुम्हाला आठवते की, जमीन मालक पाहिजे. जमीन मालक कोण असणार? सरकारी जमीनीवर घरं बांधून राहणारा माणूस असतो. तो कुठून तरी बाहेरुन आलेला चाकरमानी असतो, कष्टकरी असतो, दलीत असतो, गरीब असतो. मा. महापौर मॅडम, सदर ही घरे द्यायची आहेत. नविन रस्ता, रस्ता रुंदीकरणामध्ये किंवा आरक्षणामध्ये जी घरे बाधित झालेली आहेत. दि. ०१/०१/१९९५ पूर्वीच्या पात्र झोपडपट्टी धारकांना त्या सदनिकांमध्ये कायमचे पुर्नवसण करण्यांत यावे. तसेच मा. महापौर मॅडम, मी विषयाला धरुन बोलतो आहे. ज्या महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये जे आपण सर्व याठिकाणी बसलेले आहोत. पूर्वी याठिकाणी कातकरी समाजाचे आदिवासी राहत होते. त्यांनासुध्दा श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी काढले आणि याठिकाणी महानगरपालिकेची मुख्य इमारत बांधली. ही गोष्ट खरी आहे. खोटे असेल तर श्री. अजित पाटील साहेबांना विचारा किंवा त्यावेळी बांधकाम विभागाचे इन्चार्ज श्री. केसरीनाथ म्हात्रे साहेब होते. त्या लोकांना काढून येथून काढून श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी डॉ. आंबेडकर नगर येथे शिफ्ट केलेले आहे. परत त्या लोकांना घोडबंदर येथे २३३ येथे शिफ्ट केलेले आहे. असे किती वेळा आपण त्या लोकांना विस्थापित करणार आहोत? त्या लोकांनाही विनामुल्य घर देण्याबाबत मा. आयुक्त साहेबांना आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांनी पत्रव्यवहार केलेले आहे. एकात्मिक आदिवासी विकास विभाग, शहापूर याठिकाणाहून आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला पत्र आलेले आहे. त्या पत्राचे देखील पालन करण्यांत यावे. त्यांनाही घरे देवून पुर्नवसन करणे, अधिकृत भोगवटा धारक यादीतील लाभार्थी यांची गुणवत्ता यादी व जेष्ठता यादी तयार करणे कामी सार्वजनिक बांधकाम विभागाने दक्षता घ्यावी. शासनाने वेळोवेळी ज्या धोरणानुसार बांधकामाच्या किंमतीच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांकडून यांच्याकडून १० वर्षात दर महिन्यां टप्प्यात इन्स्टॉलमेंटने घेण्यात यावी. मॅडम, मुंबईला देखील दर महिन्याला १०० रु. महिन्याला घेतली जाते आणि इथे श्री. नरेंद्र मेहता साहेबांनी काही वेगळेच सुचविलेले आहे. पात्र लाभार्थी यादीमध्ये दि. ०१/०१/१९९५ पूर्वीच्या मुळ कागदपत्रांची तपासणी स्कुटीनी आणि व्हेरीफिकेशन प्रशासनाने पुन्हा एकदा करावी. या मताशी मी देखील सहमत आहे. महानगरपालिकेने वाटप केलेली घरे दुसऱ्या कोणालाही वाटप, भाड्याने किंवा ट्रान्सफर करता येणार नाही. अशी देखील त्याच्यात अट घालण्यांत यावी. एकदा अलॉटमेन्ट झाले. त्यांनीच त्या घरामध्ये रहावे ही देखील अट जे धोरण ठरवणार आहोत त्यामध्ये टाकण्यात यावी. महानगरपालिकेने निर्धारीत केलेली रक्कम मुळ पात्र झोपडपट्टी धारकांनी भरली नाही. तर त्यांच्या वारसांनी ती रक्कम भरावी. ही देखील अट आपल्या ठरावामध्ये समाविष्ट करावी. झोपडपट्टी धारकांच्या पूर्नवसनाकरिता करण्यात येणारे जे दस्तऐवज असतात, ॲग्रीमेन्ट असतात. त्याला देखील मंबई महानगरपालिकेने देय असलेली मुद्रांक शुल्क फक्त १००/- रु. मार्केट व्हॅल्यु प्रमाणे नाही. यासगळ्या जी.आर. ची एक सुधार समितीने घेतलेला अहवाल माझ्याकडे आहे. त्यामुळे ही योजना महानगरपालिकेने लागू करावी. अशी मी विनंती करतो. या मा. महासभेला पूर्ण अधिकार आहेत. ह्या गरीबांच्या ज्या घरपट्टया लावाल त्याच्यात देखील आपण सवलती देवू शकतात. पण त्यांना कुठल्याही प्रकारचे व्याज आकारता येत नाही. असेही शासनाचे धोरण आहे. कृपया आपण या गोष्टीवर सहानुभूतीपूर्वक प्रत्येक सन्मा. नगरसेवकांनी विचार करावा आणि योग्य तो निर्णय द्यावा. जेणेकरुन या शहरातील लोक आपले नाव

घेतील की, झोपडपट्टीवाल्यांना कुठेतरी घरे दिलीत. मा. सोनिया गांधीजी आणि मा. पंतप्रधान यांनी मानखुर्द येथे येवून ५० हजार घरे वाटप केलेली आहेत आणि याठिकाणी आज आपल्याकडे घरे असून आपण वाटप करत नाही. मग, काय आपल्याला झोपडपट्टीमध्ये राहणारी लोक नको आहेत का? ज्यांना आपण महानगरपालिकेच्या जागेवरुन काढले आणि बाहेर फेकून दिलेत. त्यांना विस्थापित करण्याची आपली जबाबदारी नाही का? या सगळ्या गोष्टींवर आपण जर सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे आणि सभागृहाला देखील नम्र विनंती आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, झोपडपट्टी धारकांना आपण विस्थापित करण्याची आपली जबाबदारी आहे की नाही ते बाजूला ठेवा. आपण ज्या सदनिका धारकांकडून ज्या बिल्डींगमध्ये, इमारतीमध्ये राहतात. ते एवढा टॅक्स भरतात. ज्यावर आपली महानगरपालिका चालते. त्यांच्या घरांना, बिल्डींगना जेव्हा आपण धोकादायक इमारत म्हणून नोटीसा लावतो आणि ती लोअर, मिडल क्लास लोक जाणार कुठे?

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. रोहितजी सुवर्णा, सन्मा. सदस्या मुक्ताताई रांजणकर, सन्मा. सदस्य, उपमहापौर श्री. चंद्रकांतजी वैती, सन्मा. सदस्या सौ. रिटा शाह आणि सन्मा. सदस्या नयनाताई म्हात्रे याठिकाणी प्रकरण क्र.४७ मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २२२, २२२(अ) बेघरांसाठी घरे, हाउसिंग फॉर डिसहाउस या आरक्षणावर धोरण निश्चित करण्याबाबत हा विषय आजच्या विषय सभा पटलावर आलेला आहे. चांगला विषय आहे. त्याबद्दल मी पिठासिन अधिकारी म्हणून आणि मा. आयुक्त साहेबांनी विषय आणला म्हणून या दोघांचे सर्वप्रथम मी याठिकाणी अभिनंदन करतो. बेघर एकतर रस्ता रुंदीकरणामुळे रुंदीकरणाने बाधीत जे होतात त्यांना किंवा रस्ता रुंदीकरणामध्ये झोपडपट्टी जात असेल ते बाधित किंवा त्यांना, अशा लोकांना आपण त्या योजनेचा लाभ द्यायचा आहे. सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णाजींनी याठिकाणी शासनाचे काही आदेश, निर्देश आणि जी.आर. चे वाचन केलेले आहे. त्याबाबत मला असे वाटते की, शासनाने झोपडपट्टी संदर्भात जे काही धोरण निश्चित केलेले आहे. त्या धोरणांचे तंतोतंत पालन महापालिकेने केलेच पाहिजे. याबाबत कोणाचेही दुमत नाही. परंतु, हा खुलासा आम्ही एकमेकांत, सदस्यांमध्ये करत न बसता प्रशासनाच्या मार्फत हा खुलासा याठिकाणी आला पाहिजे. कारण आपण सदस्य खुलासा करतो. एकमेकांशी भांडायचे आणि तुम्ही वर डायसवर बसणारे अधिकारी मंडळींनी यांची गंमत बघायची, मजा बघायची हे योग्य नाही.

**रिटा शाह :-**

मग आम्ही प्रशासनाकडे जायचे का?

**आसिफ शेख :-**

याठिकाणी आपण विषयावर बोलतो, एकमेकांशी बोलतो. चांगल्यासाठी आपण सभागृहात आलेलो आहेत की, गोरगरिबांना न्याय मिळाला पाहिजे. सन्मा. सदस्य सौ. मुक्ताताई रांजणकर म्हणाल्याप्रमाणे जे फ्लॅटमध्ये राहतात. आपण ज्या धोकादायक इमारती म्हणून डिक्लर केलेले आहे. त्यांनासुध्दा आपण न्याय दिला पाहिजे. तसेच सर्वांनाच न्याय मिळाला पाहिजे. ज्या-ज्या नगरसेवकांच्या विभागात झोपडपट्टी आहेत. त्यांना झोपडपट्टीतील लोकांबद्दल निश्चित काळजी असेल, आपुलकी असेल ज्या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये झोपडपट्ट्या येत नसतील पण त्यांच्या प्रभागांमध्ये धोकादायक इमारत असतील त्यांना त्यांची चिंता असणे साहजिकच आहे. त्या सगळ्यांसाठी आपल्याला इथे निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यादृष्टीने आपण याठिकाणी धोरणात्मक निर्णय घ्यायला पाहिजे याठिकाणी मला एक गोष्ट विचारायची आहे की, सन्मा. सदस्य, उपमहापौरजी आमचे परममित्र याठिकाणी आज विरोधी पक्ष श्री. परशुराम पाटील यांच्या डायसवर बसलेले आहेत. तर परिवर्तन काहीही झालेले आहे. तसे असेल तर तशी घोषणा करा, म्हणजे आम्हाला अभिनंदन करता येईल. आपण ज्या सदनावर बसलेले आहात. ते आसन सन्मा. विरोधी पक्षांचे आसन आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा हे आतापर्यंत कायम झोपडपट्टी या विषयावर या सभागृहात बोलत होते. खरं म्हणजे त्यांचा या विषयाबाबतचा अभ्यास चांगला आहे. आतापर्यंत त्यांनी केलेला अभ्यास, त्यांनी काढलेली माहिती आणि त्यांच्या गरीबांबद्दलचा असलेला कळवळा, हा आम्ही समजू शकतो. त्यांना खरंच मनापासून असे वाटते की, गरीबांना १८० फुट २२७ फुटांची रुम मिळावी. जर या झोपड्या विस्थापित असतील, बाधीत असतील किंवा दि. ०१/०१/१९९५ च्या विकास गर्व्हमेन्टचा आहे त्या प्रमाणे असतील तर देण्यात यावे असे त्यांचे मत आहे. पण ज्या झोपड्या १९९६ साली झाल्या किंवा ज्या आजही होत आहेत. त्या झोपड्या तोडण्यात यावे असे कधी बोलले नाही. ह्या शहरात होउ नये असे कधीही बोलले नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मी तुम्हाला सांगू इच्छितो की, घोडबंदर येथील ४० झोपड्या मी तोडायला लावलेल्या आहेत. राईला देखील आम्हीच झोपड्या तोडायला लावल्या. तुम्ही माझे नांव घेतले म्हणून मी बोललो.

**जयंत पाटील :-**

मी नांव घेउनच बोलतोय.

**रोहित सुवर्णा :-**

राईच्या झोपड्या आम्हीच तोडायला लावल्या होत्या. त्या झोपड्या तुम्ही तोडायला लावल्या नव्हत्या.

**जयंत पाटील :-**

तुमचा गरीबांबद्दलचा कळवळा मी समजू शकतो. खरं म्हणजे आपल्यासुध्दा १८० फुटाची एखादी रुम शासनाने द्यावी असा मी ठराव मांडतोय. कारण तेसुध्दा विस्थापित आहेत. १९९५ नंतरही झोपड्या बनत आहेत. मग त्या तुम्ही पुन्हा लिहून देणार का? तुम्ही गरीबांना द्या. शासनाचे, काँग्रेस पक्षाचे धोरण आहे. गरीबांना झोपडपट्टी द्यावी. हे त्यांनीच सांगितलेले आहे. त्यांना मा. श्री. विलासराव देशमुखांचे त्यांनी नाव घेतले. हे काँग्रेस पक्षाचे धोरण आहे. गरीबांना घरे द्या. त्यांना विस्थापित करु नका. मा. इंदिराजींनी संपूर्ण धारावी डेव्हलप केली. हे काणी आणले? काँग्रेस पक्षाने आणले. गरीबांना झोपड्या दिल्या. गरीबांना घरे दिली. आम्ही त्याबद्दल बोलत नाही. पण बाकीचे निर्णय ठरायला पाहिजे. मगाशी मी त्यासंबंधी विषय मांडला की, तुम्ही शासनाचे जे निर्णय आहेत त्याबद्दल आधी माहिती आणा आणि त्या माहितीच्या आधारे नियमात बसत असेल, त्यांना झोपड्या द्या. आमची काहीच हरकत नाही. हाच माझा विषय आहे. पुन्हा पुन्हा किती चर्चा करायची? आपापसात भांडायचे. आजचा शेवटचा दिवस आहे. आपण गोडी-गुलाबीने बोला. सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णाजी आपण काही गैरसमज करुन घेउ नका. आपल्याला गरीबांविषयी असलेला कळवळा याबद्दल मी सहमत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

पण, तुम्ही नंतर असेही म्हणता की, दि. ०१/०१/१९९५ च्या ज्या झोपड्या आहेत त्या झोपड्या तोडा असे मी कधीच नाही बोललो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही बोला.

**रोहित सुवर्णा :-**

साहेब, जनता दरबारामध्ये मा. आयुक्त साहेब माझ्या पत्रव्यवहाराला उत्तर देत नाहीत. म्हणून शेवटी मी नगरसेवक असून देखील ही लोकशाही दिवसामध्ये आणि जनता दरबारामध्ये पत्रव्यवहार केलेला होता.

**जयंत पाटील :-**

आपल्याला गरीबांचा कळवळा आहे ही चांगली गोष्ट आहे. आम्ही समजू शकतो. तेव्हा अशाप्रकारे आपण गरीबांची नेहमी बाजु घ्या. परंतु, ह्या शहरामध्ये किती झोपडपट्टया आहेत? मागेही अनेक वेळा बोललो होतो. किती झोपडपट्टया असाव्यात? हे आपल्याला ठरवायला पाहिजे. तेव्हा येणाऱ्या पुढच्या मा. महासभेत म्हणजे नविन टर्ममध्ये येणाऱ्या मा. महासभेत आपण पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून या. हा विषय पुन्हा घेउ या आणि या शहरातील सर्व गरीबांना झोपड्या देण्याचा ठराव आपण त्यावेळेला मांडू या. धन्यवाद.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौर मॅडम, आज ही जी दुरुस्ती टिपणी आहे. डि.सी. रुलमध्ये तरतुद आहे. ती विचारात घेउन मा. आयुक्त साहेबांनी आपल्यापुढे मांडलेली आहे. सभागृहामध्ये जे सन्मा. सदस्य अधिकृत, अनधिकृत, धोकादायक इमारती दि. ०१/०१/१९९५ पूर्वीच्या असलेल्या झोपडपट्ट्या ते विस्थापितांसाठी बाधीत होणारे शासनाचे निकष इतर महानगरपालिकेतील असलेले धोरण. ह्या सर्वांचा विचार न करता ही टिपणी डी.सी. रुल प्रमाणे दिलेली टिपणी आहे. तर आपण त्याबाबत सविस्तर माहिती प्रशासन घेउ इच्छितो आणि याचा सविस्तर अहवाल येणाऱ्या पुढील सभेमध्ये सादर करु शकतो.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, माझा प्रश्न तसाच राहिलेला आहे. आपण ज्या धोकादायक इमारती म्हणून घोषीत केलेल्या आहेत. त्या इमारतीतील राहणाऱ्या लोकांना आता भरपावसात कुठे जायचे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मॅडम, धोकादायक इमारतींसाठी महापालिका अधिनियमाच्या तरतुदीच्या सेक्शन २६४ खाली आपण त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. ह्यामध्ये आपण मालक किंवा भोगवटादार ह्यांना सदरची वास्तु मजबुत करण्यास किंवा दुरुस्त करण्यास आणि ह्यापुढेही मा. महासभेने ॲडीशनल एफ.एस.आय. आपण प्रस्ताव केलेला आहे. ही नोटीस फक्त त्याच्या जिवीताचे रक्षण करण्यासाठी आणि इतर आर्थिक मालमत्तेचे नुकसान न होण्यासाठी दिलेली नोटीस आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, मान्य आहे. तुम्ही जे बोलता ती खरी गोष्ट आहे. पण माझ्या प्रभागात ज्या बिल्डींगला नोटीसा लावलेल्या आहेत. त्यांनी ही सदनिका, इमारत त्वरीत पंधरा दिवसांत खाली करण्यांत यावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यांनी कुठेही असे म्हटलेले नाही की, ही इमारत तुम्ही रिपेरिंग करा किंवा ही इमारत रिपेअरिंग करायला सुरुवात करा. त्याचे तुम्हाला काही करता येईल तर करा. त्यांनी कुठे जायचे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याबाबत रितसर प्रस्ताव आले तर त्यांना आपण दुरुस्तीची परवानगी देउ शकतो.

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, ती लोक त्याबाबतचा प्रस्ताव घेउनही आले होते. पाण ह्या लोकांनी सांगितले की, तसे काही होउ शकणार नाही. मग अशा लोकांनी भर पावसामध्ये जायचे कुठे? सगळी लोक लोअर, मिडल क्लास आहेत. ती लोक महिन्याला रु. २०००/- रु. ३०००/- कमवितात. त्यांनी जाउन भाड्याने रुम घेवून तरी कुठे राहायचे?

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आम्ही आपल्याला विनंती करतो की, आपले जे धोरण आहे ते सांगा. सन्मा. सदस्या सौ. मुक्ताताई रांजणकर मॅडम तेच म्हणतात. मी ही तेच म्हणतेय की, आपले धोरण काय आहे? आपली तयारी कुठंपर्यंत आहे? आपण एक नोटीस दिली की, आपण सुटलो का? नोटीस दिल्यानंतर ती लोक घरे रिकामी करु शकत नाही. हे तुम्हाला माहित आहे. मग त्यांच्या परिने दुरुस्ती चालू झाली नाही हे ही खरे आहे. पण समजा, तशी परिस्थिती उद्भवलीच तर आपली तयारी काय आहे? आपतकालीन व्यवस्थेबाबत आपली काय तयारी आहे? याबाबत निवेदन करा.

**मुक्ता रांजणकर :-**

त्यांना दुरुस्ती करण्याची परवानगी द्या. मी त्यांना तुमच्याकडे आणायला तयार आहे. तुम्ही परवागनी तशी काढून द्या. ती लोक दुरुस्ती करायला तयार आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

धोकादायक इमारतींसाठी मा. महासभेने ह्यापूर्वी डी.सी. रुलच्या मॉडीफिकेशनमध्ये आपण मान्यता दिलेली आहे. तो ॲडीशनल एफ.एस.आय. साठी शासनाकडे तो प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यावर अजून अंतिम निर्णय झालेला नाही. वस्तुस्थितीमध्ये पावसाळ्यात जी दक्षता घेण्यासाठी प्रशासनाने ज्या नोटीसा दिलेल्या आहेत. तसेच, या कायद्यामध्ये मा. आयुक्त साहेबांना गर्व्हनर अधिकार आहेत. कुणाचीही जिवीतहाणी किंवा वित्तहानी होणे हे योग्य नाही. आणि तुम्ही जे म्हणता की, त्यांनी अशा परिस्थितीत कुठे रहायचे? तर मा. स्थायी समितीने ट्राझिंस्ट कॅम्पसाठी आपण निर्णय घेतलेला आहे. आपल्या ज्या शाळा आहेत. टेम्परारी ऑक्युपेशनसाठी प्रशासन निश्चितच काळजी घेईल. आम्ही कोणालाही आशेवर सोडणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुम्हाला तीच विनंती करतोय की, त्योच निवेदन स्पष्ट करा किंवा अशा ठिकाणी व्यवस्था केली आहे. असे काही तरी निवेदन करा. कायदा तुम्ही वाचता. तो कायदा तुमच्या हातात आहे. असे निवेदन असायलाच पाहिजे. आम्ही सदस्य आहोत. म्हणून आमच्याकडे असायलाच पाहिजे. आमची अशी अपेक्षा आहे की, उद्या पाउस सुरु होणार आहे. अशी दुर्घटना जर घडली तर प्रशासनाने त्याबाबत कुठली तयार केलेली आहे? आम्ही अशी अपेक्षा करतो. याच्यात काय चुकीचे आहे सांगा?

**मुक्ता रांजणकर :-**

आपण ज्या इमारती धोकादायक म्हणून घोषीत केलेल्या आहेत. त्याच्यामध्ये काही बिल्डर लोकांनीही फायदा घेतलेला आहे. काही स्थानिक नेत्यांनीही फायदा घेतलेला आहे. अशा लोकांनी कुठे जायचे? त्यांच्या आत साटेलोटे असून पंधरा – पंधरा दिवसांनी त्यांना नोटीसा बजावल्या जातात. त्यांना आपण हे ही बोलू शकत नाही की, तुम्ही दुरुस्ती करा. दुरुस्ती बाबतची सगळी माहिती आमच्याकडे सादर करा किंवा आम्ही तुम्हाला दुरुस्तीसाठी परवागनी देतो. आपण असेही म्हणत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जितक्या नोटीसा पाठविल्या गेल्या आहेत की, घरे खाली करा. समजा, सन १९८५ बिल्डींगला आपण धोकादायक म्हणून घोषीत केली. रिपेअरिंग परमिशन आपण नाकारली आणि त्यांना सांगितले की, त्यासाठी तसा रितसर प्रस्ताव पुटअप करा. त्या इमारतीला परवानगी द्या. आपण सांगितले त्याप्रमाणे आणि एखादा व्यक्तीची सन १९८५ ची बिल्डींग असेल, तो तुमच्याकडे आला की, आमची बिल्डींग आज नाहीतर उद्या कोसळणार आहे. आम्हाला दुरुस्तीसाठी परवानगी द्या. तर तुमचे म्हणणे असते की, ती बिल्डींग आम्ही अजून धोकादायक म्हणून घोषीत केलेली नाही. दोन वर्षानंतर आम्ही ती बिल्डींग धोकादायक म्हणून घोषीत करु. नंतर तुम्ही त्याची परवानगी द्या. त्यावेळी कुठे शोधायचे? जो ऑलरेडी प्लॅान आज नाहीतर उद्या त्या बिल्डींग तुटणार आहेत. तर आपण त्याला का परवानगी देत नाही?

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, दुसरी गोष्ट अशी आहे की, ज्या बिल्डींग आपण धोकादायक इमारती म्हणून पहिल्यांदा घोषीत केलेल्या आहेत, तोडलेल्या आहेत. त्यासाठी काय कायदा आहे? त्या जागेमालकांनी त्या बिल्डींगी किती दिवसात बनवाव्यात? त्यांना कधीपर्यंत स्थापित करावे? जी लोक बेघर झालेली आहेत. त्यांना किती दिवसात स्थापित करावे? आज मला माहितीनुसार १० वर्षा अगोदर धोकादायक इमारती म्हणून घोषीत केल्या किंवा तोडून टाकल्या. आपण सगळे केले. आठ दिवसापर्यंत ती लोक बाहेर इकडे तिकडे फिरत आहेत. त्यांना कुठल्याही बिल्डरने स्थापित केलेले नाही किंवा कुठल्याही जागा मालकाने केलेले नाही. आपण त्यांच्यासाठी काय करणार आहात?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या कायद्यात तरतुद आहे का?

**रिटा शाह :-**

आपल्याला कायद्यात तशी तरतुद नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कायद्यात तशी तरतुद नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, माझे म्हणणे तुम्हाला पटले.

**मुक्ता रांजणकर :-**

नाहीतर आपण धोकादायक इमारती तोडायच्या आणि त्या इमारतीमधील लोकांना बेघर करायचे आणि सोडून द्यायचे.

**नरेंद्र मेहता :-**

सन १९८५ मधील बिल्डींग आपण धोकादायक म्हणून घोषीत केली. त्या बिल्डींगमधील लोक आता काही कारणाने ती बिल्डींग खाली करु शकत नाही. त्यांना परवडत नाही. ठिक आहे. आणि १९८३ मधील बिल्डींगवाला आपल्याकडे आला आणि म्हणाला की, आमची बिल्डींग आज नाहीतर उद्या पडणार आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुमच्या माहितीस्तव मी खुलासा केला होता की, शहरामध्ये जे ॲडीशनल एफ.एस.आय. साठी महापालिकेने एक विशेष प्रस्ताव करुन शासनाकडे सादर केलेला आहे. तो प्रस्ताव अजून मंजुर झालेला नाही. आपण असा गैरसमज करुन घेउ नका की, आम्ही ॲडीशनल अडीच टक्के एफ.एस.आय. देणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

आपण रि-डेव्हलपमेन्टची बिल्डींग आहे त्याला साईड बाय बरेचसे देतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आपणाला ॲडीशनल निकष सांगितले होते. आपण असे धोरण केले होते आणि ते प्रशासनाकडे सादर केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण धोकादायक इमारतींना बांधाबांधीला १.५ एफ.एस.आय. असे देतोच. स्टींगला १ देतोच. मग आता एफ.एस.आय. चा कोणीतरी येउन प्रस्ताव पुटअप केला. त्याला आपण देत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

डी. सी. रुलप्रमाणे ज्या इमारती दुरुस्त करणे शक्य आहेत आपण अशा बिल्डींगना एफ.एस.आय. देतो.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचे असे म्हणणे आहे की, १९८३ च्या बिल्डींग आहेत त्या दोन महिन्यांनी दुरुस्त करायचे, ३ वर्षानंतर परत द्यायचे आणि धोकादायक म्हणून घोषीत करायचे म्हणजे बिल्डींगवाल्यांनी रिपेअरिंगसाठी दोन-पाच लाख रुपये खर्च करायचे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याठिकाणी आपल्याला किती गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते? प्रशासनाने त्याचीसुध्दा दक्षता घेणे गरजेचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी तुमचेच काम करित आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, याबाबत आयुक्तांना, मा. महापौरांना धन्यवाद देतो की, माझ्या वॉर्डमध्ये गेल्या वर्षी ज्या इमारती अर्धवट कोसळल्या, आयुक्त येउन बसून होते, महापौर येउन बसून होत्या, आपले सर्व अधिकारी होते. आपण अमुक एक रुम खाली केला. ती इमारत आणखी पडू नये म्हणून आपण ती इमारत आपण तोडली. त्याच्याबद्दल ते नागरीक म्हणा किंवा आम्ही नगरसेवक म्हणून तुम्हाला धन्यवाद देतो. आम्ही अशी अपेक्षा करतो की, आपण काय तयारी केलेली आहे? त्याची पूर्तता काय केलेली आहे? त्याचे एक स्पष्ट निवेदन होत नाही. आपण कायद्याने जे पाहिजे ते प्रशासन त्यांचे कर्तव्य बजावत नाही. एक भाग मोकळा होतो. त्याचा दुसरा जो भाग आहे. तशी जर घटना घडली तर त्यांचे खाणे पिणे, औषधे यांच्यासहित प्रशासनाने ह्या ठिकाणी अशी व्यवस्था करायच्या मनस्थितीत आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आपल्याला अवगत केलेले आहे की, सन्मा. स्थायी समितीने धोकादायक इमारतीमध्ये दुर्घटना किंवा कुठलीही नैसर्गिक आपत्ती आली तर आपण आपल्या शहराचे जे नागरिक आहेत. त्यांच्यासाठी आपण त्यासाठी कॅम्पची व्यवस्था केलेली आहे आणि महापालिका त्या निकडीची परिस्थितीमध्ये धोरणात्मक निर्णय

घेउन दक्षतेने जी कार्यवाही करणे अपेक्षित असेल ती सर्व कार्यवाही महापालिका करेल. असे कोणतेही हलगर्जीपणा करणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

आमची ही सभा शेवटची आहे. उद्या कार्यवाही करायची, ती कार्यवाही प्रशासन करेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

निकडीच्या परिस्थितीत मा. आयुक्तांनी निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला असे माहित आहे की, आम्ही काही चुकलो नाही. चुकले तर तुम्हीच चुकले असे होणार.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण मा. स्थायी समितीचे सदस्य आहात. आपण ट्रांझिस्ट कॅम्पसाठी निर्णय घेतलेला आहे. आपल्याला हे माहित आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुम्हाला आग्रह केला होता की, पुर्तता करा. तयारी करुन ठेवा. पण तुम्ही त्यातला एकही तंबुचा कपडा खरेदी केला नाही. आम्हाला तुमच्या हे निर्दशनास आणून द्यायचे आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण शाळेमध्ये त्यांची सोय करणार ही तात्पुरती सोय झाली. ही त्यांची परमनन्ट सोय झाली नाही. परमनन्ट सोय करावी असेही मत नाही. ज्यावेळेला मा. स्थायी समिती आणि मा. महासभेमध्ये जेव्हा हा विषय चर्चेसाठी आला, त्यावेळेला ट्रांझिस्ट कॅम्प, संक्रमण शिबीर आपण बनवायचे. एका जागेचे आरक्षण घेउन तिथे त्यांना पध्दतीने लेव्हलिंग आणि त्या पध्दतीने कॉन्ट्रॅक्टींग करुन तसेच तंबु उभारायचे अशा पध्दतीने की, तिथे या सभेमध्ये तसे निवेदन देखील झालेले आहे. साहेब, शाळा ही तात्पुरती सोय झाली. समजा, इर्मजन्सी बिल्डींग खाली करुन त्यांना शाळेमध्ये न्या. शाळा ही सोय नाही. त्याच्यासाठी तुम्हाला संक्रमण शिबीर हे उभारावेच लागणार आहे. असा मा. स्थायी समितीमध्ये आणि मा. महासभेमध्ये ठराव मांडलेला आहे. साहेब, ते करा. तुम्ही जे म्हणतात ती तात्पुरती सोय झाली. पुढचे काही बोलत नाही. हे आपल्याला करायचे आहे किंवा हे आरक्षण ताब्यात घेउन या आरक्षणामध्ये आपली संक्रमण शिबीरे बनविणार आहोत. असे काहीच बोलत नाही. साहेब हे क्लिअर करा. आपण ह्याच्यावर खुलासा करावा. शाळा ही सोय नाही. अशा किती शाळांमध्ये आपण ठेवणार आहात का? आज १०० च्या वर धोकादायक इमारती आहे. प्रशासन त्यांना बांधकामास परवानगी देण्यास, दुरुस्ती करण्यास, परवानगी देण्यास चालढकल करते, असे मी म्हणतो. कारण की, मागच्या वेळेला अशाच पध्दतीने आमच्या भाईंदर (पू.) विभागामध्ये अशी घटना घडली. त्यावेळी सर्व सांगत होते की तोडूनच टाका. हा काय पर्याय झाला? धोकादायक इमारतींची दुरुस्ती करा. आपल्याकडे एवढे इंजिनियर आहेत. महापालिका एवढा पगार देते. त्याच्यावर कार्यवाही करा, दुरुस्ती करा.

**प्रभात पाटील :-**

मला कळत नाही की, सभागृहात नेमके काय चालले आहे? कारण विषयाला जेव्हा सुरुवात झाली तेव्हा मा. उपमहापौर बोलत होते की, संबंधित विषयामध्ये जे आता परिपत्रक पाठवलेले आहे ते सगळ्यांना वेळेवर न पोहचल्यामुळे व्यवस्थित अभ्यास केला नसेल आणि म्हणून हा विषय पुढे ढकलावा. अशी त्यांनी सुचना मांडली म्हणजे हा विषय पुढेच घ्यायचा आहे. गेली तासभर त्याच्यावर चर्चा चाललेली आहे. तुम्ही स्पेशली हा विषय नंतर घ्या. ह्या चर्चेला तुम्ही काही महत्व देणार आहात का? सांगा. जर विषय तुम्हाला पुढे घ्यायचा आहे. तर आजची चर्चा ही वायफळ चर्चा होईल.

**रोहिदास पाटील :-**

ही चर्चा वायफळ चर्चा कशी होईल.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मी चर्चा म्हटलेले आहे. विषय नाही. तुम्ही बदनाम करु नका.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

तो विषय घेण्यासाठी आम्ही सतत आग्रही होतो. तो घेतला नाही. त्याचे दुःख होतेय आणि सगळ्यांना माहिती आहे की, ही शेवटची मिटींग आहे.

**सुधा गोयंका :-**

महापौर मॅडम, आपके इजाजतसे बोलना चाहती हु। अशी जैसे धोकादायक बिल्डींग की चर्चा चल रही है। मुक्ता मॅडमने भी कहॉ, की, उनको दुरुस्ती की परमिशन नही दी जाती है। तो कमसे कम अनाधिकृत बांधकाम को आप लोग बिना देखे परमिशन देते है। और दुरुस्ती की परमिशन नही देते हो ऐसा क्यो आपके अधिकारी क्या करते है? इसका कारण क्या है?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी या सभागृहामध्ये सर्व प्रशासनाचे अधिकारी बसलेले आहेत. मा. उपायुक्तांनी एक नोटीस काढायची. सेक्शन २६४ त्या अनुसार आपल्या इकडच्या सर्व धोकादायक इमारतींना प्रशासनाने वेळोवेळी दोन-दोन, तीन-तीन वेळा नोटीसा काढल्या, त्या नगारिकांनी आपल्या महापालिकेच्या मान ठेवून सगळ्या इमारतीखाली केलेल्या आहेत. अशा खाली झालेल्या इमारती मेनरोडच्या आणि अंतर्गत रस्त्याच्या बाजूला लागून आहेत. मागच्या वेळेला माझ्या प्रभागाच्या समोरच्या प्रभाबातील बिल्डींग अशी अचानक कासळली त्याच्यात एका माणसाचा जीव गेला. आता मेनरोडवर तुम्ही ज्या बिल्डीगींना नोटीसा देतात. महानगरपालिका त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना आणि मालकाला, मालकाला मोस्टली कोणी देत नाही. नागरिकांनाच दिल्या जातात आणि त्या नोटीसा दिल्या म्हणजे आपल्या प्रशासनाचे हात वर. मागे मा. आयुक्त साहेब असे बोलले की, आपण त्यांना नोटीसा दिल्या. आपला कार्यभाग संपला. पण त्या रस्त्यावरुन चालत असलेली माणसे, शशिकांत नगरला जी बाल्कनी कोसळली. ती जर ७ वाजता कोसळली असती तर त्यामध्ये भरपूर प्रमाणात जिवीतहानी झाली असती. मा. आयुक्त साहेबांचे नशिब चांगले आणि आपल्या सर्व नगरसेवकांचेही नशिब चांगले म्हणून या शहरामध्ये दोन-तीन वेळा ज्या इमारती कोसळल्या भाईंदर ईस्टला सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) यांच्या वॉर्डमध्ये दोन इमारती कोसळल्या. रेड-रोज इमारतीची बाल्कनी चार वेळा कोसळली. त्याच्याखाली बसस्टॉप आहे. तिकडे भरपूर नागरिक उभे असतात. संध्याकाळच्या वेळेला जर अपघात झाला असता, तर अनेक लोक मृत्युमुखी पडले असते आणि आपल्याला प्रशासनासहित, तुम्ही स्वतः आणि आम्ही सर्व नगरसेवक आम्हाला या शहरामध्ये तोंड दाखवायला जागा राहिली नसती. लोकांनी शोधून शोधून आम्हाला ठोकून काढले असते. याकरिता सांगतोय की, पावसाळा येतोय या टर्मची आजची शेवटची सभा आहे. पण पावसाळा आपल्याला सोडणार नाही. त्या खाली झालेल्या इमारती प्रशासन का खाली करत नाही? कारण जिल्हाधिकारी कार्यालयात असा नियम आहे की, जर एखाद्याला नोटीस देवून त्यांनी ती इमारती पाडली नाही तर प्रशासन स्वतः खर्च करुन ती इमारत पाडते आणि त्याचे बिल संबंधीत सोसायटी, बिल्डर किंवा जमिन मालक असेल त्याला पाठवून देते. आज ही कार्यवाही तुम्ही का करत नाही? याच्यामध्ये तुम्हाला कसली अडचण आली? तुम्ही रितसर नोटीसा पाठवल्या. लोकांनी बिल्डींग खाली केलेल्या आहेत. तुमच्या नोटीसांना लोकांनी संपूर्ण सहकार्य केलेले आहे. लोक इकडे तिकडे परागांडा झालेली आहेत. मा. उपायुक्त साहेब मी जरा भाषण बोलत आहे इकडे लक्ष द्या. लोक परागांडा झालेली आहेत. स्वतःची कुवत नसतानाही भाड्याने रुम घेवून राहतात. मजबुरीने, तुमच्या नोटीसीला मान देवून त्यांनी त्यांची राहती घरे खाली केलेली आहेत. असे असतानाही आयक धोकादायक इमारती प्रशासनातर्फे पाडण्यांत आलेल्या नाहीत आणि अशा इमारतींची संख्या दोन आकडी आहे. एक आकडी नाही. आपल्या भाईंदर वेस्टलाच तुम्हाला अशी २०-२५ इमारती मिळतील की, ज्या खाली केलेल्या आहेत. आपल्या शिक्षण समितीचे सभापती श्री. प्रकाश ठाकूर यांची बिल्डीग खाली केलेली आहे. मेनरोडच्या काशिमि-याला लागून असलेली ती बिल्डींग पूर्ण बिल्डींग खाली झालेली आहे. आमच्या इकडे भाईंदर ईस्टला सुध्दा अनेक बिल्डींगी आम्ही फिरतो, बघतो या बिल्डींग लोकांनी खाली केलेल्या आहेत. पण अजून आपल्या प्रशासनातर्फे पाडलेल्या नाहीत आणि ज्या धोकादायक बिल्डींगी आहेत, त्या गेली चार-चार वर्षे आम्ही बघतो की, लोकांनी त्या खाली केलेल्या आहेत. पण पाडलेल्या नाहीत. पण ज्या धोकादायक नसलेल्या बिल्डींगांना तुम्ही नोटीसा लावलेल्या त्यांच्या बाल्कन्या सध्या खाली आलेल्या आहेत. कुठे इमारतीच्या बालकन्या कोसळलेल्या आहेत. हा प्रकार फार गंभीर आहे. आपल्याला माफी करणारे कोणी नाही. आपल्याकडे कायदा तरतुदी तुम्ही जे काही वापरले. नियमानुसार तुम्ही नोटीस पाठवलीत. मालकाने ती इमारत पाडली नाही. तुम्ही पाडायची कार्यवाही सुरु करा. आज ती इमारत बसवर कोसळली, एखाद्या, शाळेच्या वेळेला रस्त्यावरुन चाललेल्या मुलांवर, नागरिकांवर कोसळली तर त्यांना आपण नोटीस दिलेली नाही. तुमच्या माहिती करिता सांगतो. मुंबई महानगरपालिकेचे कमिशनर आणि पोलिस कमिशनर मानवी आयोगाने केवळ रस्त्यामध्ये एका गटाराचा मॅन्युअल उघडा करुन एक माणूस मेला आणि एक माणूस कंबरेतून अर्धे मेला. म्हणजे कंबरेतून त्याचे फॅक्चर झाले. या कारणास्तव दोन्ही कमिशनरला आरोपी म्हणून मानवी आयोगाने आपल्या समोर आणलेले आहे. त्याकरिता रस्त्यावरुन चालणाऱ्या पादचारी आहे. याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे. बिल्डीगला नोटीस पाटवली म्हणजे तुमचा कार्यभाग संपला अशातला भाग होत नाही. या बिल्डींगी पाडणे, महापालिकेच्यावतीने पाडा. व्यवस्थित, तंत्रशुध्द तांत्रिक पध्दतीने पाडा. जेणेकरुन जिवीतहानी ही होणार नाही. त्या इमारती तुम्ही धोकादायक डिक्लेअर केलेल्या आहेत. तुमच्या पाउण पट रोल पूर्ण झालेला आहे. २५ टक्के तुम्ही ना तुमची कार्यवाही वाजवली ना त्या जमिन मालकाने, सोसायटीने, बिल्डरने काही केलेले आहे. यामधला तोडगा या मिटींगमध्ये काढायचा डिसीजन घ्या आणि ह्या ज्या इमारती आहेत. ज्या पावसात आता, तेव्हा अर्धवट आहेत किंवा सुरुवात होणारही नाही. पण तात्पुरती ही कार्यवाही सुरु करा. मेन रोडच्या बिल्डींगसुध्दा तुमच्याकडून पाडलेल्या नाहीत. त्याकधीही सुरतची एक बिल्डींग मेन त्या फ्लाय ओव्हरवर कोसळता कोसळता वाचली. हे सगळ्यांनी टी.व्ही. वर बघितले. सुरतला जी इमारत कोसळली, पत्त्याच्या बंगल्यासारखी ती अख्खी रस्त्यावर येउन कोसळली. पण एक दोन दिवस अगोदर कळले होते की, ती इमारत कोसळणार आहे. हे सगळे आम्ही

टी.व्ही. वर बघितले. मॅडम, अशा घटना भाईंदरमध्ये होउ शकते आणि त्याच्यामध्ये जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आपण यावर खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्र.२२२ व २२२(अ) बेघरांसाठी घरे या आरक्षणाबाबत धोरण निश्चित करण्याचा विषय प्रशासनाने महासभेपूढे ठेवलेला आहे. मागील विषय दि. ०६/१२/२००६ च्या मा. महासभेमध्ये ज्याप्रमाणे ७३ क्रमांकाचा ठराव झाला. त्यानुसार पुन्हा सुचना, चर्चा करुन हा ठराव पुन्हा मा. महासभेपुढे यावा. म्हणून मा. आयुक्त साहेबांनी, प्रशासनाने हा गोषवारा आपल्याला दिला होता. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.२२२ व २२२(अ) या जागेबाबत महासभा ठराव क्र. ७३ दि. ०६/१२/२००६ बाबत फेरविचार करुन मा. महासभेने निर्णय घ्यावा. म्हणून त्यांनी गोषवारा सादर केलेला होता. विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ९ टेबल ३-१ब नुसार १८० चौ. फुटची घरे विकास योजनेतील नविन रस्ता रुंदीकरणामध्ये किंवा आरक्षणामध्ये बाधीत होणाऱ्या अधिकृत मालमत्ता धारकांना पर्यायी जागा म्हणून देण्यांत यावी. (२) लाभार्थी यांची गुणवत्ता यादी व जेष्ठता यादी सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार करावी. अशी जबाबदारी त्यांच्यांवर त्यांनी सोपविलेली आहे. शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या धोरणानुसार बांधकामाच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम लाभार्थी यांच्याकडून १० वर्षात १० टप्प्यात घेण्यांत यावी. तसेच पात्र लाभार्थी यांच्याकडील मुळ कागदपत्रांची तपासणी प्रशासनाने पुन्हा एकदा करावी, असा गोषवारा मा. आयुक्त साहेबांनी मा. महासभेपुढे ठेवलेला आहे. या विषयावर चर्चा करीत असताना सभागृहातील सदस्यांनी हा विषय पुढील महासभेत घेण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. सन्मा. सर्व सदस्य, संबंधित गोषवारा हा परिपूर्ण आहे आणि यामध्ये उल्लेख केलेला आहे की, नविन रस्ता, रस्ता रुंदीकरण किंवा आरक्षणामध्ये बाधीत झालेल्या बेघरांना आपण घरे देण्याबद्दल धोरण सभागृहाने ठरवायचे आहे. सर्वांनी मा. उपमहापौरांनी सुध्दा सुरुवातीला चर्चा केली. सर्व सन्मा. सदस्यांनी, सभागृहाने या विषयावर सुचना मांडली. त्यानुसार आपल्याला हा विषय करायचा आहे अशी सुचना देखील त्यांनी केलेली आहे. तसेच काही सन्मा. सदस्यांनी अशी मागणी केलेली आहे की, हा विषय पुढील मा. महासभेत घेवून यावा. तर सर्व सभागृहाची आणि सर्व सन्मा. सदस्यांची अशी इच्छा आहे की, हा विषय पुढील सभागृहासाठी आणावा. पुन्हा एकदा प्रशासनाने सर्व माहिती सभागृहापुढे आणून हा विषय घेण्यांत यावा. अशी मागणी केलेली आहे. संबंधित विषय प्रशासनाने पुन्हा एकदा विशिष्ट माहितीनुसार सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार घेण्यांत यावा. अशी मी सभागृहाला आणि प्रशासनाला सुचित करते. नगरसचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मैने जो कहॉ उसके उपर खुलासा किजिए।

**रोहिदास पाटील :-**

जो धोकादायक बिल्डींग का विषय है, उसके उपर ठिकसे चर्चा होनी चाहिए। मा. आयुक्त साहेब, आमची अशी विनंती आहे की, आम्ही या सभागृहाच्या निर्दशनास आणतोय की, तुम्ही काही इमारतींना सात-आठ वर्षे आम्ही जबाबदारीने बोलतोय की, ही इमारत धोकादायक आहे म्हणून नोटीस देता, तरीही इमारत अजून पाडली नाही. पण मी एक उदाहरण म्हणून सांगतो, आराधना इमारतीचा गेल्या वर्षी एक सज्जा पडला. आपण तातडीने ती इमारत खाली केली. ८५ लोक राहत असलेली बिल्डींग रिकामी केली. त्या इमारतीच्या तळ मजल्यावर अजूनही लोक राहतात. ती इमारत दुसऱ्या ठिकाणी कुठेही तुटली नाही. त्या लोकांनी आपल्याकडे पुन्हा एकदा विनंती केली की, त्या इमारतीचा सज्जा दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी. आपण ती परवानगी त्यांना देण्यास नाकारली. इमारत रिकामी आहे. ती लोक वणवण फिरतात. सोसायटीचा कोणताही निर्णय होत नाही आणि आपणही त्यावर कोणतीही कार्यवाही करत नाही. असेच चाललेले आहे. यावर काही ठोस कार्यवाही होण्याची गरज आहे.

**सुधा गोयंका :-**

कमसे कम ये महासभा कुछ तो निर्णय ले।

**रोहिदास पाटील :-**

१० दिवसांपूर्वी त्यांना नोटीस बजावली. ती लोक परत घाबरली. पण ती नोटीस दरवर्षी मिळते त्याप्रमाणे आताही त्यांनी ती नोटीस घेउन ठेवली. फार घाबरुन खाली केली नाही. पण समजा आपण ती बिल्डींग खाली केलीच. मग त्या लोकांनी कुठे जायचे? आपण गेली ७ वर्षे ही नोटीस बजावतोय. सज्जा, बाल्कनी ही कोसळल्यानंतर ती ताबडतोब, ती इमारत धोकादायक करायच्या ऐवजी आपण अशी तरतुद करावी की, आपले एखादे अधिकारी त्या इमारतीची पाहणी करतील आणि ही इमारत खरोखरच खाली करण्याची आवश्यकता आहे का? ती दुरुस्त करुन द्यावी. आपण नाहीतर त्यांना ती इमारत दुरुस्त करुन राहण्यास द्यावी असे कुठेतरी पाहणे गरजेचे आहे. मी तुम्हाला ही दोन्ही उदाहरणे दिलेली आहेत की जी बिल्डींग आपण तातडीने खाली केली त्यामध्ये त्याच्यापुढे वर्षभर काही झाले नाही. ज्या बिल्डींगला आपण सात वर्ष नोटीसा देतोय. ती बिल्डींग अजून कोसळली नाही आणि त्या बिल्डींगमध्ये लोकही राहतात. आज हे जे काही कन्फ्युजन होते किंवा जो काही धोका निर्माण झालेला आहे. याचा मध्यबिंदु आपण कुठेतरी शोधायला पाहिजे आणि आपले काही नैतिक सक्षम अधिकार म्हणून त्यांना विश्वास द्यायला पाहिजे.

**शशिकांत शाह :-**

मा. महापौर मॅडम, मै आपके माध्यम से सभागृह को और अधिकारीयोंको विनंती करता हु की, इस तरहसे धोकादायक इमारत शशिकांत नगर की जब बात आयी, जब वह बिल्डींग गिरी थी तब मै बाहर गाँव मे था। हमारे अधिकारीयोने अच्छी तरहसे सहायता की उसके लिए अर्ज किया की, उसके लिए स्टॅबिलीटी सर्टीफिकट दो। तब अधिकारीयोंने बोला की, आप आर.सी.सी. कन्सलटन्टसे मिलकर उसको लिखो और मै रियली धन्यवाद देता हु। उन्होने बहोत अच्छा सहकार्य दिया और उस बाढतियोको फिरसे स्टॅबिलीटी करके, उन्होने सर्टीफिकेट दिया था। उसके लिए उन्हे धन्यवाद देता हु और सभी सभासद को मै धन्यवाद देता हुँ। इस तरहसे कसे भी धोकादायक बिल्डींग होगी तो वो पहिले आर.सी.सी. कन्सलटन्ट से मिले, उनका सर्टीफिकेट महानगरपालिका को देना चाहिए और उसके लिए हमारे अधिकारी जरुर सहकार्य करेंगे। ऐसा मुझे पुरा अनुभव है। मै देड महिना बाहर गाँव था। मेरे बच्चेने सब लोगोंकी मुदत लेके यहाॅ के अधिकारी और नगरसेवकोने अच्छी तरहसे उनको सहकार्य किया और आज जो स्टेशनरोड पे जो बिल्डींग खडी है और रियली धन्यवाद देता हुँ उसक बाजु मै भी बहोत बिल्डींग है, उसके लिए भी हमने ॲप्लीकेशन दिया था। मगर वो ज्यादा धोकादायक थी और आर.सी.सी. एकदम निकामी हो गया था। सोसायटी के सदस्योंने उनको सहकार्य नही किया। आज वह लोक उसको खाली करनेको बोल रहे है। एक जो नही कर रहे है। उनको भी कराने की हो जाएगी। उस तरह आपनी सोसायटी के बारेमे हम लोगोंको ध्यान रखना चाहिए। तब नगरपालिका मदत कर सकेगी।

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, रुलिंग दिजिए।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, यु.एल.सी. परमिशन कसे द्यायचे?

**सुधा गोयंका :-**

क्यों नही दे सकते? जब अनधिकृत बांधकाम तोडता है उसका हम तोडना नही चाहते। लोग उसमे रहने जाऐंगे तो हम कुछ नही कर सकते। उन लोगोंके पास से टॅक्स भी लेते है। उसके अंदर कोई भी नियम डालके उसको ठिक किजीए। आप रुलिंग दिजीए।

(सभागृहात गोंधळ)

**रिटा शाह :-**

आरक्षण क्र. २२२ व २२२ (अ) खाली जो विषय आहे. हा जो विषय ए.टी.पी. डिपार्टमेंटकडून आणला आहे. तो खुप चांगला आहे. परंतु, ह्यामध्ये माझी अशी एक सुचना आहे, की सदर विषय खुप चांगला आहे. प्रशासनाने आपल्या समोर हाउस फॉर डिसहाउस पिपल हा खुप चांगला विषय ठेवलेला आहे. त्याच्यावर चर्चा करण्यासाठी मा. महासभेमध्ये पूढे दिलेले आहे. त्याच्या अंतर्गत मी अशी एक सुचना देते की, आपण जे १४७ फ्लॅट बांधणार आहोत त्याच्यामध्ये जेव्हा पाउस येतो आणि धोकादायक बिल्डींग बद्दल माझ्या मते संपुर्ण सभागृहाच्या नगरसेवकांनी पोटतिडकीने विषय तुमच्याकडे मांडलेला आहे. तर पावसाळ्याच्या अंतर्गत कुठलीही बिल्डींग अचानक पडली आणि त्याच्यामध्ये लोक विस्थापित झाली तर आपण ही जी १४७ फ्लॅट बनवणार आहोत. त्यांच्यामध्ये त्या लोकांची तात्पूरती सोय करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम रूलिंग दिजीए।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांचा जो धोकादायक इमारतीबाबतचा जो मुद्दा आहे. ज्या इमारती धोकादायक म्हणून डिक्लेअर करून नोटीस पाठविल्या तर सन्मा. सदस्यांनी ह्याठिकाणी मांडल्याप्रमाणे एकतर त्यांना जागा खाली करावी लागते आणि खाली केलेल्या ज्या इमारती असतात. त्या पाडाव्या लागतात. धोकादायक म्हणून डिक्लेअर करण्याच्यापूर्वी ते स्टॅबिलीटीसाठी जरी दिले. तर त्याला दुरुस्ती परवानगी देता येते. पण एकदा धोकादायक म्हणून डिक्लेअर झाल्यानंतर त्याला दुरुस्तीची परवानगी कशी देता येईल?

**प्रकरण क्र. ४७ :-**

मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ठराव क्र. ७३ बाबत फेरविचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे.

(सदरचे प्रकरण मा. महापौर यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)

**प्रकरण क्र. ४८ :-**

मिरारोड प्रभागातील शांतीनगर गृहसंकुलन व सृष्टी कॉम्प्लेक्स येथील एस.टी.पी महानगरपालिकेने ताब्यात घेतल्याने सदर इमारतींना विशेष स्वच्छता कर लागु करणेस मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. १९ :-**

सदर विषयासंदर्भात मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेला गोषवारा वाचन करण्यांत आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड प्रभागातील ''**शांतीनगर गृहसंकुलन**'' व ''**सृष्टी कॉम्प्लेक्स**'' मधील भूमिगत गटार योजना एस.टी.पी. प्लांट महानगरपालिकेने अनुक्रमे दि. २१/०५/२००५ व २६/०७/२००६ रोजी ताब्यात घेतला आहे. ''**शांतीनगर गृहसंकुलन**'' व ''**सृष्टी कॉम्प्लेक्स**'' या भागातील

रहिवाश्यांसाठी ही भूमिगत गटार योजना/एस.टी.पी. प्लांट असून त्या योजनाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थीकडून विशेष स्वच्छता कर लावण्याची तरतुद आहे. ''**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ (ब)**'' मध्ये आहे.

मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून प्राप्त झालेला अहवालानुसार खालीलप्रमाणे देखभाल व दुरुस्ती कामी वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

| **अ.क्र.** | **विभागाचे नांव** | **देखभाल दुरुस्ती करीता अपेक्षित खर्च रु.** |
|---|---|---|
| १ | सुष्टी कॉम्प्लेक्स | रु. २० लाख |
| २ | शांतीनगर गृहसंकुलन | रु. ६७ लाख |
| | **एकूण** | **रु ८७ लाख** |

वरीलप्रमाणे भूमिगत गटार योजनेतील महानगरपालिकेस वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील खर्चाचा विचार करता संबंधित लाभार्थ्यांकडून वसुल करण्याच्या दृष्टीने ''**शांतीनगर गृहसंकुलन**'' व ''**सृष्टी कॉम्प्लेक्स**'' मधील मालमत्ता करदात्यांकडून त्यांच्या करपात्र मुल्यावर १३% दराने विशेष स्वच्छता कर प्रशासनाने लागू करण्यास प्रस्तावित केलेले आहे. तो जादा असल्याने व आरोग्य सेवेची जबाबादारी महानगरपालिकेची आहे. सबब ''**शांतीनगर गृहसंकुलन**'' व ''**सृष्टी कॉम्प्लेक्स**'' यामधील मालमत्ता धारकांकडून ६% दराने विशेष स्वच्छता कर लावण्यांत यावा व सदर कराची वसुली सन २००७-२००८ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान.　　　　अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४९ चे वाचन केले.)

**मुक्ता रांजणकर :-**

कोणा-कोणाची मुदतवाढ आहे. त्यांची यादी दिलेली आहे का? कोण कोण आहेत त्यांची नावे सांगा. त्याच्यामध्ये नावे दिलेली आहे का? जे आहेत तीच का?

**हेरल बोर्जीस :-**

हो सेम तीच यादी आहे.

(सन्मा. सभागृहनेता श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ४९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रिटा शाह :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४९ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदतवाढ करणेबाबत. (दि. ०३/०५/२००७ (दि. १६/०४/२००७ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ०९)

**ठराव क्र. २० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता दि. १९.०४.२००३ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ०५ अन्वये मनपाच्या खालील विभागात आरोग्य केंद्रे सुरू करण्यास मान्यता दिली होती. तसेच सदर केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, प्रसविका, फार्मासिस्ट तथा लिपीक यांची करारपध्दतीने नेमणुकीस मंजूरी दिली होती.

| | |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ आरोग्य केंद्रे (नवघर / बंदरवाडी) |
| भाईंदर पश्चिमत | २ आरोग्य केंद्रे (जुने मनपा कार्यालय व गणेश देवलनगर) |
| उत्तन | १ आरोग्य केंद्र |
| मिरारोड | १ आरोग्य केंद्र (नयानगर) |
| काशिमिरा | १ आरोग्य केंद्र (पेणकरपाडा) |
| काशिगाव | १ फिरता दवाखाना |

वरील आरोग्य केंद्रांकरिता वैद्यकीय अधिकारी - ८, परिचारिका (एन. एम.) - ८, प्रसविका (ए.एन.एम) - २१, फार्मासिस्ट कम लिपीक - ८ या पदास करारपध्दतीने मंजूरी देण्यात आली होती. त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मा. स्थायी समितीने दि. २०.०९.२००५ रोजी ठराव क्र. ४६ अन्वये पाच महिन्यासाठी नेमणुकीस मंजूरी घेण्यात आलेली होती. तसेच महानगरपालिका क्षेत्रात नव्याने ५ आरोग्य उपकेंद्रे सुरू करणे बाबत दि. ३०.०७.२००५ रोजीच्या मा. स्थायी समितीने ठराव क्र. ८८ अन्वये आरोग्य केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी ५, परिचारिका ५, प्रसविका ५, फार्मासिस्ट तथा लिपीक ५ यांची करारपध्दतीने नेमणूक करण्यास मान्यता दिली होती. त्यापैकी आरोग्य केंद्राकरिता वैद्यकीय अधिकारी १, परिचारिका ३, प्रसविका १, फार्मासिस्ट तथा लिपीक ३ करारपध्दतीने रूजू झाले आहेत. त्यानंतरच्या काळात काही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी महापालिका सेवा सोडून गेल्यामुळे संबंधित रिक्त पदांवर मा. स्थायी समिती सभा दि. ३१.०८.२००६ च्या ठराव क्र. ९७ अन्वये वैद्यकीय अधिकारी २, परिचारिका २ व प्रसविका ४ यांची पाच महिन्यांकरिता करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली आहे.

वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दि. २०.०९.२००५ रोजीच्या मा. महासभेच्या ठराव क्र. ४६ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ५ महिन्याची मुदत वाढ देण्यात आली होती. तसेच मा. महासभा दि. २०.०१.२००६ च्या ठराव क्र. ८४ अन्वये प्रत्येक वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दर ५ महिन्यानंतर तांत्रिक खंड देऊन एक वर्षाची मुदत वाढ देण्यात आलेली होती. सदर मुदत फेब्रवारी २००७ पर्यंत संपलेली असल्यामुळे सर्व वैद्यकीय अधिकरी व कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तरी आरोग्य केंद्रांसाठी व उपकेंद्रासाठी कार्यरत असलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुदत संपल्यापासून एक दिवस तांत्रिक खंड देऊन १ वर्ष मुदतवाढ देणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रमोद पडवळ | वैद्यकीय अधिकारी |
| २ | डॉ. चंद्रशेखर कांबळे | वैद्यकीय अधिकारी |
| ३ | डॉ. अंजली पाटील | वैद्यकीय अधिकारी |
| ४ | डॉ. बालनाथ चकोर | वैद्यकीय अधिकारी |
| ५ | डॉ. अरविंद काकडे | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | डॉ. वंदना पाटील | वैद्यकीय अधिकारी |
| ७ | डॉ. नंदकिशोर लहाने | वैद्यकीय अधिकारी |
| ८ | डॉ. अशोक पेडवी | वैद्यकीय अधिकारी |
| ९ | डॉ. ब्रिजेश पटेल | वैद्यकीय अधिकारी |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मिना तेरडे | परिचारीका / एन.एम |
| २ | ज्योती सात्वे | परिचारीका / एन.एम |
| ३ | जागृती वेताळे | परिचारीका / एन.एम |
| ४ | रसीका दळवी | परिचारीका / एन.एम |
| ५ | लिटा करवालो | परिचारीका / एन.एम |
| ६ | रेश्मा शेट्टी | परिचारीका / एन.एम |
| ७ | जॉयसी हेन्ड्रीक्स | परिचारीका / एन.एम |
| ८ | चित्रा भोईर | परिचारीका / एन.एम |
| ९ | जेन्वी रॉड्रीक्स | परिचारीका / एन.एम |
| १० | स्मिता करवालो | परिचारीका / एन.एम |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रीया पागधरे | प्रसविका / ए.एन.एम |
| २ | परिदा पठाण | प्रसविका / ए.एन.एम |
| ३ | सरीता ठाणकर | प्रसविका / ए.एन.एम |
| ४ | अश्वीनी पोतदार | प्रसविका / ए.एन.एम |
| ५ | निलीमा मोकल | प्रसविका / ए.एन.एम |
| ६ | करूणा पागधरे | प्रसविका / ए.एन.एम |
| ७ | दक्षता गमरे | प्रसविका / ए.एन.एम |
| ८ | संधेना पवार | प्रसविका / ए.एन.एम |
| ९ | प्रमिला देसाई | प्रसविका / ए.एन.एम |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १० | पदमा भोंगाडे | प्रसविका / ए.एन.एम |
| ११ | सिमा चव्हाण | प्रसविका / ए.एन.एम |
| १२ | उर्मिला घेगड | प्रसविका / ए.एन.एम |
| १३ | संध्या शिंगाडे | प्रसविका / ए.एन.एम |
| १४ | सुनिता मोठे | प्रसविका / ए.एन.एम |
| १५ | जयश्री सावंत | प्रसविका / ए.एन.एम |
| १६ | मनिषा झोरे | प्रसविका / ए.एन.एम |
| १७ | सुधा पाटील | प्रसविका / ए.एन.एम |
| १८ | ज्योती आंधळे | प्रसविका / ए.एन.एम |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | राहूल भोईर | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| २ | सचिन करंडे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ३ | सुधीर पवाले | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ४ | वैशाली मोरे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ५ | धनश्री भोईर | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ६ | योगेश शिंदे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ७ | संजीव धुमाळे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ८ | प्रकाश थोरात | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ९ | माधवी क्षत्रिय | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| १० | दिलीप राठोड | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ११ | देवयानी घरत | फार्मासिस्ट तथा लिपीक |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्रीम. रिटा शहा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५० चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृहनेता श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ५० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, याच्या आपण जी डास निर्मुलनासाठी जी मुदतवाढ दिलेली आहे. ह्याच माणसाला मुदतवाढ देण्याचे कारण काय? त्यांचे कुठलेही औषध इफेक्टीव्ह नाही. शिवाय आपण त्यांच्याकडे २० लाखाचे टेंडर दिलेले होते. आपण २० लाख रूपये खर्च करून आपल्याला काय मिळाले? डासांची तर उत्पत्ती आहेच. शिवाय आपल्याकडे अजून किती आजार पसरत आहे. त्याची काहीही योजना नाही. इव्हन मागे आपण सांगितले होते की जाहीर रित्या आपण जाहीरात काढू त्या जाहीरातीही काढलेल्या नाहीत. कुठेही काही केलेले नाही. आणि आम्ही जे साफसफाईचे काम सांगितले होते. गटार, नाले साफ करा तेही कुठे साफसफाईचे काम झालेले नाही. आरोग्य अधिकारी त्यात काहीच लक्ष देत नाही. आपण त्यांना पदोन्नती देतो. ते फक्त पदोन्नती घेउन बसतात. त्याचे त्यांना काहीच पडलेले नाही. मी मागच्या सभेलाही मा. महापौर मॅडम मी आपल्याला सांगितले होते की, आरोग्य अधिकाऱ्यांवर काहीतरी कार्यवाही झालीच पाहिजे. अजूनपर्यंत त्याच्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. शिवाय, गटार नाल्यांची साफसफाई झालेली नाही. एखाद्यावरही जोपर्यंत तुम्ही कार्यवाही करणार नाही. तोपर्यंत हे थांबणार नाही. त्यांच्यावर सक्तीची कार्यवाही झाली पाहिजे. त्यांचे प्रमोशन तरी थांबवा नाहीतर सस्पेंडचे लेटर तरी द्या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी ये विषय आपने आगे के लिए लिया है। लेकीन मै आपका ध्यान आकर्षित करना चाहता हुँ। अभी साफसफाई का जो ठेका है और नाले सफाई का ठेका है। वो काम बराबर नही हो रहा है। उसमे आदमीयोंकी संख्या एकदम कम है। मेरे प्रभाग ५ और प्रभाग क्र. २१ से दोनो जगह जाकर मै बोलू तो उसमे चार शेड पर दो-दो तीन-तीन आदमी मिलकर सिर्फ दस आदमी आते है। उसमे गटर सफाई करनेवाला कोई भी आदमी नही रहता है। दवा छिडकनेवाला को भी आदमी नही रहता है। सिर्फ उधर ६ कामगार आते है। डंपर के अलग आदमी जाते है और जो दुसरी पाली मे काम करते है वो अलग जाते है। तो मै श्री. कांबळेजीसे पुछना चाहुंगा की, हमारे प्रभाग मे साफसफाई के लिए कितने आदमी है और कितने साफसफाई करनेवाले आदमी हर एक टाईम पर आते है। वहॉ साफसफाई होती नही है। जगह जगह रेबीट के ढेर पडे है मच्छरोसे संख्या बढ गई है और शहरमे डेंग्यु फैला हुआ है। तो आपको मालुम है। गत महासभा मे डेंग्यु के विषय पर चर्चा हुई है। मै चर्चा नही करना चाहता हॅु। लेकीन उसका क्या उपाय है? मै कांबळे साहेब से पुछना चाहता हुॅ की, वहॉ पर साफसफाई करनेवाले आदमीयोंकी कितनी संख्या है।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य याठिकाणी एकात्मिक डास नियंत्रण फवारणीला जकात निविदा न मागविता मुदतवाढ दिलेली आहे. असा मुद्दा याठिकाणी मांडलेला आहे. तर त्या अनुषंगाने प्रशासनाकडून खुलासा करु इच्छितो. मागील आर्थिक वर्षाचे एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रमाची जी मुदत होती. ती ३०/४/२००७ रोजी संपुष्टात आलेली आहे.नव्याने २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या प्रशासकीय व आर्थिक मंजुरी करीता आरोग्य विभागाकडून प्रस्ताव दि. १७/५/२००६ रोजी सचिव कार्यालय, मा. महापौर यांच्याकडे सादर करण्यांत आलेला होता. दरम्यानच्या काळात आपल्या तीन सभा कामाच्या व्यापामुळे विषय हा शेवटी असल्यामुळे तहकुब सभेमध्ये पुढे पुढे जात राहिला. परंतु, सरस्वती नगर काही भागामध्ये डेंग्यु सदृश्य रोगांची लक्षणे दिसून आल्यावरुन तसेच मा. सभागृहातील सदस्यांनी, विशेषतः उपमहापौर साहेबांनी सदरचे एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम राबविण्यातबाबत मा. आयुक्त साहेबांकडे लेखी पत्र दिलेले होते. मा. आयुक्त साहेबांनी याबाबतीचा विचार करुन हा विशेष प्रशासकीय मंजुरी करिता मा. महासभेमध्ये दि. १७/५/२००६ लाच यापूर्वी सादर केलेला होता. परंतु, सभेच्या कामकाजामुळे व ते विषय संपन्न न झाल्यामुळे प्रशासकीय मंजुरी न मिळाल्यामुळे रितसर जाहिर प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यात आलेल्या नव्हत्या आणि दरम्यानच्या काळात उद्‌भवलेली परिस्थितीला सामोरे जाण्याकरिता व सन्मा. सदस्यांच्या विनंतीनुसार विशेष बाब म्हणून मा. स्थायी समितीमध्ये ती प्रशासकीय मंजुरी मिळवून निविदा मागवून पुढील निविदा अंतिम होईपर्यंत आपले जे गेल्यावर्षीची एजन्सी होती, जे दर होते त्या दराने सन्मा. स्थायी समितीने दि. ३०/५/२००७ रोजी मान्यता दिलेली आहे आणि ती कायम नाही. जर आज प्रशासकीय मंजुरी मिळाली तर आम्ही तत्काळ जाहिर निविदा मागवून परत यामध्ये ठेकेदार निश्चित केले जाणार आहे. दि. ०८/६/२००७ पासून मे. नक्षत्रा ट्रेडींग कार्पोरेशनकडून सध्या जुन्या दराने काम चालू आहे. एकात्मिक डास नियंत्रण बाबत ही सध्या वस्तुस्थिती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब माझा जबाब द्या.

**मुक्ता रांजणकर :-**

फक्त एवढेच की, औषधे किती इफेटीव्ह आहेत? काम दिले, मुदतवाढ त्यांना दिल्याबाबत आमचे काही ऑब्जेक्शन नाही. पण त्यांनी एवढी वर्षे जी कामे केली त्यांनी जी औषधे वापरली ती किती इफेक्टीव्ह वापरली असे आमचे म्हणणे आहे. आणि त्याच्यावर आपल्या आरोग्य अधिकाऱ्यांचे काय नियंत्रण आहे?

**राजकुमार कांबळे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य श्री धनराजजी अग्रवालजीने आता जो प्रश्न केला त्याच्यावर बोलतोय. सध्या आमच्या जे भाईंदर (प.) ला वॉर्ड नं. २६ आणि वॉर्ड नं. १७

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

कोबळे साहेब, तुम्ही वॉर्ड नं.५, २१ आणि १६ ह्या तिन्ही वॉर्ड मर्ज करुन तो फिगर दिलेला आहे.

**राजकुमार कांबळे :-**

वॉर्ड क्र.५, २१ आणि वॉर्ड क्र. १६ मध्ये ८९ आहेत

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

८९ आहेत आणि मागच्या वर्षी किती होते?

**राजकुमार कांबळे :-**

मागच्या वर्षी किती हाते ते आता सध्या माझ्याकडे नाही.

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

तुम्ही मागच्या वर्षापेक्षा या वर्षी लेबर वाढविण्याच्याऐवजी कमी केलेले आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

तर आता जी आपली सध्या नालेसफाईची एक्स्ट्रा घेतलेली माणसे आहेत. त्याच्यामध्ये आम्ही एडजेस्ट करुन जी दक्षता मोहीम आहे त्याच्यामध्ये ........

**धनराज अग्रवाल :-**

१८ माणसे गटाराची सफाई करायला, १८ माणसे नालेसफाई करण्यासाठी, १८ माणसे साफसफाई करणार असे कसे?

**राजकुमार कांबळे :-**

मा. आयुक्त साहेबांकडे माणसे वाढविण्याबाबतचा प्रस्ताव ठेवून त्याबाबत काही करता येईल का ते बघतो.

**धनराज अग्रवाल :-**

आपण मंजुरी जास्तीची घेतलेली आहे. तुम्हाला रु. ४ करोड वाढवून दिलेले आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

जास्त मंजुर वाढविण्याचा प्रस्ताव मी करुन घेतो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कांबळे साहेब, तुम्ही तसेच वॉर्ड नं. २२ व वॉर्ड नं. २३ मधीलही कामगारांची संख्या सांगा.

**राजकुमार कांबळे :-**

मी कामगारांची संख्या वाढवून घेतो.

**शरद पाटील :-**

कामगारांची संख्या किती आहे ते सांगा?

**राजकुमार कांबळे :-**

कामगारांची संख्या ९५ आहे.

**शरद पाटील :-**

कामगारांची संख्या ९५ आहे आणि मागच्या वर्षी १०६, १०८ अशी कामगारांची संख्या होती. आम्हांला समजत नाही की तुम्ही कामगारांची संख्या कमी करताय की, वाढवताय? कामगारांची संख्या तुम्ही का कमी करताय? म्हणजे गटारे वाढली म्हणून तुम्ही पैसे वाढविले आणि परत गटारे वाढली म्हणून माणसे कमी केली का? शहराची साफसाफई कशी होणार आहे? यावर्षी पाउस उशीरा आला आहे हे आपले नशिब आहे. आजही रेल्वे जवळचा नाला आहे अजूनही साफ होत नाही.

**सुधा गोयंका :-**

सन्मा. सदस्य श्री. शरद पाटीलजी बरोबर बोल रहे है।

**रोहिदास पाटील :-**

काही वॉर्ड हे इंडस्ट्रीयल वॉर्ड आहेत. त्या इंडीस्ट्रीयल वॉर्डमध्ये संख्या कमी होण्याचे कारणच नाही. ६ वॉर्डचे क्षेत्रफळ मोठे आहे, जनसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. कारखानदारी एरिया आहे. त्याठिकाणी बर्फीगचे कारखाने आहेत. त्याठिकाणी तुम्ही कर्मचारी कमी करणार हे कसे चालेल? एका बाजूने तुम्ही आम्हाला सांगता की, निधी वाढवून द्या. निधी वाढवून देतेवेळी साधारण अशी अपेक्षा असते की, शहरामध्ये चांगल्याप्रकारे साफसफाई व्हावी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे मा. आयुक्त साहेबांच्या ही बाब निर्दशनास आणून देवून त्या ठिकाणी आवश्यक ते मॅन पॉवर वाढवून घेतले जाईल.

**शरद पाटील :-**

साहेब, मी काय म्हणतो की, तुम्ही वाढवून घ्याल ही बाब वेगळी आहे. पण कर्मचारी कमी केले गेले हा कुठला तुमचा हिशोब तुम्ही कर्मचारी कमी का केले?

**रोहिदास पाटील :-**

कमी केलेले वाढवायचे नाही. वाढवलेले कमी करायचे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यामध्ये मुख्य बाब अशी आहे की, मी ती माहिती सभागृहाला देवू इच्छितो. आपण दिलेल्या मिनिमम वेजेस प्रमाणे जे पगार द्यायला पाहिजे होते. त्याबद्दल कर्मचाऱ्यांकडून आपल्या महापालिकेमध्ये प्रदर्शन झाले आणि यावर्षापासून आपण मिनिमम वेजेसप्रमाणे नेसेसरी आपण टेंडर टाकून देणे अपेक्षित आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आपण मा. स्थायी समितीमध्ये बजेट प्रोव्हिजन करतेवेळी त्यांचे पगार वाढवलेले आहेत. त्याच्यावर नीट चर्चा करुन ती बजेट प्रोव्हिजन केली.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बरोबर आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठेकेदाराला त्यासाठीच रक्कम वाढवून दिली. ठेकेदाराची माणसे कमी करुन किंमत वाढविली असे नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माणसे कदाचित कमी होउ देणार नाही. आवश्यकता असेल त्याबाबत आपण मा. आयुक्त साहेबांकडून मंजूरी घेवून त्याठिकाणी मॅन पॉवर वाढविली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आमची अशी विनंती आहे की, जी मुळ सफाई कर्मचारी होती. म्हणजे ज्याठिकाणी १०६ माणसे होती. १०६ मध्ये आणखी १५ टक्के वाढवा. माझ्या वॉर्डमध्ये १४५ सफाई कर्मचारी होते. त्याच्यामध्ये १५ टक्के अजून वाढवा असे व्हायला पाहिजे. तुम्ही माझ्यामधील १४५ सफाई कर्मचाऱ्यांच्या ठिकाणी ९५ सफाई कर्मचारी केले. ५० सफाई कर्मचारी कमी केले आणि सांगता की, १० सफाई कर्मचारी वाढविली. हे काय सभागृहासाठीचे उत्तर झाले का?

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम की परमिशनसे बोलना चाहुँगी. नालेसफाई का मुद्दा मैने उठाया। दुसरे दिन आपने दौरा रखा था फिर भी आप कोई कारन से नही आ सके। कोई बात नही। आपने सभी अधिकारी आये थे। उनसे पुछीये, उस दिन पोझिशन क्या थी? सारे नाले की, हालत बहोत बुरी थी। तब से लोग काम पर लगे उसके लिए मै धन्यवाद देती हुं। फिर भी काम पुरा नही हुआ। आपने खुद भी देखा होगा, उन नालो की क्या पोझिशन थी।

**धनराज अग्रवाल :-**

मागच्या वर्षी तुम्ही एका डंपरचे किती रुपये देत होतो?

**सुधा गोयंका :-**

इतना रुपया देने के बावजुद नालो की सफाई क्यो नही हो पा रही है।

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रभागामध्ये साफसफाईसाठी माणसे का कमी आहेत? त्याबाबत मी कांबळे साहेबांकडे कम्लेंट दिलेली आहे.

**राजकुमार कांबळे :-**

मागच्या वर्षी डंपरचे रु. १४५०/- देत होते.

**धनराज अग्रवाल :-**

मागच्यावर्षी रु. १२००/- किती रुपये होते? आता किती देतात ते सांगा. मला महिती आहे, तुम्ही किती देता ते?

**राजकुमार कांबळे :-**

आता आम्ही १६००/- रुपये देतो.

**लिला पाटील :-**

मोठी गटारे जर साफ होत नाही तर लहान गटारे कशी साफ करणार. बाहेर रॅबीट पडलेले आहे.तुम्ही ते कधी उचलणार?

**धनराज अग्रवाल :-**

आता तुम्ही रु. २०००/- देता. आता माणसाप्रमाणे पैसे एकदम वाढवलेले आहे. परंतु, आपली माणसे वाढलेली नाहीत. प्रभागामध्ये जे सफाई कर्मचारी कामे करतात. डंम्परवर जातात. ते दुसऱ्या गटारांवर जातात. तेच सफाई कार्मचारी दुसरी गटारे साफ करण्यासाठी जातात. मग साफसफाई कशी होणार?

**जयाबाई भोईर :-**

माझ्या वॉर्डमधील कामगार का कमी केले?

**सुधा गोयंका :-**

एकही मजूर दोनो जगह काम कर रहे है? और एकही पगार ले रहा है।

**धनराज अग्रवाल :-**

परत आता तुम्ही दक्षता विभाग वेगळा केलेला आहे. त्याचे काय? त्यातली सफाई कर्मचारी इकडे घेतली तर इकडे माणसेच नाही.

**सुधा गोयंका :-**

यहॉ से दो आदमी ले रहे है। मगर वहॉ से कहॉ कर रहे है। एकही आदमी दोनो जगह का काम कर रहा है।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ज्या ज्या प्रभागामध्ये, ज्या वस्तीमध्ये सफाई अंतर्गत मॅन पॉवर कमी आहे अशी तक्रार आहे. त्याची नोंद घेवून आवश्यक तो मॅन पॉवर वाढविला जाईल. कुठेही सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता पडू दिली जाणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रभागामध्ये कर्मचारी कमी आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी त्याच्याशी चर्चा केलेली आहे. मागच्या वर्षी पेक्षा कुठेही माणसे कमी नाहीत. पण जर जास्त सफाई कर्मचारी लागत असतील तर तशी व्यवस्था करण्यांत येईल.

**मुक्ता रांजणकर :-**

जर जास्त माणसे होती तर तुम्ही काम कशाला थांबवले?

**जयाबाई भोईर :-**

साहेब, आपल्याकडे सफाई कर्मचारी का कमी आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे सफाई कर्मचारी कमी नाहीत.

**सुधा गोयंका :-**

मेरे प्रभाग मे जितने कर्मचारीयोंकी जरुरत है, उतने कर्मचारी नही है।

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपल्याकडे सफाई कर्मचारी कमी आहेत. तुम्ही तशी त्या कर्मचाऱ्यांची फिगर घ्या. प्रभाग क्र.६ मध्ये आधी किती कर्मचारी होते? आणि आता किती कर्मचारी आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे १ जुनपासून दर पावसाळ्याकरिता विशेष दक्षता पथक तयार करावे लागतात. त्यासाठी आपण प्रत्येक विभागातील १० कर्मचारी वर्ग केलेले आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

म्हणजे विभागामध्ये आपण माणसे देणार नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ऐकून घ्या. अशी जर माणसे कमी होत असतील तर आपण वाढवून देवू सांगतोय ना. त्यात कोणतीही अडचण येणार नाही.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या वॉर्डमध्ये ७० कर्मचारी होते. ते कमी करुन ६० का केलेत? १० ते १२ कर्मचारी कमी का केले? याचे मला उत्तर द्या. तुम्ही कर्मचारी का कमी करता?

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, इस वक्त ज्यादा कर्मचारीयोंकी जरुरत है। इस वक्त ही कर्मचारी कम क्यों किये गये है?

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ही जी माहिती आम्हाला दिली गेलेली आहे. ही माहिती कशाच्या आधारे दिलेली आहे? ५० हजार सेप्टी टँक वगैरे आणि ही ५५ डबकी, तलाव आहेत. त्यांनी ही माहिती कशाच्या आधारे दिलेली आहे? ही माहिती पूर्णतः खोटी आहे. सभागृहाची दिशाभूल करणारी आहे. ही माहिती अधिकाऱ्यांनी कशाच्या आधारे काढलेली आहे? ते त्यांना विचारा.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, हा विषय प्रत्येक वेळेला निघत असतो की, आरोग्य अधिकारी दिशाभूल करतात. प्रत्येक मिटींगला हा विषय झालेला आहे. मागे तीन मिटींगही आरोग्य विभागासाठी आहे. तरी आपण त्यांच्यावर कार्यवाही करित नाही. ते निवांत जाउन पाठीमागे बसलेले आहेत. त्यांना उत्तर देण्याची घाई नाही.

**मिलन पाटील :-**

त्यांनी ही माहिती कशाच्या आधारे काढलेली आहे? आपल्या शहरामध्ये सेफ्टी टँक किती आहेत? सर्व्हे तरी ज्यांनी खरे केले की सर्व्हे न करता तुम्ही सभागृहाला खोटी माहिती कशाला देता आणि सगळ्या या फिगर तुम्ही खोडून दिलेल्या आहेत.

**मुक्ता रांजणकर :-**

त्यांनी फक्त बघत रहायचे आणि उत्तरे सगळ्यांनी द्यायची असे आहे का?

**मिलन पाटील :-**

केवळ पैसे वाढविण्याच्या दृष्टीकोनातून या फिगर दिलेल्या आहेत. त्यांनी मला प्रुफ करुन दाखवावे की ही माहिती खरी आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला कल्पना आहे की, आपल्याकडे सेफ्टी प्रोजेक्ट आहेत. त्या ५० हजारापेक्षा जास्त कॉन्ट्र्युबाईट होणारा एरिया आहे. इथे तर ५० हजार एस्टीबीट एरिया दिलेला आहे. ही दिलेली माहिती खोटी नाही आणि आपल्या शहराची सन २००१ ची लोकसंख्या ५ लक्ष २१ हजार जी आहे. आज त्यांनी ती

लोकसंख्या ८ लक्ष अंदाजित पकडलेली आहे. आपण असे म्हणू शकत नाही की, ही सर्व माहिती खोटी आहे. आपण एस.टी.पी. म्हणजे काही वेगळे नाही.

**मिलन पाटील :-**

आठ लक्ष लोकसंख्या आहे ती बरोबर आहे. पण त्यांनी सर्व्हे केलेला आहे का? आणि सर्व्हे केलेला असेल तर त्याचा रिपोर्ट तुमच्याकडे आहे का? सर्व्हे दाखवा. आहे का अधिकाऱ्यांनी दाखवा. त्याच्या आधारे माहिती दिलेली आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण जी अंदाजित लोकसंख्या भरतो. त्याला कोणता सर्व्हे करणे अपेक्षित आहे?

**मिलन पाटील :-**

हा गोषवारा दिलेला आहे. तो तुमचा गोषवारा आहे ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा गोषवारा मा. आयुक्त साहेबांचा आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांना माहिती असेल ना. अधिकाऱ्यांनी माहिती दिली तेव्हाच मा. आयुक्त साहेबांनी सही केली ना. मा. आयुक्त साहेबांना अधिकाऱ्यांनी माहिती दिली. तुम्ही अधिकाऱ्यांना विचारा की, ही तुम्ही दिलेली माहिती सत्य आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही माहिती सत्य आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आता जो प्रस्ताव मांडला. तो प्रस्ताव आम्हाला समजलेला नाही. हा प्रस्ताव कॅन्सल आहे का?

**जयाबाई भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जे नालेसफाईचे काम घेतले त्यासाठी नाले खोदलेले आहेत का?

**हॅरल बोर्जीस :-**

ठराव नही था। ६ महिने बाद सिर्फ फायनान्शीयल ॲफ्युशियल दिया था।

**मिलन पाटील :-**

आधी त्यांना माहिती देवू द्या.

**राजकुमार कांबळे :-**

ही माहिती आमच्या प्रत्यक्ष स्वच्छता निरिक्षकाने प्रत्येक एरियामध्ये फिरुन ही माहिती गोळा केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

माहिती गोळा केली म्हणजे तुमच्याकडे त्याचा अहवाल आहे का?

**राजकुमार कांबळे :-**

आमच्याकडे त्याचा अहवाल आहे. कार्यालयात तुम्हाला दाखवितो.

**मिलन पाटील :-**

काय, कसला अहवाल आहे?

**राजकुमार कांबळे :-**

शहरामध्ये किती सेफ्टी टॅंक आहे? याबद्दलची संपूर्ण माहिती आमच्याकडे आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही प्रत्यक्ष प्रभागामध्ये फोन केलेला आहे का?

**राजकुमार कांबळे :-**

आमच्या स्वच्छता निरिक्षकाने प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला तसे लेखी स्वरुपात दिलेले आहे का?

**राजकुमार कांबळे :-**

काय लेखी स्वरुपामध्ये दिलेले आहे?

**मिलन पाटील :-**

मी ह्या माहितीला चॅलेंज करतो. तुम्हाला तसे रायटींगमध्ये दिलेले आहे का? तुमच्या अधिकाऱ्यांने तुम्हाला असे रायटींगमध्ये दिलेले आहे का? की, या प्रभागामध्ये एवढे सेफ्टी टॅंक आहे, गटाराची लांबी, रुंदी एवढी आहे.

**राजकुमार कांबळे :-**

हो. याची सगळी माहिती आपल्याला मिळेल.

**मिलन पाटील :-**

मला लेखी माहिती हवी.

**राजकुमार कांबळे :-**

हो. आपल्याला संपुर्ण माहिती मिळेल. गटाराची लांबी, रुंदी सकट सगळा अहवाल मिळेल.

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, मागे झालेल्या नालेसफाईच्या अहवाला सारखा अहवाल मिळेल का?

**मिलन पाटील :-**

कांबळे साहेब, तुम्ही सभागृहाला सांगता की, ही माहिती मिळेल म्हणून, पण ती सत्य माहिती मिळेल का?

**राजकुमार कांबळे :-**

गटाराची लांबी, रुंदी याबाबतची सर्व माहिती आमच्याकडे आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही ही जी गोषवाऱ्यात माहिती दिलेली आहे त्याची सत्य माहिती आम्हाला मिळेल का? तुम्ही फक्त हा बोला. सर्व बोलणे टेपींग होत आहे. मी नंतर मा. महापौर मॅडमचे रुलिंग घेईन. तुम्ही सत्य माहिती देता. तुम्ही फक्त बोला की, तुम्ही सत्य माहिती देत आहात म्हणून आणि कबुल करायचे कांबळे साहेब तुम्ही कबुल करा की, माहिती सत्य आहे म्हणून.....

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना माझ्या प्रश्नाचा खुलासा करायला सांगा. त्यांनी साफसफाई अजून का थांबवलेली आहे?

**मिलन पाटील :-**

कांबळे साहेब, ही जी माहिती गोषवाऱ्यात दिलेली आहे. ती  माहिती सत्य आहे.

**राजकुमार कांबळे :-**

गटाराच्या लांबी, रुंदीची माहिती आमच्याकडे आमच्या एस.आय. ने दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

या सेफ्टी टँक आणि गटाराबद्दलची सत्य माहिती द्या.

**राजकुमार कांबळे :-**

मी अंदाजित माहिती दिलेली आहे. अंदाजित ५० हजाराची माहिती दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

ही डबली वगैरेची माहिती दिलेली आहे. ती सत्य माहिती नाही. तुम्ही फक्त कबुल करा. हे सगळे टेपींग होत आहे. मला जी तुमच्यावर कारवाई करायची आहे. ती मी नंतर करीन. तुम्ही फक्त बोला की, मी ही जी माहिती दिलेली आहे ती सत्य आहे. सभागृहाची दिशाभूल करु नका. हे जनतेचे पैसे आहेत.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहामध्ये काय चालले आहे? मा. आयुक्त साहेबांनी दिलेल्या गोषवाऱ्यात सत्य काय की असत्य काय? गोषवाऱ्यावर मा. आयुक्त साहेब सही करतात. त्याचा अर्थ त्यांच्यावर ॲन्थोन्टीक कुठली तरी जबाबदारी आहे. त्यांच्या एस.आय. किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांनी दिलेले रिपोर्टींग ते सत्य आहे की असत्य आहे. जेव्हा प्रश्न मा. महासभेमध्ये उपस्थित होतो. त्यावेळी सरळ सरळ हा एलिगेशन मा. आयुक्त साहेबांवर लागतो.

**मिलन पाटील :-**

तुमच्याकडे गेल्या वर्षीचे जे असते त्याला तुम्ही रिपीट करता. पुन्हा त्याच्यामध्ये थोड्या थोड्या फरकाने तुमच्याकडे येते. पण सत्य परिस्थिती काय आहे ते कोणी जाणून घेतच नाही. जमिन, डबकी, गटारे किती झालेली आहे?

**रिटा शाह :-**

याचा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सर्व कारभार अक्षरक्ष अर्धवट चाललेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सर्व सदस्यांनी आपआपल्या वॉर्डबद्दलच्या साफसफाई बद्दल माहिती दिली. काही ठिकाणी नालेसफाई झालेली नाही. तर काही वॉर्डमध्ये वॉर्ड सफाईसाठी जे कामगार दिलेले आहेत. ते कामगार कमी आहेत. यानंतर मा. उपायुक्तांनी खुलासाही केलेला आहे की, ज्याठिकाणी कामगार कमी आहेत. त्याठिकाणी कामगार वाढविण्यात येतील. नालेसफाई ज्याठिकाणी झालेली नाही. त्याठिकाणी करुन देण्यांत येईल आणि ती नालेसफाई त्वरीत व्हावी अशी मी त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश व संबंधित ज्या सुचना आहेत. त्या सुचनांचे पूर्णपणे पालन करुन त्या त्या ठिकाणी कामे करण्यांत यावीत.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, आपण हे गेल्या तीन मिटींगपासून करतोय.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही गेल्या मिटींगमध्ये सांगितले होते की, ज्या प्रभागांमध्ये पाणी तुंबले किंवा गटार चॉकअप होतील, अशांचें आपण पेमेन्ट करणार नाही. असे आपण रुलिंग दिले होते. मग तुम्ही असे रुलिंग देण्याची काय गरज होती?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रत्येक वेळी तुम्ही रुलिंग देता पण त्याची अंमलबजावणी होत नाही. याचा तुम्ही आढावा घेता का? आता चार-आठ दिवसांपूर्वी आपली जी मिटींग झालेली आहे. त्याच्यामध्ये मी डेंग्युच्या विषयाबाबत तुम्हाला पोटतिडकीपासून सांगितले. सभागृहात डेंग्युची माहिती अजून गेलेली नाही. हे एवढे बोरट अधिकारी आहेत. त्यांनी अजूनसुध्दा त्या माणसाकडे माहिती गेलेली नाही. मा. आयुक्त, मा. उपायुक्त साहेब तुम्ही रुलिंग दिलेले की, की ते उद्याच्या उद्या जातील. मला याचा तुम्ही जबाब द्या की, ते गेलेले आहेत की नाही. डेंग्यु होवून लोक मरुन जातील. साहेब, तुम्ही रुलिंग दिलेले आहे की, नाही ते सांगा? अधिकारी चौकशी करण्यास गेले होते का ते सांगा. त्याला मुदतवाढ द्यायलाच नको.

**डॉ. पडवळ :-**

मा. सदस्यांनी जे पेशन्ट बद्दल सांगितले होते. तो पेशन्ट कस्तुरी हॉस्पीटलमधील पेशन्ट होता.

**मिलन पाटील :-**

कस्तुरीमधला, आराधना बिल्डींग, तिसरा माला, अजिज शेख साहेब मी तुम्हाला त्यादिवशी नांव ही सांगितले आणि तुम्ही ते नांव लिहूनही घेतले होते. आता तुम्ही पुन्हा लिहून घेत आहात आणि मा. आयुक्त साहेबांनी रुलिंग दिलेले आहे. हे आपले काय काम करणार आहेत? मी नव्हतो म्हणून तुम्ही मुदतवाढ दिली. मी असतो तर मी या विषयाला मुदतवाढ दिलीच नसती. आयुक्तांच्या पदावर ते आहेत. आज तुम्ही मा. उपायुक्त साहेब तुम्ही काय करणार आहात? तुम्ही आता पुन्हा रुलिंग द्या. नाहीतर मी उद्या पुन्हा तुमच्या केबिनमध्ये येउन पुन्हा हीच गोष्ट विचारणार आहे. ते उद्या त्यांच्याकडे जाउन चौकशी पूर्ण करुन आणणार का?

**मुक्ता रांजणकर :-**

मागच्या मिटींगला तुम्ही सांगितले होते की, नालेसफाई ६० टक्के झालेली आहे. आजपर्यंत ही नालेसफाई ६० टक्के झालेली नाही.

**मिलन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही रुलिंग दिलेले होते की नाही? मग तुम्ही त्यांना जबाब घ्यायचा? मॅडम तुम्ही यांना काय शासन करणार आहात? ते बघा ते आज पण फोनवर बोलत आहेत. त्यांचा विषयाचा प्रश्न आहे. त्या अधिकाऱ्याला काही पडलेली आहे का? बघा मॅडम, त्याला आमच्या नगरसेवकांची काही कदर आहे का?

(सभागृहात गोंधळ)

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील, मागे त्या डॉक्टरांनी जी गैरसोय केलेली आहे. मी त्यांना संधी दिलेली आहे. उद्याच्या उद्या त्यांनी आराधना बिल्डीगच्या तिसऱ्या मजल्यावर जाउन आवश्यक इन्फॉरमेशन घेउन ते अहवाल आपल्याकडे आणि माझ्याकडे सादर करतील. त्यांनी तसे न केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

**मिलन पाटील :-**

मला एवढेच पाहिजे होते. आभारी आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जयाबाई भोईर :-**

रामनगरचे जे गटार खोदायला घेतले आहे. ते गटार अर्धवट ठेवलेले आहे. मा. आयुक्त साहेबांना त्या गटाराचा उल्लेख करायला सांगा. श्री. राजकुमार कांबळे साहेबांना बोलावून विचारा. ते गटार तुम्ही पूर्ण का केलेले नाही? तुम्हाला ते गटार तसेच ठेवायचे आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्या जयाबाई भोईर, आपण जो रामनगरच्या नाल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. आपल्या समक्ष मा. आयुक्त, मी स्वतः संबंधित अधिकारी आपण सर्वांनी ते पाणी त्याठिकाणी नाला खोदून त्या ठिकाणी नेण्याचा प्रयत्न केला. पण त्या एरियामध्ये जे विकास काम झालेले आहेत आणि तिकडचा जो परिसर विकसित झालेला आहें. तर त्या भागाकडे जे अपेक्षित पाणी जायला पाहिजे त्याप्रमाणात ते पाणी जात नाही. तरी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

**जयाबाई भोईर :-**

नाला कुठे खोदलेला आहे? ते तर सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही त्याच्यावर निश्चित कार्यवाही करु.

**जयाबाई भोईर :-**

नाला कधी खोदायला घेणार आहात?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण सर्वां समक्ष कार्यवाही करु.

**जयाबाई भोईर :-**

कार्यवाही कधी करणार?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ५१ ला सुरुवात करण्या अगोदर मी सभागृहाच्यावतीने मी आपणांस विनंती करतो की, विषय पटलावर जो ५४ क्रमांकाचा विषय, शांतीनगर येथील पाणीपुरवठा योजना हस्तांतरीत करुन घेण्याबाबत. विषयाचा सिक्वेन्स विषय ५१ च्या जागी घेवून ५४ च्या नंतर पुढे सुरु करावी. अशी मी सभागृहाच्यावतीने आपल्याला विनंती करतो.

**नरेंद्र मेहता :-**

पहिल्यांदा ५० चा विषय पूर्ण करुया. साधारण २१ लाख रुपये आपली मागणी आहे. हे मंथली आहे. मुदतवाढचा प्रश्न नाही. आपण ट्रक वरुन मागवितो. त्याला कसली मुदतवाढ? सगळ्या सदस्यांनी सांगितले की, वॉर्डमध्ये साफसफाई कर्मचारी कमी आहेत. सफाई कर्मचारी वाढवा. जे आपण नाला साफसफाईसाठी स्पेशली माणसे नेमलेली आहेत. जे कर्मचारी आहेत त्यांना आपण ८ तासाचा पगार देतो. जेवढ्या नाल्यांची साफसफाई चालू आहे. ते सध्या जे आपल्या जुन्या नाले साफसफाईचे टेन्डर आहे. तेच कर्मचारी नाले साफ करतात आणि एखादा कर्मचारी सफाईसाठी गेला. तर तेच कर्मचारी आहेत. नविन कर्मचारी अजून आलेले नाही का? तुमची शार्प ३ वाजता सुट्टी होते. ८ तासांचे आपण भाडे देतो. ३ वाजता कांबळे साहेबांना फोन केला किंवा कुठल्याही क्षेत्रिय अधिकाऱ्याला फोन केला तर ते म्हणतात की, ट्रक नाही. सुट्टीवर गेले. आम्ही सांगतो ट्रक सकाळी पाहिजे. कचरा उचलण्यासाठी. तेव्हा सांगतात अजून आलेले नाही कचरा डंपींगला गेलेले आहे. तर कचरा डंपिंगचा आणि नालेसफाईचा काय संबंध आहे? आपले दोन्ही वेगळे वेगळे टेन्डर आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे नाले साफसफाईबाबत सन्मा. सदस्यांनी विषयी प्रश्न उपस्थित केलेला आहे. मा. आयुक्तांनी सर्व ठेकेदारांना स्वतः सुचना दिलेल्या आहेत. जोपर्यंत पावसाळ्यात समाधानकारक नालेसफाई होणार नाही. तोपर्यंत कुठलेही बिल अदा केले जाणार नाही आणि शहरातील सर्व नाले सफाई पावसाळ्याच्या या एका आठवड्यामध्ये पूर्ण पध्दतीने पूर्ण केली जाणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

कामाचा एक्झ्युकेशन हा विषय आहे. तो वेगळा विषय आहे. आम्ही म्हणतो की, एकच माणूस तीन डिपार्टमेन्टला काम कसा करु शकतो?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखादा मजूर समजा ड्युटी पूर्ण करुन जास्तीचे काम करत असेल.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, जास्तीचे काम नाही. तर एखादा माणूस तीन डिपार्टमेन्टला कामे कसा करतो?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यामध्ये काम करणारे कर्मचारी सुशिक्षित आहेत. सर्व लोक नाले सफाईला भेटत असतात असे नाही. जे लोक आपली विकास कामासाठी मजूर भेटतात. ती लोक आपली कामे करुन ॲडीशनल कामे करण्यासाठी येत असतील.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तसे नाही. नाला साफसफाई करुन जी घाण बाहेर ठेवतो. समजा, आपण एखादा ट्रक मागवितो त्यावेळी त्यांचे उत्तर असे असते की, ट्रक आता कचरा भरायला गेलेला आहे. डंपिंग करुन ट्रक आल्यानंतर तुम्हाला ट्रक देतो आणि ते ही ३ वाजेपर्यंत ट्रक देतो. ३ वाजेपर्यंत माणसांची सुट्टी झाली. ट्रक मिळणार नाही. आपण ८ तासांसाठी माणसे, ट्रक नेमलेले आहे. तर ते कुठे असतात?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. कांबळे याची नोंद घ्या आणि ज्याठिकाणी आपला कचरा काढला जातो, तो कचरा तात्काळ उचलला गेला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आता मी दोन तास अगोदर त्यांना फोन केला. ती माणसे म्हणतात की, आम्ही दिड वाजता जातो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याची तात्काळ नोंद घ्या आणि आजच्या आज कचरा उचलून त्याचा अहवाल द्या.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आता इकडे प्रश्न असा आहे की, तुम्ही त्यांना सांगितले की अहवाल द्या. मी तुम्हाला एका वाक्यात सांगतो. एका शाळेत शिक्षण अधिकारी आले. तर त्यांनी शाळेतल्या विद्यार्थ्यांना विचारले की, शिवधनुष्य कोणी तोडला? तर त्या प्रश्नाचे उत्तर कोणालाही माहित नव्हते. शिक्षकांनी त्यांना सांगितले की, इथे जेवढी मुले बसलेली आहेत ती सगळी फर्स्ट क्लास आहेत. ती शिक्षित आहेत. एकच व्यक्ती शांत कोपऱ्यात बसला होता. त्याने तो शिवधनुष्य तोडला असेल म्हणजे त्याचे उत्तर असेल. असंच इकडे झाले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य आपली दिशाभूल करण्याचा माझा तिळमात्र प्रयत्न नाही.

**नरेंद्र महेता :-**

दिशाभूल करीत नाही तर तुम्हाला त्याचे उत्तर माहित नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण मला वस्तुस्थिती माहिती नाही, अशी जी तक्रार करता.

**नरेंद्र मेहता :-**

आज नंतर कोण तक्रार करणार? आणि कोण तक्रार ऐकणार आहेत?

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ५० :-**

एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत शास्त्रौक्त पध्दतीने फवारणीची कामे कंत्राट पध्दतीने देणेबाबत.

**ठराव क्र. २१ :-**

एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत खाजगीकरणा मार्फत डास नियंत्रण करण्याचे काम कंत्राट पद्धतीने देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केले होता. दि. ३०/०५/२००७ रोजीचे मा. स्थायी समितीने सन २००६-०७ चे मंजुर निविदाकारास सहा महिन्याची मुदत वाढ दिलेली आहे. ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत असून सन २००७-०८ यावर्षी कंत्राट पद्धतीने डास नियंत्रण करण्याचे कामाचा प्रस्ताव आगामी महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५१ व ५२ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याकडे एक सुचना मांडली होती की, पाण्याची स्किम घेण्यासाठी आमचा अजिबात विरोध नव्हता. पण मी त्याठिकाणी बोललो होतो की, शांतीस्टार बिल्डरने मिरा भाईंदर महानगरपालिकेला अंडर टेकिंग दिलेले आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, पुढचा विषय घ्या. परत आपली मिटींग होणार नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मिरा भाईंदर महापालिकेला विभागीय कार्यालय मिळणार आहे. तो आपल्या ताब्यात घ्या. मा. महापौर मॅडम, हा विषय जेव्हा तो आपल्याला पाण्याची स्किम देतो तर आपल्याला लायब्ररी नको का? विभागीय कार्यालय नको का? श्री. घेवारे साहेबांना विचारा की हे खरे आहे की खोटे आहे? श्री. घेवारे साहेब तुम्हांला सांगतिल.

**रतन पाटील :-**

मा. श्री. खतगांवकर साहेब, शांतीस्टार बिल्डरने महापालिकेला जी ॲग्रीमेंट दिलेली होती. तत्कालिन नगरपालिकेच्या वेळी जे ॲग्रीमेंट दिलेले होते ते ॲग्रीमेंट तपासून घ्या. आपल्याला काय काय सोय आहे त्याची पुर्तता करा. आपल्याला ज्या काही सुविधा तो देणार होता. त्या आजपर्यंत दिल्या गेल्या नाहीत. त्याची पुर्तता करा.

**रोहित सुवर्णा :-**

बरोबर आहे. मा. महापौर मॅडम, हे पण त्या ठरावामध्ये ॲड करा.

(सभागृहात गोंधळ)

**रोहित सुवर्णा :-**

मा. आयुक्त साहेब, शांती स्टार बिल्डरने आपल्याला विभागीय कार्यालय बांधून दयायचे आहे. ते आपल्या ताब्यात घेण्यासाठी आपल्या महापालिकेचे काही नुकसान आहे का? आपले कर्मचारी कुठे बसणार? शांतीनगरमध्येच आपल्याला विभागीय कार्यालय शांतीस्टार बिल्डर बांधून देणार आहे. त्याने हे आपल्याबरोबर अंडरटेंकिंग केलेले आहे. ते आपल्या फायदयाचे नाही का? सार्वजनिक लायब्ररी आहे. सार्वजनिक दवाखाने आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

यांवर कार्यवाही केली जाईल.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही यांवर रुलिंग दया. हा विषय २९ वर्षापासून पेंडीग आहे.

**रतन पाटील :-**

या महापालिकेचे जर चांगले होत असेल तर आपण दोन मिनीटे थांबा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी सन्मा. सदस्यांना सभा कामकाजाचे आश्वासित करु इच्छितो की ही सभा तहकूब सभा आहे. विषय पत्रिकेवरील विषयांवरच चर्चा व्हायला पाहिजे. पण तरीही विषय विचारत घेतो.

**रतन पाटील :-**

साहेब आम्हांला तेवढे भान आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला याची कल्पना असावी.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्या ॲग्रीमेंटची कॉपी काढा. आणि त्याच्याकडून किती देणे आहे? ते बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आता तो विषय नाही.

**रतन पाटील :-**

हा विषय नसला तरी त्याची मागणी करु शकतो ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्यासाठी आपल्याला पूर्ण वेळ आहे. आपण तपासू शकतो. आवश्यक ती कार्यवाही करु शकतो. आता तो विषय इकडे नाही.

**एस. ए. खान :-**

सभागृहाला तुम्ही आश्वासन दिले होते.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आज असे कितीतरी विषय चर्चेसाठी आलेले आहेत. जो विषय कधीच विषय पत्रिकेवर नव्हता. तरी आपण त्या विषयांवर चर्चा केली. आणि आपण त्या विषयाला रुलिंग दिलेले आहे. मी महापालिकेच्या फायदयाचे बोलतोय, शांती स्टार बिल्डरने आपल्याला विभागीय कार्यालय, सार्वजनिक दवाखाने आणि लायब्ररी बांधून दयावी. यामध्ये काय चुक आहे? ते सांगा. त्याने जे आपल्याला लेखी लिहून दिलेले आहे. मॅडम, प्लिज समजून घ्या. जर आपण पाणी पुरवठयाची स्किम घेउ शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण ठरावामध्ये याची नोंद करुन घ्या.

**मा. महापौर साो. :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी निवेदन केले की, शांतीस्टार बिल्डरने महापालिकेबरोबर जो करार नामा केलेला आहे. शांतीस्टार बिल्डरने महापालिकेबरोबर जो अंडरटेकिंग दिलेले आहे. त्याची पूर्ण माहिती त्यांनी आपल्याला पुरविलेली आहे. आणि त्या माहितीमध्ये त्यांनी महानगरपालिका विभागीय कार्यालये, ज्या ज्या वास्तू किंवा जे जे विषय आपल्याला महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याचे मंजूर केलेले आहे त्याप्रकारे प्रशासनाने सन्मा. आयुक्त साहेबांनी त्यावर कारवाई करुन आपल्याकडे लवकरात लवकर त्या वस्तू ज्याप्रकारे हस्तांतरीत करता येतील.

**रोहित सुवर्णा :-**

लवकरात लवकर म्हणजे सहा महिन्यांत सार्वजनिक दवाखाने हस्तांतरीत करावी.

**मा. महापौर साो. :-**

याची कार्यवाही करावी व तसेच ही सुचना ठरावामध्ये नमुद करुन घेण्यांत यावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, धन्यवाद.

(सन्मा. सदस्य श्री. हेरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ५१ व प्रकरण क्र. ५२ च्या ठरावाचे वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे पण सन्मा. सदस्य श्री. हेरल बोर्जीस साहेब श्री. वसंत राणे यांचा मुलगा कै. सुहास वसंत राणे याच्यासाठी झालेला वैदयकीय खर्चामध्ये १.९० असा खर्च झालेला आहे पण त्या ठिकाणी १.६० असे चुकून टाईप झालेले आहे असे श्री. वसंत राणे यांचे म्हणजे वडिलांचे म्हणणे आहे, तर त्याठिकाणी १.९० असे करुन घ्या.

**मा. महापौर सो. :-**

हा विषय मंजूर पुढील विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. :- ५१**

वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करणे बाबत.

(श्री. वसंत ग. राणे यांचा मुलगा कै. सुहास वसंत राणे यांचे करिता झालेल्या वैद्यकिय खर्चाबाबत.)

**ठराव क्र. २२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, विशेष कार्य अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. वसंत गटलू राणे यांचा मुलगा कै. सुहास वसंत राणे यांची तब्येत आकस्मिक बिघडल्याने, त्यांना खाजगी हॉस्पीटल मध्ये दि. ०३/०६/२००६ रोजीपासून वैद्यकिय उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना रक्तासंबंधी आजार होता. उपचारादरम्यान त्यांच्या मुलाचे दि. १०/०६/२००६ रोजी निधन झालेले आहे. वैद्यकिय उपचारासाठी एकुण रू. १,६०,७३५/- खर्च झालेला आहे.

शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९ मार्च २००५ नुसार कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी झालेल्या खाजगी रूग्णालयातील आंतररूग्ण उपचाराच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती बाबतची मान्यता आहे. या निर्णयामधील एकूण २७ आकस्मीक आजाराच्या यादीत रक्तासंबंधी आजाराचा उल्लेख असून आजाराची प्रतीपुर्ती रू. ४०,०००/- मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे. त्याच्याप्रमाणे मा. महासभा दि. १८/०४/२००६ ठराव क्र. ९ अन्वये स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती मंजुर केलेली आहे.

वरील प्रमाणे रू. ४०,०००/- पेक्षा जास्त वैद्यकिय खर्चाचे प्रतिपुर्ती करावयाची आहे. याबाबत विहीत तरतुदीत न बसणाऱ्या प्रकरणी काही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करणेसाठी मा. आयुक्त यांना प्राप्त असलेल्या देयक प्रदानाच्या अधिकारा अंतर्गत, श्री. वसंत गटलू राणे यांचे दिवंगत मुलाच्या वेद्यकिय उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर बाबतीत मा. आयुक्त यांनी मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडून अभिप्राय मागवून त्याचे अभिप्रायाप्रमाणे मा. आयुक्त यांनी सदर दोन्हीस वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ५२ :-**

वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करणे बाबत.

(श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे करिता झालेल्या वैद्यकिय खर्चाबाबत.)

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असलेल्या श्रीम. महानंदा विजय पाटील यांची तब्येत आकस्मिक घडल्याने, त्यांना खाजगी हॉस्पीटल मध्ये दि. ०१/१०/२००६ रोजीपासून वैद्यकिय उपचारासाठी हॉस्पीटल मध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना लिव्हर अब्सेस, मुत्रपिंडाचा आजार, डायबिटीस मिलीटरी (मधुमेह) आघात सलक्षण रक्तामधील आजार व कोमा व याकरीता वैद्यकीय उपचारासाठी एकूण ६,१७,२७६/- खर्च झालेला आहे.

शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९ मार्च २००५ नुसार कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मीक पिकडीच्या प्रसंगी झालेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती बाबती मान्यता आहे. या निर्णयामधील एकूण २७ आकस्मीक आजाराच्या यादीत श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे आजाराचा उल्लेख असून आजाराची प्रतिपुर्ती रु. ४०,०००/- मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे मा. महासभा दि. १८/०४/२००७ ठराव क्र. ९ अन्वये स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती मंजुर केलेली आहे.

वरीलप्रमाणे रु. ४०,०००/- पेक्षा जास्त वैद्यकिय खर्चाचे प्रतिपुर्ती करावयाची आहे. याबाबत विहीत तरतुदीत न बसणाऱ्या प्रकरणी काही अपवादात्मक परीस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती करणेसाठी मा. आयुक्त यांना प्राप्त असलेल्या देयक प्रदानाच्या अधिकारा अंतर्गत, श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर बाबतीत मा. आयुक्त यांनी मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडून अभिप्राय मगावून त्याचे अभिप्रायाप्रमाणे मा. आयुक्त यांनी सदर दोन्हीस वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.　　　　अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५३ चे वाचन केले)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ही जी पदोन्नती दिलेली आहे. त्याबाबत मी या सभागृहाच्या असे निर्देशनास आणू इच्छितो की आपण ही.....

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ही जी यादी दिलेली आहे. प्रशासनाने याच्यामध्ये थोडी चुक केलेली आहे. नगरपालिकेपासून जे दोन कर्मचारी होते. श्री. क्लासो फर्नांडिस आणि श्री. सुनिल म्हात्रे हे सर्व्हेअर आहेत. ह्या दोन्ही कर्मचाऱ्यांवर सातत्याने अन्याय होत आलेला आहे. आता एवढे कर्मचारी घेतले जर त्यात दोन कर्मचाऱ्यांची नावे समाविष्ट झाली असती तर आम्हांला त्याबाबत कोणताही त्रास नव्हता. पण त्यांच्यावर हा अन्याय का होतो? हे दोनच कर्मचारी सातत्याने वगळले जातात. आणि त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. हे आपले जुने कर्मचारी आहेत. ही लोक नगरपालिकेपासून कामाला आहेत. ती लोक काही बोलत नाही. म्हणून त्यांच्यावर अन्याय का करावा? प्रशासनाने असे जाणून बूजून का काम करावे? यादीत यांची नावे समाविष्ट का करुन घेतली नाही? या कर्मचाऱ्यांबद्दल माझा आक्षेप नाही. परंतु ह्याच्या जोडीला ह्या दोन कर्मचाऱ्यांची नावेही यादीत समाविष्ट करुन घेण्यात यावी ही दोन नावे समाविष्ट करुन हा ठराव आमच्यासमोर आणा ह्या ठरावास आमचा कोणत्याही प्रकारचा विरोध नाही. श्री. सुनिल म्हात्रे हे सर्व्हेअर आहेत. आणि श्री. क्लासो फर्नांडिस हे अग्निशमन विभागाचे अधिकारी आहे. ह्या दोघांची ही नावे यादीत समाविष्ट करुन घ्या. ह्या दोघांवरही अन्याय होता कामा नये. सुनिल म्हात्रे यांना मुख्य सर्व्हेअर यापदावर पदोन्नती देण्यात यावी.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दिलेल्या पदोन्नतीबाबत अवलोकनाचा विषय आणलेला आहे.

**मिलन पाटील :-**

बाकीच्या कुठल्याही गोष्टींवर आमचा कुठल्याही आक्षेप नाही. पण या दोघाचीही नावे यादीत समाविष्ट करुन घ्यावीत.

(सन्मा. सदस्यां. सौ. रिटा शहा यांनी प्रकरण क्र. ५३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दिलेली पदोन्नती तसेच सरळसेवेने केलेली उमेदवारांची नेमणूक याबाबत अवलोकन करणे.

**ठराव क्र. २४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी तसेच रिक्त पदांवर सरळ सेवेने भरती करणे करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) नुसार निवडसमिती गठित केलेली होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे कर्मचाऱ्यांना पदोन्नती/सरळसेवेने नेमणुक केलेली आहे.

अ) पदोन्नतीव्दारे नेमणुक :-

| अ.क्र. | नाव | पदाचा संवर्ग | पदाचा प्रवर्ग | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. भारत दोधू जगताप | सहा. नगररचनाकार | अनु. जाती | ६,५००-१०,५०० |
| २ | श्री. किरण मोहन राठोड | उप-अभियंता | खुला | ८,०००-१३,५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री. नितिन रघुनाथ मुकणे | उप-अभियंता | अनु. जाती | ८,०००-१३,५०० |
| ४ | श्री. शरद गोरखनाथ नानेगांवकर | उप-अभियंता | खुला | ८,०००-१३,५०० |
| ५ | श्री. हेमचंद्र मनोहर किणी | उप-अभियंता | खुला | ८,०००-१३,५०० |
| ६ | श्री. राजकुमार कांबळे | सहा. सार्व. आरोग्य अधिकारी | खुला | ५,५००-९,००० |
| ७ | श्री. संदिप शिंदे | वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक / मुख्य स्वच्छता निरिक्षक | खुला | ५,०००-८,००० |
| ८ | श्री. नागेश रामा इरकर | उद्यान अधिक्षक | खुला | ५,५००-९,००० |
| ९ | श्री. हंसराज मेश्राम | उद्यान अधिक्षक | खुला | ५,०००-८,००० |

ब) सरळसेवेने नेमणुक :-

महापालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदांवर सरळसेवेने नेमणुक केलेल्या कर्मचाऱ्यांना तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **नाव** | **पदाचा संवर्ग** | **पदाचा प्रवर्ग** | **वेतन श्रेणी** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | श्रीम. सीमा कैलासनाथ दुबे | सिस्टीम मॅनेजर | खुला | ६५००-२००-१०५०० |
| २ | श्री. राजकूमार घरत | संगणक ॲनालिस्ट | खुला | ५०००-१५०-८००० |
| ३ | श्रीम. मनस्वी मंगेश म्हात्रे | संगणक प्रोग्रामर | खुला | ४५००-१२५-७००० |
| ४ | श्री. जितेश काशीनाथ मोरे | लिपिक | (अपंग) एस.सी. | ३०५०-४५९० |
| ५ | श्री. कैलास चंद्रकांत सातपुते | लिपिक | (अपंग) एन. टी. | ३०५०-४५९० |
| ६ | श्री. राजीव आनंदराव चव्हाण | लिपिक | (अपंग) एन. टी. | ३०५०-४५९० |
| ७ | श्री. मोहन कृष्णा सावंत | लिपिक | (अपंग) खुला | ३०५०-४५९० |
| ८ | श्री. मचीगर अर्जुन मामलप्पा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ९ | श्री. योगेश अरुण पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १० | श्री. मंगेश दामोदर पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ११ | श्रीम. कैलास मुरलीधर शर्मा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १२ | श्री. विजय नोयेल मुनीस | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १३ | श्री. आगुस्तीन डेव्हीड मेंडोसा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १४ | आरेकर अनिरुद्ध विठ्ठल | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १५ | श्री. अविनाश शांताराम गावंड | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १६ | श्री. एकनाथ पांडूरंग साळूंखे | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १७ | श्री. संदिप लक्ष्मण पवार | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १८ | श्री. मनिष पांडूरंग जाधव | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १९ | श्री. प्रल्हाद शिवराम तांडेल | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २० | श्रीम. मिलन मदन पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २१ | श्री. घरत योगेश लडकू | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २२ | श्री. शिंदे मनोहर बसाप्पा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २३ | श्री. अब्दार वजीर शेख | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २४ | श्री. राकेश सुधाकर पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २५ | श्री. श्यामराव दादासाहेब | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २६ | श्री. प्रभाकर कृष्णा माने | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २७ | श्री. बालाजी इंद्रजित शिंदे | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २८ | श्री. नायजल जोसेफ फर्नांडिस | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २९ | श्री. मोळावडे कृष्णन बाबुराव | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३० | श्री. नितीन ओंकार बर्नवाल | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३१ | श्री. मधु दत्तू देवकाते | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३२ | श्री. प्रविण श्याम दिवे | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३३ | श्री. देसले राजेंद्र गजानन | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३४ | डॉ. चंद्रशेखर मधुकर कांबळे | वैद्यकीय अधिकारी | अनु.जाती | ८०००-२७५-१३५०० |
| ३५ | डॉ. अशोक दामू पाडवी | वैद्यकीय अधिकारी | अनु.जमाती | ८०००-२७५-१३५०० |
| ३६ | डॉ. वंदना रामचंद्र पाटील | वैद्यकीय अधिकारी | विजाभज | ८०००-२७५-१३५०० |
| ३७ | डॉ. अंजली भालचंद्र पाटील | वैद्यकीय अधिकारी | इमाव | ८०००-२७५-१३५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | डॉ. प्रमोद विठ्ठलराव पडवळ | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ३९ | डॉ. बाळनाथ दिलीप चकोर | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ४० | डॉ. अरविंद हरिश्चंद्र काकडे | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ४१ | डॉ. नंदकिशोर रामराव लहाणे | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ४२ | श्रीम. ज्योती संतोष सातवे | परिचारिका | अनु.जाती | ५०००-१५०-८००० |
| ४३ | श्रीम. कमल गंगा महाले | परिचारिका | अनु.जमाती | ५०००-१५०-८००० |
| ४४ | श्रीम. भारती भानुदास राउत | परिचारिका | अनु.जमाती | ५०००-१५०-८००० |
| ४५ | श्रीम. ज्योती देसाई लोहार | परिचारिका | विजाभज | ५०००-१५०-८००० |
| ४६ | श्रीम. मीना राजेश तेरडे | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ४७ | श्रीम. रसिका राजेंद्र दळवी | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ४८ | श्रीम. जागृती गणपत वेताळे | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ४९ | श्रीम. लिटा एलिस करवालो | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ५० | श्रीम. वैशाली रमेश मोरे | फार्मासिस्ट तथा लिपिक | अनु.जाती | ४५००-१२५-७००० |
| ५१ | श्री. सुतार विशाल दिलीप | फार्मासिस्ट तथा लिपिक | अनु.जमाती | ४५००-१२५-७००० |
| ५२ | श्री. ठाकूर प्रसाद रमेश | फार्मासिस्ट तथा लिपिक | अनु.जमाती | ४५००-१२५-७००० |
| ५३ | श्रीम. माधवी गणेश क्षत्रिय | फार्मासिस्ट तथा लिपिक | विजाभज | ४५००-१२५-७००० |
| ५४ | श्री. राहूल गजानन भोईर | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५५ | श्री. सचिन महादेव करंडे | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५६ | श्री. सुधिर रामभाउ पावले | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५७ | श्री. योगेश चिंतामण शिंदे | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५८ | श्रीम. पद्मा साधुजी भोंगाडे | प्रसविका | अनु.जाती | ४०००-१००-६००० |
| ५९ | श्रीम. जयश्री हेमंत वनमाळी | प्रसविका | अनु.जाती | ४०००-१००-६००० |
| ६० | श्रीम. उर्मिला रामू घेगड | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६१ | श्रीम. संध्या रामचंद्र शिंगाडे | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६२ | श्रीम. सरिता देवजी ठाणकर | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६३ | श्रीम. प्रतिभा हिरामण आवारी | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६४ | श्रीम. रेखा श्रावण कुवरा | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६५ | श्रीम. सिता नवश्या चौधरी | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६६ | श्रीम. प्रिया कृष्णा पागधरे | प्रसविका | विमाप्र | ४०००-१००-६००० |
| ६७ | श्रीम. दिप्ती रत्नाकर चिनके | प्रसविका | विजाभज | ४०००-१००-६००० |
| ६८ | श्रीम. ज्योती प्रशांत आंधळे | प्रसविका | विजाभज | ४०००-१००-६००० |
| ६९ | श्रीम. बेबी सुभाष पवार | प्रसविका | विजाभज | ४०००-१००-६००० |
| ७० | श्रीम. मनिषा मनोहर झोरे | प्रसविका | इमाव | ४०००-१००-६००० |
| ७१ | श्रीम. निलीमा शं. मोकल | प्रसविका | इमाव | ४०००-१००-६००० |
| ७२ | श्रीम. चित्रा तुकाराम भोईर | प्रसविका | इमाव | ४०००-१००-६००० |
| ७३ | श्रीम. फरिदा जमीरखान | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७४ | श्रीम. अश्विनी अजित पोतदार | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७५ | श्रीम. सुधा नानु पाटील | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७६ | श्रीम. करुणा भालचंद्र पागधरे | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७७ | श्रीम. सुनिता बाबुराव मोटे | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७८ | श्रीम. जयश्री बाळासाहेब | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७९ | श्रीम. संदेना सखाराम पवार | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८० | श्रीम. प्रमिला मारुती देसाई | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८१ | श्रीम. जॉयसी जॉन हेन्ड्रीक्स | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८२ | श्रीम. दक्षता शिवराम गमरे | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८३ | श्रीम. रेश्मा बाळकृष्ण शेट्टी | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८४ | श्रीम. स्मिता एलिस करवालो | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८५ | श्रीम. जेन्वी अजय रॉड्रीक्स | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८६ | श्री. दिनेश रामचंद्र आमनेकर | शिपाई तथा सफाई कामगार | अनु.जाती | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ८७ | श्री. धनगर निवृत्ती नाथु | शिपाई तथा सफाई | अनु.जमाती | २५५०-५५-२६६०-६०- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कामगार | | ३२०० |
| ८८ | श्री. श्याम गंगाधर बांबळे | शिपाई तथा सफाई कामगार | अनु.जमाती | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ८९ | श्री. पवार संतोष रामराव | शिपाई तथा सफाई कामगार | विजाभज | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९० | श्रीम. ललिता पोपटराव मयेड | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९१ | श्री. माधव नागोराव होकार्णे | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९२ | श्री. स्वप्नील प्रकाश गायकवाड | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९३ | श्री. भटू भाउराव कठरे | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९४ | शोभा अशोक सातवे | बालवाडी शिक्षिका | अनु.जाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९५ | वीणा वामन सरोदे | बालवाडी शिक्षिका | अनु.जाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९६ | भारती मधुकर मोकाशी | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९७ | भावना शंकर शनवार | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९८ | विजया लक्ष्मण गवळी | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९९ | सविता हिरु लेणे | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०० | संगिता प्रकाश बच्छाव | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०१ | सुवर्णा वसंत महागांवकर | बालवाडी शिक्षिका | विजाभज | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०२ | संख्ये दिपीका मनोहर | बालवाडी शिक्षिका | विजाभज | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०३ | संख्ये राजेश्री रजनीकांत | बालवाडी शिक्षिका | विजाभज | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०४ | रंजना हेमंत पाटील | बालवाडी शिक्षिका | विमाप्र | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०५ | अनिता अरुण धुरी | बालवाडी शिक्षिका | इमाव | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०६ | रेखा हेमराज पाटील | बालवाडी शिक्षिका | इमाव | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०७ | संगिता श्रीरंग पाठक | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०८ | ग्लोरीया मनवेल गोन्सालविस | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०९ | पूनम रामकिशन माली | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११० | सुनिता सुहास लोकेगांवकर | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १११ | शैला संतोष म्हात्रे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११२ | रविंद्रकौर गुरुदेवसिंग बिरदी | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११३ | माधवी विनायक राउत | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ४५९० |
| ११४ | अलका मदन पाटील | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११५ | वर्षा सतिश तांबे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११६ | आकांक्षा अरुण सावे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११७ | भारती अशोक हिंगू | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११८ | कुंदा जयकुमार पाटील | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११९ | चंचला कैलाश रोहणे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १२० | जुलेखा शफी शेंदुले | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |

प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार संगणक विभाग, अपंग अनुशेष भरती, बालवाडी शिक्षिका, आरोग्य विभागातील पदे भरताना पदोन्नत्या देतांना रितसर पध्दतीने कार्यवाही केल्याने यादीचे अवलोकन करुन सदर नेमणूकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.　　　　अनुमोदक :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो, मॅडम, हा पदोन्नतीचा जो ठराव आहे. त्याच्यामध्ये श्री राजकूमार कांबळे ह्यांना असक्षम काम करण्यासाठी पदोन्नती दिलेली आहे का? त्यांचे नाव ह्या यादीतून वगळण्यांत यावे त्यांनी पहिल्यांदा चांगले काम करुन दाखवावे. आणि त्यांनतर त्यांनी पदोन्नती घ्यावी.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्या सौ. रांजणकर मॅडमही शेवटची सभा असल्यामुळे आपण कोणावरही अन्याय करु नये. आपण त्यांच्याकडून काम करुन घ्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

याठिकाणी दोन गोषवारे कसे काय आहेत? एक अधिकाऱ्यांचा एकाच नंबरचा प्रकरण क्र. दोन गोषवारे कसे? दोन्ही गोषवाऱ्यामध्ये एक यादी वेगळी आणि दुसऱ्यामध्ये वेगळी यादी. एक यादी आहे ती वैदयकीय अधिकाऱ्यांची आहे आणि दुसरी यादीही अधिकाऱ्यांची आहे. दोघांची कामे वेगळी आहे. दोघांचीही यादी वेगळी आहे.

**एस. ए. खान :-**

त्यांची सर्टिफिकेट जातीचे दाखले वगैरे तपासलेले आहेत का?

**रोहिदास पाटील :-**

ज्यांची वैदयकीय अधिकाऱ्यांची जी नेमणूक झालेली आहे. त्याबाबत या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबद्दलची माहिती सभागृहाच्या निर्देशनास आणून देवू इच्छितो की महापालिकेच्या कामकाजामध्ये वैदयकीय सेवेमध्ये आपण ही सेवा भरती करते वेळी साधारणतः अशी प्रथा असते की क्वॉलिफाईड पर्सन जर मिळत असेल तर त्या व्यक्तिला प्रथम प्राधान्य दिले जाते. पण आपल्या आस्थापनेवर तीन वर्ष कु. धनश्री मधूकर भोईर ही मुलगी काम करीत होती. तीन वर्षापासून त्या काम करित आहेत. त्यांचे बी.फ़ार्म आहेत आणि आपण डी.फ़ार्म चे सिलेक्शन केलेले आहे. आमच्या हे लक्षांत येत नाही. सभागृहाच्याही लक्षांत येत नाही. हे जे सिलेक्शन झाले ते कोणत्या पद्धतीने झाले असे तुम्हांला वाटते की नाही? किंवा हा न्याय देतेवेळी आपण एका मुलीवर अन्याय करित आहोत. नविन कोणी नाव रेकमेंड केले असेही नाही. त्यांनी आपल्याकडे तीन वर्षापासून सेवा केलेली आहे. आणि त्यांना आपण डालवून त्यांची शैक्षणिक उच्च पात्रता असतानाही त्यांना डावलून आपण डी. फ़ार्म चे सिलेक्शन करतो. कोणाचे सिलेक्शन केले? याबाबत आम्हांला बोलायचे नाही. पण बी.फ़ार्म चे का नाकारले? हे ही माहिती होणे गरजेचे आहे. अन्यथा हे मनात आले असे होईल.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवांनगीने बोलते. कू. धनश्री मधुकर भोईर ह्यांचे नाव का वगळण्यात आले? याची आम्हांला माहिती दयावी.

**एस. ए. खान :-**

मागे १५-२० दिवस अगोदर वृत्तपत्रांत आले होते की खोटे प्रमाणपत्र देवून महानगरपालिकेत भरती केली होती. नंतर तपासणी केल्यावर हा दाखला खोटा निघाला. त्याच्यामध्ये ही तपासणी व्यवस्थितपणे झालेली आहे का?

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता जो सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी जो प्रश्न विचारला या प्रश्नांचा खुलासा करायला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्यांनी याठिकाणी जातीचे खोटे प्रमाणपत्र देवून भरती झाली. असा आत्ता मुद्दा उपस्थित केला. शिपाई पदांवर श्रीम. रेखा घाडी यांची १९९७ मध्ये नियुक्ती झालेली आहे. त्यांच्याबद्दलची ही तक्रार आहे आणि त्याबाबत चौकशीची कार्यवाही चालू आहे. वैदयकीय अधिकारी मध्ये बी.फार्म सी या पदांसाठी सन्मा. सदस्य यांनी बी.फार्म असतांना उमेदवाराला डावलले असे त्यांचे म्हणणे होते. वास्तविक या फार्मसिस्ट पदाची पदोन्नती न देता ते सरळ सेवेने निवड केलेली आहे. त्यासाठी या अधिनियमातील जी समिती आहे. त्या समितीमध्ये मा. आयुक्त, विभागाचे प्रतिनिधी, अधिकारी, मुख्यलेखापरिक्षक राज्य शासनाच्या खात्यातील एम्लॉयमेंट ऑफीसर आहेत, समाजकल्याण अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी हे सर्व या समितीमध्ये आहेत. याच्यामध्ये ज्या पदासाठी अर्हता होती. ती अर्हता पहिल्यांदा विचारात घेतली जाते. आणि त्याप्रमाणे विचारात घेवून ती निवड केलेली आहे. एखादयाकडे अर्हता जास्तीची आहे म्हणून सर्व गुण त्याच्यामध्ये प्राप्त झाले नसतील त्यामुळे त्यांची निवड झाली नसेल.

**रोहिदास पाटील :-**

हे तितकेसे संयुक्त असे वाटतच नाही. आपण महापालिकेमध्ये घेतेवेळी प्रत्येकाचे क्वॉलिफिकेशन प्रमाणे त्याला घेतो आणि क्वॉलिफिकेशन नाही हे आपल्याला दिसते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्याठिकाणी बी.एड. चा विदयार्थी डी.एड आणि बी.एड करुन जर आला आपण बी.एड विचारात घेत नाही. त्याठिकाणी आपण त्या पदापुरता डी.एड च विचारात घेतो. ही वस्तुस्थिती आहे. आपण डी.फार्म या पदासाठी ते पद होते. त्यांच्याकडे एक्स्ट्रा कोरोक्लेम होता आणि यापुढेही आपण त्याचा विचार करणारच आहोत. आपल्याकडे अजून वेगळे विषय आहेत. असे नाही की त्यांना डावलले जाणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. खतगांवकर साहेब, तुम्ही लॉलीपॉप दाखवू नका. आपल्या ज्या निवड समितीने ज्या नियुक्त्या केलेल्या आहेत. त्याची पुढे कागदपत्रे येतात. ती मी सभागृहामध्ये दाखवतो. तुम्ही निवड समिती म्हणजे सुपिरिअर पॉवर आहे असे समजू नका. निवड समिती काय करते?हे मला माहिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

कृपा करुन मेहरबानी असे शब्द वापरु नका. आम्हांला जे अधिकार होते. त्या समितीमधील मी एक सदस्य आहे. हा कुणा एकाचा निर्णय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी कुठचाही शब्द मागे घेणार नाही. तुमच्या निवड समितीने महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची माणसे कामावर घेतलेली आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्याला मंजूरी दयायची असेल तर आपण देवू शकतो. नाकारायचे असेल तर आपण नाकारु शकतो. त्याबद्दल माझी कुठलीही भुमिका नाही. पण मी एकटा सदस्य मला मेहरबानी करण्याचा काही संबंध नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी समितीबद्दल बोलतोय. समितीने निवड केलेली फायनल झाली का? यांच्यामध्ये तुमच्या महापालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या तुमच्या अधिकाऱ्यांची मुले कामाला घेतली आणि त्या मुलीला तुम्ही डावलले असा माझा स्पष्ट आरोप आहे. याठिकाणी तुम्ही जी निवड केलेली आहे. आज आम्हांला तुमच्या डायसवरुन असे आश्वासन पाहिजे की जर समजा निवड समितीने चुकून किंवा हेतू पूरस्परपणे हे काही तुम्ही बोलणार नाही. चुकून कशाने तरी एखादया कॅन्डीडेड ची तुम्ही नियुक्ती केली आणि त्याचे जे काही क्वॉलिफिकेशन आहे पात्रतेकरिता ते नसतांना सुद्धा तुमची अनावधानाने जरी निवड केली असेल तर ती रद्द करु. असे आश्वासन दया. मग आम्ही पुढचे काय ते बघतो. निवड समिती म्हणजे काय? याठिकाणी तुमच्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची मुले फटाफट कामाला लागतात. स्थानिक माणसाकडे त्या पदासाठी क्वॉलिफिकेशन आहे. ज्या बाईने तीन तीन वर्ष माझ्याबरोबर काम केले. त्या मुलीने माझ्या वॉर्डामध्ये अगदी

विना तक्रार काम केलेले आहे. आणि तिचे क्वॉलिफिकेशन असतांनाही निवड समितीने तिला डावलले आणि पुढे तुम्हांला समाविष्ट करुन घेवू. असे लॉलिपॉप दाखवू नका. याच्या नावाची लिस्ट माझ्याकडे आहे आणि ह्याचा विषयासंदर्भात मी पुढे काही कागद आणतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

जे तुम्ही सुस्थिती मांडता की, सर्व कर्मचाऱ्यांचे काम व्हायला पाहिजे. पण वस्तुस्थितीमध्ये सांगतो फॉर्मिस्ट हे पद आपल्याकडे शासनाकडुन फक्त ८ पदे मंजूर झालेले होते आणि आपल्याकडे कार्यरत असलेल्यांची संख्या ११ आहे. त्याच्यामध्ये १,२,४,५ कोणातरी नाव राहणारच. आज तुम्ही असे म्हणाल की, हेतू पुरस्पर डावलले अशी कदापि वस्तुस्थिती नाही. आपल्याकडे अजून.

**मिलन म्हात्रे :-**

जे जुने कर्मचारी होते त्यांना तुम्ही डावलले आणि नविन कर्मचारी घेतले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आधीच्या कर्मचाऱ्यांपैकी एकालाही डावलले नाही. आणि एकही नविन कर्मचारी घेतलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एकही नविन घेतलेला नाही. मगही नावे कुठची आहेत?

**जयंत पाटील :-**

साहेब तुम्ही म्हणता की त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा संधी आहे. मग त्यांना आता संधी का दिली नाही?

**मिलन म्हात्रे :-**

जे जुने कर्मचारी आहेत. त्यांना तुम्ही कायम ठेवा. आणि जे नविन कर्मचारी आहेत. त्यांना तुम्ही वेटींग वर ठेवा.

**जयंत पाटील :-**

साहेब, मला तुम्ही एक सांगा की, आपल्या शहरामध्ये फार्मसीचे काय काम आहे? त्याबद्दल माहिती दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपल्याकडे जे दवाखाने आहेत. त्याठिकाणी आपण जे औषध खरेदी करतो आणि डॉक्टर जे प्रिस्क्राइब करतात आणि ती औषधे आपल्या स्टॉक मधून डे टूडे ओपिडीला देवून त्यांनी ती औषधे नागरिकांना देणे.

**जयंत पाटील :-**

अशा फार्मसीची आज आपल्याला गरज आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपल्याकडे सध्या ११ फार्मसी कार्यरत आहेत ही फॅक्ट आहे मी ती आपल्याला सांगितली.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आठ आणलेली आहेत. ते बरोबर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी आठ आणलेले नाहीत. शासनाकडून आठ मंजूर झालेले आहेत. अजून आपले ५ मंजूरीसाठी प्रलंबित आहेत.

**जयंत पाटील :-**

फार्मसीचे सरळ काम असे आहे की ज्या मेडिकल मधून गोळया आपल्याकडे येतात किंवा आपण आणतो. त्याबरोबर आहेत की नाही? त्या त्याच्या फॉर्म्युल्याप्रमाणे आहेत की नाही? योग्य आहेत की नाही? हे बघणे त्यांचे महत्त्वाचे काम आहे. ह्या शहरामध्ये एकही रुग्णालये नाहीत. मी सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे अभिनंदन करतो. अजूनपर्यंत कोणी त्यांचे अभिनंदन केलेले नाही. या शहरामध्ये रुग्णालय होण्यासाठी ते हायकोर्टात गेले आणि त्यांनी हायकोर्टाच्या माध्यमातून ती जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले. आम्ही सत्ताधारी पक्षाचे आहोत. आमच्या पक्षाचे मुख्यमंत्री आहेत. इकडे आणखीन सत्ताधारी बसलेले आहेत. परंतु, एखादा शिलेदाज सदस्य हायकोर्टात जातो, उच्च न्यायालयांत जातो आणि रुग्णालय ताब्यात मिळावे म्हणून हे झगडतात. आजसुद्धा त्यांची एक बातमी नवशक्ति या वर्तमानपत्रांत आहे. त्यासंबंधी मी नंतर बोलणार आहे. प्रश्न असा आहे की या शहराला ८ फार्मसिस्ट ची गरज आहे का? आणि तुम्ही नुसते फार्मसिस्ट असे नुसते लिहिलेले नाही तर फार्मसिस्ट कम लिपिक असे लिहिलेले आहे. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब हा महत्त्वाचा मुद्दा आहे की लिपिक म्हणजे जो फार्मसिस्ट शिकला तो डी.फार्म झाला. बी.फार्म झाला. उदया तुम्ही त्याला टॅक्सच्या पावत्या फाडायला लावणार आहात का? त्याला पाण्याचे बिल काढण्यासाठी घरोघरी पाठविणार आहात का? मला हे सांगा की तुम्ही फार्मसिस्ट घेतले की लिपिक घेतले आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

वस्तूस्थिती अशी आहे की, फार्मसिस्ट या पदासाठी शासनाकडून जी पदे मंजूर झालेले आहे. त्याचा दर्जा लिपिकचा आहे. ते लिपीक नाहीत. पदाच्या शासन मंजूरी आदेशामध्ये जे नामांकन आहेत. त्याच्या आदेशामध्ये आम्हांला ते नामांकन टाकायला लागले आहेत. फार्मसिस्ट तथा लिपिक असे ते पद आहे आणि

मूळात आपल्याकडे जे ११ कार्यरत होते. त्या अगेस्ट आपल्याला ८ पदे मंजूर झालेले आहेत. जी वस्तूस्थिती आहे. त्यांना पुन्हा समाविष्ट करुन घेता येईल त्यांना मुद्दाम डावलेले आहे अशी वस्तुस्थिती नाही.

**जयंत पाटील :-**

मी त्या मुलीची संपुर्ण माहिती देतो. त्या मुलीला इंटरव्ह्यु मध्ये काय प्रश्न विचारले? ते मी सांगतो मा. आयुक्तांना जेव्हा आम्ही विचारले की, असे काय घडले. की, ती फेल झाली. इंटरव्ह्यु मध्ये तिन योग्य उत्तर दिले नाही तिने योग्य उत्तरे दिलेली नाहीत. तिला फक्त दोनच प्रश्न विचारले आपण कुठल्या वॉर्डमध्ये राहता? बी. फार्मसी झालेल्या बाईला कुठले प्रश्न विचारले जातात? ते लक्षांत घ्या. आणि आपले नगरसेवक कोण आहेत. याची उत्तरे काही मोठी नाहीत. हे प्रश्न जेव्हा विचारल्या नंतर तिने उत्तरे दिली. आणि इंटरव्ह्यु मध्ये फेल झाली याची काय कारणे असु शकेल हे या शहरामध्ये हे लपलेले नाही. दुसरा प्रश्न असा आहे की, त्या मुलीने ०३/०२/२००५ ते २/०८/२००६ आपल्या महापालिकेत त्यानंतर ०४/०८/२००६ ते ३०/०१/२००७ महापालिकेत सेवा केलेली आहे पुन्हा ०१/०२/२००७ ते ०१/०७/२००७ आणि ०८/०७/२००७ ते १२/०३/२००७ पर्यंत ह्या महापालिकेमध्ये काम केलेले आहे. मॅडम सांगायला अभिमान वाटते की, आपल्या हातुन आपण त्यांना प्रमाणपत्र दिलेले आहे.गेल्या २००५ च्या २५,२६ डिसेंबरमध्ये, जुलैमध्ये आपल्याकडे जो प्रलय आला. त्यासाठी आपण त्यांना प्रशस्तिपत्रक दिलेले आहे. चांगली सेवा केल्याबद्दल आपण तीला प्रशस्तीपत्रक दिलेले आहे. आणि अशा मुलीला अशा व्यक्तिला आपल्या महापालिकेतील अधिकारी त्यांना फेल करतात त्या स्वतः बी फार्म आहेत. म्हणजे ह्यांना इ. १० शिकलेला उमेदवार चालेल. पण १२ वी शिकलेला उमेदवार नको कारण इ. १२ वाल्याची बुध्दीमत्ता कमी असेल त्यांना डी फार्मासीवाले चालतील पण बी फार्मासी वाले उमेदवार नकोत. एक्सप्रियंन्स मोठा आहे विरारच्या संजिवनी हॉस्पीटलमध्ये त्यांनी सेवा केलेली आहे. त्याचा तो एक्सप्रियंन्स आहे. त्यांना महापालिकेमध्ये सेवा केल्याचा एक्सप्रियन्स आहे. तरीही त्यांना ह्यांनी का फेल केले? हे सांगु शकत नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

त्या व्यक्तिचे नाव काय आहे?

**जयंत पाटील :-**

कोणाचे? म्हणजे अजुन ही तुम्हाला माहिती नाही. तर तीचे नाव आहे धनश्री भोईर. मला वाटले आपल्याला माहित असेल.

**रोहिदास पाटील :-**

मी नाव घेतले होते.

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, मी स्वतः नाव वाचले.

**जयंत पाटील :-**

सगळे त्याच विषयावर बोलता, चांगले काम केल्याबद्दल महापालिका त्यांना प्रमाणपत्रक देते त्यांनी महापालिकेमध्ये दोन वर्ष सर्व्हिस केलेली आहे आणि असे असतांनाही सगळ्यांत पॉझिटीव्ह व्यक्ति असतांनाही आपण तिला फेल करतोय. आपल्या वॉर्डात नगरसेवक कोण आहेत? असा प्रश्न विचारतात. काहीही कारण आहे का?

**जोत्स्ना हंसनाळे :-**

साहेब तीच्या जागी कोणाला घेतले?

**जयंत पाटील :-**

सांगतोय. सर्व माहिती माझ्याकडे आहे. वैशाली रमेश मोरे ह्या कुठे राहतात. ते ही कुठे राहतात. ते ही सांगतोय? वैशाली रमेश मोरे राहतात कळवा, खारी गांव, सुतार विशाल दिलीप, राहतात पालघर, वेडी ठाकुर प्रसाद, रमेश राहणारे टॉवर शंकर मंदीर जवळ कळवा ह्यांना आपण घेतलेले आहेत. माधुरी गणेश क्षत्रि राहणार माणिकपुर, एक व्यक्ति आपल्या शहरातील आहे मी त्या व्यक्तिचे नाव घेत नाही. सचिन महादेव करंडे, राहणार कूठे हे काही लिहीलेले नाही फक्त साई विहार कस्तुरी गार्डन लिहीलेले आहे . कुठे आले हे गार्डन? आणखी एक मजेशीर गोष्ट आहे सुधीर रामभाउ पावले मघाशी त्यांनी विचारले हे राहतात कुठे तर हे आपल्या आरोग्य केंद्रात रात्री झोपतात. मघाशी जो विषय निघाला हाउस फॉर डिसहाउस मध्ये त्यांना घरे नाही. आपल्या पालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये ते झोपतात हे खरे आहे श्री. पडवळ साहेब उत्तर द्या. आम्ही कुंडली काढली की एकदम संपुर्णच कुंडली आमच्याकडे असते.

**डॉ. पडवळ :-**

आपल्या पालिच्या प्राथमिक आरोग्य केद्रांचे जे क्वाटर्स आहेत. त्या ठिकाणी ते राहतात.

**जयंत पाटील :-**

हे मुळचे कुठले आहेत?

**डॉ. पडवळ :-**

ते मुळचे कुठले आहेत ते मलाही माहिती नाही पण ते सध्या तिकडे राहतात.

**जयंत पाटील :-**

आस्थापनेवर कोण आहेत? त्यांना विचारा श्री. परब साहेब तुम्ही उत्तर द्या. हे जे सुधीर रामभाउ पावले आहेत. त्यांचे मुळचे गाव कुठले आहे? हे कुणाला पावले ते तरी सांगा आणि कितीला पावले? ते पहिले निट विचारा एवढे सगळे असतांना त्या मुलींला त्या बाईला टाळण्याचे फेल करण्याचे काही कारण होते का? ती एक व्यक्ति म्हणुनच होती ती सगळ्या गोष्टीने पॉझीटिव्ह असतांना तीला फेल का केले?

(सभागृहात गोंधळ.)

**जोत्स्ना हंसनाळे :-**

साहेब, नगरसेवक ऐवढ्या आपुलकीने बोलतात. त्याबद्दल तुम्हांला सर्व माहिती देतात.

**मिलन म्हात्रे :-**

त्या मुलीला आम्ही ओळखतही नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आम्ही ही तिला ओळखत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या कमिटीमध्ये कुठेतरी पाणी मुरते आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

धनश्री भोईर बद्दल कोणीही आकस राहण्याचे कारण नाही मी सभागृहाला प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की त्या मध्ये जे पद मंजुर झालेले होते. ते आपल्या अपेक्षित पदापेक्षा कमी कर्मचाऱ्यांची पदे होती. त्यामध्ये जी वस्तुस्थिती आहे. जे कोणी आपले ५ कर्मचारी बाकी राहिलेले आहेत. त्यांना निश्चित यापुढच्या काळात आपल्या महापालिकेचा जो दवाखाना होत आहे. त्यात निश्चीतच संधी दिली जाईल.

**मिलन पाटील :-**

त्यावेळेला त्यांना ह्या लिस्ट मध्ये ॲड केले जाईल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्यांना ह्या लिस्टमध्ये ॲड केले जाईल.

**मिलन पाटील :-**

आजच्या आज त्यांना ह्या लिस्ट मध्ये ॲड करुन घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्यामधील एक नाव तुम्ही सर्वानुमते कमी करा. आम्हांला काही हरकत नाही. तुम्हाला अधिकार आहेत. आमच्यापेक्षा हे सभागृह सुपिरियर आहे तुम्ही त्या कॅटेगिरीचे कोणतेही एक ना कमी करा.

**जयंत पाटील :-**

आम्ही कोणतेही नाव कमी करणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

जे गूणानुकर्म सर्वात कमी असेल ते नाव कमी करण्यांत येईल.

**लिओ कोलासो :-**

तुम्हांला एकही नाव कमी करता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी निवड समितीवर कोण होते? आम्ही तेथे होतो का? साहेब ते तुम्ही ठरवायचे आम्ही ठरवणार नाही.

**एस. ए. खान :-**

तुम्ही तुमच्या अधिकारात घेतलेल आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

धनश्री भोईर ह्यांना ॲडिशनल लिस्टमध्ये सामावुन  घेता येईल.

**लिओ कोलासो :-**

आम्ही आपल्या मताशी सहमत नाही. एक नाव कमी करण्याचे पाप तुम्ही आमच्यावर का ढकलता?

**जयंत पाटील :-**

तुम्ही ८ काय ९ आणखी घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

घेता येत नाही.

**जयंत पाटील :-**

मग कोणाला वगळायचे?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, फार्मोसीस्ट कम लिपीक यासाठी ८ पदे मंजुर झालेली आहेत. यामध्ये ८ नावे आहेत. गुणानुक्रमांचा नावामधुन जी कमी संख्येचे गुण असतील त्या जागी सन्मा सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. संपुर्ण सभागृहाची देखील तीच भावना आहे. कारण ज्या व्यक्तिने तीन

वर्ष या महापालिके मध्ये सेवा केलेली आहे. ८ नावांमध्ये जे गूणांनुक्रमे ज्यांची संख्या कमी असेल त्या नावांच्या जागी ते नाव समाविष्ट करावे अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**हेलन गोविंद :-**

साहेब, त्याचे आत्ताच स्पष्टीकरण केले तर बरे होईल.

**एस. ए. खान :-**

मी सुध्दा एक नाव देतो. त्या लिस्ट मध्ये ते ही नाव समाविष्ट करावे.

**जेन्वी आल्मेडा :-**

सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस साहेब ह्यांनी आता जे सांगितले की ज्यांना कमी जास्त गुण मिळालेले आहेत त्यांना तुम्ही खाली करा. त्या हिशोबाने आताच स्पष्टीकरण केले तर बरे होईल कारण आमचेही दोन दिवस राहिलेले आहेत नंतर आचार सहिंता लागेल त्यांनतर तुम्ही आपल्या मनमानीप्रमाणे करुन घ्याल.

**रोहिदास पाटील :-**

सिनीॲरीटी असले तर सिनीऑरिटीसुध्दा घ्या.

**मिलन पाटील :-**

तुम्ही कामावर ज्या ज्या तारखेपासुन त्यांना सिनीऑरिटी प्रमाणे घेतलेले आहे. त्या लोकांनाच पाहिल्यांदा ठरवा तो तरी तो....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील मुख्य लेखापरिक्षकांशी मी चर्चा केली आणि त्या प्रमाणे त्यामध्ये नियमाप्रमाणे दुरुस्ती केली जाईल.

**एस. ए. खान :-**

ठिक आहे. मी सुध्दा एक नाव देतो ते ही नाव समाविष्ट करा.

**मिलन पाटील :-**

जो पण ठरावाज त्यामध्ये दोन नावांचा समावेश करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्हाला माहित आहे ना की हे महत्वाचे आहे तुम्हांला ही अंधारात ठेवलेले आहे.

**मिलन पाटील :-**

श्री. सुनिल म्हात्रे आणि लिओ फर्नांडीस या दोघांची ही नावे या यादीत समाविष्ट करुन घ्यावीत.

**एस. ए. खान :-**

मी जो विचारलेला प्रश्न आहे. की त्यांनी जो क्लॉलिफाईडसाठी डिग्र्या जमा केलेल्या आहेत. त्या युनिव्हसिटीच्या तरी आहेत का? त्यांनी पदोन्नोत्ती साठी आणि भरती होण्यासाठी जी कागदपत्रे जमा केलेली आहेत ते क्लेरीफिकेशनसाठी जिनेन आहेत की आणि त्या युनिव्हसिटी तरी आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

संबधित समिती कडून जी जात पडताळणी करणे अपेक्षित आहे ते एक महिन्याच्या मुदतीमध्येकेली जाते. आणि तसे प्रस्ताव त्या विभागाकडे पाठविण्यात येतात.

**एस. ए. खान :-**

त्याचे रिपोट आले नाहीत का?

**लिओ कोलासो :-**

आम्ही जो काही मुद्दा उपस्थित केलेला आहे. आम्हाला त्याबाबतचे क्लेरिफिकेशन द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो.) :-**

श्री. क्लासो फर्नाडीस आणि श्री. सुनिल म्हात्रे यांच्याबाबत जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी त्याबाबत असे सांगु इच्छितो की, श्री. सुनील म्हात्रे हे सर्वेअर आहेत आणि श्री. क्लासो फर्नांडीस हे अग्निशमन विभागामध्ये ज्येष्ठ अधिकारी आहेत. शासनाने आपल्याकडे जे पद मंजुर केलेले आहे. त्याबाबत ते मुख्य अग्निशमन अधिकारी आहे आम्ही मागच्या स्थायी समितीमध्ये सहाय्यक अग्निशमन अधिकाऱ्याचा दर्जा श्री. क्लासो फर्नांडीस बहाल केलेला आहे. दोन दिवसापुर्वी मा. आयुक्तांकडुन तसे आदेश निघालेले आहेत. आम्ही त्यांचा प्रश्न निकाली काढलेला आहे. सर्व्हेअर श्री. सुनिल म्हात्रे यांच्यासाठी पद रिक्त नसल्यामुळे मी माझ्याकडे ती यादी आणलेली आहे. त्यांची जी दुसरी जी पदोन्नती वेतनश्रेणी असते ती वेतन श्रेणी श्री. सुनिल म्हात्रेंना न देता आपल्याला मागच्या सभेमध्ये मा. आयुक्त साहेबांनी अश्वासीत केलेले होते की, १६ तारखेच्या आतमध्ये सर्व लागू करुन देवु मी, माझ्याकडे ती यादी आणलेली आहे. उर्वरित साधारणपणे ५४, लिपीक, १२ शिपाई, एक व्हॉलमेन श्री. नारायण दिवाडकर आहेत. वाचनालयाचे ॲटेण्डड सौ. रश्मी चव्हाण आहेत. मजुर श्री. डॉलरेज घर्शी आहेत. ११ सफाई कामगार आहेत आणि सर्व्हेअर श्री. सुनिल म्हात्रे आहेत. आम्ही या लोकांना पदोन्नती वेतन श्रेणी देण्याचे फायनल केलेले आहे.

**मिलन पाटील :-**

पदोन्नतीचे पद रिक्त नसल्यामुळे श्री. सुनिल म्हात्रे यांना मुख्य सर्व्हेअर या पदाची पदोन्नतीची वेतनश्रेणी देण्यात यावी.

**जयंत पाटील :-**

तुम्ही केलेले आहे का?

**रोहिदास पाटील :-**

मग त्याच्यामध्ये समाविष्ठ करुन घ्या. तुम्ही आम्हाला यादी द्यायला पाहिजे होती.

**रतन पाटील :-**

श्री. क्लासो फर्नांडीस यांना प्राधान्य दिलेले नाही असे मी तुम्हाला बोललो होतो.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम मुझे बढती के बारेमे मालुम नही है। हमारी मिंटिग मे यह विषय आना चाहिऐ। आरोग्य संबधित जो विषय है वह मालुम होना चाहिऐ।

**रोहिदास पाटील :-**

हा आस्थापनेचा विषय आहे. हा आरोग्याचा विषय नाही.

**एस.ए.खान :-**

कर्मचाऱ्यांची भर्ती करुन घेतलेली आहे असे सांगितलेले आहे. त्याच्यानंतर त्याचे सर्टिफेकेट खोटे निघाल्यानंतर काय करणार? या कर्मचाऱ्यांची अप्वॉईन्टमेन्ट केलेली आहे. परंतु, त्याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही याबाबत मा. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. उप आयुक्तसाहेब, तुम्ही आता जे वाचन केले त्याला आमची मान्यता घेतलेली आहे ना की ते सुध्दा बाकी आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आता जी काही नावे वाचलेली आहेत त्याबाबत मा. आयुक्त साहेबांना अधिकार होते आणि ते मा. आयुक्तसाहेबांच्या अधिकारात फायनल केलेले आहेत.मी तुम्हाला ते ॲडिशनल सांगितलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते बालवाडी वगैरेचे आहेत.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

त्यालासुध्दा मान्यता मिळाली पाहिजे त्याला मान्यता मिळण्याचा प्रश्न येत नाही. परंतु, आता तो विषय ठेवलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्या बालवाडीमधुन किती बालवाड्या बाकी राहिल्या.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

बालवाडीमध्ये साधारणतः जे वयाचे प्रॉब्लेम होते. तीन बालवाडी शिक्षिका जास्तीचे वय असल्यामुळे त्या राहिलेल्या आहेत आणि तीन शिक्षिकांचे अर्हता शिक्षण दहावी पास नसल्यामुळे त्या राहिलेल्या आहेत. परंतु, आम्ही त्यांना काढणार नाही. त्या शिक्षिका अस्थायी स्वरुपात राहतील.

**रोहिदास पाटील :-**

आपली वयाची अट शिथिल करण्याची मर्यादा काय होती? सभागृहासाठी काही ग्राह्य आहे ना.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आपण शासनाच्या निर्देशाप्रमाणे वयाची अट शिथील केलेली आहे. आपल्याला वयाची जास्त अट शिथील करता येत नाही.

**एस.ए.खान :-**

तुम्ही सभासदांना विश्वासात घेतलेले नाही ही चुकीची गोष्ट आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

यह जो बालवाडी शिक्षीका है। हमारे यहॉ पर बालवाडी शिक्षीका थी। उनको समाविष्ट नही किया और बाहर की शिक्षीको को समाविष्ट किया ऐसे क्या? उसके पिछे क्या कारण है।

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मी तुम्हाला बोललो की, तीन शिक्षिकांची अर्हता दहावी पास नव्हत्या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

परंतु, अशा नउ शिक्षिका आहेत. आपल्याकडे त्या शिक्षीका ऑलरेडी होत्या. त्यांना घेतलेले नाही. आणि बाहेरच्या शिक्षिकांना घेण्यात आले याच्या मागे काय कारण आहे.

**दिपक खांबित :-**

सहा शिक्षीका दहावी पास नाहीत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

परंतु, आमच्याकडे नउ शिक्षिकांची यादी आहे.

**एस.ए.खान :-**

शिक्षिकांची निवड करणारे लोक बाहेरचे आहेत. ज्या शिक्षिकांची निवड झाली त्या शिक्षीका बाहेरच्या आहेत. ह्याच्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

तिकडे सहा शिक्षक नाहीत. तुम्ही नउ शिक्षकांना वगळलेले आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आपल्याकडे ऑलरेडी जे नउ शिक्षक होते. तुम्ही त्या शिक्षकांना का घेतले नाही?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडील सहा शिक्षीका दहावी नापास होत्या. आणि तीन शिक्षकांचे वय ५५ – ५६ मधील आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

परंतु त्यांच्या घरात त्यांची मुलगी किंवा सुन आहे. अशा लोकांनासुध्दा फॉर्म भरलेला आहे. परिणामी फॉर्म सबमिट केलेले नाहीत. तुम्ही ही आपल्यामध्ये ॲडजेस्टमेंट केलेली आहे.तुम्ही त्याच्यावर अंदाज केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबित साहेब, कायद्याने प्रयत्न केलेला आहे. मग तुम्ही परंतु त्यांना बेनिफिट मिळालेला नाही. ते कागदावरुन जातील त्यांना जे काही अधिकार मिळायला पाहिजेत. किंवा फायदे मिळायला पाहिजेत ते मिळणार नाहीत. तुम्ही काढणार नाहीत हे खरे आहे.

**एस.ए.खान :-**

ह्याच्यामध्ये स्थानिकांना काहीही प्राधान्य नाही.

**रोहिदास पाटील :-**

जो पर्यंत त्या येणार तोपर्यंत त्या शिक्षिकांना फायदे मिळणार आहेत. परंतु ते रेकॉर्डवर नमुद केलेले नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

जो पहलेसे काम कर रहा है। उसे रु. हजार मिल रहा है और जो नही कर रहा है उनको रु. ३ हजार मिल रहा है। उनके उपर ऐसा अन्याय क्या हो रहा है? उसके पिछे क्या करण है? पैसे का गोलमाल है या कोई लेन देने का प्रकरण है।

**दिपक खांबित :-**

महासभेची मंजुरी मिळाल्यानंतर कार्यवाही केली जाते.

**मदन उदितनारायण सिंग :-**

जो भी है वह क्लिअर होना चाहिए . उनको भी न्याय मिलना चाहिऐ।

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आप जिसके बारे मे बोल रहे है। उनका क्वालिफिकेशन अर्हता होने दिजीऐ और उनको न्याय नही दिया तो आप ऐसी भाषा बोलिये।

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, आता एक मुलगी दहावी शिकलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

उनकी अर्हता क्वालिफिकेशन आपके पास भेजना है। अगर वह क्वॉलिफिकेशन मे नही बैठेगी तो मैं आपके साथ बात करुगाँ।

**एस.ए.खान :-**

आमच्याकडील सुध्दा एक नाव घ्या.

**जेन्वी आल्मेडा :-**

आपण ज्या शिक्षिका घेतलेल्या आहेत त्या सर्व नातेवाईक आहेत. तुम्ही त्यांना सामावुन घ्या. त्यांची मागणी अशी आहे की, आम्ही यांच्यामध्ये बसत नाही तर आमची मुलगी किंवा सुन किंवा बहिण आहे. त्याची त्याबाबत मागणी आहे तर तुम्ही त्यांना न घेता. तुम्ही बाहेरच्या शिक्षीका परस्पर भरलेल्या आहेत हे योग्य नाही. तुम्ही त्यांना संधी द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मुंलाची शैक्षणिक अर्हता बसु शकते.

**जेन्वी आल्मेडा :-**

श्री. खतगांवकर साहेब तुम्ही आम्हाला मान हालवुन समाधान देउ नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आपल्याकडे अशाप्रकारची वारसा पध्दत नाही. त्यांचे ऐजबार झाल्यानंतर जी पदे मंजुर होतील त्यावेळेला त्यांना भरु द्या एकावेळेला सगळी कामे करणे शक्य नाही. आपण त्यामुळे एकही काम करु शकणार नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

साहेब, त्यांची आणखी माणसे आहेत.

**हॅरल बार्जीस (सभागृह नेता) :-**

ज्यावेळेला त्या पदांना मंजुरी मिळेल. तेव्हा ती कामे केली जातील तीन बालवाडी शिक्षीका वयाच्या अटीमुळे अडकलेल्या आहेत. परंतु, त्यांच्या ज्या मुली आहेत. त्यांनी शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे. ज्यावेळेला ती पदे मंजुर होतील त्यावेळेला त्याच्या जागी त्यांची जी मुले आहेत ज्याची शैक्षणिक अर्हता आहे त्यांना प्राधान्य द्या. परंतु, तुम्ही श्री. क्लासो फर्नांडीसच्या बाबातीत जे वक्तव्य केलेले आहे. तुम्ही त्यांना सुधारित वेतनश्रेणी लागु केलेली आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) साो.) :-**

होय.

**हॅरल बार्जीस (सभागृह नेता) :-**

तुमच्या वक्तव्यावर विश्वास ठेवुन कार्यवही करू शकत नाही.

**मोहन पाटील :-**

तुम्ही सिनिअरिटी प्रमाणे चला.

**हॅरल बार्जीस (सभागृह नेता) :-**

साहेब, या दोन कर्मचाऱ्यांवर सतत अन्याय झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी तुम्हाला एक पत्र वाचुन दाखवतो. तुम्ही या ठिकाणी हा जो विषय मंजुरीला आणलेला आहे. तुमच्या मंजुरीच्या अगोदर ज्या लिस्टची नावे मंजुरीनां आलेली आहेत. अशा लोकांना मा. आयुक्तांनी दि. २९/०५/२००७ रोजी कामावर हजर राहण्याचे आदेश दिल्याचा हा कागद आहे. आपल्याकडे ही लिस्ट आता मंजुरीला आलेली आहे. आपण आज त्याला मंजुरी देणार आहोत की आम्ही तुम्हाला आज पासुन मंजुरी देतो. प्रशासनाने त्यांना दि. २९/०५/२००७ रोजी ऑलरेडी कार्योदश दिलेले आहेत. सभागृहनेते तुम्ही जो ठराव मंजुर करित आहात त्याबाबत प्रशासनाने पुर्वी जावक क्र. मनपा/ आस्था/४०४/१२९/२००७ – २००८ दि.२९/०५/२००७ रोजी नोकरी मिळावी म्हणुन अर्ज केलेला आहे. दि. २९/०५/२००७ रोजी सकाळी नोकरी मिळावी म्हणुन स्टाफने अर्ज केला आणि दि. २९/०५/२००७ रोजी मा. आयुक्तसाहेबांनी हा आदेश दिलेला आहे. ह्याच्या खाली आपली नियुक्ती एक वर्षाच्या परिविक्षाअधीन कालावधीसाठी करण्याबाबतच्या सगळ्या अटीशर्ती टाकलेली आहेत. खाली मा. आयुक्तांची सही आहे हे आदेश घेउन ती लोक कामाला लागलेले आहेत. नंतर मा. महापौरांच्या मंजुरीला हा विषय आलेला आहे.

**रतन पाटील :-**

हे अवलोकन आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

हे अवलोकन नाही. मंजुरी करीता दिलेले आहे. तुम्ही पुर्वीचे विषय वाचा. तुम्ही वाटेल तसे काहीतरी करु नका. तुमच्या लिस्टमध्ये १ ते २५ पर्यंत त्यांना टाकलेले आहे. आताच्या ठरावाप्रमाणे याचा सिरीयल नंबर २५ ते ४८ आहे. ही लिस्ट पुर्णपर्ण दडवली गेलेली होती. मी काढुन आणलेली आहे. त्यांनतर काही हालचाली घडलेल्या आहेत. याचा प्रशासनाने काहीतरी खुलासा करा की, हे सगळे अवलोकनात का आपले नाही? बाकीचे मंजुरीसाठी येते.त्या मंजुरीमध्ये काही नावे घुसवली जातात. हा एक कार्यादेश अगोदर काढला जातो. तो कार्यादेश त्या कर्मचाऱ्यांना मिळतो. ते कर्मचारी कामाला लागतात. आम्ही हा कार्यादेश मागायला गेलो तेव्हा सगळी पळापळ झालेली होती. मग १०० टक्के ठणठणीत काम होते ते आम्हाला का मिळाले नाही? ही पळापळ का झाली? त्यावेळेच्या मा. आयुक्तांनी हा जो कार्यादेश काढलेला होता तो बरोबर आहे की, नाही याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

पदोन्नोती आणि निवड भरतीमध्ये वर्ग – १, वर्ग – २, वर्ग – ३ मध्ये जी निवड यादी लावली जाते. ज्या दिवशी निवड यादी पब्लिश केली जाते. त्या दिवशी मा. आयुक्तांनी आदेश निर्गमीत केलेले आहे. हे त्यात सगळ्याची महासभेत मान्यता होईल. अशी त्यांची अपेक्षा असते. कायद्यामध्ये अशी तरतुद आहे की, जी यादी निवड होते ती, महसभेमध्ये निर्णय स्तव सादर करण्यात यावी. मा. आयुक्तांनी आदेश देवुन या वेळेला दोन वेळा पदोन्नोतीचे आदेश दाखल केले होते. त्या प्रमाणे ते आदेश निर्गमित करुन. पदोन्नोती साठी अहवाल सादर केलेला आहे.

**लिओ कोलासो :-**

यापुर्वी सभागृहाने बालवाडी शिक्षकांच्या मंजुरीसाठी ठराव केलेला होता.सभागृहाने त्याला मंजुरीसाठी ठराव केलेला होता. सभागृहाने त्याला तत्वतः मंजुरी दिलेली होती. म्हणुन शासनाकडे जो प्रस्ताव पाठवलेला होता तो पद मंजुरी झाल्याबाबतच्या होता त्यामुळे हा फक्त फॉर्मालिटीचा भाग आहे. ह्याच्यामध्ये विशेष काहीही नाही.

**हॅरल बोर्जीस (सभागृह नेता) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दिलेली पदोन्नोती तसेच सरळ सेवेने केलेल्या उमेदवाराच्या नेमणुक यादीचे अवलोकन करुन मान्यता देणेबाबत. ज्या उमेदवारांच्या सरळ सेवेने पदोन्नोतीने नेमणुका झालेल्या आहेत. त्यांची यादी सभागृहातील सन्मा. सदस्यांना प्राप्त झालेली आहे. त्याच्यामधे्य सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी या सभागृहात जी सुचना मांडलेली आहे. आपण फार्मासिस्ट कम लिपीकची जी आठ पदे भरलेली आहेत. त्या आठ पदापैकी सिनिअरिटी बेस पकडा किंवा आठ पदापैकी सिनिअरिटी बेस पकडला किंवा आठ पदांमधुन गुणानुक्रमे जे कमी गुणाचे नावं असेल ते कमी करुन त्या जागी श्रीम. धनश्री मधुकर भोईर यांचे नावे समाविष्ट करावे अशी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी जी सुचना केलेली आहे. मी ती सुचना या ठरावामध्ये अंर्तभुत करीत आहे.

(ठरावाचे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ठरावाला अनुमोदन देता. परंतु श्री. क्लासो फर्नाडिस आणि श्री. सुनील म्हात्रेचे काय झाले? कारण त्यांच्याबाबत ठरावात उल्लेख केलेला नाही.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम श्री. क्लासो फर्नाडिस आणि श्री. सुनील म्हात्रेंचे काय झाले?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तसाहेब तुम्ही श्री. क्लासो फर्नांडीस बाबत सांगितलेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

तुम्ही श्री. क्लासो फर्नांडीस आणि श्री. सुनील म्हात्रेंचा ठराव वाचुन दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावाचे वाचन करुन दाखवा.

**प्रभात पाटील :-**

त्या मिंटीगला श्री. खतगावंकर साहेब होते. आपण ६० ग्रज्युएट लोक लिपिक म्हणून भरलेले होते. आपण ५० लोकांना पगार दिला जातो तर असे का?

**हॅरल बार्जीस (सभागृह नेता) :-**

मा. उप - आयुक्त साहेब तुम्ही श्री. क्लासो फर्नांडीस आणि श्री. सुनील म्हात्रे या दोन कर्मचाऱ्यां विषयी सभागृहाला प्रशासनातर्फे माहिती द्या.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मी या ठिकाणी पुनश्च खुलासा करतो की, सर्व्हेअर श्री. सुनील म्हात्रे आणि श्री. क्लासो फर्नांडीस यांच्याबद्दल प्रशासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यांना सोमवारी आदेश देउन त्यांचा कॉप्या सदस्यांना दिल्या जातील.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही अर्धवट माहिती देत आहात. तुम्ही कुठल्या आदेशाबाबत बोलता?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही कुठला आदेश बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दोन आदेश देउ शकता. तुम्ही ज्या दिवशी नियुक्ती केली तो एक आदेश देउ शकता आणि दुसरा आदेश त्यांच्या पदावर नियुक्ती केल्याबद्दलचा असतो. त्यापैकी तुमचा कुठला आदेश आहे? तुम्ही तो आदेश सांगितल तर बर होईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, श्री. खतगांवकर साहेबांना माझी अशी विंनती आहे की, आपण जे ५० ग्रॅज्युएट लिपीक भरलेले होते. ते ५० ऐवजी ६० भरलेले होते. स्थायी समितींची ५० लिपीकानां मान्यता होती ते ६० लिपीक काम करतात परंतु, त्यावरच्या दहा लोकांना गेले सात आठ महिने पगार मिळत नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, आपण जी ५० पदे घेतलेली होती. त्याच्यामध्ये १० लिपीक जास्त लागलेली होती. त्या ५० पैकी १० मुले बाकी आहेत. त्यांना गेल्या आठ आठ महिन्यापासुन

पगार मिळालेला नाही. हे असे काय चालले आहे? तुम्ही आम्हाला याचे उत्तर द्या त्या मुलांनी आठ आठ महिने काय खायचे?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

स्थायी समितीची मंजुरी घेउन तो विषय पुर्ण केलेला आहे. आता त्या विषयामध्ये काहीही अडचण नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझे त्या ठरावाला अनुमोदन असतांना दुसऱ्याची सही घेतलेली होती. तुम्ही दुसऱ्या सदस्याची सही का घेतली? तुम्हाला वाटेल तसे तुम्ही करता का? तुम्हाला वाटेल तिथे तुम्ही सही घेणार का? कारण मी अनुमोदन दिलेले होते.

**संगिता म्हात्रे :-**

मा. आयुक्तसाहेब आपण सफाई कामगार आणि शिपायांच्या मुलाखती घेतलेल्या होत्या तुम्ही त्यांची भरती कधी करणार आहात?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, गेल्या आठ महिन्यापासुन दहा जास्तीचे लिपीक कामाला आहेत. तुम्ही त्यांना सात आठ महिने पगार दिलेला नाही. मग त्यांनी काय खायचे?

**रोहिदास पाटील :-**

श्री. मिलन पाटील तुमचे अनुमोदन असो किंवा इतर कोणाचेही अनुमोदन असो परंतु, काम होणे महत्वाचे आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्या लिपीकांना पगार दिला नाही तर तुमचे ५० लिपीकमध्ये नांव नाही असे सांगतात. त्या मुलांनी घरामध्ये काय करायचे?

**रोहिदास पाटील :-**

श्री. मिलन पाटील बोलले की, माझे अनुमोदन होते. मग ते महत्वाचे आहे की, काम होणे महत्वाचे आहे ते सांगा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीवाल्यांनी ७० लिपीकांना कामाला घ्या असे सांगितलेले होते आणि आपल्या आयुक्तांनी फक्त ५० लिपीक कामाला घेण्याचे सांगितलेले होते. मग बाकीचे सगळे कामे त्यांच्या बाजुने चालतात का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

स्थायी समितीने १०० लिपीक घेण्यास सांगितलेले होते.

**नयना म्हात्रे :-**

मग तुम्ही जेवढे सांगितलेले असतील तेवढे लिपीक घ्या. मा. उप - आयुक्त साहेब तुम्हाला १०० लिपीक घ्यायला सांगितल असतील तर तुम्ही १०० लिपीक घ्या. परंतु आधी ७० लिपीक तरी घ्या. तुम्ही ७० लिपीक का घेतले नाहीत?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आम्ही ही बाब मा. आयुक्तसाहेबांकडे सादर करु. त्यांनी मान्यता दिली तर निश्चितच कार्यवाही करु.

**नयना म्हात्रे :-**

आपले आयुक्तसाहेब कधीही मान्यता देणार नाहीत. तुम्ही तसा ठराव करुन घ्या. मा. आयुक्त साहेब कधी मिंटीगला येतात. कधी मिंटीगला येत नाहीत. ते त्यांच्या सभासाठी मंत्रालयामध्ये असतात.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ही शेवटची सभा आहे हे तुमच्या लक्षात आहे. आपण पाच वर्षे केलेल्या कामाची चुकभुल सुधारत आहोत. ते सुध्दा खेळीमेळीने सुधारत आहोत. श्री. खतगांवकर साहेब एकदम प्रमाणिक आहेत. ते जे लिपिक आहेत. त्यांच्यासाठी ५० ही फिगर महत्वाची नाही. ७७ ही फिगर महत्वाची आहे. त्याच्यासाठी कूठे पळवाट असेल. कुठे नियम असेल तरी चुकीचे काहीही करु नका. कारण हे तुम्हाला हे सभागृह संहमती देत आहे. मा. महापौर मॅडम, त्याच्यामुळे तुमची शान वाढेल, मान वाढेल, या सभागृहात उपस्थित असलेल्या सगळ्यांचा डायसवर उपस्थित असलेल्या सगळ्या अधिकाऱ्यांचा मान वाढेल. कारण आपण न्याय देत आहोत. आपण कोणावर अन्याय करित नाही. त्या यादीमध्ये कोणाचे नांव नाही ते मला माहिती नाही. इकडचे सदस्य वेगळे आहेत. परंतु, ती यादी ७७ लिपीकांची आहे.

**मिलन पाटील :-**

मॅडम, तुम्ही लिपीकांची यादी फायनल करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्ही ७७ लिपीकांच्या यादीसाठी कानमंत्र द्या. कुठे बसवता येईल ते बसवा. मा. आयुक्त साहेब, तुम्हीच आम्हाला सांगा परंतु, यासभागृहामध्ये मा. आयुक्तसाहेबांना दुसरे कोणीही सांगु शकत नाही. फक्त श्री. खतगांवकर साहेब सांगू शकतात.

**प्रभात पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेबांची याबाबतीत भुमिका योग्य आहे. सभागृहाची कर्मचाऱ्यांच्या बाबातीत जशी चांगली भुमिका आहे. त्याबाबत श्री. .खतगांवकर साहेबांनी सुध्दा वेळोवेळी चांगली भुमिका घेतलेली होती. परंतु, मी आज तुम्हाला अशी विनंती करते की, ही संपुर्ण शहराची मिटिंग आहे. त्यामुळे तुम्ही या गोष्टीवर चांगला सोक्षमोक्ष लावा. कोणावरही अन्याय होणार नाही. असा सोक्षमोक्ष लावा.

**नयना म्हात्रे :-**

आपल्याकडे जे दहा — पंधरा लिपीक कामाला असतील तुम्ही त्यांना सुध्दा कामाला घ्या. तुम्ही ज्याप्रमाणे ५० लिपीक कामाला घेतले त्याप्रमाणे त्यांनासुध्दा कामाला घ्या. ते लिपीक आठ - आठ महिन्यापासुन काम करित आहेत. परंतु, हातामध्ये एक रुपया सुध्दा आलेला नाही. तर त्या लिपीकांचे काय करायचे?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मी याबाबत खुलासा करु इच्छितो की आपल्याकडे ५० लिपीक प्रशासनाकडे डायरेक्ट कामाला नाहीत. ते ठेका पध्दतीने कामाला आहेत. ते ठेकेदाराकडुन कामाला आहेत. आमच्याकडुन कामाला नाहीत ते लिपीक प्रशासनाच्या आस्थापनेवर डायरेक्ट कामाला नाहीत.

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, त्यांना पगार मिळालेला नाही. त्या लिपीकांनी एवढे दिवस काम केले त्याचा पगार त्यांना द्या.

**लिओ कोलासो :-**

मग, ठेकेदारावर करावाई करा.

**रोहिदास पाटील :-**

तुमचे उत्तर चोख आहे. आम्हाला त्या उत्तराबाबत संशय येण्याचे काहीही कारण नाही. आपली जी काही व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेमधुनच त्यांना न्याय मिळावा एवढीच आमची अपेक्षा आहे. तुम्ही चुकीचे केलेले आहे असे आम्ही सांगण्याचा प्रयत्न करतो. तुम्ही चुकीचे केलेले आहे असे आमचा सांगण्याचा प्रयत्न करीत नाही. परंतु, ही संधी किंवा योग्य वेळ आहे. मा. महापौर मॅडम, तुम्हाला हे सभागृह विनंती करीत आहे. की, तुम्ही मा. आयुक्त साहेबांन कडे शब्द कसा करावा? तुम्ही ७७ लिपीकांची ॲडजेस्टमेंट योग्य पध्दतीने करावी. एवढेच आमचे म्हणणे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, प्रभात पाटील, सन्मा. सदस्या नयना म्हात्रे, सन्मा. सदस्य रतन पाटील, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, सन्मा. सदस्य मिलन पाटील , सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस आणि सर्व सन्मा.सदस्यांनी आस्थापनेवर ठेका पध्दतीने ५० लिपीक कामाला घेतलेले होते. त्यांच्या व्यतिरिक्त स्थायी समितीने शिफारस केल्यानंतर त्याच्यामध्ये आणखी भर पडुन लिपीकांची ७७ पद आहेत. आजही ते लिपीक आस्थापनेवर काम करीत आहेत. परंतु गेल्या पाच सहा महिन्यापासुन त्यानां पगार मिळत नाही.

**नयना म्हात्रे :-**

त्या लिपीकांना गेल्या आठ महिन्यापासुन पगार मिळालेला नाही.

**मा. महापौर :-**

जे काही, महिने त्यांना पगार मिळालेला नाही. त्यांनी या ठिकाणी काम केलेले आहे आणि आजही ते कामावर येतात. परंतु, त्यांचा पगार त्यांना दिलेला नाही. सर्व सन्मा. सदस्यांनी प्रशासनाला विनंती केलेली आहे. मी त्या द्वारे प्रशासनाला विनंती केलेली आहे. मी त्या द्वारे प्रशासनाला सुचना देते की, जे इतर कर्मचारी आहेत म्हणजेच ५० लिपीकांपेक्षा अधिक अर्ज जे अतिरीक्त लिपीक आहेत. त्यांचा पगार झालेला नाही. तर आपण हा विषय मा. आयुक्तसाहेबांकडे घेउन त्या कर्मचाऱ्यांचा सात आठ महिन्याचा जो काही पगार असेल किंवा ठेकेदार नियमाप्रमाणे जो काही पगार देत असेल किंवा ठेकेदार नियमाप्रमाणे जो काही पगार देत असेल त्याप्रामणे त्यांचा पगार काढण्यात यावा आणि त्यांना तो पगार लवकरात लवकर अदा करण्यांत यावा. ही महासभा त्या खर्चाला मंजुरी देत आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्या कर्मचाऱ्यांना रुजु करुन घ्या.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही त्यांना समाविष्ट करुन घेतलेले आहे का?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही त्यांना पगार दिला म्हणजे सगळे झाले असे करु नका. तुम्ही त्या लिपीकांना घरी बसवु नका.

**हॅरल बार्जीस ( सभागृह नेता ) :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही त्यांच्या आर्थिक गोष्टीला मंजुरी देता. तुम्ही त्यांना पगार दिल्यानंतर ते पुन्हा घरी बसतील. तुम्ही त्यांना त्यांच्या मुळ पदावर ठेवुन सेवेमध्ये कायम करा.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, तुम्ही त्यांना त्यांच्या पदावर ठेवा.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण लिपीकांना आर्थिक मंजुरी देण्यापेक्षा आपला ठेकेदार सक्षम नाही असा त्याचा अर्थ आहे. महापालिकेने पैसे उशिरा दिले नंतर दिले परंतु, या लिपीकांचा पगार देण्यासाठी तुमचा ठेकेदार सक्षम असला पाहिजे.

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आता जे रुलिंग दिले त्याच्यामध्ये थोडी दुरुस्ती करुन घ्या. त्या लिपीकांना त्याच्यामध्ये सामावुन घ्या. अशी दुरुस्ती करुन घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

श्री. खतगांवकर साहब, आप आज की महासभाने आयुक्त है। आपको मातापिताने आपका नाम बालाजी अच्छा रखा है। इसिलीए आज आपको जो फैसला लेना है वह लिजिए।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही ५० लिपीकांना सेवेत समाविष्ट करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे रोजदारी पध्दतीने समाविष्ट करुन घ्या असे आमचे म्हणणे आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही असेच रुलिंग द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण ठेका पध्दतीने लिपीक घेतो. त्यांची फिगर थोडीशी वाढवुन घ्या एवढाच बदल आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, गेली पाच वर्षे आमच्यासारखे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्यासारखे सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्यासारखे नगरसेवक इथे जिव्हाळ्याने, सद्सद्विवेकाने चांगल्या कर्तव्य भावनेने काम करीत होते. परंतु, आम्हाला मिळणारे मानधन कमी केले गेले. ते मानधन रुपये २ हजाराने वाढवुन आमची निवृत्ती होईपर्यंत म्हणजेच हे सभागृह अंर्तधान पावेपर्यंत आम्हाला एरियस म्हणजेच थकबाकीच्या रुपाने मानधन वाढवुन द्यावे. दुसरी गोष्ट अशी आहे की, काही सभासद सभागृहात असतील. परंतु, आमच्यासारखे किंवा दुसरे कोणतेही सदस्य सभागृहात नसतील तर आम्हाला निवृत्ती वेतन लागु करावे अशी आमची तुम्हाला विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्या लिपीकांना समाविष्ट करुन घ्यावे. एवढेच आम्हाला बोलायचे होते.

**मा. महापौर :-**

जे लिपीक ठेका पध्दतीने कामावर घेतलेले आहे. त्यांना कामावर रुजु करुन घेण्यात यावे व त्यांचे पेमेंट त्वरीत देण्यात यावे.

**हॅरल बार्जीस (सभागृह नेता) :-**

मा. महापौर मॅडम, आवश्यक त्या मंजुऱ्या किंवा आवश्यक त्या सुचना त्वरीत घ्याव्यात अन्यथा तुम्ही रुलिंग दिले तरी त्या परवानग्या घेतल्या नाहीत तर अर्थ नाही.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेबांनी मंजुऱ्या घेतलेल्या आहेत.

**मा. महापौर :-**

सदर ठराव सर्व सदस्यांच्या सुचनेने मंजुर करण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या लिपीकांचे क्वालिफिकेशन सुध्दा विचारात घ्यावे. कारण जे कम्प्युटर ऑपरेटर्स आहेत. त्यांना कॉम्प्युटर्स हाताळता येत नाही, पत्र ड्राफ्टींग करता येत नाही. तरी सुध्दा ते कामाला येतात आणि त्यांना ५ हजार रुपये पगार आहे अशी परिस्थीती आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५४ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ५४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ५४ शांतीनगरच्या बिल्डरकडे नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनादेखील आपण महापालिकेमध्ये समाविष्ट करुन घेणार आहात का? ते प्रायव्हेट बिल्डरकडे काम करणारे बिल्डर लोक आहेत. कर्मचारी संपूर्ण वितरण व्यवस्था महानगरपालिकेत हस्तांतरीत करावयाची असल्यास कर्मचारी वर्ग ही महापालिकेत समाविष्ट करुन घ्यावा लागेल. म्हणजे हे काय आहे? प्रायव्हेट बिल्डरकडे काम करणारी लोक आपल्या महापालिकेत उदयापासून कामे करणार? म्हणजे आपण आपले स्टाफ क्वार्टर विसरुन त्यांना कामाला घेणार आहात का? शांती स्टारचा बिल्डर आपल्याला १०० टक्के रोडचा ताबा देत नाही किंवा तो गार्डन बनवून देत नाही. आर.जी.एच. मधील गार्डन विकसित करुन देत नाही आपल्याला विभागीय कार्यालय बनवून देत नाही. पार्क म्हणून त्याला कव्हर नाही. फक्त एस.टी.पी. आणि पाण्याची टाकी.....

**मा. उपमहापौर सो. :-**

ऐकून घ्या. आता आपण जो विषय काढला की, शांतीनगर बिल्डर गार्डन बनवून देत नाही. आर.जी.एच. जागा विकसित करत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मी मा. महापौरांना विचारतो. यावर मा. महापौरांनी आणि प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या माहितीसाठी सांगतो की, शांतीनगरमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून चार गार्डन तयार करण्यांत आलेले आहेत. प्रशासनाला त्यांना माहिती कळविली की, चार गार्डन तयार झालेले आहेत. आपण शांतीनगरच्या गटारांची योजना ताब्यात घेतलेली आहे. शांतीनगरची एस.टी.पी. ही आपण ताब्यात घेतलेली आहे. शांतीनगरला गेल्या दोन वर्षापासून मिरा भाईंदर महानगरपालिका ५ एम.एल.डी. पाणी देत होती. आता आपण नव्याने बांधून घेतलेल्या टाकीचा ७० टक्के खर्च शांतीस्टार बिल्डरने केलेला आहे. ३० टक्के खर्च हा मिरा भाईंदर महानगरपालिकेने केलेला आहे. आणि ती आपण ताब्यात घेतलेली आहे. पाण्याचे डिस्ट्रीब्युशन करायचे असेल तर तो स्टाफ घ्यावा न घ्यावा हे धोरण महापालिकेने ठरवावे. परंतु, सध्या शांतीनगरमध्ये वितरण करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यांनाच द्यावी. जेणेकरुन तिथल्या लोकांची कुठच्याही प्रकारची अव्यवस्थता होणार नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझा प्रश्न क्लिअर होउ दे. आपण वेळोवेळी शांतीस्टार बिल्डर यांना हाउसिंग स्किमचा विकास सेक्शन डेव्हलप करण्यासाठी गेली दर पाच-पाच वर्षानी रिव्हाईस करत गेलो. आपल्याला ज्या ज्या ठिकाणी वाटले त्याठिकाणी आपण त्यांची प्लॅन रिव्हाईस केली. त्यांनी कधी कधी नगरविकास विभागाकडून यु.एस.अे ची अंडर प्लॅन विकसित करुन घेतली. मा. आयुक्त साहेबांनी याठिकाणी गोषवारा दिलेला आहे. त्या शांतीस्टार बिल्डरने आपल्याला चार वस्तु द्यायच्या आहेत. त्याबाबत कोणीच कधीही बोलत नाही. प्रत्येक १८ सेक्टरमध्ये देखील गार्डन आहेत. ११ सेक्टरमध्ये आर.जी.एच., ११ सेक्टरमध्ये देखील ज्या पाणी वितरण करणाऱ्या सिस्टीम आहेत. त्यादेखील त्यांनी आपल्याकडे हॅडओव्हर करायच्या आहेत. एस.टी.पी. आपल्याला आपल्या ताब्यात घ्यायच्या आहेत. हे मला मान्य आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव, तुम्ही पुढच्या विषयाला सुरुवात करावी. सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, कर्मचाऱ्यांची यादी देखील नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा झालेला ठराव आम्हाला वाचून दाखवा.

**एस. ए. खान :-**

ठराव वाचून झालेला आहे.

**रतन पाटील :-**

आपण त्यांना कर्मचाऱ्यांसकट घेत आहोत का? आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेने सगळे श्युअर पॉईंट आपण देतो. तर हे कर्मचारी आपल्याला पाहिजे आहे का? तर घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

कर्मचाऱ्यांच्या नावाची यादी देखील नाही.

**रतन पाटील :-**

आपण किती कर्मचारी घेत आहोत किंवा नाही?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, गोषवाऱ्यामध्ये लिहलेले आहे की, वितरण व्यवस्थेसाठी शांतीस्टार विकासक यांच्याकडे असलेल्या कर्मचारी वर्गाची यादी सोबत जोडत आहे. याची यादी देखील नाही.

**रतन पाटील :-**

यादीही नाही आणि किती कर्मचारी आहेत?

**रोहित सुवर्णा :-**

आपण किती कर्मचारी घेणार आहोत? त्यांना आपण किती पगार देणार आहोत? त्यांचा स्केल काय असेल? त्यांना कामाचा अनुभव काय आहे? त्यांचे वय किती आहे? याची काहीही माहिती नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आपण मला परवानगी दिली नाही तरी मी बोलतो. रोहित सुवर्णाजी यांनी शांतीस्टार बिल्डर संबंधी काही आक्षेप व्यक्त केले आणि सहकारी पक्षाच्या कॉंग्रेसच्या सर्व नगरसेवक एका हेतूने विचारायला लागले की, तुमचा आमचा काय संबंध आहे? असे होता कामा नये. हे सभागृह संपर्ण शहराचे प्रतिनिधीत्व करीत आहे. तर त्यामुळे असे एखाद्या सभासदाला नाउमेद करणे कसे टाळता येईल हे सभागृहाने पाळले पाहिजे. शांतीनगरच्या योजनेबद्दल मीसुध्दा बराच अभ्यास केलेला आहे.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, आमचा बोलण्याचा तसा उद्देश नाही. मी तुमच्या प्रभागाबद्दल बोलत नाही. मग तुम्हाला एवढे बोलायची गरज नाही.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही त्यांना बोलायला दिले पाहिजे. तुम्ही विचाराल की, तुमचा काय संबंध आहे? तर तसे काहीही नाही.

**एस. ए. खान :-**

तुमचा काहीही संबंध नाही.

**लिओ कोलासो :-**

माझा या गोष्टीशी संबंध आहे. प्रत्येक नागरीकाचा संबंध आहे. तुम्ही संबंध नाही असे बोलू शकत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझा संबंध आहे. सन्मा. सदस्य एस.ए. खान साहेबांना जरा आवरा. शांतीस्टार योजनेबद्दल फार चांगले बोलले जात आहे. शांतीस्टार योजनेमध्ये प्रचंड इयूरेगिलिटी आहे. शांतीस्टार बिल्डरने महापालिकेला अनेक आश्वासने दिलेली होती. पण त्याने ती पूर्ण केली नाहीत. त्या तेथील रहिवाशांना ऑक्युपेशन सर्टीफिकेट दिलेले नाही. ऑक्युपेशन सर्टीफिकेट देताना अनेकवेळा हेलपाटे मारुन त्यांना त्रस्त करण्यांत आलेले आहे. हे आम्ही विसरतोय. मा. महापौर मॅडम, मी या विषयावर शांतीस्टार बिल्डरच्या विरोधात बोलणार नव्हतो. पण सभागृहाचा असा कल होईल की, शांतीस्टारने सगळे चकाचॉंद केलेले आहे. पण तसे नाही आणि केवळ या शहराचा, या महापालिकेचा अनेक सुविधांचा अनेक संबंधितांनी फायदा घेतलेला आहे. पण मा. महापौर साहेबा, आपला मोबाईल बंद करा. अशी आपल्याला विनंती आहे. माझे स्पष्ट म्हणणे आहे की, पाणी पुरवठा योजनेसाठी शांतीनगर स्टार त्यांचा जो कोणी स्टाफ आपण महापालिकेच्या प्रशासनावर घेउ नये. त्यांची काही आवश्यकता नाही. तो स्टाफ प्रायव्हेट बिल्डरचा आहे. तो कृपया महापालिकेच्या आस्थापनेवर घेउ नये. आमचा त्याला सक्त विरोध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, शंतीनगरचा ठराव पास झाला. मागे शांतीनगरच्या काही सोसायट्यांमध्ये जाण्याचा आम्हाला योग आला होता. त्या सोसायटीनी मला बोलविले आणि मी गेलो होतो. आपण सर्व खर्च करुन कर्ज वगैरे काढून जी ५० एम.एल.डी. ची नविन स्कीम तयार केली. त्यावेळेला मिरा भाईंदर शहरामध्ये नागरीक पाण्याने त्रस्त होते. दंगे झाले, आंदोलने झाली. त्यावेळेला शांतीस्टारच्या बिल्डरने कधीही आमच्या मिरा भाईंदर शहरातील लोकांना एक दिवस आड पाणी दिलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे. आम्ही इकडे चार-चार दिवस, दहा-दहा दिवस पाण्यासाठी वण-वण फिरत असताना त्याने स्वतःच्या स्कीममधील पाणी कधीही दिले नाही. परंतु, काही काळानंतर या महापालिकेतील अशी चक्र फिरायला लागली की, आपल्याकडचे चीफ ऑफिसर देखील त्यांच्या ऑफिसमध्ये जाउन बसलेले मी बघितलेले आहेत. नगरपालिकेचे काही वरिष्ठ अधिकारी त्यांच्या ऑफिसमध्ये तासनतास तात्काळत बसलेले मी स्वतः बघितलेले आहेत. हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही. आणि एवढे सगळे झाल्यानंतर आमच्या पैशातून म्हणजे आमची महापालिका जे कर्जाचे पैसे देते ते कर्ज करोडोमध्ये जाते. त्या करोडोंच्या खर्चातून जे पाणी आम्हाला मिळाले ते पाणी आपण त्यांना देण्याचा ठराव पास केला. आपण आपल्याकडे १००० लीटरला ७/- रु. दराने पाणीपट्टी घेतो आणि आजच्या तारखेला शंतीस्टार बिल्डर केवळ त्यांच्या नळाचे कॉक उघडण्याचे, व्हॉल्व फिरवून लोकांना डिस्ट्रुब्युट करायचे १५/- रु. घेतो. हा मधला जो फरक आहे. म्हणजे आपल्याला जो वितरण व्यवस्थेचा खर्च आहे. टाक्यांमध्ये पाणी घ्यायचे. ते डिस्ट्रुब्युट करुन इथंपर्यंत आणायचे, आतापर्यंत जेवढा पैसा लावला, जेवढा निधी लावला या मिरा भाईंदर शहरामधून शांतीस्टारच्या व्यतिरिक्त जे आपली घरसंकुल किंवा इतर गावे यांचा पैसा तिकडे लागलेला आहे. त्याकरिता आपण ७/- रु. ने विकायचे आणि त्याने फक्त १५/- रु. ने व्यापार आणि धंदा करायचा. त्याठिकाणच्या लोकांमध्ये काही युनिटी नसते किंवा ती लोक कोणाला घाबरत असतील. पण ती

लोक येत नाही. पण आमच्यासारख्याच्याकडे गेल्यावर ते सांगतात की तुम्हांला ७/- रु. ने पाणी मिळते आणि त्याच महापालिकेचे पाणी आमच्याकडे १५/- रु. ने मिळते. कोणी या गोष्टीचा विचार करतो का? हा जो आपला लॉस होतोय. तो ७/-रु. ला ७/- रु., ७/-रु. ला ८ रु. आपले ७/- रु. तर त्याचे ८/-रु. म्हणजे निव्वळ ८/-रु. त्याला व्हॉल खोलण्यामागे जो प्रॉफीट होतोय. त्याचा आम्ही तर हिशोब करतोच आहोत. पण असे नुकसान आपण कधीपर्यंत सहन करायचे? म्हणजे तुम्ही सर्व व्यवस्थित माझ्या दरवाज्यापर्यंत द्यायचे. मी फक्त उघडण्याचे लोकांकडून डबल, टिबल रेट आकारायचे आणि लोकांकडून वसुली करायची. या सगळ्यांचा कुठेतरी विचार व्हायला पाहिजे. तो स्टाफ जो कुणी तुम्ही घेणार आहात. त्याची काय परिस्थिती पडलेली नाही की, एखाद्या बिल्डरला आपण डोक्यावर घ्यायचे? त्याची काही गरज नाही. तुमच्याशी जी काही ठरलेली ॲग्रीमेन्ट आहेत. त्यांनी जे काही वचननामे गर्व्हमेन्टला दिलेले आहेत. त्याच्याशी त्याने प्रातारणा केलेली आहे आणि त्याने जी काही कमीटमेन्ट तुमच्याशी त्या त्या वेळेला केली. ती त्याने निभावलेली नाही. त्याकरिता हा ठराव करताना ठराव जर तुम्ही काही वेडावाकडा केलात तर जरुर तो आम्ही विखंडनाला पाठवू. कारण एक लक्षात घ्या. आठ रुपये पर हजारी लिटर तो पैसे जास्त घेतोय. महापालिकेचे नुकसान किती होतेय? आज आम्ही विचारतो. प्रशसनाने याचा खुलासा करावा की, महानगरपालिकेच्या दररोजच्या पाण्याच्या वितरणापैकी शांतीस्टार बिल्डरकडे काही मिटर वगैरे लावले आहेत का? नसतील? त्याबाबत आम्हाला काही माहित नाही. नसतील सुध्दा मुद्दामहून काढून लावलेली असतील किंवा जी मिटर असतील ती त्याच्या हिशोबाची असतील. आज महापालिकेने कमर्शियल मिटर लावली. ३०००/- रु. ची २३,०००/- रु. व्हायला लागले. पूर्वी मिटरचे बील ३०००/- रु. यायचे. ते आता २३,०००/- रु. लावले. याच्या कोणी उहापोह केलेला आहे का? आपण प्रशासनाने प्रथम पाण्याचे जे वितरण आहे. याच्यामध्ये आपल्याला किती लॉस आहे? शांतीनगरला आपण जेव्हापासून पाणी देता तेव्हापासून किती लॉस होतोय? आणि तो लॉस कशामुळे होतो? ते काढा आणि याचा आम्हाला या मिटींगमध्ये खुलासा पाहिजे. आणि तो स्टाफ घेण्यासाठी आमची मनाई आहेच. त्याने आम्हाला ५० मजूर दिले तर आमच्याकडे तेवढ्या कुठल्याही स्टाफ पॅटर्नला मंजुरी नाही. हा प्रश्न तिकडे येवून अडकणार आहे. कोणी काहीही म्हणो. आम्हाला बाकीच्या सगळ्या वस्तु चेक करुन जर व्यवस्थित असेल तर. पण त्यांचा स्टाफ आमच्याकडे हस्तांतरीत करुन घेणे हे कदाही उचीत ठरणार नाही आणि आम्हाला मा. आयुक्तांनी आता जे कोणी प्रभारी आहेत. त्यांनी जरा खुलासा करावा की, आपल्याला किती लॉस होतोय?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, नेहमी प्रत्येक नगरसेवक बोलतात की, गोषवारा इनकम्प्लीट आहे. आता हा देखील गोषवारा इनकम्प्लीट आहे. याच्याबरोबर कर्मचाऱ्यांची यादी नाही. मग तुम्ही कसा काय हा विषय विषयपत्रिकेवर खाली असून देखील वर चर्चा करण्यासाठी घेताय? आणि प्रत्येकवेळा एवढी काळजी आहे की, गोषवारा नाही. मा. आयुक्त साहेबांचा गोषवारा इनकम्प्लीट आहे. सोबत कर्मचाऱ्यांची यादीदेखील नाही. ते कर्मचारी कोण आहेत? कसे आहेत? त्यांना कामाचा किती अनुभव आहे? याच्याबद्दल कुठेही उल्लेख नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रेजींनी प्रश्न विचारला होता की, शांतीनगरला शासनाच्या धोरणामुळे ठरलेल्या धोरणानुसार बल्क सप्लाय ५ एम.एल.डी पाणी सरासरी एवढे देतो. याचे मीटर लावलेले आहे आणि एम.आय.डी.सी दर हा ७/- रु. आहे आणि आपल्या स्टीमचा दर साडे चार रुपये आहे. तो जो फरक आहे, आजच्या घडीला तो बिल्डर आपण ५ एम.एल.डी. चे ७/- रु. दराने पैसे घेतो. परंतु, यानंतर हस्तांतरण झाल्यानंतर मिरा भाईंदर शहरातील नागरीकांना ७/- रु. प्रती हजारी दर आहे. तोच दर शांतीनगरमधील रहीवाशांना लागेल. ही वस्तुस्थिती खरी आहे की, बिल्डर ७/- रु. न घेता १४/- रु. किंवा १५/- रु. नागरीकांकडून घेतो.

**लिओ कोलासो :-**

जो फरक आहे तो फरक आपण बिल्डरकडून वसुल करणार का?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, कोणता फरक?

**लिओ कोलासो :-**

जो ७/- रु., १५/- रु. चा फरक आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

७/- रु. हा एम.आय.डी.सी. चा रेट आहे.

**लिओ कोलासो :-**

आपल्याला साडेचारच्या दराने पाणी मिळते.

**शिवाजी बारकुंड :-**

शांतीस्टार बिल्डर तेथील नागरीकांकडून १४ ते १५ रु. दराने पाण्याचे पैसे घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्याला परवानगी कशाला दिली? दोन वर्ष त्यांनी आणखी घेउन पाणी विकण्याची तुम्ही परमिशन दिलेली आहे का? तुम्ही त्यांना जास्त दराने पाणी विकण्याची परमिशन दिलेली आहे का?

ज्यादिवशी तुमचा पाणी दर ७/- रु. ने मिळाले. त्यादिवशी त्याने अॅज इटीज विकले पाहिजे. पण तो पाणी १५/- ने विकतो. त्यासाठी तुम्ही त्याला परमिशन दिलेली आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

ज्या दिवशी आपण ही स्कीम ताब्यात घेवून मा. महासभेपुढे ठेवू.

**मिलन म्हात्रे :-**

ताब्यात घेवू नाही. त्याला तुम्ही पाणी दिलेले आहे. मी त्या तारखेपासूनचे बोलतो. ज्या तारखेला तुम्ही ७/- रु. दराने पाणी दिले. त्याच वेळेला त्याने समोर ७/- रु. दराने पाणी द्यायला पाहिजे.

**चंद्रकांत मोदी :-**

ज्यादा रेट लेते थे, इसलिए ठराव पास किया है। अभी लोगो को, जनता को फायदा होगा के नही?

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एकतर ह्या विषयात काही कारण नसताना उगाच क्रम बदलून आपली सभा ७.०० वाजेपर्यंत चालणार आहे. कारण आज क्रम बदलण्यात काय रुची होती. त्याबद्दलचा क्रम बदलण्याचा आम्हाला समजलेला नाही. शांतीस्टार बिल्डरची योजना ज्या क्षणी घेता येईल त्याक्षणी घेणे गरजेचे आहे. शांतीस्टारच्या लोकांना, त्या हद्दीत राहणाऱ्या लोकांना न्याय देणे गरजेचे आहे. पण त्याबाबतीत जो खुलासा व्हायला पाहिजे होता, प्रशासनाने तो खुलासा न करता काही सदस्यांना उगाच घाई वाटते की, सभा आता संपणार आहे. सभागृहात चार माणसे जरी असली तरी आज काम पूर्ण होणार आहे. तुम्ही चिंता करु नका. जे करायचे ते चांगले करुया. पण ज्या तांत्रिक बाबी आहेत. जसा कर्मचाऱ्यांचा विषय आला, रेटचा विषय आला. जेव्हा आपल्याला नक्की माहिती आहे की, या योजना आपण ताब्यात घेतो. ज्यादिवशी आपण या योजना ताब्यात घेवू. त्यादिवशी आपले बिलींग होईल. कारण आपल्या महापालिकेत एक सारखेच बिल बनवावे लागेल. हे बरोबर आहे ना. असे टिपणीत लिहलेले असते तर कोणी कशाला विचारले असते. त्यांनी तसे लिहायला पाहिजे होते की, आपण त्यांना ७/- रु. दराने चार्ज करणार. त्यावेळी काही पैसा घाटा येईल. तो घाटा महापालिका स्विकारेल कारण की, जनतेच्या हितासाठी जनतेला पाणी समप्रमाणात मिळाले म्हणून. तर आमचे काही त्यामध्ये प्रश्न आहेत की, आपल्याला बिल्डरने जी काही आश्वासने दिलेली होती. त्यातील कोणकोणत्या गोष्टींची पूर्तता बिल्डरने केली? आपण जेव्हा बिल्डरला नविन कनेक्शन देतो. आपल्याला त्या नविन कनेक्शनचे इन्कम मिळते. रु. २८,०००/-, रु. ३०,०००/- एका इंचाच्या कनेक्शनला आपल्याला मिळतात. त्याल ती सगळी कनेक्शन देवून झालेली आहेत का? की, कनेक्शन द्यायची बाकी आहेत? कनेक्शन द्यायचे अजुन बाकी असेल तर ती एक महानगरपालिकेच्या उत्पन्नाची बाजु आहे. नसतील तर ती बाजु संपलेली आहे. या बाबतीचा उल्लेख टिपणीत व्हायला पाहिजे होता. त्या नागरिकांना न्याय मिळवुन देण्यांत काही चुक नाही. प्रशासनाला जो कर्मचाऱ्यांचा विषय आहे तो सोपा आहे असे वाटते का? आता ज्या ठिकाणी मा. आयुक्त साहेब बसलेले आहे ते मुख्य आहेत. म्हणजे मा. आयुक्त साहेबांनी पाठवले तरी चार वेळा नाही सांगणारे मा. आयुक्त बसलेले आहेत तुम्ही निवेदन करा की ती माणसे जशी आहेत तशी कोणतेही कॉलीफिकेशन नाही? किती वर्षे सर्व्हिस झाली? त्या बाबतचा कामाचा अनुभव नाही त्याचे नाव गांव नाही अशी माणसे तुम्ही आपल्या या सगळ्या व्यवस्थेत जशी आहेत. तशी घेणार की काही दुरुस्ती करुन घेणार आहात? काही दुरुस्ती करणार असाल तर ती सांगा आम्ही कशासाठी विरोध करु? एखाद्या गरजु माणसांला नोकरी मिळत असेल त्याला आम्ही विरोध करणार नाही पण संशयासाठी जागा निर्माण करायची? तुम्हाला असे वाटत असेल की ही शेवटची सभा असल्याने ही योजना घ्यायला पाहिजे हा प्रशासनाचा भाग आहे. कर्मचाऱ्यासाठी तुम्ही आम्हाला वेठीस धरु नका. तुम्ही तांत्रिक त्रुटी देवुन या सभागृहाने मान्यता दिलेली आहे. असा कुठेही तांत्रिक त्रुटी देवुन या सभागृहाने मान्यता दिलेली आहे. असा कूठेही शब्द येता कामा नये प्रशासनाची तुमची भावना क्लिअर पाहिजे आमची भावना सरळ आहे ह्यातला सभागृहामधील कोणताही व्यक्ती कोणताही सन्मा. सदस्य असे कधीही बोलणार नाही की, शांतीनगर मध्ये राहणाऱ्या त्या स्किम वर अवलंबुन असलेल्या नागरिकांनी अनेक वर्षे अन्याय सहन केला आहे. त्या बिल्डरने रुपये १४ हजार रुपये ते असे जे पैसे घेतलेले आहेत पण इतकी मोठी महानगरपालिका आपली आहे. ३५० कोटीचे आपले बजेट आहे या लोकाना न्याय द्यायला पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. म्हणुन आम्ही या ठरावाचे समर्थन करतो पण जे कर्मचारी आहेत. त्याचा निट खुलासा होणे गरजेचे आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, शांतीस्टार बिल्डरचा पाणी पुरवठा योजना जो हस्तांतरणांचा विषय आलेला आहे. त्या विषयाला सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. त्याच्यानंतर आता जे पुढचे रामायण चालु आहे. याच्यामध्ये आपण निर्णय घ्या. मा. महापौर मॅडम, ज्यावेळेस शांतीस्टार बिल्डरने त्या ठिकाणी बिल्डींग बनविल्या त्यावेळी महानगरपालिकेनेच त्यांना परमिशन दिलेली आहे. त्याच्यानंतर त्या शांतीस्टार बिल्डरने कशाप्रकारचे त्यांना जिझियाकर लावला? किंवा काय त्रास दिला? तिथल्या नागरिकांना किंवा मिरा भाईंदर शहरामध्ये जे बाहेरचे नागरिक त्या ठिकाणी आलेले आहेत. आता त्याठिकाणी जे बाहेरचे नागरिक त्याठिकाणी आलेले आहेत. ते मिरा भाईंदर शहरामध्ये आलेले आहेत. त्यांची सगळी सुविधा आपली मिरा भाईंदर महानगरपालिका त्यांना देत

आहे. पाच वर्ष तुम्ही झोपला असाल. पण आम्ही बिलकुल झोपलेलो नाहीत. त्याठिकाणी प्रत्येक शहरामध्ये जे इतर नागरीकांना जशी सोय मिळते जसा न्याय मिळतो तोच न्याय व सोय त्याठिकाणी राहणाऱ्या नागरीकांना मिळते.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्याकडे आम्ही प्रत्येक कनेक्शन ३०,०००/- रु. भरले. त्याप्रत्येक कनेक्शनचे पैसे घ्या आणि मग कनेक्शन द्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, या शहरामध्ये एकाला एक न्याय आणि दुसऱ्या नागरीकाला दुसरा न्याय.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ज्या वॉर्डमधून उभे आहात. त्याठिकाणच्या लोकांनीही कनेक्शनसाठी ३५,०००/- रु. भरलेले आहेत. शांतीनगरच्या प्रत्येक बिल्डींगच्या कनेक्शनला पैसे भरलेले नाहीत.

**दिनेश नलावडे :-**

हा विषय मंजुर झालेला आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक छोटी सुचना होती की, कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये मला सांगणे ही आहे की, महापालिकेने ऑलरेडी पाणीपुरवठा, आस्थापना आहे. महापालिकेकडे जे पाणीपुरवठासाठी जे कर्मचारी आहेत. त्यांच्या जागी हे कर्मचारी घेण्यात येउ नये.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, फक्त सन्मा. सदस्य लिओ कोलासो अपूऱ्या कर्मचाऱ्यांबद्दल त्यांचे ऑब्जेक्शन आहे. त्यासाठी आपल्याला आपल्या महापालिकेच्या नियमामध्ये जे काही असेल त्यापध्दतीने करुन हा विषय मंजुर करुन टाका.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याकडे जेव्हा शांतीस्टार बिल्डरची लाईन हस्तांतरीत करणार आहेत. तर त्यांच्या लाईनवर किती लोक काम करत आहेत? त्यांच्या लाईनवर १७ वर्षे लोक कामे करतात. मग ती लोक कुठे जातील? १७ वर्षांचे त्यांचे आयुष्य खराब होणार की नाही. त्यांच्या आयुष्याचा विचार का करत नाही? जेव्हा लाईन आपण हस्तांतरीत करुन घेतो. त्याच्याबद्दल जनतेला पाणी सुध्दा कमी दरांत मिळणार आहे. १४/- रु. वरुन ७/- रु. ने पाणी मिळणार आहे. याचासुध्दा आपण विचार करायला पाहिजे. त्यामुळे हा ठराव परत आलेला आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, शांतीनगरची सदरची जी वितरण व्यवस्था आहे. ती व्यवस्था महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे. त्याबद्दल तीन मुद्दे उपस्थित झाले. कर्मचाऱ्यांचे शांतीस्टार बिल्डरने ज्या ज्या बिल्डीगीला कनेक्शन लावले. त्या त्या कनेक्शनच्या डिपॉझीटचा मुद्दा सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी उचलला. तो मुद्दा आणि तिसरा मुद्दा म्हणजे ती हस्तांतरीत केल्यानंतर त्याला ७/- रु. च्या रेटने पाणी तर आपण पूर्वीपासून देत आहोत. बिल्डरने त्यांना ते पाणी १५/- रु. ने विकले. तर आज मिरारोडचे कॉंग्रेस पक्षाचे कुठल्याही नगरसेवकाची अशी बाजू नाही की, त्या शांतीस्टर बिल्डरवर कार्यवाही करु नका. शांतीस्टार बिल्डरकडून ते डिपॉझीटचे पैसे वसुल होउ शकले तर ते वसुल करा. त्यावर आमचे काही ऑब्जेक्शन नाही. त्या कर्मचाऱ्यांबद्दल सभागृहाला वाटत असेल की, त्यांनी १७ वर्षे कामे केली आहेत. परंतु सभागृहाला असे वाटत असेल की, शांतीस्टार बिल्डरची लोक आहेत. म्हणून आम्हाला घ्यायची नाही. त्याच्याबद्दलचे आमचे काही ऑब्जेक्शन नाही आणि तिसरा मुद्दा त्याने ७/- रू. आयोजिताने १५/- रू. शांतीस्टार बिल्डरने वसुल केलेले आहेत. बाकीचे ८/-रू. महानगरपालिकेने त्याच्याकडून वसुल केले आहेत. त्याबद्दलही आमचे काही ऑब्जेक्शन नाही. फक्त हस्तांतरणाची ती स्कीम मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याचा उद्देश ऐवढाच होतो. फक्त कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकाचे की त्याने १५/- रू. लिटरने पाणी विकतो तो त्याचा धंदा बंद करायचा आणि ती स्कीम आपल्या ताब्यात घेवून इतर लोकांना ज्याप्रमाणे ७/- रू. दराने पाणी देतो त्याप्रमाणे त्यांनाही ७/- रू. दराने पाणी द्यायचे.

**रोहिदास पाटील :-**

कॉंग्रेस पक्षाने त्यांचे धोरण मांडलेले आहे ना. मग प्रशासनाने त्यावर खुलासा करावा. पक्षाच्या प्रवक्त्या म्हणून त्या बोललेल्या आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, जेसल पार्क, सृष्टी आणि शांती नगरच्या एस.टी.पी. ही आपण ताब्यात घेतली तेव्हा त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे कोणी लक्ष दिले नाही. एस.टी.पीच्या कर्मचाऱ्यांबाबत कोणी नाही बोलत. १०० पैकी डी.पी. रोड आणि शांती नगरमध्ये आता दोन स्कीम आहेत. त्याच्यात दोन रोड येतात. ते हॅंडओव्हर करण्याबाबत कोणताही नगरसेवक बोलत नाही. तसेच पब्लीक लायब्ररी आहे. पब्लीक डिस्पेंसरी आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेला विभागीय कार्यालय बांधून महानगरपालिकेच्या ताब्यात विनामुल्य द्यायचे आहे. त्याच्याबद्दल कोणी नगरसेवक बोलत नाही. यागोष्टीवर देखील प्रशासनाने खुलासा करावा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर मे २० साल पहिले सिर्फ शांतीनगरमध्ये पीने का पानी था, बाकी कही भी नही था। भाईंदर के लोग भी पीने का पानी लेने को शांती नगरमे आते थे। मतलब यह स्कीम था तब अच्छा था। अभी महानगरपालिकेने यह स्किम हँड ओव्हर किया है।

(सभागृहात गोंधळ.)

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो जे तीन मुद्दे उपस्थित झाले. त्याची मी पार्श्वभुमी सांगतो, शांतीनगरमध्ये राज्यशासन, शांतीस्टार यांच्यात कररानामा झालेला होता. तीथे ई.एस.आर. बांधायचा होता. ई.एस.आर. च्या टाकीचे काम त्यांनी केलेले नव्हते त्यांनी बांधून पूर्ण झाल्यानंतर एम.जी.पी.ने त्याचा टेस सर्टीफिकेट द्यायचा आणि नंतर महानगरपालिकेने हस्तांतरीत करून घ्यायचे. असे झाले होते. ई.एस.आर. कंम्प्लीट झाला. एम.जी.पी च्या अधिकाऱ्यांनी आपल्याला सर्टीफिकेट दिले आणि वारंवार तेथील नागरिकांची नगरसेवकांची आणि सर्वांची मागणी होती आणि आपण ताब्यात घेतल्यानंतर त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांप्रमाणेच दर हजारी ७/- रू. हा दर लावला त्या दिवसापासून आणि ह्याच्या अगोदर शांतीस्टार बिल्डर आपल्याला ७/- रू. दराने देत होता. आपण त्यांना ५ एम.एल.डी. पाणी देत होतो. त्याचे पैसे तो देत होता. परंतु, आता आपल्या ताब्यात घेतल्यानंतर इतर शहरातील नागरिकाप्रमाणेच त्यांना ७/- रू. प्रती हजारी लिटर लावणार नविन नळ जोडणी होणार तीच नळ जोडणी महापालिका देणार त्याचे डिपॉझिट महापालिकेकडेच जमा होणार कर्मशियल कनेक्शन असतील तेही महापालिकेकडे जमा होणार हा मुद्दा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हाला गॅप विचारला.

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही गॅप बद्दल बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दिड वर्ष ७/- रू. दराने पाणी दिले आणि त्या बिल्डरने १५/- रू. दराने पाणी विकले. तर जो दिड वर्षाचा गॅप आहे त्या गॅपमध्ये त्याने किती एम.एल.डी. वर त्याने किती दलाली खाल्ली?

**लिओ कोलासो :-**

त्याच्यात दलालीचा प्रश्न नाही. मा. महापौर साहेबा ह्यामध्ये दलालीचा प्रश्न नाही. जो गॅप आहे तो कॉर्पोरेशनची दिशाभुल करण्यासाठी आणि कॉर्पोरेशनची फसगत करून त्याने पैसे वसुल केलेले आहेत. त्यामुळे हे पैसे कॉर्पोरेशन वसुल करणार आहे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा आम्हाला खुलासा पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

आज पर्यंत त्याला किती एम.एल.डी. पाणी दिले? त्या हिशोबाप्रमाणे त्याच्याकडून किती पैसे येणे आहे? ते खात्याच्या अधिकाऱ्याने आम्हाला सांगावे?

**मा. महापौर सो. :-**

सदस्यांनी बोलताना असे शब्द वापरू नये चांगले शब्द वापरावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, शब्द चांगलेच वापरलेले आहेत वाईट वापरलेले नाही.

(सभागृहात गोंधळ.)

**मिलन म्हात्रे :-**

ही लोक या प्रशासनाची धुळफेक करतात. तेव्हा हा शब्द येतो. आम्ही महिना महिना असा कोणताही शब्द बोललो नाही. परंतु, ह्या वर्षाच्या गॅपमध्ये आलेल्या बिलाबाबत अधिकारी सांगत नाही. ते नगरसेवकांनी सांगावे. आमच्यामुळे प्रशासनाचे एवढे नुकसान होणार आहे. मागच्या वेळेलाही अशाप्रकारचा ठराव आणला. त्यावेळेला ८०/- लाख रूपयाचे एका वर्षाचे महापालिकेला नुकसान झाले. या नुकसानाला जबाबदार कोण आहे?

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, मिरा रोडला महापालिकेचे पाणी देण्यास सुरूवात जो मधला राहीलेला दोन वर्षाचा गॅप आहे. या दोन वर्षाच्या गॅपमध्ये शांतीस्टार बिल्डरने ज्या रेटने आपण पाणी देतो त्यापेक्षा डबल रेटने पैसे वसुल केलेले आहे. हा जो गॅपचा फरक आहे. तशी त्याच्याकडून वसुली करावी आणि महापालिकेचे जे आर्थिक नुकसान होत आहे ते टाळावे. त्याचबरोबर त्याने या दोन वर्षाच्या गॅपमध्ये जेवढ्या बिल्डिंगला नळ कनेक्शन दिलेले आहेत. त्यांचे डिपॉझिट सुद्धा महापालिकेकडे जमा करावे. अशी मी सुचना मांडतो.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील तुम्ही असे कशाला सांगता? त्यांनी एक कनेक्शन दिलेले नाही तर त्यांनी दोन तीन वर्षात ती केली का?

**रतन पाटील :-**

साहेब, दोन वर्षाच्या गॅपमध्ये कनेक्शन लागली गेलेली आहेत ना.

(सभागृहात गोधळ.)

**रतन पाटील :-**

शांती स्टार बिल्डर जी पाण्याची टाकी बनवत आहे त्यासाठी महापालिका खर्च करते. त्यासाठी त्याने स्वतः खर्च करावा. महापालिकेने का खर्च करावा? त्याची क्षमता आहे तर त्याने स्वतःच्या खर्चाने पाण्याची टाकी बांधून महापालिकेकडे हँडओव्हर करावी.

(सभागृहात गोधळ.)

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

शांतीस्टार बिल्डरला ज्यावेळी महापालिकेकडून जे दोन वर्ष पाणी देण्यात आले होते.....

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील जी तुम्ही मा. आयुक्त साहेबांचे ऐकून घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

शांती स्टार बिल्डरला महापालिकेकडून दोन वर्षे पाणी देण्यात आले होते. जे रेट देण्यात आले होते. त्यात महापालिकेने काही अटी घातल्या होत्या का? की शांतीस्टार बिल्डरने नागरिकांना पाणी देताना या दराने पाणी विकावे.

**लिओ कोलासो :-**

साहेब, आम्ही यावर आक्षेप घेउ. ज्या बिल्डरला महापालिकेने तेथील वस्तुस्थिती सांगीतली असेल.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तो तेथील नागरिकांवर जो भुर्दंड बसतो. तो आपल्याला कमी करायचा आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, मा. उप आयुक्त साहेब जे समर्थन करतात ते बरोबर नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

हा समर्थनाचा मुद्दा नाही.

**लिओ कोलासो :-**

जिथे महापालिकेने पाणी दिले गेले तेथील बिल्डरने त्याठिकाणी राहणाऱ्या नागरिकांबरोबर असा दूर व्यवहार करणे बरोबर नाही. तो किती मोठा बिल्डर आहे? त्याने काहीतरी नितीमत्ता पाळायला पाहिजे होत्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तुम्ही मुद्दा समजून घेत नाही.

**लिओ कोलासो :-**

आपण त्याला ७/- रू. दराने पाणी देतो आणि तो नागरिकांना १५/- रू. दराने पाणी विकतो हा फरक तुमच्या लक्षांत कसे येत नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

मग हि बाब तुमच्या आज लक्षांत आली का?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मी पहिल्यांदाच माझ्या भाषणामध्ये याबाबत बोललो होतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तेथील नागरिक गेल्या दोन वर्षापासुन त्याच रेटने पाणी घेत आहेत. ही वस्तुस्थिती आहे.

**रतन पाटील :-**

आम्हाला असे विचारायचे आहे की, त्यावेळेला आपले प्रशासन काय करत होते?

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त सो. तुम्ही दोन वर्षे कुठून काढली?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकांनी बोलावे प्रशासनास त्यांची बाजू मांडू दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी याठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. की तो डिफरन्स अमाउन्ट वसुल करण्याचा वस्तुस्थिती आहे की ज्या वर्षी त्या शांतीस्टार बिल्डरला आपण पाणी दिलेले आहे आणि त्याने त्याचा इस्टॅब्लिश खर्च लावून ते जास्तीचे पैसे केलेले आहे. आणि तो भुर्दंड त्या नागरिकांवर पडत आहे. म्हणून हा प्रस्ताव आपण सविस्तर रित्या घेतलेला आहे. जसे आपल्याकडे आपण एस.टी.पी. घेतलेले आहे त्याच पद्धतीने हे घेण्याचा हा प्रस्ताव होता. याठिकाणी डीफरन्स अमाउन्ट वसुल करण्याचा जो मुद्दा येतो.

त्याची नैतीकता आपल्याला पोहोचविण्यासाठी आपल्याला काही ॲग्रीमेंट तरी त्यांच्याशी करावे लागेल. तेच मी त्यांना विचारत होतो की ते आपल्याला पोहचेल का? म्हणजे असु नये की त्याने जमा केलेली रक्कम आपल्याला वसुल करण्यासाठी आपल्याकडे काही हक्क पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

शांतीस्टारच्या संदर्भामध्ये आपली महापालिका आपली नगरपालिका नेहमीच सहह्रदय राहिलेली आहे. वाजवी पेक्षा जास्त सहकार्य त्या टाउनशिपला आपल्या महापालिकेने केलेले आहे. जर त्या स्किमचा आपण अभ्यास केला आणि त्या स्किममधील सर्व ॲग्रीमेंट आणि सर्व कंडीशन्स जर तपासुन बघीतल्या तर त्याने आपल्या सगळ्या कंडीशन्स ना हरताळ फासलेला आहे. त्याने महापालिकेचा कुठेही आणि कुठल्याही पद्धतीचा मान ठेवलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. जर मी सांगायचे म्हटले तर माझे आणि आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य या ठिकाणी उपस्थित नाहीत. नाहीतर मी ठराव मांडला असता की, या संपुर्ण स्किमचा हायकोर्टच्या रिटायर्ड जज मार्फत तपास करण्यात यावा आणि त्याबाबतच्या सगळी माहिती सभागृहाला सांगण्यात यावी एवढी ही जी गोष्ट आहे म्हणून आम्ही म्हणतो की, काही वेळेला व्यवहारीक न्यायामुळे एखाद्या बिल्डर कडून, एखाद्या माणसाकडून काही झाले असेल. होत असेल. पण त्याने निश्चितपणे सुधारायला पाहिजे आणि या शहराचा या महापालिकेचा मान ठेवण्याचा त्याने प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे. तसा प्रयत्न होत नाही. म्हणून हे सगळे भांडण चालले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मी पहिल्यांदाच बोललो होतो की, ही महापालिका चालविण्यासाठी जे चिफ ऑफिसर आहेत. ते त्या शांतीस्टार बिल्डरच्या ऑफिसमध्ये ताटकळत बसलेले मी बघितलेले आहेत. असे कोण आहेत की, चिफ आफीसर त्याच्या फेवरमध्ये ॲग्रीमेंन्ट बनवणार नाहीत? सर तर बोललो आम्ही तर प्रत्यक्ष आरोप करतो. आतापर्यंत चे जे काही तत्कालिन चिफ ऑफिसर आहेत त्यांच्या पापाची जी कर्म समोर आलेली आहेत. आणि त्याच्याबरोबर त्यांना ही रिकव्हरी लागावी. ऑडीट, वसुलीमध्ये हा विषय आलेला असणार आणि नसेल तर तो विषय आम्ही माहितीच्या अधिकारात मागवू आणि हा जो ठराव आज तुम्ही पास केला तर त्याचे आम्ही तीन तेरा वाजवू हे लक्षात ठेवा. गेल्यावर्षी त्यासाठी तुम्ही ८० लाख रूपयांचे नुकसान केले आहे.

**दिनेश नलावडे :-**

मिरा भाईंदर शहराचे तीन तेरा वाजवणार आहेत. ज्यांनी आतापर्यंत पाच वर्षात सगळ्यांचे तीन तेरा वाजविलेले आहे.

(सभागृहात गोंधळ.)

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो साहेब जे बोलले की शांतीस्टार बिल्डरने या शहराचे भरपूर नुकसान केलेले आहे. मा. महापौर मॅडम, यामध्ये प्रशासन कुठे कमी पडलेले आहे का? की त्या शांतीस्टार बिल्डरचे ॲग्रीमेंट प्रमाणे पूर्ण घेण्यामध्ये .....

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, हा नागरिकांचा दोष नाही.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही नागरिकांच्या विरोधात नाही. तर शांतीस्टार बिल्डरच्या विरोधात आहोत.

**दिनेश नलावडे :-**

या शांतीस्टार बिल्डरच्या विरोधात महापालिकेने काहीतरी कायदेशीर कार्यवाही जरूर करावी माझे एवढेच सांगणे आहे.

(सभागृहात गोंधळ.)

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो साहेब, जे काही बोलले त्याच्याशी मी सहमत आहे. आपण एक योग्य ठराव करून हायकोर्टच्या रिटायर्ड जज च्या मार्फत आख्खी विकसित हाउसीत स्किम याची पूर्ण चौकशी करावी असा एक ठराव मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या पाणी पूरवठ्याच्या पाईपला जे ७-८ लोक नोकरी पासून वंचीत होते. त्यांना नोकरी लागण्यासाठी चार वर्षे गेली मी पहिल्यांदा हाउसला नगरसेवक होतो. तेव्हा पासुन ते प्रस्ताव येत होते. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील नगराध्यक्ष होते आणि आता ह्या तीन महिन्यापुर्वी तो ठराव पास झाला. म्हणजे तुमच्या न्यु स्किम तर्फे ज्यांनी जागा दिल्या शहराकरिता येणारी पाईप लाईन त्यांच्या जागेतून गेली त्या लोकांना सहा सहा वर्ष येथे वाट बघावी लागली. यांच्या एका घरामध्ये ही लोक उद्याच्या उद्या मर्ज होणार. मागतील तो पगार जर तो १५०००/- रू. देत असतील तर ती लोक तुमच्या या ठरावामुळे लेबर कोर्टमध्ये जाणार. तुमचा तो एक मेंबर आहे. त्याने २० वर्ष महापालिकेची सेवा करूनही त्याने ८ हजार रूपये पगार घेणार आणि आता जो कालच्या ठरावामुळे आलेल्या माणसाला तुम्हाला १५ हजार रूपये पगार द्यावा लागणार.

कारण त्याचा पेस्केल तोच म्हणून आम्हाला ही नोकर भरती नको. आपल्या इकडची भरपूर तज्ञ लोक तुम्ही भरलेली आहेत. पूढच्या ठरावामध्ये सगळी लिस्ट येत आहे. साहेब, आपला ५० टक्के वर पगाराचा खर्च चाललेला आहे. हे खायचे काम नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा चांगला विषय सभागृहासमोर आणलेला आहे. पण राष्ट्रवादी कॉंग्रेसवाल्यांना वाटते की, हे सगळेच आम्हीच आणलेले आहे. त्यांना कसे क्रेडीट घ्यायचे असेल ते घेउ द्या नागरिकांच्या दृष्टीने जी योग्य गाष्ट आहे ती होउ द्या. योग्य वेळी कायदेशीर बाबी होणे आहे. ती होउ द्या. वस्तुस्थिती तुम्हाला नाकारता येणार नाही. कधीतरी सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैतीजी बोलतात ते असे झाले दिल्याशिवाय जे काही समजत नसेल तरी ते आणखीन बोलण्याचा प्रयत्न करतात. हा विषय भावनात्मक नाही. शांतीस्टार बिल्डरच्या कामकाजाबद्दल संपूर्ण भाईंदर आग्रही होते की, या बिल्डरचे काम बरोबर नाही. जोपर्यंत न्याय देत नाही. जिकडच्या नागरीकांनी अनेकवेळा मोर्चे काढले. मोर्चे काढल्यानंतर नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांनी ज्यांनी नगरपरिषदेतील नगरसेवकांनी सहानुभुमितीची भुमिका घेतली. पहिल्यांदा ज्यावेळी भाईंदरला पाणी मिळत नव्हते. त्यावेळेला शांतीस्टारमध्ये राहणाऱ्या लोकांना पिण्यास पाणी मिळत होते. आणि जेव्हा भाईंदरमध्ये पाणी आले. त्यावेळेला भाईंदरच्या लोकांनी शांतीस्टार येथे राहणाऱ्या लोकांना विश्वासाने, प्रेमाने पाणी दिले. त्या उद्‌घाटनचा मी साक्षीदार आहे. मा. आयुक्त साहेब म्हणतात, दोन वर्ष, त्यांनी दोन वर्ष कुठून आणली समजत नाही. प्रशासनाने सांगायला पाहिजे की, कोणत्या दिवशी आपण त्यांना पाणी दिले. ज्या दिवसापासून आपण आपल्या महापालिकेच्या परिषदेचे किती क्वॉंटीटी पाणी देतो? त्याच्यानंतर झालेले अग्रीमेन्ट, ॲग्रीमेन्टमध्ये शांतीस्टार बिल्डरची कोणतीही बाजू घेण्याची भारतीय जनता पार्टीची कोणतीही मनस्थिती नाही. त्याने कुठेही मनमानी केलेली नाही. त्योन अनेक अतिक्रमणे केलेली आहेत. अनेकवेळा प्रशासनाला आम्ही सांगतोय. मा. आयुक्त साहेबांना किंवा त्यावेळच्या चिफ ऑफिसरना, त्यावेळचे नगराध्यक्ष त्याने कधीही जुमानलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे. आता गुरुजी बोलले की त्याचे दुर्देव आहे की, राष्ट्रवादी पार्टीचे कोणीही नगरसेवक उपस्थित नाही. त्यात दुर्देवाचे काय ते सोडून द्या. पण हे खरे आहे की, तुमचे काही चालले नाही. याचे त्यावेळी चालले नाही. आणि या पाच वर्षामध्ये ह्यांचेही काही चालले नाही. पण शेवटच्या दिवशी चांगल्या होते. म्हणून आम्हाला त्याचा आनंद आहे की, शांतीनगर येथे राहणाऱ्या नागरकांना न्याय मिळाला पाहिजे. नियमानुसार जे करणे आहे प्रशासन त्याबाबत काय भुमिका घेते? हे आमच्या लक्षात येत नाही. प्रशासनाच्या भुमिकेबाबत आम्हाला संशय घ्यायचा असेही नाही. पण ठराव आणतेवेळी, ठराव काल तर नाही आला. ज्यादिवशी तुम्ही प्रोसेडिंग दिल्या. माझे म्हणणे त्या दिवसापासून आहे. त्या दिवसापासूनची जी माहिती घ्यायला पाहिजे होती. ती माहिती तुम्ही घेतली नाही. आम्ही कर्मचाऱ्यांबाबत तुम्हाला विचारतो. नियमात आहे की, नियमबाह्य आहे? हे तुम्ही सांगत नाही. त्यामुळे आम्हाला असे वाटते की, हा विषय चांगला आहे. त्यांना ७/- रु. दराने पाणी मिळेल हे नक्की आहे. तुम्हाला एवढेच करावे लागेल. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो साहेबांनी सांगितले की, आधी किती दिले ते वसुल करा. त्यांनी प्रश्न केला होता की, त्या बिल्डरने तसे ॲग्रीमेन्ट केलेले आहे का? ते तपासून घ्या. पण तसे न घेता आपण काहीतरी करतोय असे नलावडे आणि कंपनीला वाटते. पण लोक मुंबई तेवढी भोळी नाही. सगळी चांगल लोक आहेत. त्यांनी तुमचे सगळे पाणी चाखलेल आहेत. त्यामुळे आमची एवढीच विनंती आहे की, या सगळ्या विषयाचा उहापोह वगळा न करता नियमानुसार जे आहे. शांतीस्टार बिल्डरच्या हितासाठी नाही. नगारीकांच्या हिताचे जे आहे ते आपण करायचे आणि सभागृह नेत्यांनाही काय घाई झालेली आहे? ते माहित नाही. कर्मचाऱ्यांचा विषय येतो तेव्हा एक मागे, एक पुढे ह्यालाही विरोध करणार आणि त्यालाही विरोध करणार तुम्हाला विरोध करायला तुम्ही करा पण घाईघाईत एकदम गुंडाळून घेतले. आजच्या सभागृहात आम्ही परिस्थिती होवू देणार नाही.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, शांतीस्टारची पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करण्यासंबंधी जनतेच्या हिताच्या संबंधित हा प्रश्न आहे. म्हणजे पाण्याची लाईन त्यांनी आपल्याकडे हस्तांतरीत करायची की नाही? यापेक्षा शांतीस्टार बिल्डरवर आमचा असलेला राग जास्त व्यक्त होत असताना दिसत आहे. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो साहेब मी जे बोलतो ते बरोबर आहे. त्याने चुकीच्या गोष्टी केलेल्या आहेत. त्याने अतिशय चुकीच्या गोष्टी केलेल्या आहेत. आपण मगाशी दुर्देवाने बोललात की, इकडे आमच्या राष्ट्रवादी पार्टीचे नगरसेवक जवळ जवळ नाहिच आहेत. कमी आहेत. असे म्हणणेही चुकीचे आहे. चारच आहेत. नाहीतर आपण एक ठराव मांडणार होते. परंतु, सांगण्यापुरते दुर्देवाने खरे सांगितल्यावर आपण वाईट वाटून घेउ नका. शांती स्टार बिल्डर बरोबर पिंगा घालणाऱ्या लोकांमध्ये आपल्याच राष्ट्रवादीचे नेते होते. आपण विसरलात पण आम्हाला सगळे माहित आहे. पाण्याचा प्रश्न आहे. ती योजना आपल्याकडे ताब्यात यायला पाहिजे. तेथील नागरिकांना न्याय मिळाला पाहिजे. याबाबत कोणाचेही दुमत नाही. त्या ठिकाणी असलेले कर्मचारी श्री. बारकुंड साहेब मी तुम्हाला विचारतोय, की त्या ठिकाणी या योजनेवर किती कर्मचारी कामे करित आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, ही पुर्ण शांती नगरची स्किम पूर्वी जी ठाण्यापासुन येत होती?

**जयंत पाटील :-**

त्या स्किमवर किती लोक कार्यरत आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

एकूण ४५ लोक त्या स्किमवर काम करित आहेत.

**जयंत पाटील :-**

आता किती लोक काम करित आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

२,३, क्लार्क, ६ पंप ऑपरेटर, ४ प्लंबर, ६ व्हॉलमेन, बाकी २४ आहेत. ते मजूर म्हणून काम करतात. पूर्वी ही त्यांची ठाण्यापासूनची स्किम होती. श्री. म्हात्रे साहेबांना त्याची पूर्ण कल्पना आहे.

**जयंत पाटील :-**

ठाण्यापासूनचे जे कर्मचारी भाईंदर पर्यंत आहेत. त्यांची आपल्याला गरज आहे का? श्री. बारकुंड साहेब मला त्याचे उत्तर द्या.

**रोहिदास पाटील :-**

त्यांच्या कंपनीचेही परमनंट लोक असतील? त्यांनी इतकी वर्षे नोकरी केलेली ......

**जयंत पाटील :-**

मला सांगा, अत्यावश्यक असणारी अशी किती लोक लागणार आहेत? आपल्याला त्यांची आवश्यकता आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आवश्यकता म्हणजे आज सुद्धा पाणी पूरवठा विभागामध्ये कर्मचारी कमी आहेत? म्हणून त्यांची आवश्यकता आहे.

**जयंत पाटील :-**

पुर्वेला पाणीच कमी येते. तर कर्मचारी काय घेवून बसतात.

**रोहिदास पाटील :-**

मुख्यालय आयुक्त ऐकणार असेल. मा. स्थायी समितीमध्ये आम्ही तुम्हाला विचारले होते की, पाणी पुरवठा विभागामध्ये किती कर्मचारी आहेत? तर तुम्ही सांगितले सरप्लस आहेत. म्हणजे किती उपद्वाप आहे. मा. स्थायी समितीमध्ये तुम्ही म्हणता की, ५० कर्मचाऱ्यांची गरज नाही. आणि आता म्हणता की, कर्मचाऱ्यांची गरज आहे. हा कुठच्या कुठे विषय जात आहे. तुम्ही बनवा बनवी करू नका. आम्ही तुम्हाला सगळे पारदर्शक व्हावे असे म्हणतो. ही शेवटची मिटींग आहे. अगदी चांगल्या प्रकारे उत्तर द्या.

**जयंत पाटील :-**

१७ वर्षे त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी, सन्मा. सदस्य श्री. म्हात्रे साहेबांनी मगाशी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यांचे आज वय किती झाले असेल? त्यांची मुले बाळे असणार तुम्ही आता इकडे एवढ्या भरत्या करताता. १७० कर्मचारी, पोलिस, हवलदार यांच्यात पाच पंचवीस लोक.

**लिओ कोलासो :-**

जयंत पाटील साहेब, शांतीस्टार बिल्डरने त्यांना सेवेत घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

सभागृहातील सर्व सदस्यांना तसा ठराव मांडू शकतो. नाहीतर त्याला मोघम मांडू शकतो पण मानवता हा एक दृष्टीकोन तुम्ही ठेवा आणि त्या कर्मचाऱ्यांची आपल्याला गरज असेल तर हा एक भाग त्यामध्ये आहे. एकदा तर आपल्याला घ्यायचीच आहे आणि ते आपल्या कामासाठी लागणार आहेत. तर ह्या गोष्टीचा सभागृहाने विचार करावा. अशी आपल्याला सर्वांना विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या शांतीस्टार बिल्डरच्या संपूर्णपणे त्याच्या आस्थापनेवर असलेले जे काही स्टाफ आहेत. आता जी पदे तुम्ही मोजुन दाखविली उद्या गुजरात मधून त्यांची माणसे असतील तर तुम्ही ती माणसे देखील सामावून घ्याल. हे चालणार नाही. आज १७-१८ वर्षाचा त्याचा जो काही कालावधी आहे. साहेब, एवढ्या कंपन्या बंद पडतात. कोर्टसुद्धा निकाल देते. ही कंपनी एवढ्या मिल्स बंद पडल्या. त्यांची नुकसान भरपाई दिली. लोकांना रस्त्यावरती काढले. आज तुम्ही त्यांना जर घेतलेत तर उद्या आपला एखादा ठेकेदारसुद्धा उभा राहिल आणि सांगेल की माणसे माझ्याकडे १५ वर्षे काम करत होते. त्यांनी महानगरपालिकेचे काम केलेले आहे. तुम्ही ह्यांना महापालिकेमध्ये भरती करून घ्या. हा जो चुकीच्या पद्धतीचा पायंडा पाडलेला आहे हे चालणार नाही. त्या लोकांचा जर १० लाख रूपये फंड वगैरे निघत असेल तर त्या शांतीस्टार बिल्डरने त्यांना २० लाख रूपये द्यावा. त्याचे बोझे आम्ही का घ्यायचे. मगाशी मी बोललो आपल्याकडे पाईप लाईनच्या जागेखाली जी लोक बाधित झालेली आहेत. त्यांना आपल्याला ६-६ वर्षे घेण्यासाठी गेली. कितीतरी मिटींगमध्ये तो विषय आला आणि इकडचे आदीवासी लोक, स्थानिक आगरी भूमिपुत्र हे सगळे असतांनाही त्यांनी ६ वर्षे असतांनाही त्यांना ह्या लोकांनी घेतलेले नाही आणि आज हा ठराव होतो. त्याला तुम्ही पटकन मंजुरी देता.

माझी महापौर मॅडम परत हा विषय आर्थिक नुकसानीचा आहे. या महानगरपालिकेतील लेखा परिक्षण यांच्याकडून याचा अहवाल मागवावा. आपल्याला किती लॉस होतोय? पाण्याचा किती गॅप पिरियड आहे? जसे सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब बोलले की त्या उद्‌घाटनाचा मी एक साक्षीदार आहे. त्यादिवसा पासुन ते आजच्या दिवसापर्यंतचा लॉस किती आहे? तो आपल्या लेखा परिक्षकाकडून काढा आणि त्यांच्याकडून ती माहिती मागवून घ्या आणि हा विषय तुम्ही पेंडींग ठेवा यासाठी आपल्याला काही घाई नाही हा महत्वाचा विषय आहे.

**प्रभात पाटील :-**

हा विषय पेंडींग ठेवण्याची काही आवश्यकता आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हाउस फॉर डिसहाउसचा विषय कसा मागे केलात?

**प्रभात पाटील :-**

ज्या पद्धतीने आता चर्चा झालेली आहे की ही योजना आपल्याकडे हस्तांतरीत करून घेण्यासाठी जेवढा कर्मचारी वर्ग आपल्याला आवश्यक आहे. अनावश्यक बोजा आपल्याकडे ठेवू नका. ही योजना आपल्याकडे घ्या. कारण की, तिथल्या नागरिकांवर आपल्याला अन्याय करायचा नाही. परंतु, त्यासाठी जेवढा आवश्यक कर्मचारी वर्ग आहे. त्याच्यापलिकडे जास्त कर्मचारी घेउ नका.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला शांतीस्टार बिल्डरच्या एकाही कर्मचाऱ्याची गरज नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पाहिजे तेवढाच कर्मचारी घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते जे आपल्या मिरा भाईंदरमध्ये साफ सफाई कर्मचारी आहेत ते काशासाठी आहेत? बिचारे जे गरिब आहेत त्यांना तरी ह्यामध्ये समाविष्ट करून घ्या.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. आयुक्त साहेब, विषय पास हो गया है। अब चर्चा करने की कोई जरूरत नही है?

**नयना म्हात्रे :-**

जे बिचारे कर्मचारी आपल्याकडे कामाला येतात जे बिचारे कर्मचारी आजाराने मेले त्यांच्या बायका आतापर्यंत झाडूवाल्या (सफाई कर्मचारी) म्हणून काम करतात. मग त्यांना नगरपालिकेत कामावर घेतले पाहिजे का?

**दिनेश नलावडे :-**

हा विषय अनुमोदन देवून पास झालेला आहे. ह्याविषयासाठी ज्यांचा विरोध आहे त्यांनी मतदानावर विषय घ्या. फक्त आवश्यक तेवढा स्टाफ मंजुर करून आवश्यक नसलेला स्टाफ वगळुन हा विषय मंजुर करा शांतीस्टार बिल्डरच्या चुकीची तेथील राहणाऱ्या नागरिकांना सजा द्यावी का? तेथील राहणाऱ्या लोकांना का त्याची सजा तुम्ही देत आहात?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मा आयुक्त साहेबांनी आपल्याकडे जो गोषवारा दिलेला आहे. त्यामध्ये करारनामाचा उल्लेख केलेला आहे. त्या करारनाम्याची कॉपी ह्या गोषवाऱ्यासोबत नाही. मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, वितरण व्यवस्थेसाठी मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की वितरण व्यवस्थेसाठी शांतीस्टार विकासक यांच्याकडे असलेल्या कर्मचारी वर्गाची यादी सोबत जोडलेली आहे. पण ती यादी देखील या गोषवाऱ्या सोबत जोडलेली नाही. मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की सर्व कर्मचाऱ्यांना समाविष्ट करून घेण्यात यावे. ते देखिल आम्हाला मान्य नाही. असा जर गोषवारा इनकम्पलिट असेल तर आपण ठराव करणे आणि त्या ठरावाला मंजुरी देणे ही योग्य नाही.

**जयंत पाटील :-**

रोहित मी कधीही कर्मचारी घ्या असे म्हणत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मी असे बोललो नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही फार मोठा शब्द वापरलेला आहे. माझा कोणीही नातेवाईक त्या ठिकाणी नाही.

(सभागृहात गोंधळ.)

**चंद्रकांत मोदी :-**

हमारे को फायदा नही इसका फायदा जनता को होना चाहिए......

**रोहित सुवर्णा :-**

हम जनता के फायदे के लिये ही बोल रहे है?

(सभागृहात गोंधळ.)

**शिवप्रकाश भुदेका :-**

हम जनता के फायदे के लिये ही बोल रहे है।

(सभागृहात गोंधळ.)

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ५४ वर चर्चा चालू असताना शांतीनगर येथील शांतीस्टार बिल्डरची योजना ताब्यात घेण्याबद्दल सभागृहात अजिबात बोलत नाही. सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे साहेबांनी जो मुद्दा मांडला तो हि मुद्दा सभागृहास पटण्यासारखा आहे की, ज्या व्यक्तीने आज १८ वर्ष काम केल्यानंतर मानवतेच्या दृष्टीने त्याचा गोषवारा आला. असा मुद्दा त्यांनी मांडला. सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांनी त्याच मुद्याला दुजोरा घेवून असा आग्रह धरण्याचा सभागृहासमोर मांडला नाही की, तुम्ही त्याचे सगळेच्या सगळे कर्मचारी महापालिकेत सेवेसाठी घ्या. पण इथे कॉंग्रेस पक्षाची अशीही मागणी होती की, त्याचे ४५ कर्मचारी आहेत. त्यातील आपल्याला आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग आपल्या महापालिकेतल्या सेवेसाठी भरती करुन घ्या. परंतु, त्या ४५ कर्मचाऱ्यांपैकी आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग ताब्यात घेताना कोणावर अन्याय करणार? कोणाच्या बाजूने न्याय करणार? कोणाला समाविष्ठ करणार? त्यापेक्षा ज्या कर्मचारी वर्गाचा उल्लेख ठरावामध्ये केलेला आहे. त्याबद्दल मी सन्मा. सदस्यांना अशी विनंती करतो की, फक्त शांतीस्टार बिल्डरची योजना ताब्यात घेउन आणि जो कर्मचारी वर्गाचा ठरावामध्ये उल्लेख केलेला आहे. तो कर्मचारी वर्ग ताब्यात न घेता फक्त योजना ताब्यात घ्यावी अशी मी सुचना मांडतो.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, ही सुचना मला मान्य आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आज कॉंग्रेस, राष्ट्रवादी वाले नही है। नही तो वो ठराव पास होने नही देते। शांतीस्टार बिल्डर मिरा भाईंदर महानगरपालिका का इतना नुकसान कर रहा है। पर कॉंग्रेस सिर्फ उसका बाजू ले रहा है। उसको विरुद्ध एक शब्द भी उन्होंने बोला नही है।

**रिटा शाह :-**

हमने आज स्पष्ट भुमिका रखी हुई है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

आज १७० सफाई कामगार की भर्ती देड दो महिनेसे पेंडींग है। आज यह दुसरे का पाप अपने सरके उपर ले रहे है। उसमे एक भी शब्द बोला नही । अगर मेरा शब्द इनको बुरा लगा है तो मै अपने शब्द वापस लेता हू।

(सभागृहात गोंधळ.)

**मा. महापौर सो. :-**

विषय क्र. ५४ मध्ये शांतीनगर येथील पाणीपुरवठा योजना हस्तांतरीत करुन घेणे, आणि कर्मचारी वर्ग समावेश करण्याचा विषय वगळून पाणी पुरवठा योजना हस्तांतरण करण्याची योजनेचा विषय मंजूर करण्यांत आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी तुम्हांला विचारले होते की, जो दोन वर्षाचा गॅप आहे. दोन, अडीच, तीन वर्षाचा जो गॅप आहे. त्या वर्षांमधील वसूलीचे काय? लेखापरिक्षकाकडून त्याचा अहवाल मागून घ्या.

**मिलन पाटील :-**

ते लेखापरिक्षक बघतिल.

**हॅरल बोर्जिस :-**

शांतीनगर बिल्डर बरोबर जे करारनामे झालेले आहेत. त्याची प्रत बघा ना.

**मिलन म्हात्रे :-**

लेखापरिक्षक बघतिल असे नाही. आपले किती नुकसान झाले. याबाबतचा अहवाल आला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

ते काय लेखापरिक्षकांचे काम आहे. ते बघून घेतील. काय करायचे ते? काय आणि किती नुकसान झाले? याबाबत लेखापरिक्षक अहवाल देतील.

**तुळशीदास म्हात्रे :-**

कॉंग्रेस पक्षाने शांतीनगर बिल्डरचा एवढयासाठी विषय घेत होता की तेथील लोकांना जो भुर्दंड बसतो. तो भुर्दंड बसू नये. म्हणून विषय घेण्यांत आला होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्याबाबत प्रश्न नाहीच नाही. आमचे म्हणणे असे होते की त्याचा फायदा नको व्हायला. आपल्या रिकव्हरीचे बोला. त्याच्यावर आम्हांला तुमचे रुलिंग पाहिजे. त्या रिकव्हरीचे काय करणार आहात?

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्याच्या पाईप लाईन्स साठी तो स्वतःसाठी तो स्वतः खर्च करत होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यासाठी त्याने लोकांकडून पैसे घेतलेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्याने ती चुकी केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वाऱ्यामाफ पैसे त्याने लोकांकडून वसूल केलेले आहे. आपल्याला त्याची चिंता नको. आपल्या महापालिकेचे ११ रु. जास्तीचे पाणी त्याने किती रुपयाला विकले? आणि त्याची वसुली किती रुपये मिळणार? मा. महापौर मॅडम १,२००/- रु., १५००/- रु., १६००/- रु. ला भावाने त्याने जागा विकलेल्या आहेत.

**मिलन पाटील :-**

विषय क्र. ५१, विषय क्र. ५२ एकत्रित घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्या रिकव्हेरीबाबत लवकरांत लवकर आम्हांला रुलिंग दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सदरची बाब मुख्य लेखापरिक्षक यांच्याकडे तपासण्यासाठी देण्यांत येईल. आणि त्यांच्या अभिप्रायाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

वसुली केली जाईल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांच्या अभिप्रायाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**प्रकरण क्र. ५४ :-**

शांतीनगर (मिरा रोड) येथील (शांती स्टार विकासक वसाहतीतील) पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करून घेणेबाबत.

**ठराव क्र. २५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड येथे शांतीनगर नावाची वसाहत मे. शांतीस्टार बिल्डर्स यांनी विकसीत केली आहे. सदर संकुलासाठी स्वतःची पाणी पुरवठा योजना शांतीस्टार बिल्डर्स सुमारे २० ते २२ वर्षापासून राबवीत आहे. सदर संकुलासाठी सरासरी ५.०० द.ल.लि. इतका ठोक पाणी पुरवठा शांतीस्टार बिल्डर्सला मनपामार्फत करण्यात येत आहे. सदर ठोक पाणी पुरवठा शांतीस्टार विकासकामार्फत तेथील वसाहतीस वितरीत करण्यात येतो.

शांतीनगर वसाहतीतील वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करावा म्हणून शासनाने वेळोवेळी बैठका होऊन काही ठोस व निर्णायक निर्णय घेऊन शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे दि. ३१/०३/२००४ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका व शांतीस्टार विकासक यांच्यामध्ये व्दिपक्षीय करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यातील अटी क्र. १ नुसार शांतीस्टार विकासकर्त्यांने शांतीनगर येथे ११ लक्ष क्षमतेचे उंच जलकुंभ बांधावयाचा असून त्याचा अंदाजित खर्च ५०-५५ लक्ष असेल व त्यापैकी १०.४० लक्ष इतकी रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

सदर जलकुंभाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पुर्णत्वाचा व यशस्वीरित्या हायड्रॉलीक टेस्टींग केल्याचा दाखला महानगरपालिकेस द्यावयाचा आहे व तद्नंतर उंच जलकुंभातील एस्. के. स्टोन ते भाईंदर पर्यतची शांतीनगर वसाहतीची संपूर्ण पाणी पुरवठा योजना सर्व उपांगासहीत सुस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेत विनामोबदला कायमस्वरूपी हस्तांतरीत करणेत यावे असे करारनाम्यातील अट क्र.३ मध्ये नमुद करण्यात आले आहे.

शांतीस्टार विकासक यांनी संदर्भिय पत्र क्र. १ ने ११ लक्ष उंच जलकुंभाचे काम पूर्ण झाले असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सदर जलकुंभाची पाहणी करून सदर जलकुंभ पूर्ण झालेला असून चालू करणेबाबत शांतीस्टार बिल्डर्स यांना दिलेल्या पत्रात कळविले आहे. करारनाम्यातील अट क्र. ३ व ५ नुसार शांतीस्टार विकासकर्त्याने संपूर्ण वितरण व्यवस्था सुस्थितीत महानगरपालिकेस विनामोबदला हस्तांतरीत करावयाची आहे.

सद्यस्थितीत शांतीस्टार वसाहतीमध्ये अंदाजे ३३ कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था आहे. त्यामध्ये ८० मि.मी. व्यासाची ते ३०० मि.मी व्यासाच्या जलवाहिन्या आहेत तसेच सदर वसाहतीमध्ये ६६२ इतक्या इमारती असून त्यामध्ये ५२४ एवढया नळजोडण्या आहेत. वितरण व्यवस्थेसाठी शांतीस्टार विकासक यांच्याकडे असलेल्या कर्मचारी वर्गाची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. सय्यद अझर मोहिमुद्दीन | कनिष्ठ अभियंता |
| २ | श्री. दिपक विठ्ठल जाधव | कनिष्ठ अभियंता |
| ३ | श्री. आनंद किसन दाभाडे | लिपीक |
| ४ | श्री. परमेश्वर महादेव गाडे | लिपीक |
| ५ | श्री. गणेश कांतीलाल गोडगे | लिपीक |
| ६ | श्री. विजय मोहन गायकवाड | लिपीक |
| ७ | श्री. नारायण ज्ञानदेव जाधव | सफाई कामगार |
| ८ | श्री. मधुकर पांढु सुर्यवंशी | सफाई कामगार |
| ९ | श्री. सतीश होनावरे | सफाई कामगार |
| १० | श्री. रामदास डोंबरे | सफाई कामगार |
| ११ | श्री. रामनीहार गोस्वामी | सफाई कामगार |
| १२ | श्री. मधुकर बाबुलाल सोनावणे | सफाई कामगार |
| १३ | श्री. भिमराव शंकर शेरे | सफाई कामगार |
| १४ | श्री. रामा कांबळे | सफाई कामगार |
| १५ | श्री. शंकर शिंदे | सफाई कामगार |
| १६ | श्री. बारको दांगडे | सफाई कामगार |
| १७ | श्री. शंकर सातीसप्पा पोतदार | सफाई कामगार |
| १८ | श्री. भागवत गंगा साळवे | सफाई कामगार |
| १९ | श्री. वासुदेव सीताराम धनगेकर | सफाई कामगार |
| २० | श्री. पॅरेलाल श्रीवास्तव | सफाई कामगार |
| २१ | श्री. गणेश रंगडी | सफाई कामगार |
| २२ | श्री. विलास लक्ष्मण गायकवाड | सफाई कामगार |
| २३ | श्री. सचिन उत्तम खरात | सफाई कामगार |
| २४ | श्री. सुरेश भोईर | सफाई कामगार |
| २५ | श्री. फुलबदन जगन्नाथ यादव | सफाई कामगार |
| २६ | श्री. जर्नादन पाटील | सफाई कामगार |
| २७ | श्री. शशीकांत ठाकुर | सफाई कामगार |
| २८ | श्री. भगवान मानकर | सफाई कामगार |
| २९ | श्री. बाबु नामदेव जाधव | सफाई कामगार |
| ३० | श्री सुरेश सरनाप्पा सोनकांबळे | सफाई कामगार |
| ३१ | श्री. महादेव कदम | सफाई कामगार |
| ३२ | श्री. किरण तुकाराम गायकवाड | सफाई कामगार |
| ३३ | श्री. महेश शांताराम तामोरे | सफाई कामगार |
| ३४ | श्री. नागरे ताराचंद दिनकर | सफाई कामगार |
| ३५ | श्री. सिंग अतुल रामदेव | सफाई कामगार |
| ३६ | श्री. विलास रामचंद्र बागड | सफाई कामगार |
| ३७ | श्री. भुषण भागवत अहिरे | सफाई कामगार |
| ३८ | श्री. सुनिल दगडू गागुर्डे | सफाई कामगार |
| ३९ | श्री. माने चिंतामणी महादेव | सफाई कामगार |
| ४० | श्री. महेश बाबूराव डावाले | सफाई कामगार |
| ४१ | श्री. संदीप श्याम सावंत | सफाई कामगार |
| ४२ | श्री. वाघमारे जय विजय | सफाई कामगार |
| ४३ | श्री. मंडगे शिवाजी नारायण | सफाई कामगार |
| ४४ | श्री. तांबोळी इक्बाल गुलाब शेख | सफाई कामगार |
| ४५ | श्री. फारूक अली मेमन | सफाई कामगार |
| ४६ | श्री. भास्कर कृष्णा माने | सफाई कामगार |
| ४७ | श्री. अशोक लक्ष्मन माने | सफाई कामगार |
| ४८ | श्री. विलास दिनकर धिवर | सफाई कामगार |
| ४९ | श्री. विनोद गंगाधर जमदाडे | सफाई कामगार |
| ५० | श्री. मंगेश हरेश्वर राऊत | सफाई कामगार |

| अ.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| ५१ | श्री. संतोष माणिक खरटमोल | सफाई कामगार |
| ५२ | श्री. हेमंत गोरेकर | सफाई कामगार |
| ५३ | श्री. जयेश कमळाकर म्हात्रे | सफाई कामगार |
| ५४ | श्री. भरत यशवंत म्हात्रे | सफाई कामगार |
| ५५ | श्री. विजय शिवाजी पाटील | सफाई कामगार |
| ५६ | श्री. भुषण अनंत पाटील | सफाई कामगार |
| ५७ | श्री. देवेंद्र वसंत मोरे | सफाई कामगार |
| ५८ | श्री. अर्जुन जयसिंग गायकवाड | सफाई कामगार |
| ५९ | श्री. विलास श्रीपती टेळे | सफाई कामगार |
| ६० | श्री. भैरव भिमा नाईक | सफाई कामगार |
| ६१ | श्री. राजेंद्र केशव नाईक | सफाई कामगार |
| ६२ | श्री. सचिन संगीत साळुंखे | सफाई कामगार |
| ६३ | जसिता सायमन पाटील | सफाई कामगार |
| ६४ | श्री. अजय रामचंद्र पाटील | सफाई कामगार |
| ६५ | श्री. विजय प्रकाश पाटील | सफाई कामगार |
| ६६ | श्री. संतोष परब | सफाई कामगार |
| ६७ | श्री. प्रशांत बळवंत पाटील | सफाई कामगार |
| ६८ | श्री. संदिप दत्तात्रेय मोरे | सफाई कामगार |
| ६९ | श्री. योगेश मोहन गायकवाड | सफाई कामगार |

संपूर्ण वितरण व्यवस्था महागनरपालिकेकडे हस्तांतरीत करावयाची असल्यास कर्मचारी वर्गही महानगरपालिकेत समाविष्ट करून घ्यावा लागेल. तसेच शांतीस्टार मध्ये सर्वच इमारतीमध्ये भूमीगत टाक्या आढळून आलेल्या नाहीत. वसाहतीमधील या इमारतींना भुमिगत टाक्या नाहीत त्यांना भुमिगत टाक्या बांधणे बंधनकारक करावे लागणार आहे. तसेच इमारतींना १ व्यासाच्या नळ जोडण्या दिसून येत आहेत, तसेच इमारतीला असलेल्या नळजोडणीची मीटर रिडींगप्रमाणे बिल काढण्यासाठी आपल्या दप्तरी नोंद घ्यावी लागणार आहे.

मनपा आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदावर त्या पदाच्या वेतनश्रेणीवर सामाविष्ट करून घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे. याकामी येण्याऱ्या खर्चासही ही सभा मंजुरी देत आहे तसेच कायम कर्मचाऱ्याप्रमाणे देण्यात येणारे सर्व फायदे व सुविधा त्यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे तसेच मनपाने पाणी पुरवठा वितरणा संबंधी जे धोरण ठरवले असेल ते या विभागास लागू करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सन्मा. सभागृहनेते श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ५५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**हॅरल बार्जीस (सभागृह नेता) :-**

प्रकरण क्र. ५५ श्री. सुर्यकांत दातीर यांना पुर्वलक्षी प्रभावने सेवेत कायम करणेबाबत सन्मा. सदस्यांना जो गोषवारा प्राप्त झालेला आहे. मी त्या गोषवाऱ्याच्या अनुषंगाने ठराव वाचत आहे.

**शुभांगी नाईक :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी या ठरावामध्ये एक सूचना आहे. तुम्ही ती सुचना, नमुद करुन घ्या. आपण श्री. सुर्यकांत दातीर यांना दि. ८/६/१९८८ पासुन नेमणुक देण्याबाबतचा विषय आणलेला आहे. आपण श्री. सुर्यकांत दातीर यांना श्री. अविनाश जाधव यांना पुर्वलक्षी नेमणुक दिल्याप्रमाणे नेमणुक देत आहोत. आपण यापुर्वी या सभागृहामध्ये ५३८ कर्मचाऱ्यांना दि. १/३/१९९३ पासुन सेवाजेष्ठता देण्याबाबतचा ठराव पारित केलेला होता. मग, आजपर्यंत त्या कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठता का दिलेली नाही? माझी श्री. सुर्यकांत दातीर यांच्या ठरावाबाबत एक सुचना घ्या. की, आपण ज्याप्रमाणे श्री. सुर्यकांत दातीर यांना पुर्वलक्षी प्रभावाप्रमाणे

नेमणुक देतो. त्याप्रमाणे ५३८ कर्मचाऱ्यांना देखील दि. १/३/१९९३ पासुन नेमणुक देण्यात यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. अशी या ठरावामध्ये नोंद करुन घ्या.

**मा. महापौर :-**

सदर ठराव सुचनांसह मंजुर करण्यांत येत आहे. ठराव वाचून कायम करण्यात आला. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ५५ :-**

श्री. सुर्यकांत दातीर (लिपिक) यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवेत कायम करणे बाबत.

**ठराव क्र. २६ :-**

तत्कालीन नगरपालिकेत १ फेब्रुवारी १९८६ पासून जकात विभाग सुरू करण्यात आला त्यावेळी लिपिक कर्मचारी वर्ग कमी होता. त्या कमी कर्मचाऱ्यांकडून नगरपालिका जास्त वेळ काम करून घेत असे. दरम्यान दि. १७/३/१९८७ व दि. ४/५/१९८८ रोजीचे आदेशान्वये लिपिक पदांना शासनाकडून मंजुरी मिळाल्यामुळे नगरपालिकेने जकात विभागासाठी आवश्यकता असल्यामुळे लिपिक पदे तातडीने भरण्याचे ठरविले. परंतू सन १९८८ मध्ये लिपिक पदे नगरपालिकेने भरावयाची असल्यास प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ त्यावेळी नव्याने अस्तित्वात आलेले असल्यामुळे त्यांचेकडून यादी मागवून लिपिक पदे भरणे अपेक्षित होते. परंतु, जकात विभागासाठी लिपिक कर्मचारी तातडीने भरणे आवश्यक असल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून सेवायोजन कार्यालयाकडून लिपिक पदाच्या उमेदवारांची यादी मागवून उमेदवाराची मुलाखतीद्वारे निवड करून निवड केलेल्या लिपिकांची तात्पुरता नेमणूकीने पदे भरण्यात आली. त्यात एकूण २० लिपिक होते. त्यापैकी श्री. दातीर यांना आदेश क्र. ८८०/८८-८९ दि. ३०/५/१९८८ अन्वये लिपिक पदावर नेमणूक करण्यात आली होती. त्या आदेशानुसार दि.८/६/१९८८ पासुन श्री. दातीर हे लिपिक पदावर रूजू झाले होते. श्री. दातीर व अन्य लिपिक यांना दिलेल्या आदेशात विभागीय निवड मंडळाकडून पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झालेनंतर नेमणूक रद्द समजण्यात येईल असे स्पष्ट आदेशात नमुद केले होते. त्यामुळे श्री. दातीर व अन्य लिपिक यांची नेमणूक ही तात्पुरती लिपिक पदावर असल्यामुळे त्यांना सहा महिन्याची प्रथम नेमणूक देण्यात येउन विभागीय निवड मंडळाकडून उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे व नगरपालिकेस जकात विभागासाठी लिपिकाची आवश्यकता असल्याने सहा महिन्यांनी काही वेळा तीन महिन्यांनी त्यांना तांत्रिक एक ते दोन दिवसाचा सेवा खंड करून पुन्हा कामावर ठेवून घेण्यात येत असे.

अशाप्रकारे त्यांना माहे सप्टेंबर - ९० पर्यंत त्यांची सेवाखंडीत करून कामावर ठेवून घेण्यात येत होते. परंतु, सदर कर्मचारी यांनी एकाच कॅलेंडर वर्षात २४० दिवस भरल्याने व डिसेंबर - ९० मध्ये पुन्हा सेवा खंड नगरपालिका देणार या अपेक्षेने संभाव्य सेवाखंड देण्यापूर्वी श्री. दातीर व अन्य लिपिक यांनी सेवेत कायम होण्याच्या दृष्टीने मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांचेकडून नगरपालिकेने सेवाखंड करू नये म्हणून स्थगिती आदेश प्राप्त केला. त्यानंतर लिपिकांना न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सेवाखंड देणे नगरपालिकेने बंद केले. दरम्यान श्री. सुर्यकांत दातीर यांनी नगरपालिकेची रितसर परवानगी घेउन मा. प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, कोकण भुवन, नवि मुंबई यांचे कडील परिक्षा उत्तीर्ण केली. परिक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांना नगरपालिका सेवेत कायम करावे अशी श्री. दातीर यांनी विनंती केली. परंतु, श्री. दातीर यांचा दावा औद्योगिक न्यायालयात प्रलंबित होता. दावा औद्योगिक न्यायालयात असल्यामुळे तो त्यांनी प्रथम मागे घ्यावा असे तत्कालीन नगरपालिकेने कायम करण्यापूर्वी अट घातल्यामुळे दि.६/९/१९९१ रोजी श्री. दातीर यांनी वैयक्तीक दावा मागे घेतल्यानंतर श्री. दातीर यांना लिपिक पदावर दि.८/१/१९९३ पासून रूजू करून घेतले आहे. श्री. दातीर यांना लिपिक पदावर दि.८/१/१९९३ पासून रूजू करून घेतले. परंतु, दि.८/६/१९८८ चे आदेशातील अटीशर्तीनुसार नगरपालिकेत निवड मंडळाची परिक्षा उत्तीर्ण केल्यामुळे दि. ८/६/१९८८ पासून म्हणजेच प्रथम नेमणूकीच्या दिनांकापासून कायम करणेत यावे यासाठी मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचे जवळ विनंती अर्ज केला होता. त्या अर्जास अनुसरून मा. उप संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडील दि.३/९/१९९६ रोजीचे प्राप्त पत्रानुसार श्री. सुर्यकांत दातीर यांना दि. ८/६/१९८८ या प्रथम नेमणूकीचे दिनांकापासून सेवेत कायम करणेबाबत नगरपालिका तयार असल्यास तसा ठराव पारित करून पाठविण्यास कळविले होते. त्यानुसार श्री. दातीर यांना सेवेत पुर्वलक्षी प्रभावाने कायम करणेबाबत तत्कालीन नगरपालिकेच्या मा. स्थायी समिती सभा दि. २६/११/१९९७ ठराव क्र.९७ अन्वये प्रस्ताव मा. कौन्सीलचे मंजूरीने पाठविण्यास मंजूरी दिली होती. दरम्यान नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम सुरू असल्याने सभा होण्यास विलंब होणार असल्याने निवडणूकीनंतर होणाऱ्या सभेस विषय घेउन पारित ठरावानुसार विहित नमुन्यात प्रस्ताव पाठविण्यांत येईल. असे दि. २६/१२/१९९६ रोजी मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, संचलनालय, मुंबई यांना कळविले होते. परंतू, अद्याप तसा ठराव पारित न झाल्याने प्रस्ताव पाठविला नाही. त्यामुळे त्यांचे प्रकरण अद्याप प्रलंबित आहे.

श्री. दातीर यांचे प्रमाणेच सन १९८८ पासून लिपिक पदावर नगरपालिकेत तात्पूरते काम करणारे अविनाश जाधव हे श्री. दातीर व अन्य लिपिक मा. औद्योगिक न्यायालयात जाण्यापुर्वी हंगामी स्वरूपात कामावर होते. परंतू, श्री. जाधव नोव्हेंबर १९९० अखेर दुय्यम सेवा निवड मंडळाची परिक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना न्यायालयात जाणेची आवश्यकता भासली नाही. तत्पुर्वी त्यांना दि.१/१२/१९९० पासून लिपिक या पदावर

नगरपालिकेने प्रथम हजर करून घेतले. त्यानंतर त्यांनी केलेल्या अर्जानुसार त्यांना तत्कालीन नगरपालिकेने ठराव पारित करून मा. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे पारित ठरावास अनुसरून केलेल्या पत्र व्यवहाराचे अनुषंगाने दि. २९/९/१९९८ रोजी पत्राने मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, संचालनालय, मुंबई यांनी पुर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच श्री. अविनाश जाधव यांना प्रथम नेमणूकीचे दिनांकापासून (दि.१/९/१९८८) कायम नेमणूक देण्यांस मंजूरी दिली. ज्याप्रमाणे श्री. जाधव यांना नगरपालिकेने नेमणूक व सेवाजेष्ठता दिलेली आहे. त्याप्रमाणे तुलना करता श्री. जाधव व श्री. दतीर योचे नेमणूकीबाबत वस्तुस्थिती सारखी आहे. परंतू, श्री. दातीर यांनी यापूर्वी मागणी करून सुद्धा सेवाजेष्ठता दिलेली नाही. त्यांना सेवाजेष्ठता न दिल्याने त्यांनी २००३ रोजी प्रसिद्ध प्रारूप सेवाजेष्ठता यादीस आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपाचे अनुषंगाने तात्कालीन आयुक्त साो., यांनी मा. आयुक्त साो., यांनी श्री. दातीर व श्री. अविनाश जाधव यांचे नेमणूकीबाबत तुलना करता प्रकरण सारखेच असल्यामुळे श्री. दातीर यांचेवर अन्याय झाल्याचे दिसून येत असून ह्या प्रकरणी श्री. दातीर यांना कोणत्याही प्रकारे थकीत रकमेचा फरक न देता, सेवाजेष्ठता बाबत प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरीता ठेवावे असे निर्देश दिलेले होते. त्यानुसार उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता श्री. दातीर यांचेवर सेवाजेष्ठता अन्याय झाल्याचे दिसुन येत असून त्यांची नमणूक ही वेतनश्रेणीवर असल्याने व प्रथम ओदशातील अटीशर्तीची पुर्तता त्यांनी केलेली असून श्री. दातीर व जाधव यांची नगरपालिका प्रशासन, मुंबई यांनी दिलेल्या प्रथम नेमणूकीच्या आदेशाप्रमाणेच श्री. सुर्यकांत दातीर, लिपिक यांना प्रथम नेमणूकीच्या म्हणजेच दि.८/६/१९८८ पासून नेमणूक देउन, त्याप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने त्यांची वेतन निश्चिती करून रक्कम देय फरकासह व सेवाजेष्ठतेसह सेवालाभ देण्यास तसेच मा. महासभा दि. २१/१२/२००६ रोजीचा ठराव क्र. ७९ नुसार ५३८ कर्मचाऱ्यांना दि. १/३/१९९३ पासुन सेवाजेष्ठतेबाबतचा पारित करण्यात आला होता. या ठरावावर देखिल कार्यवाही करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्रीम. शुभांगी नाईक.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५६ चे वाचन केले.)

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप आयुक्तांची तीन पदे मंजुर आहेत. परंतु, त्यापैकी एक पद मागासवर्गीय उप आयुक्तांसाठी रिक्त होते. परंतु, अद्याप अनुशेष भरलेला नाही. आपण प्रशासनाच्या अहवाल मध्ये असे म्हटलेले आहे की, आपण मागासवर्गीयांचा अनुशेष पुर्णपणे भरलेला आहे. मग, हा अनुशेष आतापर्यंत का भरलेला नाही? याची कृपा करुन माहिती द्या.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने सभागृहासमोर वस्तुस्थिती मांडण्यात येत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये शासनाच्या मंजुरीने आस्थापनेवर एकुण तीन उप आयुक्तांची पदे मंजुर होती. त्यापैकी शासनाने दोन पदे प्रतिनियुक्तीने भरलेली आहेत. आणि महापालिकेने एक पद स्वतःच्या ह्याच्यामध्ये भरलेले आहे. कारण मध्यंतरी शासनाने महराष्ट्रातील सर्व महापालिकांचे वर्गीकरण केलेले होते. त्या वर्गीकरणामध्ये अ, वर्ग दर्जाची महापालिका ब, वर्ग दर्जाची महापालिका क, वर्ग दर्जाची महापालिका, आणि ड, वर्ग दर्जाची महापालिका अशा एकुण चार कॅटेगिरीमध्ये महापालिकेचे वर्गीकरण केलेले आहे आणि त्याप्रमाणे महापलिकेच्या पदांचे आकृतीबंध मंजुर केलेले आहेत. शासन निर्णयाप्रमाणे आपली महापालिका ड, वर्ग महापालिका मध्ये समावेश होतो त्या आकृतीबंधाप्रमाणे आपल्याकडे जरी उप - आयुक्तांची तीन पदे मंजुर असली तरी यापुढे महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या तीन उप आयुक्तांच्या पदांपैकी एक पद बदली किंवा एक सेवानिवृत्तीने संपुष्टात आल्यास यापुढे फक्त दोनच उप आयुक्त राहतील असे त्यामध्ये नमुद केलेले आहे. शासनाचा दुसरा धोरणात्मक निर्णय असा आहे की, उप आयुक्त दर्जाचे अधिकारी ५० टक्के शासन प्रतिनियुक्तीने मुख्याधिकारी संवर्गातुन भरण्यात यावेत व ५० टक्के अधिकारी महापालिका स्तरावर अधिकाऱ्यातुन भरण्यात यावेत. आमच्यापैकी कोणाचीही बदली झाली तरी यापुढे दोन उप आयुक्त राहणार आहेत. त्यापैकी ५० टक्के म्हणजे एक उप आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी रहाणार आहे आणि एक शासन प्रतिनियुक्तीवर राहणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने श्री. संभाजी पानपट्टे साहेबांची यापुर्वी नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे त्या दोन पंदामध्ये अनुशेष पद आजच्या परिस्थीतीमध्ये शिल्लक नाही. मा. विधानमंडळाची समिती या ठिकाणी आल्यानंतर याबाबतीत अनावधनाने चर्चा झालेली होती. आणि त्या ठिकाणी याबाबतचा व सुस्थितीचा खुलासा केलेला होता. तेव्हापासुन हा विषय या

ठिकाणी प्रामुख्याने मांडला जात आहे. आजच्या परिस्थीतीला या ठिकाणी असा कुठलाही अनुशेष शिल्लक नाही. ही वस्तुस्थिती आहे आणि प्रशासनाकडुन हा खुलासा केला जात आहे. याशिवाय सभागृहाला काही निर्णय घ्यायचा असेल तर आपण तो निर्णय शासनाकडे पाठवणार आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, अनुसुचीत जाती कल्याण समितीच्या सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केलेला होता. याकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्यांने याबाबत माहिती दिलेली होती. जर मागासवर्गीय अनुशेषामध्ये उप - आयुक्तांचे एक पद रिक्त असेल तर आणि आमच्याकडे सक्षम अधिकारी आहेत ते तिन पदांमध्ये ते अधिकारी बसणार असतील तर तुम्ही त्याची त्या ठिकाणी नेमणुक न करता आम्ही शासनाकडुन उप आयुक्त का घ्यावा?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सन्मा. सदस्य ज्योत्स्ना हसनाळे, आपण असे बोलुन चालणार नाही. आपल्याला शासनाच्या धोरणाप्रमाणे काम करावे लागते. शासनाने ५० टक्के शासनांची आणि ५० टक्के महापालिकेंची उप - आयुक्त दर्जाची पदे समाविष्ट कलेली आहेत. आपल्याकडे त्या ५० टक्क्यापैकी एक पद ऑलरेडी महापालिकेने भरलेले आहे. ते पद रिक्त झाल्यानंतर तुम्हाला धोरणात्मक निर्णय घेता येईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आम्ही असे म्हणुन नाही की तुम्ही ती पदे मंजुर करु नका. तुम्ही तीन पदे शासनाकडे मंजुरीला पाठवा. मग, त्यांच्यावर अन्याय होणार नाही. कारण जर आपण त्यांची पशुशल्य चिकित्सक या पदावर नेमणुक केली तर त्यांच्यावरसुध्दा अन्याय होणार नाही. हे जे मागासवर्गीय पद रिक्त आहे. त्याच्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, मागासवर्गीय समाजाचा एक भाग असतांना आपल्याला त्या पदावर इतर समाजाच्या उमेदवारांची भरती करता येत नाही. हा सुध्दा एक नियम आहे. आपण त्या नियमाला धरुन उप आयुक्त पद भरावे.

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे ह्यांनी प्रकरण क्र. ५६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी आल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

माझा ठराव करण्याबाबत आक्षेप नाही. परंतु, या सभागृहाने एका अधिकाऱ्यांची नेमणुक केलेली असतांना आपण बदलु शकतो का?

**रोहिदास पाटील :-**

मा. उप आयुक्तसाहेब, तुम्हाला निवेदन करावे लागेल की, या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावामध्ये यापुर्वी झालेली नियुक्ती जी योग्य नाही असे वापरलेले आहे. मग ती नियुक्ती कोणी केलेली होती? ती नियुक्ती नियमानुसार झालेली होती की, नव्हती. ती नियुक्ती खरोखर अधिकृत होती की, अनधिकृत होती. असे समजल्यावरच ठराव होईल नाहीतर आम्ही ठरावाला मंजुरी कशी देणार? ज मध्ये येणाऱ्या ठरावात एकाने ठराव वाचला आणि दुसऱ्याने अनुमोदन दिले असे चालणार नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

या सभागृहाने श्री. संभाजी पानपट्टे साहेबांची नियुक्ती करुन शासनाची मंजुरी घेतलेली आहे. त्यामुळे ती नियुक्ती अनधिकृत नसुन अधिकृत आहे. जोपर्यंत ते पद रिक्त होत नाही. तोपर्यंत प्रशासनाला असा ठराव करता येणार नाही असे माझे मत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ती दोन पदे आहेत ना.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

तूम्हाला जास्तीच्या पदांची मागणी करावी लागेल. आपल्याकडे पद मंजुरीला पाठवावे लागेल.

**रोहिदास पाटील :-**

या महापालिकेचा दर्जा अ कसा होईल? त्याचा प्रयत्न करा. आपण एवढे बक्षीस घेतो सगळे घेतो. आणि आपण ड मध्ये बसलेले आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी माझ्या ठरावात दुरुस्ती करुन घेते की, शासनास विनंती करुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप आयुक्तांची तीन मंजुर पदे कायम ठेवुन त्यापैकी एका पदावर अनुसुचित उमेदवाराची नेमणुक करण्याबाबत मा. महासभेने ठराव केलेला होता.

**रोहिदास पाटील :-**

त्यापेक्षा तीन पदांनपैकी चौथे पद निर्मीत करुन घ्या. जातीच्या उमेदवारी साठी ताबडतोब भरुन घ्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

चौथे पद निर्मित करता येणार नाही. कारण त्याच्यामध्ये दोनच पद अनुशेष आहेत. त्यामुळे आपल्याला तिसरे आणि चौथे पद अनुसुचीत जातीसाठी करता येणार नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

सन्मा. सदस्य ज्योत्स्ना हसनाळे, शासनाचे असे धोरण आहे की, शासन ५० टक्के पदे प्रतिनीयुक्तीने घेईल आणि ५० टक्के पदे महापालिका भरेल. त्यामुळे पदसंख्या केल्यावर आणखी अडचण निर्माण होईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपल्याकडे त्या श्रेणीतील सक्षम अधिकारी आहेत. आपल्याला शासन नियुक्त बाहेरचा अधिकारी घेण्याची गरज नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

आपल्याला असे बोलुन चालत नाही. शासनाचे जे धोरण आहे ते आपले सभागृह तोडु शकत नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपल्याकडे त्यातील एक पद आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

जर ठराव झाल्यानंतर आम्ही तुमची भावना शासनाला कळवु. परंतु, अपल्याला शासनाच्या धोरणाच्या विरोधात निर्णय घेता येत नाही. महासभेने ऑलरेडी एका पदाची नियुक्ती केलेली असतांना आपण दुसरे पद कसे भरायचे?

**सुरेखा गायकवाड :-**

आपल्याला ते पद  मंजुर करुन घ्यावे लागेल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, गेल्या दोन वर्षापासुन म्हणजेच श्री. सुदामराव गायकवाड साहेब आल्यापासुन अगोदर आस्थापनेचा खर्च किती होता? आणि आता किती खर्च वाढलेला आहे? तुमचा खर्च ३० टक्के होता. आता ५८ टक्क्यावर गेलेला आहे. तुम्ही या सगळ्या पदोन्नोत्या करत गेलेले आहात. परंतु, तुम्ही कोणीही याच्या पुढचा विचार करीत नाहीत. पैसे कसे येतील तर याचा कोणीही विचार करीत नाही. फक्त खर्च कसा होईल? याचा विचार करतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण जर बाहेरुन उप आयुक्त आपले तरी आपल्याला त्यांना मानधन द्यावे लागते. त्यापेक्षा आपल्याकडील जे अधिकारी आहेत आपण त्यांना सेवेत सामावुन घेउया.

**जयंत पाटील :-**

श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब बरोबर बोलले की, महापालिकेत फंड कसा जमा होईल. महसुल कसा वाढेल आपण हे बघण्यापेक्षा आपला खर्च वाढत चाललेला आहे. आज दै. नवशक्तीमध्ये एक बातमी आहे. बहुतेक लोकांनी ती बातमी वाचली असेल. श्री. मिलन म्हात्रेसाहेबांनी जनहित याचिका केली आणि महापालिकेच्या गाड्या महापालिकेचे अधिकारी, पाधिकारी कशा तऱ्हेने वापरतात. त्याच्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात किती घट आलेली आहे? किती नुकसान झालले आहे? या संबधातील एक चांगली बातमी आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे मी तुमचे अभिनंदन करतो. शासनाचे या संबधी कडक निर्देश आहेत. आम्ही माहपालिकेच्या गाड्यांबाबत मधल्या काळात स्थायी समितीमध्ये चर्चा केलेली होती. साहेब, तुम्ही त्यावेळेला उपस्थित होतात. आम्ही त्यावेळेला अशी चर्चा केलेली होती की, महापालिकेची एक गाडी सहकुटंब सहपरिवार कोणाच्या तरी फार्मवर गेलेली होती आणि गाडी येतांना त्या गाडीला ॲक्सीडंट झाला आणि विशेष गोष्ट आहे की, महानगरपालिकेच्या वाहन विभागाच्या अधिकाऱ्यांना गाडीला अपघात झाल्याची कल्पना सुध्दा नव्हती. आणि त्या गाडीला २५,००० रु/- खर्च झालेला होता. तो खर्च कोणी केला? ते माहित नाही परंतु, या बाबत शासनाचे कडक निर्देश आहेत. काही गोष्टी अशा आहेत की, शासकीय वाहने वातानुकुलीत करु नयेत. आपल्याकडील बहुतेक गाड्या वातानुकुलीत होत आहेत. मला वाटते की, या गाड्या कंपनीतुनच आलेल्या आहेत. शासकीय वाहनांचा व्यक्तिगत कामाकरीता उपयोग करण्यात येवु नये. आणि अशा प्रकारे वापर केल्यास प्रशासकीय विभागाने याची गंभिर दखल घेउन त्याच्यावर कार्यवाही केली पाहिजे. परंतु, आपण शासकीय गाड्यांचा वापर सर्रास बघतो. मी अधिकाऱ्यांना दोष देत नाही. मला या ठिकाणी सांगायला वाईट वाटते की, मी या सदनाचा गेली पंधरा वर्ष नगरसेवक आहे मी बऱ्याचश्या माझ्या मी बारच्या बाहेर उभ्या राहिलेल्या बघितल्या तर आम्ही बारमध्ये गेलेलो होतो का? तसा प्रकार नाही, आम्ही कधीतरी चुकुन माकुन येत असतो. तेव्हा त्या गाड्या बाहेर दिसलेल्या  होत्या हे चुकीचे आहे. पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी कसे वागायला पाहिजे? कोणते ताळतंत्र पाळायला पाहिजे? आम्ही आमच्या काही पदाधिकाऱ्यांच्या हळदी समारंभाला गेलेल्या पाहिल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

काही पदाधिकाऱ्यांच्या गाड्या ओटीवरच उभ्या आहेत. तुम्ही खाली उतरुन बघा. तुम्हाला गाड्या उभ्या असलेल्या दिसतील.

**जयंत पाटील :-**

श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब, बोलतात की, प्रशासनाचे कर्ज प्रचंड वाढलेले आहे. प्रशासनाचे कर्ज ३० टक्के होते. आता ते ५९ टक्के झालेले आहे. म्हणजे दूप्पट झालेले आहे. आपल्याला काही दृष्टीने खर्च करावा लागत असेल. आम्ही आज म्हणतो की, तुम्ही आमच्या कार्यकर्त्यांना शिपाई म्हणून कामाला लावा. परंतु, आजपर्यंत एकही कार्यकर्ता शिपाई म्हणून लागलेला नाही. जे शिपाई म्हणून लावलेले आहेत. तुम्ही त्यांना काढण्याचा प्रयत्न करता असे माझे म्हणणे आहे. मी या सभागृहात अशी परिस्थिती बघितलेली आहे. खरे म्हणजे आम्ही साक्षीदार आहोत. सन्मा. सदस्य लिओ कोलासो, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि या सभागृहातील बरेच सदस्य या गोष्टींचे साक्षीदार आहेत. आम्ही या शहराचे कसे भले होईल? या महापालिकेच्या उत्पन्नात कशी भर पडेल? आम्ही यासंबंधी निश्चितच कायम तत्पर आहोत किंवा याची काळजी घेणार आहोत. मला वाटते की, आता संध्या. ६.३० वाजलेले आहेत. आमचे य सदनातील शेवटचे क्षण चाललेले आहेत. हे काउन्ट डाउन चालू झालेले आहे. आता अर्ध्या तासानंतर आम्ही निवडून आलो तर या खुर्चीवर बसू. नाहीतर घरी बसू. मी या ठिकाणी सगळ्यांची भावना सांगत आहे. असे करताना या सभागृहामध्ये काही नगरसेवक आणि काही अधिकाऱ्यासंबंधी चर्चा झालेली होती. पक्षाची दोन छत्र झालेली बघितलेली होती. आमच्या महापौर असून आमचे महापौर नाहीत सांगणार बघितले. परंतु, त्यावेळेला आमचा कॉंग्रेस पक्ष स्थिर आणि व्यवस्थित राहिलेला होता. बी.जे.पी., शिवसेना हे पक्षसुद्धा स्थिर राहिलेले होते. मी यावेळेला कुठलीही चर्चा करित नाही , काहीही वाईट बोलत नाही.

**मिलन पाटील :-**

आम्ही अगोदरच्या मिटींगला कॉंग्रेसमध्ये काय चाललेले होते? ते बघितलेले आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. मिलन पाटील साहेब, तुम्ही एक चांगले सदस्य आहात. या सभागृहामध्ये मघाशी सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका बालाजी असे काहीतरी बोललेले होते. सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका साहेब, तुम्ही असे बोलता कामा नये. परंतु, तुम्हाला अशी बुद्धी आहे का? तुमच्या वडिलांनी तुमचे नांव भुदेका ठेवले म्हणजे बुद्धि आहे का? आम्हाला याचा प्रश्न पडलेला आहे. तुमचे नांव शिवप्रकाश चांगले आहे. तुम्ही नक्कीच शिवासारखे वागा. तुम्ही पहिल्या वेळेला नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहात. तुम्ही पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून येण्यासाठी मी तुम्हाला शुभेच्छा देतो. परंतु, पुढच्या वेळेला अशाप्रकारे वागू नका की आपल्याला शेवटी माफी मागावी लागेल. तुम्ही कृपया असे वर्तन करणार नाही अशी मी अपेक्षा बाळगतो आणि माझ्याकडून मधल्या काळामध्ये कोणी दुःखावले गेले असतील. आमचे पदाधिकारी अधिकारी वर्ग व नगरसेवक जर दुःखावले गेले असतील तर मी सगळ्यांची क्षमा मागतो. आणि माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ५६ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांचे दिनांक ११/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर अनुसुचित जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुशेष भरणेबाबत.

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासन निर्णय क्र. एम.बी.एम.सी/२०००/१७७३/प्र.क १६३/नवी-२५/दि. ३१ ऑक्टोबर २००२ अन्वये. ''उपआयुक्त'' या पदनामाची रु. ८०००/१३५०० या वेतन श्रेणीतील ०३ पदे मंजुर आहेत. त्यातील एक पद अनुसूचित जातीतील उमेदवाराकरीता राखीव आहे. आज पर्यंत रिक्त असलेल्या ''उपायुक्त'' पदाचा अनुषेश भरलेला नाही. म्हणुन महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी रिक्त पदाचा मुद्दा उपस्थित करुन त्वरीत ''उपआयुक्त'' या रिक्त पदावर अनुसूचित जातीतील कर्मचाऱ्याची नेमणुक देण्यांचे निर्देश मा. आयुक्त मिरा भाईदर महानगरपालिका यांना दिला आहे.

३१ ऑक्टाबर २००२ च्या परिपत्रकानुसार एकुण ३ उपायुक्त पदावर शासन सेवेतुन प्रतिनियुक्तीने आलेले दोन उपायुक्त आहेत व अनुसुचित जातीकरीता राखीव असलेल्या उपायुक्त पदावर खुल्या वर्गातील सरळ सेवेत पद भरले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वर्गीकरण ''ड'' वर्गात झालेले असल्याने उपायुक्त संवर्गातील फक्त दोनच पदे अनुदेय आहेत. त्यात एक पद शासन सेवेतील प्रतिनियुक्तीचे भरावयाचे आहे. व एक पद अनुसूचित जातीकरीता राखीव आहे. महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी निर्देश केल्याप्रमाणे अनुसूचित जातीकरीता राखीव असलेले उपायुक्त पद भरण्याकरीता आपण खुल्या वर्गातील उपायुक्त म्हणुन सरळ सेवेने केलेली नेमणुक चुकीची झाल्याने दिसुन येते. त्यामुळे आपण खुल्या वर्गातील उपायुक्त म्हणुन सरळ सेवेने केलेली नेमणुक दि. ४ मे २००६ रोजीच्या शासन निर्णय आकृतीबंधाप्रमाणे त्यांची नेमणुक ''ड'' वर्गातील महापिालकेच्या समान वेतनश्रेणी ८०००/१३५०० च्या पशुशल्यचिकित्सक या पदावर करावी जेणे करुन खुल्या वर्गातील सरळ सेवेने नेमणुक केलेल्या अधिकाऱ्यांवर अन्याय होणार नाही. त्यामुळे अनुसूचित जातीकरीता राखीव असलेले उपायुक्त हे पद रिक्त होईल.

रिक्त झालेल्या उपायुक्त या पदावर मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापने वरील अनुसूचित जातीच्या वर्ग - २, च्या अधिकाऱ्यामधुन ज्याचा कार्यकाल एक वर्षापेक्षा जास्त झाला आहे. व शैक्षणिक पात्रता पदवीधर व एल.जी.एस परिक्षा प्रथम उत्तीर्ण असले तसेच मागील तीन वर्षाचा गोपनिय अहवाल तपासुन त्वरीत पदोन्नोती देण्यांत ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे. तसेच मा. सचिव साहेबांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधनियम १९९४ अनुसूचित प्रकरण क्र. २ नियम - १, प्रारुप नियम २००२ कलम (न - ब) अन्वये कारवाई करुन त्वरीत अंमलबजावणी होणेस हि सभा मंजुरी देत आहे. तसेच उपायुक्त संवर्गातील जुनी तीन पदे व एक नवीन पद निर्मितीस मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.  अनुमोदक :- सौ. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, सदर विषय आणण्याचे प्रयोजन निश्चितच प्रामाणिक आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये सन १९९७ रोजी राज्यशासनाकडून मंजूर झालेली आहे आणि आज खाजगी जागेवर जी आरक्षण आहेत. ती शासकीय जागा ३१५ वर शासकीय जागेवर २७ आरक्षणे आहेत. केन्द्र शासनाच्या जागेवर २० आरक्षणे आहेत व इतर संस्थेच्या जागेवरिल २४ आरक्षणे आहेत. मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी विस वर्षात म्हणजे आपल्याला सन २०१७ पर्यंत ही आरक्षणे विकसित करायची आहेत. मला प्रशासनाला असे सांगायचे आहे की आज जेवढी आरक्षणे आहेत. त्यामधील बऱ्याचशा आरक्षणाबाबत महापालिकेच्या प्रशासनाकडून एक यादी आलेली आहे. ती ३४ आरक्षणे महापालिकेच्या आरक्षणावर बाधीत आहे. त्या आरक्षणांवर अतिक्रमण झालेले आहे. आपल्याला सन २०१७ पर्यंत ही आरक्षणे विकसित करायची आहेत. ह्याच्यावर सन २०१७ पर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही. जी काही राहिलेली आरक्षणे आहेत. त्याच्यामध्ये अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे होउन जातील. मला प्रशासनाला असे सुचवायचे आहे की आता जी आरक्षणे आलेली आहेत किंवा महापालिकेने ज्या जागा ताब्यात घेण्याचे काम चालू केलेले आहे. ते निश्चितच चांगले आहे. महापालिकेला बऱ्याचशा जागा हस्तांतरीत झालेल्या आहेत. महापालिका बऱ्याचशा जागांचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करित आहे. आपण त्या जागांचा बी.ओ.टी. तत्वावर विकास केला तर महापालिकेला दरवर्षी रु. १ कोटीच्या वर उत्पन्नात भर पडणार आहे. माझी अशी विनंती आहे की सदर जागेवर सन २०१७ ची वाट न पाहता अजूनपर्यंत जी काही आरक्षणे शिल्लक आहेत. त्या आरक्षणाच्या संदर्भात तुम्ही त्या जागा जास्तीत जास्त लवकर हस्तांतरित करा. जेणेकरुन त्याच्यावर कुठल्याही पद्धतीचे अतिक्रमण होउ नये आणि अतिक्रमण झाल्यावर महापालिकेकडून ते अतिक्रमण तोडण्याची कार्यवाही होत नाही. आतापर्यंत जो इतिहास आहे. कारण आज प्रशासनाने ३४ जागा दिलेल्या आहेत. माझे या ठिकाणी असे म्हणणे आहे की, तुम्ही ३४ जागांऐवजी त्याच्यापेक्षा जास्त आरक्षणावर अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम झालेले आहे. महानगरपालिकेवर अशी वेळ पुन्हा येउ नये. यासाठीच महानगरपालिकेने निश्चीतच काळजी घ्यायची आहे. संबधित आरक्षणाच्या जागेवर महानगरपालिकेने काही बोर्ड किंवा कुठल्याही पध्दतीचे संरक्षणासाठी लावावे. जेणेकरुन त्या आरक्षणावर कूठल्याही पध्दतीचे अनधिकृत बांधकाम होउ नये. महानगरपालिकेच्या राहिलेल्या आरक्षणाचा लवकरात लवकर कार्यवाही करायची आहे. मी पुन्हा एकदा जास्त वेळ न घेता बोलतो की, मी असा ठराव मांडतो की जी राहिलेली आरक्षणे आहेत. महापालिकेने त्यांच्या कायद्यातील योजने अंर्तगत बसत असतील तर ती आरक्षणे लवकरात लवकर ताब्यात घ्यावीत. त्याचा विकास करावा. त्या विकासामार्फेत महिपालिकेचे उत्पन्न वाढावे म्हणुन ही जी राहिलेली आरक्षणे आहेत. ती महापालिकेने ताब्यात घ्यावीत असा मी ठराव मांडतो.

**शुभांगी नाईक :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांचे दिनांक २८/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ नुसार विकास योजना मंजुर झाल्यापासून दहा वर्षाच्या आत आरक्षणाची जागा ताब्यात न घेतल्याने आरक्षण व्यपगत झाल्यास कारवाई होणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २८ :-**

मी असा ठराव मांडतो की जी राहिलेली आरक्षणे आहेत. महापालिकेने त्यांच्या कायद्यातील योजने अंर्तगत बसत असतील तर ती आरक्षणे लवकरात लवकर ताब्यात घ्यावीत. त्याचा विकास करावा. त्या

विकासामार्फेत महिपालिकेचे उत्पन्न वाढावे म्हणुन ही जी राहिलेली आरक्षणे आहेत. ती महापालिकेने ताब्यात घ्यावीत असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. रतन पाटील. अनुमोदक :- सौ. शुभांगी नाईक.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, श्री. रतन पाटील यांनी जो ठराव मांडलेला आहे. मला त्याबाबत बोलायचे आहे. मी हा विषय तीन वर्षापुर्वी काढलेला होता. या विषयाबाबत मागच्या महासभेत गंभीर चर्चा झालेली होती. माझ्या प्रश्नाच्या आवाजावरुन या लोकांनी ३४ लोकांची यादी दिलेली होती. नंतर एक ठराव झालेला होता. आम्ही ही सर्व आरक्षणे घेउन बी.ओ.टी बेसीसवर वीस वर्षासाठी एम.जी.ओ. ना देण्याचे ठरलेले होत. माझी अशी सुचना आहे. की, आता हा टर्म संपलेला आहे. आम्ही गेल्यांनतर दोन तीन महिने हे सभागृह चालणार नाही. आपण १० वर्ष कुठलीही कार्यवाही केलेली नाही. कारण काही लिमिटेशन असते. कूठल्याही राजकीय पक्षाचा दबाव असतो किंवा अन्य काही गोष्टी असतात. आतासुध्दा आपल्याकडे दिड महिन्याचा कालावधी आहे.तुम्हाला ह्याच्यामधील जी जी आरक्षणे एम.जी.ओ देता येईल. आपण त्यासाठी ठराव केलेला होता की, वर्तमानपत्रामधुन रितसर टेंडर काढुन आम्ही तीस वर्षासाठी देउ. मी तुम्हाला हॉस्पिटलसाठी असे निवेदन करतो की, जर कुठलेही एखादे आरक्षण हॉस्पिटलसाठी असे निवेदन करतो की, जर कुठले तरी एखादे आरक्षण हॉस्पिटल आणि लायब्ररीसाठी, हॉस्पीटलसाठी २ कोटी रु. आणि लायब्ररी साठी रु. १ कोटी खर्च करण्याची मी तुम्हाला तयारी दाखवतो तुम्ही याची नोंद घ्या. अग्रवाल सेवा समिती ही महाराष्ट्रची ''आदर्श लायब्ररी'' आणि हॉस्पिटलसाठी परोपकार मुंबई ही संस्था रु. २ कोटी खर्च करण्यास तयार आहे. म्हणुन याची अधिकाऱ्यांनी ताबतोब दखल घ्यावी. अशी मी सुचना मांडतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, गेल्या पाच वर्षामध्ये मिरा भाईंदरच्या या सभागृहामध्ये बऱ्याचश्या पध्दतीने बऱ्याचश्या वेळेला वादळ उठलेले होते. बऱ्याचशा वेळेला महानगरपालिकेच्या विकास कामामध्ये आम्ही सर्व विरोधकांनी आपल्याला सहकार्य केलेले होते. आज ही महानगरपालिकेची शेवटची सभा असल्यामुळे समारोपांच्या संदर्भात मी मिरा भाईंदरचा महापालिकेच्या विभागाच्या अंर्तगत जी काही कामे झालेली आहेत त्याचा एक छोटासा आपल्याला वेळ पाहिजे होती. कारण महापालिकेच्या माध्यमातुन सर्व सन्मा. सदस्यांच्या सहकार्याने झालेली आहे. ती नाकारता येत नाही. काही गोष्टी मागेपुढे झाल्या असतील परंतु, आमच्या शिवसेनेने विकास कामांमध्ये या सभागृहाला नेहमी सहकार्य केलेले होते. आम्ही या सभागृहाला आणि प्रशासनाला सहकार्य केलेले होते. आज मिरा भाईंदर मध्ये युती सरकारच्या काळात उड्डाण पुल झालेले आहे. हा उड्डाण पुल मिरा भाईंदरची शान आहे. भाईंदर (पु.) आणि भाईंदर (प.) ला जोडणारा उड्डाणपुल हा युती सरकारने दिलेली त्यावेळेची एक देणगी आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराज मार्गाची गणती मुंबईच्या बरोबरीने करतो. मुंबईलासुध्दा असे रोड नाहीत आपण तशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज मार्ग विकसीत केलेला आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, उड्डाणपुलाचा युती शासनाची काय संबध आहे? ते मला समजत नाही.

**रतन पाटील :-**

आपण जी काही बी.ओ.टी तत्वावर आरक्षणे घेतलेली आहेत. त्याचा विकास होत आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे उद्याने, मैदाने विकसीत करण्याचा जो सपाटा लावलेला आहे. त्यामुळे मिरा भाईदरच्या सौंदर्यामध्ये निश्‍चितच भर पडत आहे. शहरातील डांबरी रस्ते, फुटपाथ, गटारे चांगल्या पध्दतीने होत आहेत, मार्गी लागत आहेत. महापालिकेच्या आरोग्याची समस्या आहे. महापालिकेच्या गरीब वर्गाला आपल्याकडुन सुविधा मिळण्यासाठी आपण जी आरोग्य केंद्र सुरु केलेली आहेत. ती खरोखर वाखाण्यासारखी आहेत. आपण महानगरपलिकेतर्फे एक चांगली सुविधा नागरिकांना भेट म्हणुन दिलेली आहे. सिग्नलची यंत्रणा उपलब्ध करुन दिलेली आहे. ते नागरी सुविधा केंद्र सुसज्ज आणि वाखाण्यासारखे आहे. आपण पाच मिनिटामध्ये नागरिकांना कुठल्याही तऱ्हेचे दाखले देउ शकातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे सुध्दा अनावरण झालेले आहे. शहरामध्ये ठिकठिकाणी वाहतुक बेटे केल्यामुळे श्हरातील रस्त्याच्या संदर्भामध्ये निश्‍चितच भर पडलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, फक्त शिवसेनेनेच शहराचा विकास केलेला आहे का?

**रतन पाटील :-**

या शहरामध्ये युतीचे सरकार होते. म्हणुन या शहराला ५० एल.जे पाण्याची योजना दिलेली आहे. आज महापालिका ते पाणी पित आहे. महापालिकेने ५० एम.एल.डी योजना चांगल्या पध्दतीने राबवुन महापालिकेचे पाण्याचे वाटप चांगल्या पध्दतीने चालु आहे. आपण या योजना सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने राबवलेल्या आहेत. जर अन्य कोणाला काही गेले असेल किंवा जास्त पाणी गेले असेल तर तो वितरण व्यवस्थेचा भाग आहे. परंतु, प्रशासन पाच वर्षामध्ये चालक आणि मालक असे समजुन प्रशासन आणि नगरसेवक मिळुन आपण मिरा भाईंदर शहराच्या विकासाचा रथ निश्चितच पाच वर्षामध्ये पुढे गेलेला आहे. याच्यापुढे ही हा विकासाचा रथ पुढे – पुढे जाईल. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरिकांना निश्चीत चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी शिवसेना कटीबध्द राहिले आणि कटिबध्द असणार आहे. अशी मी सर्व नगरसेवकां कडुन अपेक्षा बाळगतो . जय हिंद, जय महाराष्ट्र.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, मी तुमच्या एक निदर्शनास आणु इच्छिते आणि एक निवेदन करते की आपण मागच्या वेळेला डेंग्युच्या रुग्णांना जी मदत जाहिर केलेली होती त्या फाईल कुठे पेंडीग असतील तर त्या रुग्णांना ती मदत त्वरीत करण्यांत यांनी आणि आपण तसे आदेश काढावेत.

**हॅरल बार्जीस :-**

प्रकरण क्र. ५४ ह्याच्यावर चर्चा होताना आपल्याला जी स्किम ताब्यात घ्यायची होती. त्या स्किममध्ये जे सेवेमध्ये कर्मचारी आहेत. त्या सेवेमध्ये असलेल्या कर्मचाऱ्याबाबत प्रशासनाची चर्चा केल्यानंतर संबधित खात्याला कर्मचाऱ्यांची आवश्यकता असे खात्याचे आग्रही मत आहे. तरी सुध्दा मी सभागृहाच्या वतीने आपणांस विनंती करतो की, तुम्ही या विषयावर गटनेत्यांशी चर्चा करुन या विषयावर निर्णय घ्यावा. अशी माझी विनंती आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मी क्रॉंग्रेस पक्षातर्फे दोन शब्द बोलु इच्छिते की, सदर सभागृहामध्ये महापालिका आल्यानंतर तत्कालीन कमिशनर श्री. शिवमुर्ती नाईक साहेब होते. त्याच्यानंतर श्री. आर.डी शिंदे साहेब होते. आताचे कमिश्नर श्री. सुदामराव गायकवाडसाहेब मिरा भाईंदर महानगरपालिका उप आयुक्तसाहेब सर्व अधिकारी वर्ग , संपुर्ण प्रशासन, कर्मचारी वर्ग आणि आपण शासनावर बसणारे पदाधिकारी व नगरसेवक या सर्वांनी मिळुन पाच वर्षामध्ये खेळीमेळीच्या वातावरणात सभा चालवलेली होती. आपला काही गोष्टींबाबत शासन आणि प्रशासनाचा वादसुध्दा निर्माण झालेला होता. आपण आज खेळीमेळीच्या वातावरणात तो वाद सोडवलेला घेता. आपण संपुर्ण विषयावर ठराव मंजुर करुन पाच वर्षामध्ये सर्व कार्यपध्दती पार पडलेल्या आहेत. हा पाच वर्षातील शेवटचा दहा मिनिटाचा क्षण आहे. आमच्याकडुन आतापर्यंत प्रशासनाचे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांचे आम्ही कोणाचेही मन दुखावले असेल तर आम्ही क्षमा मागतो कॉंग्रेस पक्ष असु दे, बीजेपी असु दे, शिवसेना असु दे, कोणताही पक्ष असु दे आम्ही त्यांचे अभिनंदन व्यक्त करतो. कुठलाही पक्ष असु दे. परंतु आम्हाला मिरा भाईदर महानगरपालिकेच्या प्रशासनाने हातभार दिला साथ दिली. कार्यपध्दती दिली. आम्ही त्यामुळे विकासाची कामे करु शकलो म्हणुन मी प्रशासनाचे क्रॉंग्रेस पक्षाच्यावतीने अभिनंदन व्यक्त करते.

**हॅरल बार्जीस :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, सन २००२ रोजी निवडणुका झाल्यांनतर या सभागृहामधील ८४ नगरसेवक या मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी कार्यरत होते. सत्ताधारी राष्ट्रवादी क्रॉग्रेस पक्ष म्हणजेच मी एक राष्ट्रवादी क्रॉंग्रेस पक्षाचे नेतृत्व करीत असलो तरी या सभागृहाचा सभागृहनेता या नात्याने मला गेली दोन वर्ष काम करण्याची संधी मिळालेली आहे सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि भाजपा – शिवसेना हे जरी विरोधी पक्ष असले तरी सभागृहामध्ये असा कधीही अनुभव आलेला नाही. शहराच्या विकासासाठी शहराच्या हितासाठी संपुर्ण सभागृहाने नक्कीच एकमताने गेल्या पाच वर्षामध्ये अनेक घडामोडी घडलेल्या होत्या. प्रथम महापौर सौ. मायरा मंडोसा यांनी अडिच वर्षाच्या कार्यकालामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने कामकाज केलेले होते. दुसऱ्या टर्ममध्ये तुम्ही गेल्या अडीच वर्षापासुन या शहरामध्ये महापौर पदावर कार्यरत आहात. मॅडम, या शहराचा विकास करीत असतांना या सभागृहामध्ये कामकाज करीत असतानां जरी सर्व सन्मा. सदस्यांचे सहकार्य लाभलेले असेल तरी सुध्दा प्रशासनावरील आरोप प्रत्यारोप हा कामकाजाचा नित्याचाच भाग आहे. सत्ताधारी पक्ष म्हणा, विरोधी पक्ष म्हणा ती लोक प्रशासनावर आरोप प्रत्यारोप करणारच सध्या प्रशासन हे परिपूर्ण नाही. परंतू, त्यातल्या त्यात गेली पाच वर्षे प्रशासनाच्या वतीने आपण अतिशय चांगल्या प्रकारे सभागृहाला मदत आणि सहकार्य केलेले असले तरीसुद्धा या सभागृहाच्यावतीने प्रशासनाचे प्रमुख मा. आयुक्त, श्री. सुदामराव गायकवाड, उपायुक्त म्हणून श्री. बालाजी खतगांवकर इतर सर्व उपायुक्त, सर्व खात्याचे विविध अधिकारी मी या सर्वांचे या सभागृहाच्यावतीने विशेष धन्यवाद देतो. तुम्ही आम्हाला या शहराच्या विकासासाठी आम्हाला जे सहकार्य केलेले होते. आम्हाला या विकासाच्या बाबतीमध्ये जी मदत केलेली आहे. मी त्याबाबत सभागृहाच्यावतीने धन्यवाद देतो. सौ. मायरा मेन्डोन्सा मॅडम यांनी जो

अडीच वर्षे कारभार केला आणि सौ. निर्मला सावळे – कांबळे मॅडम यांनी अडीच वर्षे जो कारभार केला त्याच्यामध्ये शेवटच्या टप्प्यात ज्या घडामोडी घडलेल्या होत्या. तरीसुद्धा तुम्ही या शहरामध्ये चांगले काम केलेले आहे. एक सभागृहनेता या नात्याने मी या सभागृहाच्यावतीने आपलेसुद्धा धन्यवाद देतो आणि या सभागृहामधील सर्व सदस्यांना मग ते सत्ताधारी पक्षाचे असुदे, विरोधी पक्षाचे असुदे यासर्व सदस्यांना पुढे येणाऱ्या निवडणूकीमध्ये त्यांनी चांगल्याप्रकारे विजयश्री प्राप्त करून या सभागृहामध्ये पुन्हा एकदा या शहराच्या विकासासाठी प्रतिनिधीत्व करावे अशा मी सर्व सदस्यांना शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सभागृहनेते, श्री. हॅरल बोर्जीस यांनी सर्वांचे अभिनंदन केलेले आहे आणि सर्वांना शुभेच्छा दिलेल्या आहेत. प्रत्येक पक्षाच्या मान्यवरांनी शेवटची सभा असेल तर बोलावे अशी प्रथा असते. गेल्या ५ वर्षाच्या कालावधीमध्ये आपण सगळ्यांनी जास्तीत जास्त एकत्र राहण्याचा प्रयत्न केलेला होता हे खरे आहे. कदाचित, कोणाच्या बोलण्यातुन एखादा शब्द निघाला असेल त्याचा अनेकांनी वेगवेगळा अर्थ लावला असेल त्याच्यावर जे बोलले त्यांनी माफी मागितली असेल किंवा आपण त्यावेळेला त्याच्या विरोधात असे बोलू नये की अशी इच्छा व्यक्त केलेली असेल तरी काही गोष्टी आल्या असतील हे ही खरे आहे. परंतु, आपण कामकाज करताना या शहराला जे काही देणे होते किंवा द्यायला पाहिजे होता. तो आपपपल्या परिने पक्षाने केलेला आहे. भारतीय जनता पार्टीच्या संख्येच्या दृष्टीने भारतीय जनता पार्टीने अत्यंत पारदर्शक कामकाज करण्याचा प्रयत्न केलेला होता. आज शेवटचा दिवस आहे. आता दोन तीन मिनिटांचा अवधी आहे. आपण त्याच्यामध्ये कोणावरही टीकाटीपणी करणार नाही. कॉंग्रेस पक्षाला किती यश आले? किंवा राष्ट्रवादीला किती यश आले? हे बघणार नाही. परंतु जे सत्ताधारी होते ते काय नाही करू शकले नाहीत त्याची खंत त्यांना शेवटच्या आठवड्यात वाटलेली आहे. मला याबद्दल आनंद होतो. आपण द्यायला पाहिजे होतो परंतु आपण देउ शकलो नाही. आपण सत्तेत असताना त्यांना देउ शकलो नाही. हे त्रिवार सत्य आहे. आपल्या तोंडून निघाले त्याबद्दल खेद वाटतो. सभागृहनेते मा. महापौरांबद्दल बोलले मी दोन्ही मा. महापौरांचे एकदम मनापासुन अभिनंदन करतो. त्यांनी त्यांच्या पद्धतीने त्यांना जो कालावधी मिळालेला होता तो कालावधी पार पाडण्याचा प्रयत्न केलेला होता. सौ. मायरा मेन्डोन्सा मॅडमने कालावधी पार पाडण्याचा प्रयत्न केला तेव्हा संपुर्ण सभागृह त्यांचे अभिनंदन करित होते. परंतु, ह्यांचे काही चुकले असे आम्हाला वाटलेले नाही. त्यांना जे काही वाटायचे ते वाटले असेल. परंतु, एकवेळ त्यांनी शेवटच्या क्षणाला मोठेपणा दाखवला. मा. महापौर मॅडमनी त्यांच्या परिने चांगले काम केलेले आहे. हाही एक मोठा दिलदारपणा आहे आणि सभागृहामध्ये तो असला पाहिजे आपण काम करतेवेळी अनेक योजनांमध्ये म्हणजे आता अवधी फार कमी आहे. त्यामुळे कॉंग्रेस पक्ष काय करू शकला नाही? राष्ट्रवादी पक्ष काय करू शकला नाही? त्याच्यापेक्षा आमची संख्या कमी आहे. आमची संख्या कमी असतानासुद्धा प्रशासनाच्यावतीने मा. सभागृहातील सदस्यांनी जे भारतीय जनता पार्टीचे सदस्य आहेत. या सभागृहात बोलते वेळी सगळ्यांना सहकार्य केले त्याबद्दल मी निश्चितच या सभागृहातील सर्वपक्षाच्या सदस्यांनी सहकार्य केलेले आहे. मग तो सदस्य कॉंग्रेस पक्षाचा असुदे, राष्ट्रवादीचा असुदे, शिवसेनेचा असुदे, जनता दलाचा असुदे किंवा अपक्षाचा असुदे आम्हाला या सर्वसदस्यांनी समजुन घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर अनेक दबाव असतानासुद्धा अधिकाऱ्यांनी जे काही सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल भारतीय जनता पार्टी ऋणी आहे. कारण आज डायसवर अधिकारी किंवा आज जे अधिकारी नाहीत आणि यापुर्वी जे अधिकारी होते. मग ते श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असु दे किंवा आर.डी.शिंदे साहेब असु दे. वेगवेगळ्या खात्योच जे अधिकारी या सभागृहात पाच वर्षाच्या कालावधीत बसलेले आहेत. त्यांनी आम्हांला आपापल्या परिने सहकार्य केलेले आहे. जनतेने आमच्यावर जो विश्वास टाकलेला आहे की आम्हाला या शहरामध्ये देणारे कोण आहे? भारतीय जनता पार्टी देणार आहे. म्हणून अशा पद्धतीने आमच्यावर विश्वास टाकून आमच्याबाबत काही गोष्टी करुन घेण्यास आम्हाला जे काही प्रोत्साहित केलेले आहे. आम्ही आमच्या त्या आम जनतेला सुद्धा धन्यवाद देतो. कारण त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवलेला आहे. कधी कधी असे वाटत होते की आपण सभागृहामध्ये कुठेतरी एक आहोत. आपला दर्जा जातो का? परंतु, असे कुठेही घडलेले नाही. अनेक महापालिकांमध्ये असे अनेक प्रसंग घडले की ज्यामुळे कामकाजाची शान वाढली नाही. परंतु, संपूर्ण शहराचा नागरिकांचा अपमान होणाऱ्या घटना घडल्या. आपल्या महापालिकेमध्ये अशी एकसुद्धा अप्रिय घटना घडलेली नाही. आपण सर्वांना याचा अभिमान आहे हे सगळे करतेवेळी तुमच्या सगळ्यांच्या लक्षात आहे की जर आपल्याला कुठेही काम करायला जायचे असेल तर कोणताही पक्ष असू दे कोणताही अधिकारी कितीही सक्षम असला तरी पत्रकारिता आणि प्रेक्षक गॅलरी यामध्ये आजच्या दिवसात पाच वर्षे ज्यांनी ज्यांनी पुन्हा पुन्हा येउन हे कामकाज करण्याचा प्रयत्न केलेला होता. मी त्यांनासुद्धा धन्यवाद देतो आणि आपण चौथा स्तंभ जेव्हा बघतो. त्या पत्रकारांनी आपापल्या परिने त्यांच्या स्वतंत्रतेनुसार आपल्याबद्दल जे छापण्याचा प्रयत्न केलेला होता. जर काही चुकले असेल तर त्यांनी चुकले म्हणून छापलेले होते. बरोबर असेल तर बरोबर म्हणून छापलेले होते. मी त्या पत्रकारांना धन्यवाद देतो आणि पुन्हा एकदा अपेक्षा करतो. सहाजिकच या सगळ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळे भारतीय जनता पार्टीची ताकद वाढलेली आहे. पुढच्या सभागृहामध्ये त्यांची ताकद मोठया प्रमाणात वाढणार आहे असा सगळ्यांना विश्वास आहे. त्यामुळे आम्हाला सगळ्यांनी तसा आर्शिवाद दिलेला आहे. मी तसा सगळ्यांना आर्शिवाद देतो. जे ८४ नगरसेवक या सभागृहात होते. ते त्यांच्या

पक्षाच्या नियमानुसार निवडणुक लढवले. ज्यांना संधी मिळेल त्यांचे अभिनंदन करतो. ज्यांना संधी मिळणार नाही त्यांनी पाच वर्षे दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. प्रत्येकाला निवडून यावे असे वाटते. सगळे न बोलणाऱ्यांनासुद्धा निवडून यावे असे वाटते. मी निवडून येणाऱ्या सर्व सदस्यांना शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहात दि. ११ ऑगस्ट २००२ रोजी निवडणुका झालेल्या होत्या. मी त्याच्या अगोदरच्या टर्मलासुद्धा नगरसेवक होतो. सर्वप्रथम आमच्या विभागातील मतदारांनी आम्हाला या सभागृहात जागरुक मतदार या नात्याने पाठवले मी त्याबद्दल त्यांचा आभारी आहे. तसेच, या सभागृहात गेल्या पाच वर्षामध्ये अनेक वादग्रस्त विषयावंर आमचा तुमच्याशी संघर्ष झालेला होता. मी तुमची स्तुती करित नाही. परंतु, जे वास्तव आहे ते आहे. आम्ही विरोधी पक्षाच्या बाकावर बसलो तर आम्हाला तो भुमिका निभावी लागते आणि आम्हाला नागरिकानेच भुमिका निभावण्यासाठी निवडून देत असतात. आम्हाला याचे आत्मसुख आहे की आम्ही विरोधी पक्षाची जी भुमिका होती ती आमची अत्यंत अल्प संख्याबळ असतानासुद्धा आम्ही ते प्रभावीपणे मांडले आणि त्याच्यामध्ये यशस्वी झालेलो आहोत. अनेक सभागृहाचे एकमताने केलेले ठराव कायदयाच्या अधिकाराने बरोबर होते. आम्ही जे म्हणत होतो ते बरोबर होते. म्हणून शासन स्तरापासून ते विखंडीत करुन आणण्यापर्यंतचे काम आम्ही यशस्वीपणे केलेले होते. आमचे तुमच्याबरोबर बऱ्याचशा केसमध्ये संघर्ष झालेले होते. आम्ही त्या विरोधात उच्च न्यायालयात लढलेलो होतो. श्री. जयंत पाटील यांचा आभारी आहे. सभागृहामध्ये कटूता असावी, विरोधीपण असावे. सर्व काही असावे. परंतु, खेळाडू वृत्ती सुद्धा असावी. खरं बघायला गेलो तर श्री. जयंत पाटील यांनी जे काही केलेले आहे मी त्याची मा. महापौर, विरोधी पक्षनेता, सभागृहनेते यांच्याकडून एक अपेक्षा ठेवलेली होती. परंतु, आमच्या त्या अपेक्षा फोल ठरलेल्या आहेत. आता शेवटी  श्री. जयंत पाटील जे काही बोलले मी त्याबद्दल आभारी आहे. ती घटना तीन ते सहा महिन्यापूर्वी घडलेली होती. ज्यावेळेला निकाल आला त्यावेळेला हे यायला पाहिजे होते. कारण आम्ही जे काम केले त्यासाठी सभागृहातील सर्व व्यक्ती, प्रेक्षक गॅलरीत बसलेल्या सर्व व्यक्ती, पत्रकार कक्षात बसलेल्या सर्व व्यक्ती अशा सगळ्या स्तरातील लोकांना त्या इस्पितळाचा उपयोग होणार आहे. आपण ते काम नाकारले तरी उच्च न्यायालयातून आणलेले आहे. कधीही सभागृहातील विजयश्रीपेक्षा उच्च न्यायालयातील विजयश्री कधीही श्रेष्ठ असते. त्याला महाराष्ट्रभर आणि अन्य बऱ्याच ठिकाणी त्याचा गौरव आलेला आहे. आपल्यामुळे मला ती संधी मिळाली. जर तुम्ही राजकारण्यांच्या नादीलागून माझा प्रस्ताव फेटाळला नसता तर मला उच्च न्यायालय बघावे लागले नसते. मी खासकरुन तुमचा आभारी आहे. कारण तुम्ही मला विरोध केला म्हणून मला पुढची पायरी चढावी लागली आणि माझ्या विजयाची पताका संपूर्ण महाराष्ट्रात लागलेली आहे. मी त्याबद्दल तुमचा आभारी आहे. मी या महापालिकेतील झाडू मारणाऱ्यापासूनचा जो कर्मचारी आहे. तो थेट आमच्या आयुक्तांपर्यंत जेवढे क्लास-१, क्लास-२, चतुर्थ श्रेणीपर्यंतच्या सर्व कर्मचाऱ्यांना मी मनस्वी आभारी आहे. कारण आज आमच्याकडे वॉर्ड साफ करणारे झाडूवाले नसते तर आम्हाला नगरसेवकांना लोकांनी चप्पलेने मारले असते. म्हणून खालच्या स्तराच्या कर्मचाऱ्यापासून ते वरच्या आयुक्त स्तराच्या अधिकाऱ्यांपर्यंत मी तुमचा ऋणी आहे. मी पाच वर्षामध्ये आमची भुमिका मांडताना कोणाला दुःखावले असेल तर मी त्याची माफी मागतो. आपण येत्या सभागृहात पुन्हा एकदा भेटू. एवढे बोलून मी माझे भाषण संपवतो. जयहिन्द. जय महाराष्ट्र.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की आता श्री. हॅरल बोर्जीस यांनी राष्ट्रवादी, भाजपा, शिवसेना पक्षाचे नांव घेतले. परंतु, त्यांनी जनता दलाचे नांव घेतलेले नाही. यांना विसर पडलेला आहे. मा. महापौर मॅडम, मी राजकारणी नाही. मी नगरसेविका झाले. मला श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी नगरसेविका बनवली. मी त्याबद्दल त्यांचे आभार मानते. मा. महापौर मॅडम, डायसवर बसलेले सगळे अधिकारी, उप-आयुक्त, जे झाडू कामगार असतील त्यांनी मला पाच वर्षे जी साथ दिली. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानते.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की आतापर्यंतच्या कालावधीमध्ये श्री. शिवमुर्ती नाईकसाहेब, श्री. आर.डी.शिंदे साहेब आणि श्री. सुदामराव गायकवाड साहेब या आयुक्तांनी या शहराच्या विकास कामांकरिता खूप मेहनत घेउन या शहराचा विकास केलेला आहे. यापूर्वीच्या महापौर सौ. मायरा मेन्डोसा आणि सौ. निर्मला सावळे/कांबळे या दोन्ही महापौरांनी भवितव्य उज्वल केले. मी त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आयुक्त, उप-आयुक्त व सर्व कर्मचाऱ्यांनी नगरसेवक पदावर असताना मला जे सहकार्य केलेले होते. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सर्व सभासदांनी मला सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आम्ही भुमिका मांडताना सर्व पक्षांनी मला व माझ्या पक्षाला सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व प्रशासन अधिकारी, माजी महापौर, सर्व पक्षांच्या नगरसेवक-नगरसेविका, सर्व पत्रकार बंधू आणि कर्मचारी वर्ग यांना मी सांगू इच्छितो की मी या ठिकाणी गेली पाच वर्षे जनतेची सेवा करित असताना जे काही प्रश्न उपस्थित केलेले होते. ते प्रश्न विरोधकांनी उपस्थित केलेले होते. सत्ताधाऱ्यांनी उपस्थित केलेले होते. तरीसुद्धा ते प्रश्न

प्रशासनाने समजून घेतलेले होते आणि त्याच्यावर चांगल्या तऱ्हेने या शहराचा विकास करण्यासाठी अभ्यासपूर्वक सहकार्य केले मी त्याबद्दल आपणा सर्वांना धन्यवाद देतो. आता जो येणारा काळ आहे त्या काळासाठी सर्व पक्षाच्या नगरसेवकांना हार्दिक शुभेच्छा देतो. मी तुम्हाला या ठिकाणी निश्चितपणे सांगू इच्छितो की मिरा भाईंदर महानगरपालिकेवर येणाऱ्या काळात काँग्रेसचा झेंडा निश्चितपणे लागेल. याची आशा बाळगतो. ही आशा साकार करण्यासाठी आपल्याला सर्व लोक सहकार्य करतील. ही जनतासुद्धा सहकार्य करेल. मी या सर्वांचे हार्दिक आभार मानून माझे दोन शब्द संपवतो. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी बीजेपीचा झेंडा फडकेल असे सांगितले आणि आदरणीय श्री. तुळशीदास म्हात्रे कॉंग्रेसचा झेंडा लागेल असे सांगितले. आदरणीय महापौर साहेब आज या शेवटच्या क्षणाला जास्त बोलायचे नाही. वेगवेगळ्या नेत्यांनी अगदी योग्यरित्या जरुर त्या शब्दांविषयी गेल्या पाच वर्षाचे सिंहावलोकन केलेले आहे आणि प्रामाणिकपणे एक कबूली दिलेली आहे की जे काही झालेले आहे ते चांगले झालेले आहे. त्याबद्दल पुढे जाताना अत्यंत समाधान होत आहे. आदरणीय महापौर साहेब, पेशवाईमध्ये साडे तीन शहाणे होते. आम्हांला आमच्या वरिष्ठांनी सांगितले की आम्ही त्या तीन शहाण्यांच्या बुद्धिमत्ते एवढे पात्र नाही. त्यांची विद्वता, त्यांचे जे विचार आहेत. आमच्याकडे एवढी प्रगल्भता नाही. आमच्या वरिष्ठांनी तीन सभागृह नेत्यांना निर्देश दिलेले होते. आदरणीय श्री. हॅरल बोर्जीस जे विदयमान सभागृहनेते आहेत. माझ्या डावीकडे बसलेले पूर्व सभागृह नेते श्री. ध्रुवकिशोर पाटील आणि मी आम्हाला हे सांगण्यात आलेले आहे की तुम्ही सभागृहात उपस्थित रहा. या सर्व मंडळीचे कौतुक करा आणि त्यांना राष्ट्रवादी पक्षाच्यावतीने धन्यवाद दया. म्हणून मी ते काम करित आहे. मला कल्पना आहे की या ठिकाणी ४० टक्के नवीन नगरसेवक होते आणि ६० टक्के जुने नगरसेवक होते. परंतु, राजकारण आणि चढाओढीच्या स्पर्धेमध्ये काही नगरसेवक सभागृहात उत्कृष्ट कामगिरी करुन गेलेले आहेत. जे ४० टक्के नगरसेवक होते ते राजकारण शिकले. मी माझ्या उत्तन परिसराच्या बाजूने मुद्दामून बोलेन की आमच्याकडील श्री. चिंतामण पाटील, श्री. टेरी परेरा, श्री. जेम्स कोलासो, श्री. जोजफ घोन्सालवीस आणि श्रीम. भानुताई हे पाच नवीन नगरसेवक या सभागृहात आलेले होते. आमच्या मंडळींना आपल्या शहरवासियांनी आणि पुढारलेल्या माणसांनी समजून घेतले. आम्हांला सहकार्य केले. त्याबद्दल मी त्या परिसराच्यावतीने आपणा सर्वांना धन्यवाद देतो आणि त्यासोबत मा. महापौर मॅडम, मी मुद्दामून आपल्या खात्याच्या सर्व अधिकाऱ्यांना आयुक्तांपासून, उप-आयुक्त आणि जसे श्री. मिलन म्हात्रे बोलले त्याप्रमाणे तळागाळात काम करणाचा महापालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षा रक्षक, झाडूवाले, पाणीवाले या सगळ्यांना मी धन्यवाद देतो. मी शेवटचे धन्यवाद आदरणीय महापौर सौ. निर्मला सावळे/कांबळे यांना देतो. राष्ट्रवादी पक्षाने राजकीय कृती करुन आदरणीय महापौर आणि आपल्यामध्ये फारकत केली. परंतु, या गोष्टी फार क्षणभंगूर असतात. कदाचित या शहराचे चित्र बदलले आणि तुम्ही मुख्य प्रवाहात सामील व्हाल. तुम्ही शहरासाठी केलेले कार्य आणि गरिब झोपडपट्टी वासियांसाठी व्यक्त केलेली तुमची तळमळ वाखाणण्यासारखी होती. तुम्हाला आमच्याकडून काही सहकार्य अभिप्रेत असेल आणि पक्षामुळे ते सहकार्य मिळाले नसेल आम्हाला त्याची खंत राहिल. परंतु, आपल्या नेतृत्वाखाली या शहरातील सर्व अधिकारी वर्गाने अत्यंत चांगले काम केलेले सर्व नगरसेवक,पक्षाचे पदाधिकारी आणि वृत्तपत्राचे प्रतिनिधी यांनी मोलाची भुमिका बजावली मी त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो. या सभागृहामध्ये आम्ही असलो किंवा नसलो.तरी बचेंगे तो और भी लढेंगे एवढे सांगुन मी माझे दोन शब्द संपवतो जय हिंद, जय महाराष्ट्र.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी स्विकृत नगरसेवकांचा प्रतिनिधी म्हणुन आपले दोन शब्द या ठिकाणी बोलु इच्छितो यासभागृहामध्ये एकुण पाच स्विकृत नगरसेवक आहेत. त्यापैकी चार स्विकृत नगरसेवक या ठिकाणी उपस्थित नाहीत. सन १९८१ पासुन मी मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये समाजिक काम करत करत अनेक लोकांच्या संपर्कात आलो. काँग्रेस पक्षांनी शिवसेनेनी व मिरा भाईंदर शहरविकास आघाडीनी एक योग्य निर्णय घेवून मला या सभाशास्त्रामध्ये आपल्या सर्वांच्या बरोबर काम करण्याची संधी दिली. मला त्या बद्दल सर्वांचा आभारी आहे. विशेष करुन माझे अनुमोदन जनता दलाचे गटनेते सौ. नयना म्हात्रे आणि श्री. सुरेंद्र प्रसाद तिवारी हे तिघे होते. आज आपण सगळेच एकमेकांना शुभेच्छा देत आहोत. मी या मिरा भाईंदर शहराच्या झोपडपट्टी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर काम केलेले आहे. कारण मला ती संधी मिळालेली होती. मला नगरिकांना संपर्क केलेला होता. आणि त्यांची जी काही गरज किंवा घरगुती प्रॉब्लेम किंवा मला जे काही प्रॉब्लेम महापालिकेकडुन मला सोडवता येतील मी त्या दृष्टीकोनातुन मंत्रालय ते लोकशाही दिवस, लोकशाही दिवस ते जनता दरबार, जनता दरबार ते महासभा मी अशा प्रत्येक ठिकाणी वेळोवेळी पाठपुरावा केल्यामुळे मी ५० टक्के सक्सेसफुल झालो. मी दुर्देवाने पुर्णपणे सस्केस झालो नाही कारण माझी लॉबी कमजोर पडलेली होती. आमच्याकडे संख्याबळ कमी आहे. माझ्याबरोबर फक्त सौ. नयन म्हात्रे आहेत आणि त्या राजकारणी नाहीत. मला अधिकाऱ्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहयोग दिलेला आहे. सभागृहामध्ये हायकोर्ट आणि सुप्रिम कोर्टाच्या मॅटर बाबत बोलले जाते. मी त्या अनुषंगाने लॉचा विद्यार्थी असल्यामुळे मला त्या विषयाची आवड आहे. म्हणुन मी न्यूज पेपरची कटिंग वगैरे जमा करित असतो. मी त्यामुळे एखादा शासन निर्णय किंवा एखाद्या शासन परिपत्रकाचा पाठपुरावा करुन प्रशासनाकडे काहीतरी मागत गेलेलो आहे. परंतु, मी प्रशासनाला

कधी काहीही दिलेले नाही. या ठिकाणी फक्त माझ्या क्षेत्रामध्ये असे नाही मी नगरसेवक म्हणुन निवडुन आलो त्यावेळेला ती कामे माझी नव्हती. म्हणजे एका खासदार लेव्हलची जी कामे असतात. मी ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणी एखाद्याची मनिऑर्डर जरी यु.पी ला पोहोचली नाही तरी तो माणुस मला येउन सांगतो की साहब मेरा मनिऑर्डर घरपर नही पहुचा आप मुझे लेटर दिजिऐ। तेव्हा मी त्या माणसाला कधीही हे काम माझे नाही. असे बोललो नव्हतो. मी नगरसेवक या नात्याने काम न करता विशेषकरुन म्हणुन एन.जी.ओ मधिल आहे. त्यामुळे मी नॉन गर्व्हमेंट ऑफ ऑरगने मधुन काम करित असल्यामुळे रात्र शाळेमध्ये शिकणारे विद्यार्थी, गटई कामगार करणारे दलित, मागासवर्गीय यांच्यासाठी सदैव काम करित आलेलो आहे. मी पिपल्स एज्युकेशन सोसायटी ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी संस्था उघडलेली आहे मी. अशा कॉलेजेस मधुन डिगऱ्या वगैरे केल्यामुळे मला त्या लोकांमध्ये राहण्याची व काम करण्याची संधी मिळालेली होती. सुदैवाने मी या पाच वर्षामध्ये देखिल आंबेडकर नगर, भोलानगर, बंदरवाडी अशा झोपडपट्टयांचा विषय काढलेला होता. तुम्ही अनेक वेळा मिटींगमध्ये असे ऐकले असेल. आणि तुम्हाला असे आढळुन आले असेल की माझे जास्तीत जास्त झोपडपट्टी भागामध्ये लक्ष असते. त्याला मुख्य कारण असे आहे की, बिल्डींगमध्ये राहणारे मतदार खाली उतरत नाही. मी मोदी पटेल रोड या ठिकाणी निवडुन येउ शकलो नाही. परंतु, यापुढे तुम्हा सर्वांची इच्छा आणि सहयोग असेल तर मी निवडुन येउन देखील या ठिकाणच्या गरिब आणि दलित जनतेसाठी, मागासवर्गीय आणि झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांसाठी मी काम करु इच्छितो. मी गेल्या पाच वर्षापासुन माझा नगरसेवक निधी झोपडपट्टी प्रभागासाठी वापरलेला आहे. मग तो प्रभाग जय अंबे नगर असेल किंवा गणेश देवल नगर असेल किंवा डॉ. आंबेडकर नगर असेल किंवा मुर्धा खाडी असेल. आपण सगळ्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केलेले होते. मा. महापौरांकडुन एखादी चुक झाली. मला आणि सौ. नयना म्हात्रे यांना विनाकारण चार पाच दिवस फरार रहावे लागले होते. एक अत्यंत दुःखद घटना आहे की, या सभागृहात जी काही कोर्टाची लढाई होती आम्ही दररोज कोर्टामध्ये लढत असतो. आमच्या काहीही चुका नसताना देखील आमच्यावर गुन्हे दाखल झालेले होते. त्याच्यामध्ये मुख्य आरोपी वेगळेच होते. त्यावेळेला माझ्यावरसुध्दा गुन्हा दाखल झालेला होता मला आणि सौ. नयना म्हात्रे यांना देखिल लपुन राहावे लागलेले होते. माझी मी एक अंत्यत दुःखद घटना होती. कारण मी माझ्या जिवनात दलितांना कधीही शिवीगाळ केलेली नव्हती. परंतु, मी घटनेच्या विरोधात बोललो म्हणुन मला फरार रहावे लागलेले होते. ही एक या सभागृहातील माझी एक दुःखद घटना आहे मी ही घटना माझ्या जीवनात नेहमी माझ्या लक्षात राहणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना लिहिलेली आहे. आम्हाला सानेगुरुजींनी जे काही शिकवलेले होते. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जे काही अधिकार असतात.आम्हाला त्याबाबत राम मनोहर लोहिया साहेबांनी जी काही माहिती दिली, राजीव गांधी यांनी महिलांसाठी जो ३३ टक्के आरक्षणाचा अधिकार दिलेला होता. मागासवर्गीयांसाठी जी काही आरक्षणे दिलेली होती. आपण त्या माध्यमाने या ठिकाणी बसलेले आहेत.मी तुम्हाला फक्त एका गोष्टीची आठवण करुन देईल की, संपुर्ण महराष्ट्रामध्ये आरक्षणामधुन निवडुन आलेले नगरसेवक या सभागृहातुन बाहेर गेलेले आहेत. कारण त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र चुकीचे होते. मिरा भाईंदर महानगरपालिका अशी एक महापालिका आहे. की जिथे एकही नगरसेवक जात पडताळणी प्रमाणपत्रकामधुन बाहेर गेलेला नाही. म्हणजे तो नगरसेवक डिसकॉलिफाय झालेला नाही. या पुढे सुध्दा प्रत्येक राजकिय पक्षाने त्यांच्या त्यांच्या पक्षामध्ये एक लिगल सेल उघडावी आणि प्रत्येक उमेदवाराची जात पडताळणी प्रमाणपत्रकाचा अभ्यास करुन घ्यावा. तो नगरसेवक कुठल्याही पक्षाचा असला तरी माझा त्याच्याशी काहीही संबध नाही. मला जात पडताळणी प्रमाणपत्र समितीचा काम करण्याच्या पध्दतीचा थोडासा जास्त अनुभव आहे. कारण मी माझ्या समाजाला महाराष्ट्रामध्ये ओ.बी.सी मिळवु शकलो मी तुम्हा सगळ्या नगरसेवकांना एवढेच सांगु इच्छितो की तुम्ही एखाद्या उमेदवाराचे नाव देतांना त्या उमेदवाराच्या जात पडताळणी प्रमाणपत्राचा अभ्यास करा. जर आपल्याला त्या गोष्टीची गरज लागली तर तुम्ही मला निश्चीत आठवण करा. मी पक्ष बघणार नाही,. व्यक्ती बघणार नाही. मी सहकार्य करेन. परंतु, वेल इन ॲडव्हान्स सांगु इच्छितो की, आज किंवा उद्या इलेक्शन लागेल जर उद्या इलेक्शन असेल आणि तुम्ही मला मदत करण्यास सांगितले तर मी मदत करु शकणार नाही. मी एवढे बोलुन माझे दोन शब्द संपवतो जय हिंद, जय महराष्ट्र, जय भीम.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, सन २००२ मे इलेक्शन हुआ इसके बाद श्री. शिवमुर्ती नाईक साहब उप - आयुक्त थे। श्री. आर.डी. शिंदे साहब आयुक्त बने थे और उसके बाद श्री सुदामराव गायकवाड साहब आयुक्त बने है। प्रथम महापौर सौ. मायरा मेंडोसा मॅडम अभी के महापौर मॅडम सभी उप - आयुक्त सब अधिकरी वर्ग और पत्रकार बंधु इन सबको आज मै खास करके अभिनंदन देता हु। मै सभी अधिकारी और सदस्योंकी अभिनंदन देता हु की हमारे से जो आजतक गलती हुई है तो हम लोगो को माफ किजिए। दुसरी यह बात है की, हमारे प्रथम उप महापौर आमदार श्री. मुजफ्फर हुसेनसाहब थे। उन्होंने शहर के विकास के लिऐ जो काम किया था और उन्होने शहरका विकास कैसे करना है? यह बताया था मै उनका लाखो लाखो वंदन करता हु। हमारे दुसरे उप महापौर श्री. चंद्रकांत वैती साहब हमारे अध्यक्ष श्री. तुळशीदास म्हात्रे साहब और हम लोगो को श्री. सय्यद नुरजहाँ नझर हुसेनजी का आशिवार्द है। मैं इन सब लोगो को अभिनंदन करता हु और आनेवाले चुनाव मे मै सभि को एक भक्ती भावसे अशिवार्द देता हु इस सभागृह मे यह सब लोग पधारे थे। श्री. तुळशीदास

म्हात्रे साहबने जो बताया है की, काँग्रेस का झंडा लहरेगा वह थोडा ज्योतिष की हिसाब के ज्ञान से जानते है सब लोग ज्योतिष की बात करते थे कॉग्रेसका झंडा ज्योतिष के हिसाब से जरुर लहरेगा। जय हिंद जय महाराष्ट्र.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर महोदय, डायसवर बसलेले सर्व अधिकारी गण इथे बसलेले माझे सर्व सहकारी नगरसेवक, काँग्रेस पक्षाचे नगरसेवक, राष्ट्रवादी नगरसेवक, भाजपाचे नगरसेवक, जनता दलाचे नगरसेवक, शिवसेनेचे नगरसेवक यांनी आजपर्यंत सभा खेळीमेळीच्य वातावरणात पार पाडल्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार व्यक्त करतो. सन २००२ मध्ये निवडणुकीमध्ये निवडुन आल्यानंतर मिरारोडमध्ये जो विकास झालेला आहे. त्याच्यासाठी आम्हाला सर्व अधिकाऱ्यांनी जे सहकार्य केलेले होते. मी ते कधीही विसरणार नाही. आमचे प्रथम आमदार श्री. मुजफ्फर हुसेन, श्री. चंद्रकांत वैती आमचे जिल्हा अध्यक्ष श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब यांच्या सहकाऱ्यामुळे मिरारोडचा विकास झालेला आहे. मी त्यांचा आभारी आहे. सर्व नगरसेवकांनी वेळोवेळी सहकार्य केलेले होते. त्यामुळे आज मिरा भाईंदर शहर सर्वांच्या समोर आहे आताच सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी सांगितले की येणाऱ्या काळामध्ये जुन ६० टक्के नगरसेवक असतील आणि ४० टक्के नगरसेवक बाद होतील. ४० टक्के नगरसेवक निवडुन येतील अशी शंका असते. काही नगरसेवक मागच्या दोन टर्ममध्ये निवडुन आलेले होते. त्यानां असाच संशय झालेला होता. मागच्या वेळेला जे पहिल्या वर्गामध्ये निवडुन आलेले नगरसेवक होते तेच पुन्हा दुसऱ्या टर्ममध्ये निवडुन आलेले होते. तो तसा नियमच आहे. आपण ७९ नगरसेवक निवडुन येतीलच असे सांगु शकत नाही तर मी सर्वांना शुभेच्छा देतो. अधिकारी वर्ग क्लास वन, टू, थ्री या सर्वांना शुभेच्छा देतो. मी सर्वांचे आभार मानतो आणि धन्यवाद देतो. सर्व नगरसेवक/नगरसेविका यांचे परत आभार मानून मी माझे दोन शब्द संपवतो. जयहिंद जयमहाराष्ट्र.

**संगिता म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व सन्मा. सदस्य, सदस्या अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधू तसेच प्रेक्षक गॅलरीत बसलले सर्व नागरिक, सर्वांना मी काही वेडेवाकडे बोलले असेल तर क्षमस्व. मी जरा दोन शब्द बोलते जाता सोडून सकळ जनांनो सोडूनिया मायेचा पसारा, आठवण आमची करा.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम तुम्ही सगळ्याचे धन्यवाद अदा केलेले आहेत. या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नोकरीच्या हिशोबाने कायम राहणार आहे परंतु आम्हाला या सभागृहात पाचवे बसण्याची संधी या सभागृहाने दिली मी त्या सर्व मिरा भाईंदरच्या जनतेचे सर्व नगरसेवकांन तर्फे धन्यवाद अदा करीत आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो ) :-**

मा. महापौर श्रीम. निर्मला सावळे/कांबळे, मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती, सभागृहनेते, विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे गटनेते, या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सदस्या, पत्रकार बंधु गॅलरीमध्ये उपस्थित असलेल्या नगरिकांना मी सांगु इच्छितो की आजच्या महासभेच्या शेवटच्या कार्यकाळात या ठिकाणी गेल्या पाच वर्षाचे अवलोकन करण्यात आले तसेच या ठिकाणी विविध पक्षाच्या ज्येष्ठ सदस्यांनी जे विचार मांडले ती माझ्या आयुष्यातील आपल्या नगरपालिका क्षेत्रातील पहिली वेळ मी या ठिकाणी अनुभवलेली आहे. लोकशाही प्रणालीमध्ये निश्चितच लोकमुक्त प्रतिनिधी आणि प्रशासन ही विकासाचे काही वेगळे अंग नाहीत ही एकच अंग आहेत. एकमेकांचे प्रतिबिंब असे मी समजतो. या ठिकाणी आपण या कायद्याप्रमाणे जी लोकशाही प्रणाली स्विकारलेली आहे. जनतेकरीता जनतेचे निवडुन दिलेले हे सभागृह आहे. या शहरासाठी शासनाने ठरवुन दिलेल्या नियम आणि त्या कामामध्ये जे निर्णय होतात. या सभागृहाला ते निर्णय घेण्याची अपेक्षा होती आणि माझ्या कार्यकाळात ते उत्तम रित्या झालेली आहे तसेच तसेच यापुर्वी उत्तमरित्या झाल्याचे सदस्यांनी मांडलेले आहे. आणि मी स्वतः ते अनुभवलेले आहे. जे निर्णय झालेले हाते. त्या निर्णयाची अमंलबजावणी करण्यासाठी मी प्रशासन म्हणुन मा. आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन किंवा यापुर्वी काम केलेले मा. आयुक्त, माझे सहकारी आणि माझ्याबरोबर शेवटपर्यंत काम करणारे सर्व कर्मचारी यांना मी असे सांगु इच्छितो की आपल्या सर्व निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी तुम्ही कटाक्षाने आणि प्रमाणिकपणे प्रयत्न करता परंतु, काही ठिकाणी नैसर्गिक मधील असतात जर काही ठिकाणी कायद्याच्या मर्यादा असतात. आपण त्या सर्व मोठ्या अंतः करणाने निश्चितच समजुन घेतलेल्या आहेत आपणा सर्वांचा त्याच्यामध्ये मुख्य उद्देश म्हणजे समाजातील व्यक्तीची उन्नती करणे, आपल्या सर्वांची उन्नती करणे हा फक्त आपल्या सर्वांची धागा आहे असे आपण मानतो. या शहरामध्ये या सभागृहाला एक चांगले दृश्य पाहायला मिळालेले आहे. पु.ल.देशपांडे साहेबांचे एक गंगोत्री पुस्तक आहे. या पुढे पक्षविरोधी जाउन ज्या काही घडामोडी झालेल्या असतील तर त्या आम्ही प्रशासकिय स्तरावर मानत नाही. कारण, निश्चीतच एक मोठे गंगोत्र आहोत असे मला वाटते. हे काम करित असतांना स्थानीक स्वराज्य संस्था ह्या शहरी किंवा ग्रामीण भागातील असल्या तरी एक केंद्र स्तरीय राज्य आणि राज्यस्तरीय शासन याच्या खाली जे शासन आहे त्याचा मुख्य उद्देश मुलभुत सुविधा पुरविणे आणि त्याप्रमाणे या शहरासाठी या राज्यासाठी नेतृत्व तयार करणे असा आहे. हे सभागृह किंवा ही संस्था एक कार्यशाळा आहे. आणि मला या ठिकाणी जे प्रामुख्याने दिसुन आलेले आहे जर मला ह्याच्यामध्ये संधी मिळाली

तर ह्याच्यापुढे काम करण्याची क्षमता असलेले पदधिकारी या ठिकाणी दिसुन आलेले आहेत. मी कोणाचेही व्यक्तिश नाव घेण्यात वेळ घालवत नाही. परंतु, माझ्या नजरेत हे सभागृह खुप उच्च दर्जाचे आहे त्या ठिकाणी काम करतांना प्रशासनाकडुन जाणुन बुजुन कोणाचा कमीपणा करण्याचा किंवा गैर उद्देशाने काम करणे निदर्शनास आले असेल तर कृपा करुन ते विसरुन जावे. तशी अपेक्षा कुठल्याही कर्मचाऱ्याची नसते हे मी या ठिकाणी माझ्या सहकारींच्या वतीने नमुद करतो. आताच्या मा. महापौर श्रीम. निर्मला सावळे/कांबळे, माजी मा. महापौर मायरा मेन्डोसा मॅडम आणि या सर्व सभागृहाच्या प्रतिनिधींनी आम्हाला म्हणजे प्रशासनाला समजुन घेतले. काम करण्याची जी संधी दिली त्याबद्दल या सर्वांचे हार्दिक आभार मानुन मी प्रशासनाच्यावतीने माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस (सभागृह नेता) यांनी सुचवलेली सुचना अशी आहे की शांतीनगर येथील पाणीपुरवठा योजना हस्तांतरीत करणे यामध्ये आवश्यक वाटल्यास कायद्यानुसार कर्मचारी वर्गासह ही योजना हस्तांतरीत करावी अशी त्यांनी सभागृहापुढे मागणी केलेली आहे. संबधित सुचना मान्य करुन मी ठराव पारित करते.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मला तुमची सुचना समजलेली नाही. तुम्ही कर्मचाऱ्यांना घेणार आहात का?

**मा. महापौर :-**

आम्ही कायद्यानुसार कर्मचाऱ्यांना घेणार आहोत.

**रोहित सुवर्णा :-**

मा.महापौर मॅडम, तूम्ही एकदा रुलिंग दिले की ते कर्मचारी घेता येत नाही.

**मा. महापौर :-**

सभागृहाने मागणी केलेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी तुमचा खुप आदर करतो. तुम्ही जे काही झालेले होते. ते विसरुन गेलेले आहात. आज मी विषय महासभेपुढे आला . आज त्या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे. पुन्हा तोच विषय आलेला आहे. आमच्याकडील गोषवाऱ्यामध्ये त्या कर्मचाऱ्यांची यादी सुध्दा नाही. त्यांचे क्वालिफिकेशन नमुद केलेले नाही. त्या कर्मचाऱ्यांची नांवेसुध्दा नाहीत. ज्यावेळेला एस.आर.आय. आमचा विषय आला त्यावेळेला तुम्ही गोषवारा नाही असे बोलले.

**हॅरल बार्जीस (सभागृहनेते ) :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा तुम्ही सभागृहाचे गांभीर्य लक्षात घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

मी सभागृहाचे गांभीर्य लक्षात घेणार नाही.

**हॅरल बार्जीस (सभागृहनेते ) :-**

मा. माहापौरांना जे निवेदन करायचे आलेले ते करु द्या. तुम्हाला जे अपेक्षीत आहे ते तुम्ही नंतर बोला.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मिंटीग संपलेली आहे.

**हॅरल बार्जीस (सभागृहनेते ) :-**

सभा ७.०० वा. संपलेली आहे. तरी सुध्दा मा. महापौरांनी सदस्यांना बोलण्याची संधी दिलेली होती.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही रुलिंग दिलेले होते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा मी माझे शब्द मागे घेते.

**रोहित सुवर्णा :-**

ठिक आहे.

**मा. महापौर :-**

आदरणीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांच्या सविंधानामुळे प्रभाग क्र. १० मध्ये घोडबंदर येथे प्रथम राष्ट्रवादी पक्षातर्फे दि. १३ ऑगस्ट २००२ मध्ये निवडणुक होउन मिरा भाईंदरच्या नगरसेवक पदी जे निवडुन आलेले आहेत. मी प्रथम त्यांच्या विचारांना कोटी कोटी अभिवादन करते. प्रभाग क्र. १० घोडबंदर येथील जनतेने मला प्रथम निवडुन दिले मी त्या जनतेचे आभार मानते आदरणिय राष्ट्रवादीचे अध्यक्ष मा. श्री. शरदचंद्रजी पवार, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. विलासरावजी देशमुख साहेब यांच्या विचाराने भारावुन जाउन आम्हाला प्रथम राजकारणात येण्याची संधी मिळाली. तसेच अडीच वर्षानंतर मिरा भाईंदर शहरामध्ये एका मागासवर्गीय महिलेला आरक्षणाचा लाभ मिळाला तो केवळ या राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री , पालक मंत्री आदरणीय श्री. गणेशजी नाईक साहेब, उपसभापती

आदरणीय वसंत डावखरेसाहेब, तेसच या शहराचे स्थानीक आमदार मा. श्री. मुजफ्फर हुसेन साहेब, या शहराचे प्रथम नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेन्डोसा साहेब, प्रथम महिला महापौर सौ. मायरा मेन्डोसा यांनी राष्ट्रवादी पक्षातील महापौर पदी नियुक्ती व्हावी म्हणुन निवड केली. तसेच या सभागृहातील सर्व संबधित सर्व पक्षाचे राष्ट्रवादी पक्षाचे, काँग्रेस पक्षाचे सर्व नगरसेवक, भाजपाचे नगरसेवक, शिवसेनेचे सर्व सन्मा. नगरसेवक, जनता दलाचे नगरसेवक, अपक्ष नगसेवक यांनी बहुमानाने एकमताने माहापौर पदामध्ये योगदान आहे. मी संबंधित नगरसेवकांचे आभार मानते. कारण कारभार करित असतांना सर्व नगरसेवक आणि सर्व पदाधिकारी, मा. आयुक्त, सन्मा. सचिव मा. उप आयुक्त या सर्वांनी चांगल्याप्रकारे सहकार्य केल्याबद्दल मी त्या सगळ्यांचे या ठिकाणी मनःपुर्वक आभार मानते आपण शहराचा विकास करीत असतांना मला फार मोठ्या प्रमाणात जे सहकार्य केले. खरोखरच माझे मोठे भाग्य आहे की, मला या शहराची अडीच वर्षे आपल्या सर्वांच्या माध्यमातुन जी संधी मिळाली या संधीच्या माध्यमातुन शहराचा विकास करीत असतांना मी तुमच्यासमोर काही ठळक वैशिष्ट्ये मांडु इच्छिते की मिरा भाईंदर शहर हे महाराष्ट्रातील प्रथम असे शहर आहे की आपण ज्या शहरामध्ये सर्वांनी एकमताने घनकचरा प्रकल्प कार्यान्वीत केला. एक शिक्षिका या नात्याने अधिकारी आणि सर्व सन्मा. सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे आपण शाळेतसुध्दा फार मोठ्या प्रमाणात प्रगती घडवुन आणली. आपण काही ठिकाणच्या कौलारु शाळांचे इमारतीत रुपांतर संगणकीकरण केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणुन आपण त्यांना दरवर्षी गणवेश पोषक आहार उपलब्ध करुन दिला. सध्या शहराला ८६ एम.एल.डी पाणी मिळत आहे. परंतु, वाढती लोकसंख्या असल्यामुळे ते पाणी काही प्रमाणात अपुरे पडत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी ३५ एम.एल.डी पाण्याचा प्रस्ताव मंजुर केलेला होता. शासनाकडुन त्या प्रस्तावाची मंजुरी होउन आपण लवकरच त्या प्रस्तावाची मंजुरी होउन आपण लवकरच तो प्रस्ताव जनतेच्या सर्वसाठी अर्पण करणार आहोत. ग्रामपंचायत काळापासुन असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग आपण त्याची पदोन्नोती केलेली आहे. तसेच शहरातील ठिकठिकाणचे रस्ते, नाले, गटार, चौक, रिंग रुट या सगळ्याची शक्य होईल. तेवढी विकासकामे सर्व नगरसेवकांनी, सर्व पक्षांच्या सदस्यांनी तसेच अधिकाऱ्यांच्या मान्यतेने आपण केलेली आहेत. बालवाडी शिक्षीका तसेच शाळेमधील शिक्षकांची जी कमी पदे आहेत आपण ती पदे भरण्याचा प्रस्ताव पारित केलेला आहे. महानगरपालिकेच्या हद्दीमधील घरांच्या करांमध्ये सवलती देवुन मोठ्या प्रमाणात कराची वसुली या वर्षी केलेली आहे. सुवर्ण जयंती स्वयंरोजगारच्या माध्यामातुन शहराता १००० पेक्षा अधिक बचत गट निर्माण करुन आपण महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच त्यांना कर्जाची माध्यमे उपलब्ध करुन देवुन आपण महिलांना सक्षम करण्याचा या माध्यमातुन प्रयत्न केलेला आहे. अडीच वर्षाच्या कारकीर्दीत प्रथमच मिरा भाईंदरमध्ये अग्रीम तसेच विकासाची कामे मोठ्या प्रमाणात झालेली आहे. त्याच्यामध्ये विशेष म्हणजे परिवहन उपक्रम हा ह्या अडीच वर्षाच्या कारकिर्दीत सुरु झाला. तसेच आपण विविध प्रभाग समित्यांची स्थापना केलेली आहे आपण शिक्षण मंडळ स्थापना करून शहर आणि शाळांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण परिवहन समिती आणि प्रभाग समितीची स्थापना केलेली आहे तसेच विशेष समित्यांमध्ये शिक्षा समिती आरोग्य समिती, गलीच्छ वस्ती निर्मुलन, सांस्कृतीक समाजकल्याण समितीची स्थापना केली तसेच आपण चार महिन्यापुर्वी विधी समिती आणि पाणीपुरवठा समितीची स्थापना करुन सर्व सदस्यांना समावुन घेउन त्यांना काम करण्याची संधी दिली. शासनामध्ये एक केद्रिंकरण नसुन सर्वांना विभाग वाटुन देवुन प्रत्येकाला कामाची जबाबदारी देवुन आपण त्यांना त्यांचे अधिकार प्राप्त करुन दिलेले आहेत. मिरा रोडला सुसज्ज हॉस्पीटलचे निर्माण सुरु आहे. हे आपल्या सर्वांच्या मान्यतेनुसार होत आहे. तसेच आपल्या आवारा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अधिकृत पुतळ्याचे अनावरण नुकतेच झालेले आहे. आणि या शहरामधील जनता सुजाण, जागरुक आणि सुसज्ज व्हावी. त्यासाठी आम्ही शहरामध्ये ठिकठिकाणी वाचनालयाचे सुरु केलेली आहे आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने जैसल पार्क चौपाटी ताब्यात आलेली आहे. मिरा भाईंदर शहरातील भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) ला रेल्वेला जोडण्याऱ्या सबवेसाठी महासभेने मंजुरी दिलेली आहे. आपण शिवार गार्डनसारखा सुंदर प्रोजेक्ट बी.ओ.टी तत्वावर राबवणार आहोत. आपल्या शहरासाठी ही एक आदर्शाची गोष्ट आहे. आपल्या शहरामध्ये नगररचना विभागाचे अधिकारी श्री. दिलीप घेवारे यांनी आतापर्यंत जी आरक्षणे ताब्यात घेतलेली आहेत ती आरक्षणे विकसित व्हावीत तिथे अतिक्रमण वाढु नये. म्हणुन आपण त्या आरक्षणे लिझवर देवुन आपला सर्वांला ती आरक्षणे लवकरात लवकर विकसीत करण्याचा मानस आहे. आपण उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे म्हणुन आपण शहरात जकात फंड वसुल करित आहोत. ज्याप्रमाणे शाळेतील विद्यार्थी शिकुन बाहेर पडतो. आपणही त्याप्रमाणे या पाच वर्षामध्ये फार मोठा दांडगा अनुभव घेतलेला आहे. आपण शहराच्या पुढिल प्रगतीसाठी अजुनही सुसज्ज झालेले आहोत. शहरामधील खेळाडुंना ठिकठिकाणी प्रोत्साहन मिळावे म्हणुन आपण दरवर्षी महापौर चषक म्हणजे मिनी मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत करुन शहराला एक वेगळी दिशा देतो. गेल्या वर्षी २६ जुलैला अतिवृष्टी झालेली होती. सगळीकडे पाणी भरल्यामुळे मोठ्या प्रमाणात रेगराई तसेच डेंग्युचा प्रसार झालेला होता. मध्यतंरीच्या काळात बॉम्बस्फोटामुळे मृत पावलेले आणि जखमी झालेल्या नागरिकांना मदत करता यावी म्हणुन आपण आपातकालीन महापौर निधी उपलब्ध करुन दिलेला होता. आपण या आपातकालीन व्यवस्थेतुन शक्य होईल तेवढी मदत जनतेला पुरवलेली आहे. या अगोदर काळापासुन मिरारोड येथे हिंदु, मुस्लीम आणि ख्रिश्चन लोकांची स्मशानभुमी आहेच परंतु आम्ही हा उपक्रम नगरसेवक असल्या काळापासुन घोडबंदर येथे सुध्दा सुरु केलेला होता. घोडबंदर येथे हिंदु, मुस्लीम व

ख्रिश्चन लोकांची स्मशानभुमी तयार करुन ती जनतेच्या सेवेसाठी तयार करुन ती सुसज्ज स्मशानभुमी जनतेच्या सेवेसाठी ठेवलेली आहे. आपण जवाहरलाल नेहरु अर्बन मिशन याद्वारे प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे लवकरात लवकर मंजुरीसाठी पाठवलेला आहे. इत्यादी कामे करीत असतांना आपल्या सर्व नेते मंडळींचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष, जनतेचे सर्व पक्षातील नगरसेवकांचे तसेच अधिकारीवर्ग आणि पत्रकार बंधु या सर्वांचे सहाकार्य लाभल्यामुळे आपल्याला या मिरा भाईदरची पाच वर्ष सेवा करण्याचा आनंद आणि अधिकार मिळालेला आहे. हे आपले भाग्यच आहे. जनतेची सेवा करित असतांना आपण कूठेही कसुर केलेली नाही मला या ठिकाणी हे प्रामाणीकपणे सांगावेसे वाटते. आपण सर्वांनी एकमताने कधी विरोधात जाउन तर कधी सहकार्य करुन सर्व ठराव महासभेमध्ये पारित केलेले आहेत. जनतेच्या विकसासाठी एक कार्यकर्ता एक समाजसेवक म्हणुन आपण यापुढे समाजसेवेच्या क्षेत्रामध्ये राहुन जनतेच्या समस्या सोडवण्याचा आपला सर्वांचा सदैव प्रयत्न राहिल आणि माझासुध्दा प्रयत्न राहिल या ठिकाणी प्रेक्षक गॅलरीत उपस्थित असलेली जनता, पत्रकार बंधु यांचेसुध्दा मी आभार मानु इच्छिते की आपण दाखवलेले प्रेम, आशिर्वाद आणि आपण दिलेली शक्ती म्हणुनच आम्ही चांगल्याप्रकारे कारभार करु शकलो त्याबद्दल आम्हाला नक्कीच आनंद होतो की आमच्या पाठीशी आपल्या सारखी शक्ती असल्यामुळे आम्ही अडीच वर्षे महापौर पद चांगल्याप्रकारे निभावलेले आहे. यामध्ये आपल्या सर्वांचे अशाप्रकारे चांगले सहकार्य लाभलेले आहे म्हणुन पुन्हा एकदा आपणा सर्वांचे आभार मानतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**सभा संपल्याची वेळ :-संध्या ७.०० वाजता.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सही/-**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**